नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६



चित्र : मंगेश नारायणराव काळे

अनुक्रमणिका



मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष : ७१ वे


जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक

युगवाणी

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६

संपादक
डॉ. अजय देशपांडे



मुखपृष्ठ मलपृष्ठ व आतील रंगीत चित्रे :
मंगेश नारायणराव काळे
४-व,आनंदमयी हौसिंग सोसायटी बी विंग, हॉटेल वरुणराज शेजारी,
एरंडवणा, कर्वे रोड, पुणे - ४११०४ भ्रमणभाष : ९७६६५९४१५४

रेखाचित्रे :
प्रा. वसंत आबाजी डहाके भ्रमणभाष : ०७२१-२६६२७०३
विजयराज बोधनकर भ्रमणभाष ९९२०४११८२८
प्राचार्य सदानंद बोरकर भ्रमणभाष : ९०२१३३३६३३, ९४०४११६६२४

मांडणी, सजावट, अक्षरजुळवणी व मुद्रण :
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, वणी, जि.यवतमाळ

मूल्य : शंभर रुपये

वार्षिक वर्गणी : २०० रुपये

ISSN - 2319-6092

प्रकाशक
डॉ. विलास चिंतामण देशपांडे
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७, ९९६००३११४८

वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता दूरध्वनी : ०७१२-२५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ. अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

www.yugwanivss.com
www.facebook com/yugwani.ank@gmail.com

अनुक्रमणिका

संपादकीय

■

विदर्भ साहित्य संघ ही संस्था शताब्दीकडे वाटचाल करीत आहे. त्र्याण्णव वर्षांच्या या संस्थेने भाषा, संस्कृती, वाङ्मय आणि कला या क्षेत्रात लक्षणीय अशी कामगिरी केली आहे. या संस्थेच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकाने यंदा एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे. सात दशकांच्या या वाटचालीत कुठल्याही नियतकालिकाच्या वाट्याला येऊ शकतील असे पडझडीचे अनेक प्रसंग 'युगवाणी'वरही आलेत, पण प्रतिकूल परिस्थितीतही लढा सुरूच राहिला, कधी प्रकाशनसातत्य काही काळापुरते खंडितही झाले, पण हे नियतकालिक संपले नाही, उलट दर वेळी नवी झेप या नियतकालिकाने घेतली आहे.

एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या नियतकालिकासमोर आताही नवी आव्हाने आहेत.

वाङ्मयीन नियतकालिकांसह एकूणच भाषा, संस्कृती, वाङ्मय व कला व्यवहार यांवर संपूर्णपणे पकड घेण्याचे प्रयत्न गेल्या काही वर्षात बाजारू, गल्लाभरू अर्थसत्ता करीत आहे. सारेच व्यवहार ग्राहक आणि विक्रेता अशाच संबंधाने बांधले जावेत आणि एकूणच समाजजीवनातून नीतिमत्ता, विचार, तत्त्वे हद्दपार व्हावीत, सत्तालंपटता आणि चंगळवाद तेवढा उरावा यासाठी एक समांतर व्यवस्था सतत कार्यरत असल्याचे दिसत आहे. वाङ्मय आणि कलाव्यवहारात मानाचे तर नाहीच पण नाममात्रही स्थान नसणाऱ्या संवेदनशून्य आणि अभिरुचीशून्य अशा स्वनामधन्य प्रवृत्तींनी सांस्कृतिक दहशतवादाच्या सूत्रधारांसमोर व नीतिमत्तेचा कडेलोट करणाऱ्या अर्थसत्तेसमोर लाळ गाळत शेपूट हालविण्याचे अगतिक धोरण राबविल्यामुळे वाङ्मयीन नियतकालिकांसह एकूण लेखनविश्व व कलाविश्व यांचेवर समाजाची कलामूल्ये व जीवनमूल्ये संवर्धित करण्याची मोठी जबाबदारी समकाळात आली आहे. धर्माधिष्ठित सांस्कृतिक दहशतवादावर विवेकवादी, विज्ञानवादी लोकशाही विचारांनीच अंकुश मिळवता येणे शक्य आहे. अशावेळी नियतकालिके, परिसंवाद, व्याख्याने, संमेलने, मेळावे, प्रदर्शने आदी सर्व विचारपीठांवरून विवेकवादी प्रबोधनविचार प्रवाहित करण्याची गरज आहे. नीतिमत्तेच्या विचारांचा कणा आणि भूमिका नसणाऱ्या प्रवृत्ती जेव्हा कलाव्यवहार आणि वाङ्मय व्यवहारांच्या केंद्रस्थानी सत्तासूत्रे हाती घेऊन असतात तेव्हा परिघावर किंवा परिघाबाहेर ठेवण्यात आलेल्या विवेकवादी - लोकशाहीविचारांच्या माणसांसमोर मोठा संघर्ष करण्याशिवाय पर्याय नसतो. या रणधुमाळीत वाङ्मयीन नियतकालिकांनी लोकशाहीवादी, विवेकवादी प्रबोधनविचारांच्या आणि तो विचार घेऊन विचारांची लढाई विचारांनीच लढणाऱ्यांच्या सोबत असण्याची गरज असते. 'युगवाणी' हे नियतकालिक गेल्या सत्तर वर्षांपासून विचारांची लढाई विचारांनीच लढणाऱ्यांच्या बाजूने उभे राहिले आहे. वाङ्मय आणि कलाव्यवहाराची मुस्कटदाबी होत असलेल्या समकाळात भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद, कला, अभिरुचीचे संवर्धन करीत या नियतकालिकाने लोकशाहीमूल्यांचाच स्वीकार, प्रचार, प्रसार व जयघोष केला आहे.

संपूर्ण सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तव त्यातील चांगल्यावाईट वृत्तीप्रवृत्तींसह, मूल्यनिष्ठा व मूल्यभ्रष्टतेसह कला व वाङ्मय व्यवहाराचा चिंतनाचा विषय असते. या चिंतनातून उदात्त मूल्ये, नीतिमत्तेचा विचार यांच्या साह्याने अपप्रवृत्ती व भ्रष्टतेचा बिमोड कसा करायचा ते ठरवायचे असते. हे ठरवणे आणि कृतीत आणण्याचे कार्य वाङ्मयीन नियतकालिकांच्या विचारपीठांच्या संगतीने, साक्षीने आणि सहकार्याने होत असते. म्हणून 'युगवाणी'सारखी वाङ्मयीन नियतकालिके जिवंत राहण्याची नितांत आवश्यकता असते. लेखकांनी सत्यप्रतिपादन करणारे, लोकशाहीविचारांचा स्वीकार, प्रचार, प्रसार करणारे विवेकवादी लेखन करूच नये आणि 'युगवाणी'सारखी नियतकालिके निघूच नये असा बंदोबस्त करणाऱ्या प्रवृत्ती वाङ्मय आणि कलाव्यवहाराची सूत्रे आपल्या हाती राहावी म्हणून सतत धडपड आणि तडफड करीत असतात त्यांचाही बिमोड नीतिमत्ता, सदाचार, लोकशाहीविचार आदींनीच करायचा असतो. सत्तर वर्षांच्या काळात असे कित्येक हल्ले 'युगवाणी'ने लेखक कलावंतांचे निरपेक्ष सहकार्य घेऊन यशस्वीपणे परतवून लावले. आगामी काळ यापेक्षाही मोठ्या आव्हानांचा असल्याने विवेकवादी प्रबोधन विचारांवरची निष्ठा अविचल ठेवून 'युगवाणी'ला निकराने लढावे लागणार आहे.

एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या वाङ्मयीन नियतकालिकास मनःपूर्वक सदिच्छा.

। अजय देशपांडे

अनुक्रमणिका



अ नु क्र म

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६

अनुक्रमणिका

लेखक - कलावंतांचा एल्गार

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

■

सुधारकांचे अग्रणी, महराष्ट्रांतील आधुनिक विवेकवादाचे शिल्पकार आणि प्रबोधनाचे एक अग्रदूत गोपाळ गणेश आगरकर असे म्हणाले होते की, ''सांप्रतचा काळ सुधारणांसाठी अनुकूल आहे''. सांप्रताचा म्हणजे त्यांच्या वेळेचा, म्हणजेच ब्रिटिशांचे राज्य असणारा काळ. याचा अर्थच पुढे राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी ते सामाजिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनुकूल असणार नाही यांची पूर्ण जाणीव सुधारकांना होती आणि म्हणूनच गोपाळ गणेश आगरकर असाते की, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी असोत की महात्मा फुले, र. धों. कर्वे असोत वा प्रबोधनकार ठाकरे किंवा साने गुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या साऱ्याच सुधारकांचा, प्रधोधनकर्त्यांचा भर हा राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही अधिक सामाजिक - सांस्कृतिक परिवर्तनावर होता. अगदी लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा व महात्मा गांधींचा रोष पत्करूनही त्यांचा तो भर कायमच होता.

सामाजिक मुक्ती, आर्थिक गुलामगिरीतून मुक्ती, धार्मिक सुधारणा, विवेकी, सहिष्णू, जाती आणि वर्गविहीन समाजरचना या शिवाय सनातनी पगडा असणाऱ्या समाजातील राजकीय स्वातंत्र्याला फारसा अर्थ असणार नाही हेच या मंडळीचे प्रतिपादन होते. एवढेच नव्हे तर राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीपेक्षा देखील ते काम अग्रक्रमाचे होते असे त्यांचे मत होते आणि ब्रिटीशांचा काळ त्यासाठी अनुकूल होता, असे त्यांच्यापैकी महात्मा फुले, आगरकरासारख्यांना वाटत होते. त्योच कारण श्रद्धेच्या अतिरेकाने अंधश्रद्धेला देखील श्रद्धा व धर्म समजणारा जो भोळा भाबडा समाज, त्याचे यथायोग्य परिवर्तन झाले नाही तर स्वातंत्र्यातील ज्या राजकर्त्यांपैकी विषम समाजरचना कायम टिकवण्यातच ज्यांचे हितसंबंध सुरक्षित राहतील त्यांना व अशा समाजाच्या सत्ताप्राप्ती ही सुलभ असल्याची जाणीव असणाऱ्यांना तो विषम समाज आयताच उपलब्ध होईल आणि तो तसाच टिकवण्याचीच त्यांची ती गरज होऊन बसेल आणि अशा समाजात पुढे महात्मा गांधी व आता दाभोळकर, पानसरे, कलबुर्गीसारखांचे जे खून पाडले गेले तसे ते पडत राहतील, हे भान द्रष्ट्या सुधारकांना होते.

धर्म, जात, श्रद्धा, ईश्वरावरील विश्वास व त्याच्या नावावर चालणारे व्यवसाय - उद्योग यांना शरण जाण्यापेक्षा बुद्धिप्रामाण्य, विवेक, सहिष्णुता, सर्वधर्मसमभाव, जाती व्यवस्थेचे, अंधश्रद्धांचे निर्मूलन आणि धर्माचे खऱ्या अर्थाने असणारे व्यक्ती व लोककल्याणाचे आध्यात्मिक उद्दिष्ट समाजाला शिकवणे आवश्यक होते. भाऊजी दप्तरींनी म्हटल्याप्रमाणे धर्म हे इहलोकाच्या सुखाचे साधन असणे, ते विषमता निर्मूलनाचे साधन असणे हे जाणण्याचा शहाणपणा

अनुक्रमणिका

बाळगणारा समाज निर्मिण्याच्या सुधारकांच्या, प्रबोधनकर्त्यांच्या उद्दिष्टांकडे राजकीय पक्षांपेक्षा व केवळ राजकीय सत्ताप्राप्ती म्हणजे स्वातंत्र्य समजण्याची चूक ज्यांनी ज्यांनी केली त्यांच्या त्या चुकीचे फळ म्हणून विषमतेचे तत्त्वज्ञान हे समतेच्या, परिवर्तनाच्या तत्त्वज्ञानाच्या विचारांच्या, आचारांच्या जागी आज अधिक प्रतिष्ठित झाले आहे.

स्वकीयांच्या हाती राजकीय स्वातंत्र्य पडण्याअगोदरच शक्य तेवढ्या सुधारणा व त्यांना कायद्याचे पाठबळ ब्रिटीशांच्या काळातच करून घेणारा दबाव निर्माण करणे तुलनेने अधिक सोपे होते. स्वकीयांच्या हाती राजकीय स्वातंत्र्य येईल तेव्हा ते सुधारित, प्रबोधित, विवेकी, समताधिष्ठीत आणि शोषणाचा अंत करू इच्छिणाऱ्या वृत्तीच्या बहुसंख्य अशा समाजामार्फत आले तरच या देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या लोकशाहीत विवेकी, सहिष्णू व समताधिष्ठीत समाज रचनेचा दबाव राजसत्तेवर राहू शकेल असे या सुधारकांना वाटत होते. कारण या देशाचा प्रश्न मुळातच राजकीय नसून, सामाजिक आहे यावर विवेकानंद, टागोर, म. फुले, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एकवाक्यता आहे. तसे न झाल्याने स्वातंत्र्यानंतरचा भारतीय समाज हा वेगाने, सनातन्यांसाठी अगोदरच तयार असलेल्या वृत्ती-प्रवृत्तीचाच व श्रद्धा-अंधश्रद्धांचाच समाज अधिक असल्याने, सनातन्यांना त्यांच्या बाजूने तो वळवण्यासाठी फारसे कष्ट घ्यावेच लागले नाहीत.

राजसत्ता ही अशाच पुरेशा परिवर्तित, प्रबोधित व समताधिष्ठित न झालेल्या समाजातील लोकांमधूनच आल्याने सत्ता टिकवण्यासाठी लोकमानस हे आहे तसेच टिकणे-टिकवणे व त्यांना परिवर्तित करण्याचे, विवेकी करण्याचे, सहिष्णू करण्याचे, तशी संस्कृती निर्मिण्याचे, धर्मचर्चांना त्या पद्धतीच्या प्रागतिक दर्शनांची जोड देऊन चर्चा घडविण्याचे राजकारण या देशातील कोणत्याच राजकीय पक्षाने फारशा गांभीर्याने, आपला सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय कार्यक्रम या स्वरूपात कधीच राबविले नाही. स्वातंत्र्यानंतर सुधारकांचा, परिवर्तनवाद्यांचा, विवेकवाद्यांचा, सहिष्णुता व धर्मनिरपेक्षतावाद्यांचा अधिकच छळ करण्याचे बळ आणि लोकशाहीच्या नावाखाली तसे करण्याचे कायदेशीर स्वातंत्र्यच त्यामुळे सनातन्यांना, मूलतत्त्ववाद्यांना, असहिष्णू लोकांना, विषमतावाद्यांना व धर्म हे लोकांच्या कल्याणाचे साधन करण्यापेक्षा ते उपजीविका, व्यवसाय, उद्योगाचे व मते मिळवण्याचे साधन करू इच्छिणाऱ्यांना अधिक प्रमाणावर प्राप्त झाले. हे असे होणारच होते. दे द्रष्टेपण सुधारकांजवळ होते व त्यामुळे सामाजिक सुधारणांशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही अशी ठाम श्रद्धा असणाऱ्या विवेकानंद, टागोर, आगरकर-रानडे-लोकहितवादी, महात्मा फुले-प्रबोधनकार ठाकरे - डॉ. बाबासाहेब आंबेडकर - साने गुरुजी या विचार परंपरेचेच अगोदर या वादात खरी सरशी ही सुधारकांची आणि खरा पराभव हा राजकीय स्वातंत्र्य आणि त्यायोगे आलेली सत्ता हेच सर्वस्व मानणाऱ्या विचारसरणीचाच झाला आहे. पण त्याचा लाभ मात्र तिसऱ्याच म्हणजे असहिष्णुतावादी शक्तींना झाला आहे.

या साऱ्या सुधारकांच्या लढ्याला विवेकी राष्ट्रवादाचा व सामाजिक दास्यमुक्तीच्या स्वातंत्र्ययुद्धाचा दर्जा न देता उलट त्यांना राष्ट्राचे, समाजाचे द्रोही ठरविण्यापर्यंत ज्या सत्ताकांक्षी, राजकारणी, राजकीय पक्ष, विचारवंत, पत्रकारांची मजल गेली ते समाजाच्या आजच्या असहिष्णू, अविवेकी स्थितीसाठी आणि धर्मसापेक्ष राष्ट्रवादाला प्रतिष्ठा लाभणारे वातावरण निर्माण करण्यासाठी, प्रामाणिक सनातनी अथवा असहिष्णू, अविवेकी, तथाकथित धर्मराष्ट्रवाद्यापेक्षाही अधिक जबाबदार ठरतात. कारण त्यांना आपले काँग्रेस सारखे पक्ष, आपली यंत्रणा, दीर्घकाळापर्यंत लाभलेली सत्ता या साऱ्यांचा वापरच त्यांना हवे त्या पद्धतीने इहवादी, अंधश्रद्धामुक्त, विवेकी, सहिष्णू, सर्वधर्मसमभावाधिष्ठीत राज्य आणि राष्ट्र निर्माण व्हावे यासाठी ना वापरता आली ना ती वापरण्याची राजकीय इच्छाशक्ती निर्माण करता आली, ना ती निर्माण करण्याचा अग्रक्रम त्यांनी कधी बाळगला.

डाव्या, समाजवादी व पुरोगामी म्हणवणाऱ्या पक्ष आणि संघटना यांनी तर पुढे मार्क्सवाद ज्या सांस्कृतिक साम्यवादाच्याच मांडणीच्या पायावर टिकला तो सांस्कृतिक साम्यवाद फारसा समजूनच न घेता केवळ 'आर्थिक' साम्यवादाच्या पोथीनिष्ठ पोपटपंचीच्या पलीकडचे देशातले प्रचंड मोठे, खऱ्या अर्थाने धार्मिक, दांभिक अर्थाने धार्मिक, खऱ्या अर्थाने आध्यात्मिक, दांभिक-आध्यात्मिक तसेच खरे धर्म आणि संस्कृतीचे क्षेत्र, जात वास्तव, धर्मचर्चा, धर्मचिकित्सा हे तर कधीच आपले राजकीय कार्यक्षेत्रच मानले नाही. परिणामी या प्रचंड मोठ्या प्रमाणावरील लोकांच्या प्रत्यक्ष सहभागाचे हे क्षेत्र वापरून लोकसंवादी होण्याचा कार्यक्रमच त्यांचा नव्हता त्यामुळे हे आयतेच कोणताही दार्शनिक, वैचारिक, तात्त्विक सामना खेळावा न लागता व त्यासाठी हे आयतेच कोणताही तथाकथित 'धर्मांध', 'जात्यंध', 'उजव्या', 'प्रतिगामी' इत्यादी समजल्या जाणाऱ्यांनाच त्याचे 'राजकीय' क्षेत्र म्हणून दत्तक मिळाले.

त्यांनी कुठे कुठे कशी कशी 'घुसपेठ' केली हे सांगत

बसणारी केवळ चर्चा व तीही आपसातच करीत आणि ते कसे 'धर्मांध', 'जात्यंध' आणि अमुक-तमुकवादी आहेत हे परस्परांना सांगण्यापलीकडे फारसे कुणी गेले नाही. त्या मंडळींनी याच राज्य घटनेने दिलेल्या लोकशाही स्वातंत्र्याचा भारतीय राज्यघटनेला पूरक नसणाऱ्याही विचार, आदर्श, मूल्ये व मतांच्या पुरस्कारासाठी ज्या हिरीरीने, व्रतस्थपणे, निष्ठेने, असंख्य संघटना, गट, कळप, अगदी कुटुंब पातळीपर्यंत जात जात ज्या प्रचारतंत्राने सातत्याने उपयोग करून घेतला तसा या देशातल्या पुरोगामी, डावे, समाजवादी, लोहिया-आंबेडकर-शाहू-फुलेवादी म्हणवणाऱ्यांना का करून घेता आला नाही, याचा विचार करण्याची वेळ आता तरी आली आहे असे खरोखरच मनापासून या साऱ्यांना वाटते आहे काय?

'त्यांनी' का व कसे केले यापेक्षा आपले काय व कसे झाले यांचे आत्मताडन विवेकवादी, सहिष्णू, डाव्या, समाजवादी, आंबेडकरवादी इत्यादी शक्तींनी, मंडळींनी कधी करायचेच नाही काय?

डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे, गोविंदराव पानसरेंचे, डॉ. कलबुर्गींचे बलिदान त्यासाठी कामी यावे. त्यासाठी केवळ भावनोद्रेकावर न भागवता, केवळ पूर्णपणे पातळ झालेला एक कायदा संमत झाल्याने व काही संस्था-संघटनांवर बंदी घालण्यापुरता त्यांच्या झालेल्या खुनाचा संदर्भ मर्यादित करून चालणार नाही. कारण नरेंद्र दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी हे आगरकर - फुले - रानडे - आंबेडकर - साने गुरुजी या मालिकेतलेच कालपर्यंत आपल्यात असलेले एक कर्ते सुधारक होते. त्या सुधारणांचा वसा पुढे अधिक संघटितरित्या व प्रभावीपणे कसा चालवता येईल याचा विचार करण्यासाठी सामूहिक शहाणपण संघटित करून वापरले गेले पाहिजे.

नागपूरच्या एका सभेत डॉ. श्रीनिवास खांदेवाले म्हणाले होते त्याप्रमाणे दाभोळकरांची हत्या कोणी केली यापेक्षाही ती का झाली त्याच्या कारणांचा शोध घेणे खरोखरच महत्त्वाचे आहे. तो तसा घ्यायचा तर उपरोल्लेखित वास्तवाचा अधिक विस्ताराने विचार करण्याची गरज आहे. दाभोळकरांच्या खूनाच्या पार्श्वभूमीवरील लोकमत - आयबीएनच्या चर्चेत बोलणारे एकजण म्हणाले होते की, मशीद पाडल्यानंतरच्या महाराष्ट्राच्या राज्यपालांकडे आयोजित संपादकांच्या एका बैठकीत रिबेरो म्हणाले होते की, ''पोलिसही धर्मांध बनतो आहे'', मिलिंद मुरुगकर म्हणाले होते, ''हिंदूंना आक्रमक करणे ही रणनीती आहे, बहुसंख्यांकांची, ते अन्यायग्रस्त असण्याचा दिशाभूल करणारा प्रचार करून असहिष्णूता वाढवायची व त्या योगे त्या रणनीतीला बळ प्राप्त करायचे असे चालले आहे''. हरी नरके म्हणाले होते, ''मतांसाठी जात संघटनांना संरक्षण दिले जाते. फुले-शाहू-आंबेडकरांच्या नावाने देखील कार्य करणाऱ्यांच्या मधून दहशत पसरवणारे निर्माण होत आहेत. धर्मांध, जात्यंध एकत्रच तपासले पाहिजेत'', निवृत्त पोलीस अधिकारी इनामदार म्हणाले होते, ''झुंडशाहीला सर्वच प्रोत्साहन देत आहेत. १५३ कलमाखालच्या मंजुरीचा अधिकार शासनाने, राजकारण्यांनी जाणून-बुजून आपल्या हाती ठेवला आहे. घटनाविरोधी वक्तव्यांवर त्यामुळे कारवाई होत नाही. केवळ सरकारच नव्हे तर समाजही अपयशी ठरला आहे''. पुष्पा भावे म्हणाल्या होत्या, ''कोण काय करते आहे यात समाजाने लक्ष घालायला हवे''. जितेंद्र आव्हाड म्हणाले होते, ''अशा खुनांच्या कृतीमागे माथी भडकवण्याचे काम चालू असते. कृतीमागच्या विचारावर लक्ष केंद्रित करायला हवे''. सरतेशेवटी श्रोत्यांपैकी ९५ टक्के लोकांचा कौल हा धर्मांध शक्तींना हाताळण्यात सरकार कमी पडले आहे हा होता. सरकार ही एक सातत्यपूर्वरितीने अस्तित्वात असणारी यंत्रणा असते. पक्ष कोणता आहे यावर ती अवलंबून नसते तर ती यंत्रणा ताब्यात घ्यायला पक्ष सत्तेवर येत असतात.

अनेक प्रकारची वस्तुस्थितीदर्शक प्रातिनिधिक विधाने त्या चर्चेतून आली. मात्र, एका वाहिनीवर दाभोळकरांच्या पत्नी म्हणाल्या होत्या की, ''या खूनानंतर प्रचंड संख्येने जे लोक रस्त्यावर आले ही भावनिक प्रतिक्रिया आहे. तेवढ्याने होणार नाही. त्यांचे रूपांतर वैचारिक प्रतिक्रियेत होणार आहे काय?'' हे महत्त्वाचे आहे.

ज्या वृत्ती-प्रवृत्ती-संस्था-संघटनांना उद्देशून आपण त्यांच्या रणनीतीचे, 'विषारी' प्रचाराचे, धर्मांधतेचे-जात्यंधतेचे, माथी भडकवण्याचे, विषवल्ली पेरण्याचे, 'दिशाभूल' करणाऱ्या प्रचाराचे, झुंडशाहीचे, शासन-प्रशासनाचे जातीयीकरण, धर्मांधीकरण करण्याचे जे काय कार्य - प्रयत्न - उपक्रम - प्रचार चालला आहे, असे म्हणतो ते झाले वास्तवाचे चित्रण, छायाचित्र. मुद्दा असा आहे की, हे सारे करणारे कोणी एकच वा अनेक संघटना वा व्यक्ती नसून तो एक विचार आहे. त्या विचारावर आधारित अनेक संस्था - संघटना - गट - कळप यांच्या सातत्याने चालेल्या विविधांगी माध्यमांच्या, पर्यायी माध्यमांद्वारे देखील चाललेल्या 'कॉमन मिनिमम प्रोग्राम'च्या कार्याचा तो सामूहिक परिणाम आहे.

'विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे' असे म्हणणाऱ्यांचा विचार जो अंधश्रद्धा निर्मूलनाचा, शोषणाच्या

अनुक्रमणिका

अंताचा, समता स्थापनेचा, विषमता निर्मूलनाचा असेल, बहुसांस्कृतिकतेचा, बहुधर्मियतेचा असेल, सहिष्णुतेचा, इहवादाचा असेल, त्या साऱ्याच पुरोगामी म्हणवणाऱ्यांचा प्रभाव धर्मांध, जात्यंध व्हायला निघालेल्या लोकांवर पडत नसल्याचा तो परिणाम आहे काय?

पुरोगामी सांस्कृतिकतेचा 'डिस्कोर्स', प्रचार - प्रसार - कथन - निवेदन आणि तसेच प्रत्यक्षात वर्तन यात पुरोगामी म्हणवणारे गट - संस्था - संघटना देखील कमी पडत नाहीत काय?.

मुळात सत्तर - ऐंशीच्या दशकापर्यंत या देशात प्रभावी असलेल्या शास्त्रीय वृत्तीचा, पुरोगामी वृत्तीचा समाज निर्माण करण्याचा विचार जो अभ्यासक्रमातून, शिक्षणातून, नाटक, सिनेमा, चित्रपटगीतातून, सभा, संमेलने, परिषदा, संस्था, विद्यापीठांतून सर्वसंचारी होता त्या पुरोगामी वातावरणाच्या दबावाच्या काळात आजचा मूलतत्त्ववाद पिछाडीवर गेला होताच ना?

बाबरी मशिदीच्या पतनानंतर तो दादरीच्या घटनेपर्यंत या समाजाचेही वेगाने झालेले पतन अधोगती आणि सुवर्णमंदिरावरील हल्ल्यापासून धर्म, धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचे अगोदरच्या काळात नेहरूंनी केलेले विलगीकरण संपुष्टात आणून धर्मांध आणि जात्यंध शक्तींच्या लांगुलचालनाने राजकीय सत्ता स्थापनेचे केले गेलेले प्रयत्न, त्यात पुढे पडलेली बाजाराच्या कार्पोरेट हितांच्या, कंपनी राज्याची भर आणि धर्मांध, जात्यंध शक्ती, बाजाराचा साम्राज्यवाद, त्याची प्रबळ संवाद - माध्यमे आणि राजकीय सत्ता यांची झालेली 'अभद्र' युती यातून आजचे राजकीय - सामाजिक - सांस्कृतिक दहशतीचे वास्तव उभे झाले आहे.

याच दोन - तीन दशकात साऱ्याच पुरोगामी संस्था - संघटना - चळवळी - विचार यांचीही वेगाने पिछेहाट आणि विघटन घडून आले आहे.

केवळ अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही एकमेव परिवर्तनवादी चळवळ या काळात प्रभावीपणे टिकून, पाय रोवून उभी राहिली. त्यामुळे समग्र परिवर्तनवाद्यांच्या आशा - आकांक्षांचे ही चळवळ एकमेव केंद्रबिंदू ठरली आणि त्यामुळे साऱ्या मूलतत्त्वद्यांचे देखील हीच एकमेव चळवळ म्हणूनच लक्ष्यही ठरली.

मात्र ही एकमेव चळवळ टिकाव का धरू शकली आणि अन्य परिवर्तनवादी चळवळीचा विलय का घडून आला ? पुरोगामी, परिवर्तनवादी म्हणवणाऱ्या शक्तींपैकी अनेकांनी मूलतत्त्ववाद्यांच्याच राजकीय आघाड्या सांभाळल्यानंतर हे होणे अपरिहार्य होते.

ज्या निष्ठेने मूलतत्त्ववाद्यांनी आपला अग्रक्रम राबवला त्या निष्ठेने पुरोगामी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी, लोहियावादी इ. म्हणवणाऱ्यांनी आपला अग्रक्रम राबवला नाही. खरे तर कोणत्याही मार्गाने तडजोड करून सत्तेचे नवे स्थापत्य शास्त्र स्थापण्यातच त्यांची ऊर्जा खर्च झाली. त्यासाठी पुरोगामी, समाजवादी शक्ती म्हणवणाऱ्यांनी आपला सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा वसा उत-मात करत टाकून देवून जातीय ध्रुवीकरणाच्या आधारावरील सत्तेचे राजकारण हाच सत्ता परिवर्तनासाठी आपला एकमेव अग्रक्रम मानल्याने जात्यंध व धर्मांध शक्तींचेच बळ वाढले. सातत्यपूर्ण पुरोगामी सामाजिक - सांस्कृतिक चळवळीची निर्माण झालेली पोकळी, अवकाश हा मूलतत्त्ववाद्यांच्या वैचारिकतेने आयताच भरून काढला गेला.

आपल्या पुरोगामी निष्ठांचे रूपांतर वेगाने जातीय - धार्मिक निष्ठांत करू शकण्याचे पारंपारिक बळ लाभलेली जातीव्यवस्था व तिच्या अंताचा लढा हा वारसा ज्यांनी आपला वारसा म्हणून मानला व ते खरेच ज्यांचे अग्रक्रम होते असे त्यामुळे वाटले होते त्यांनीही ते लढे पूर्णपणे स्थगित केल्याने फुले - आंबेडकर - पेरियार यांचा केवळ नामोच्चार तेवढा उरला. त्या मागील आत्मभान त्यांनी दिलेला आत्मसन्मान आणि बळ मात्र क्षीण होत जातिसंस्थाच तेवढी अधिक केंद्रस्थानी आणली गेली. स्वतःला कितीतरी टोकाचे मार्क्सवादी, समाजवादी, परिवर्तनावादी म्हणवणारे वेगाने या लाटेत वाहून गेले. अनेकांनी तर जाती - उपजातींचे - धर्मांचे झेंडे हाती घेवूनच आपले स्थान आणि अस्तित्वाचे महात्म्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सारी बुवाबाजी - भोंदूगिरी - जातपंचायतीचे राजकारण - अंधश्रद्धा या साऱ्याच्या निर्मूलनाची जबाबदारी जणू केवळ डॉ. नरेंद्र दाभोळकर, गोविंदराव पानसरे, डॉ. कलबुर्गी आणि आता श्याम मानव, दाभोळकर व पानसरे कुटुंबीय या व्यक्ती आणि यांच्या संटनांपुरती मर्यादित, त्यांचीच तेवढी जबाबदारी मानून भारतीय कम्युनिस्ट पक्षासारखे काही अपवाद वगळता काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना या सारखे प्रमुख राजकीय पक्षोपक्ष हे त्यापासून स्वतःला सक्रियरित्या दूर राखण्याचेच राजकारण करीत राहिले. धर्मांधता व जात्यंधतेला खतपाणी घालणाऱ्या वृत्ती - प्रवृत्तींचा अनुनयही करीत राहिले. नरेंद्र दाभोळकरांचा खून व त्याचे खापर केवळ एखाद्या वा पारंपरिक, सनातन

अनुक्रमणिका

स्वरूपाच्या संस्थांवर फोडून त्यांना मात्र त्यांनीही कोणतीच कृती न करण्याच्या वास्तवापासून आपली सुटका करून घेता येणार नाही. गोविंदराव पानसरेंचा व डॉ. कलबुर्गींचा खून ही या साऱ्याची परिणती, या साऱ्या प्रक्रियेचा एकत्रित परिणाम आहे. सुदैवाने भारतीय माध्यमांमध्ये, अगदी मुख्य प्रवाही माध्यमांमध्ये देखील पुरोगामित्त्वाच्या अग्रक्रमाला असणारी जागा योग्यरित्या वापरण्याचा जो एकाकी प्रयत्न एखाद - दुसरा माणूस ज्या तळमळीने करतो ती तळमळ, ती कळकळ, ती निष्ठा वैयक्तिक पातळीपर्यंत मर्यादित होत चालली आहे. त्या कळकळीचे, तळमळीचे सामूहिक प्रदर्शन जे दाभोळकरांच्या पानसरे, कलबुर्गींच्या खूनानंतर घडले ते त्यांच्या कार्याला त्याच संख्येने लाभते, याच लोकांच्याच याच संख्येचा मोर्चा, शिष्टमंडळे विधिमंडाळवर वेळीच नेणाऱ्या लोकशक्तीत तिचे रूपांतर झाले असते तरीही त्यांचे बलिदान रोखता येऊ शकले असते.

एवढे झाल्यावरही पुढचे जे अनेक दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी करण्याचा ज्यांचा 'अजेंडा' कायम आहे त्यांचे मनसुबे रोखायचे असतील आणि प्रत्येकाचा हुतात्मा होऊ न देता जर काही साध्य करायचे असेत, तर ते केवळ 'धर्मांध' आणि 'जात्यंधांवर' दोषारोपण करणारी वाचाळ बडबड तेवढी करून भागणार नाही. ते वास्तव आहे व त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्र संकल्पना समजून घेऊन ही लोकशाही ज्या सामाजिक समतेच्या पायावर उभी व्हायला हवी त्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला पाया हा सामाजिक बंधुभावाचा, फ्रॅटर्निटीचा आहे आणि तोच नेमका पारंपरिक जातिव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांनी कधीच रचला नसल्याने विविध जातीजमातीत विभागलेला हा समाज हे राष्ट्रच असू शकत नाही, हे जे बाबासाहेब सांगतात ते पुन्हा नव्याने नीट जाणून घेण्याची व त्या आधारे, या देशातून 'राष्ट्र' निर्माण करण्याची गरज आहे. सामाजिक समतेसाठीचा सामाजिक बंधुभाव हा वर्गविहीन - जातीविहीन समाज रचनेशिवाय शक्य नाही आणि ही समाजरचना जातिअंताशिवाय शक्य नाही ही बाबासाहेबांची शिकवण किती पक्ष, नेते, कार्यकर्ते व बुद्धिप्रामाण्यवादी अंमलात आणतात असा प्रश्न विचारून तेच जर हे करत नसतील तर, आपण का करायचे असा युक्तीवाद करणारा पलायनवाद आपण आपल्यात खोलवर मुरवून घेतला आहे.

साऱ्या पुरोगामी चळवळींच्या विघटनाचे मूळही त्यातच आहे. बाबासाहेबांच्या याच सांगण्यात पर्यायाने, जातीव्यवस्थेच्या जाळ्यातच अडकलेले आहे. ब्राह्मण पुरोगामी, हिंदू पुरोगामी, मुस्लिम पुरोगामी, दलित पुरोगामी, मराठा पुरोगामी अशी पुरोगामित्वाची संज्ञा वापरणे आणि तिला मान्यता देणे हा पुरोगामित्वाचा विस्तार नसून संकोच आहे. पुरोगामित्वाचे असे जातीयीकरण व धार्मिकीकरण केले गेले व त्याने वर्चस्ववाद्यांना वैधताच दिली गेली. हे आपले वास्तव आहे. या उलट प्रतिगाम्यांचे असे वर्गीकरण हे सर्व जाती धर्मातील प्रतिगमित्त्वाला बळ देत एका समान कार्यक्रमावर त्यांचे ऐक्य घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. पुरोगाम्यांचे असे वर्गीकरण मात्र पुरोगामित्त्वाला क्षीण करत करत त्यातल्या व्यक्तीला एकटे, एकाकी पाडत गेले आहे. प्रतिगामी वृत्ती - प्रवृत्तीच्या प्रबळ होण्यामागे हे देखील एक सर्वाधिक महत्त्वाचे कारण आहे.

सर्व पुरोगाम्यांनी, त्यांच्या संस्था संघटनांनी आपले क्षीण होत चाललेले अस्तित्व आणि बळ वाढवायचे तर त्यांना आपल्यातल्या एक एकट्या व्यक्ती - संस्था, संघटना यांच्या बौद्धिक मुजोरी, 'इंटलेक्चुअल ॲरोगन्स' व आपल्याच सर्वज्ञतेचे आपल्याला होणारे आभास, त्यातून जपलेले अहंकार, अहंगंड व त्यातून आपआपली स्थापली गेलेली स्वायत्त अस्तित्वाची ठाणे जपण्याची वृत्ती सोडून आपसातलाच क्षीण झालेला विवेकी, सहिष्णू व धर्मनिरपेक्षतेचा सांस्कृतिक संवाद पुनः स्थापित करावा लागेल. तरच तो इतरांशी समर्थपणे साधता येईल. साऱ्याच समतावाद्यांचा एकच कॉमन मिनिमन प्रोग्राम ठरवून समतावाद्यांची व्यापक आघाडी त्यासाठी सिद्ध होण्याची गरज आहे. मात्र अद्यापही त्या दिशेने कोणतीच आश्वासक पाऊले उचलली गेली आहेत असे वाटत नाही. परंतु दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या खुनानंतर ही गरज आहे हे अधिकच प्रकर्षाने सर्वांना जाणवू लागली आहे.

प्रबळ पुरोगामी समाजकारणशिवाय, प्रबळ विवेकी सांस्कृतिकीकरणाशिवाय प्रबळ पुरोगामी राजकारण व पुरोगामी राजकीय शक्ती ही आपोआपच उदयाला येईल, असा भ्रम बाळगणे म्हणजे केवळ अवतारवादावर श्रद्धा बाळगणे होय.

शेवटी प्रबोधन करायचे कोणाचे आहे? परिर्वतन करायचे कशात आहे ? 'धर्मांध' आणि 'जात्यंध' या सुद्धा शेवटी तो विचार बाळगणाऱ्या व्यक्तीच आहेत, याच समाजाच्या त्या भाग आहेत, त्यांना बळ या समाजातूनच लाभते आहे, लाभणार आहे, हीच लोकशाही त्यांना हे बळ देत आहे. पण म्हणून हेच लोक व हीच लोकशाही प्रबोधनकर्त्यांना ते बळ द्यायला नकार

अनुक्रमणिका

देते असे नाही. हा नकार कारपोरेट भांडवलशाहीच्या ताब्यात सारी प्रसार-माध्यमे गेल्यामुळे जाणवतो आहे. त्या प्रसार-माध्यमांमधला संवाद केवळ नफ्याच्या उद्दिष्टाचा, कारपोरेट संवाद असून त्याने कल्याणकारी संवाद हा माध्यमांमधून संपुष्टात आणला आहे. ही लोकशाही व तिची शक्ती अशा माध्यमशरण युगात सनातन, मूलतत्त्ववादी व प्रतिक्रांतीवाद्यांना बळ देते आहे. त्यांना ते बळ देणे हा कारपोरेट, बहुराष्ट्रीय नफोत्तेजकांचा अजेंडाच आहे.

तथाकथित सनातनी वृत्ती, धर्मांध आणि जात्यंध शक्ती या विशिष्टच संस्था, संघटना वा पक्षांपुरत्या मर्यादित आहेत आणि इतर पक्ष मात्र पूर्णपणे धर्मांधता व जात्यंधता मुक्त आणि पुरोगामी आहेत, एवढे बाळबोध प्रचारी आकलन अगोदर सोडून दिले पाहिजे.

ज्यांना आपण 'धर्मांध' आणि 'जात्यंध' म्हणतो तो जर विचार असेल तर परिवर्तन त्यातच करायचे असल्याने धर्मांधता आणि जात्यंधतेचे संस्थाकरण करण्याऐवजी व तसे करून नेमके त्यांच्याकडेच बोट दाखवून त्यांना अधिकचे मान्यतेचे बळ देण्याऐवजी त्या विचारांमध्येच, त्या विचारांवर प्रखर व तीव्र वैचारिक हल्ले करून परिवर्तनाची जी व्यूहरचना फुले - आगरकर - रानडे - आंबेडकर - लोहिया करतात तशी नव्याने आपण प्रत्यक्ष कृतीशील अशा विविध उपायांनी ती कशी करू शकू, ते कार्य प्रत्यक्षात आपआपल्या पातळीवर कसे हाती घेऊ शकू, त्यासाठीचे सामूहिक शहाणपण कसे वाढवू शकू, त्यासाठीचा सांस्कृतिक पुरोगामी संवाद कसा वाढवू शकू व त्यासाठी कोणती संमातर व पर्यायी माध्यमे वापरता येणे शक्य आहे याचा विचार करणे ही खरी गरज आहे. दाभोळकरांनी, पानसरेंनी, कलबुर्गींनी प्रत्यक्षात ते केले, दाभोळकर व पानसरे कुटुंबीय, अविनाश पाटील आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, मेधा पाटकर, श्याम मानव असे अनेक लोक ते करीत आहेत, आपणही करू शकतो. मात्र या साऱ्याला संघटित चळवळीचे रूप प्राप्त होणे आवश्यक आहे.

शेवटी ज्यांना कुणाला आपण 'धर्मांध' आणि 'जात्यंध' म्हणून असू त्यांच्याही पुरोगामीकरणाची, त्यांच्याही परिवर्तनाची ही चळवळ आहे. नव्हे त्यांच्याच प्रबोधनाची ही चळवळ आहे, म्हणून महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, साने गुरुजी आणि युद्धाच्या नव्हे तर बुद्धाच्या मार्गावर आपला विश्वास असेल तर या माणसांनी हतबल न होता दिलेल्या लढ्याचा हा वसा आहे हे लक्षात ठेवलेच पाहिजे.

***

या साऱ्या पार्श्वभूमीवर विद्यमान परिस्थितीत उद्‌भवलेला अभिव्यक्तीसाठीचा संघर्ष, कुचंबणा, घुसमट, तिच्यावरील आक्रमणे, अतिक्रमणे आणि ते करणाऱ्या शक्तींना विशिष्ट वर्चस्ववादी समाज घटकांकडून पुरवले जात असलेले अधिकचे बळ, त्या शक्तींचा शक्तीपात घडवून आणण्याऐवजी अभिव्यक्ती निर्भयपणे घडवू इच्छिणाऱ्यांचाच शक्तिपात घडून याचा अशा वृत्तीची राजकीय इच्छाशक्ती व त्यामुळे वाट्याला आलेले या देशातले अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या गळ्यालाच नख लावणारे अभिव्यक्तीचे पर्व हे या देशातले ताजे अबांछित वास्तव आहे.

अभिव्यक्तीची घुसमट केवळ स्वबाह्य अशा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक कारणांपुरतीच मर्यादित नसते. तर ती व्यक्तीच्या, निर्मात्यांच्या, लेखकांच्या, कलावंतांच्या अज्ञानाचेही उत्पादन असते. सांस्कृतिक भांडवल हे अभिव्यक्तीचे नियमन करू शकते आणि म्हणून सामाजिक सजगतेची बांधीलकीही सतत जागती ठेवावी लागत असते. अभिव्यक्ती आणि सत्यवचन हाच लोकशाहीचा आत्मा असतो. कोणताही पुरोगामी विचारवंत धर्मभावनेचे उच्चाटन करू शकत नाही. हे जेवढे खरे आहे तेवढेच कोणतीही धार्मिक संवेदना चाळवून, तिचे संघटन करून कोणीही, पुरोगामी, प्रागतिक, इहवादी विचारनिर्मिती रोखू शकणार नाही, हेही खरे आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विचारवेदनेचे तेच मूळ स्वरूप आहे. राजकीयदृष्ट्या सत्ताविहीन असलेले कवी, लेखक, कलावंत, विचारवंत आणि सर्वंकष सत्तापिपासू होऊ बघणारे राज्यकर्ते यांच्यातला संघर्ष हा नेहमी विषमच असतो, तरीही कलावंत त्याला पुरून कसा उरतो हे लेखक - कलावंत - विचारवंत आणि राज्यकर्ते यांच्या संघर्षाच्या निमित्ताने इतिहासाने वारंवार नमूद केले आहे. आजही त्याचे प्रत्यंतर लेखकांच्या ताज्या बंडाने दिले आहे.

विद्यमान काळातील अभिव्यक्तीच्या नियंत्रणाचे सांस्कृतिक राजकारण तर स्पष्ट झालेलेच आहे. परिणामी या देशातल्या लोकांनीच लोकांना दिलेल्या घटनादत्त मूलभूत स्वातंत्र्याचा गळा घोटणारी ऐतिहासिक आणीबाणी व तिने दिलेले यातना - भोग आज अधिक विकृत स्वरूपात भोवताली पुन्हा उभारले जात आहेत. एकीकडे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य वेदकाळात निर्भीडरित्या स्त्रिया देखील कशा घेत होत्या हे सांगत वेदांपासून या देशात सहिष्णुता कशी होती याचे दाखले देणारे तर दुसरीकडे त्याच तोंडाने स्त्रियांनी नोकऱ्या कश्या करू नयेत, त्यांनी केस मोकळे कसे सोडू नयेत, त्यांच्या ऋतूवस्थेत मंदिरात त्यांनी प्रवेश कसे करू नयेत, त्याच

स्त्रियांनी जीन्स पँट कशा घालू नयेत, कपडे अंगभरच कसे घालावेत, सांयकाळच्या आत घरातच कसे परतावे, परजातीत, परधर्मांत विवाह कसे करू नयेत हे सांगणारे दुतोंडी असहिष्णू वर्तनही त्यांनी चालवले आहे. स्त्रियांवर अत्याचार, बलात्कार, अगदी सामूहिकारित्या ते केले जाणाऱ्या, प्रवृत्तींचा धाक निर्माण केला जातो आहे. मारले गेले तितके उघडत जाणाऱ्या दरवाज्यासारखी, खुलत - मोकळ्या होत गेलेल्या स्त्रियांच्या पुरूषी परतंत्राखालील दबलेल्या अभिव्यक्तीचे स्वरूप त्यांनी मांडूच नये व उपभोगू नये यासाठी दाभोळकर, पानसरे यांच्या पाठोपाठ कलबुर्गी यांच्या खुनानंतर उद्‌भवलेल्या पार्श्वभूमीवर अशा असहिष्णू पर्यावरणात पुरोगामी विचार करणाऱ्यांची अभिव्यक्ती नियंत्रित करणाऱ्या धमक्यांचे सत्र थांबलेले नाही. हैद्राबाद विद्यापीठातल्या दलित विद्यार्थ्यांच्या ताज्या आत्महत्येच्या प्रसंगाने प्रत्यक्ष हत्यांऐवजी आता दलितांना आत्महत्येलाच कसे प्रवृत्त केले जात आहे ते दिसू लागले आहे.

अभिव्यक्तीसाठीचा संघर्ष पेलून अभिव्यक्तीची नवीन दालने 'वॉटर' आणि 'फायर' या दीपा मेहतांच्या सिनेमांनी उघडली होती. सिनेमा बनवायचाच नाही असा फतवा शिरावर घेऊन, 'ऑफसाईड' हा सिनेमा काढणाऱ्या जफर पनाहीच्या निमित्ताने इराणमधील दहशतीखालील अभिव्यक्तीची घुसमट मांडलीच गेली होती. 'चार्ली हेब्दो'चे व्यंगचित्रकार, पत्रकार मारले जाणारी कत्तल केली जावूनही लेखक - कलावंतांची बंड उभी होतच आहेत.

मुस्लिम व ख्रिस्ती समाजातील अभिव्यक्ती नियंत्रण हा ज्यांच्या अग्रक्रमाचा विषय आहे त्यांनीच निर्माण केलेल्या वातावरणाचा परिणाम दादरीच्या घटनेत झाला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची भारतीय घटनात्मक संकल्पना अनिर्बंध न ठेवणारे घटनाकार या समाजातील पारंपारिक सहिष्णुतेवर श्रद्धा बाळगून होते. या समाजावर पूर्ण विश्वास टाकूनच त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कायद्याचे नव्हे तर सहिष्णुतेचे विवेकाचे नियंत्रण महत्त्वाचे मानले होते, त्यामुळेच ते अनिर्बंध ठेवले नव्हेत, खुले ठेवले होते. मात्र त्यांच्या विश्वासघात करून त्याचा वापर अभिव्यक्तीवर आपली स्वतःची नियंत्रणे लादणाऱ्या व केवळ आपल्याच अभिव्यक्तीसाठी शक्तीच त्यामुळे आज प्रबळ होत आहेत.

या सेन्सॉरशीपला जे जबरदस्त आव्हान दिले गेले त्या ऐतिहासिक घडामोडींचे स्मरण करून देण्यासाठी 'साधना'च्या दिवाळी, २००१ च्या अंकात डॉ. श्रीराम लागू यांचा प्रदीर्घ लेख प्रकाशित झाला होता. सोबतच प्रा. भालबा केळकरांना 'घाशीराम कोतवाल' संदर्भात डॉ. श्रीराम लागूंनी लिहिलेले पत्र देखील. अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आवश्यक कृती करण्याची प्रेरणाच त्यातून प्राप्त होते.

गेल्या काही महिन्यातच या देशात अभिव्यक्तीवरील हल्ल्यांचे स्वरूप आणि नियंत्रण विशद करणाऱ्या घडामोडी, प्रसंग, विधाने अशा काही घटना अशा काही वेगाने घडत गेल्या की त्याची परिणती केवळ लेखक - कलावंतच नव्हे तर इतिहासकार व शास्त्रज्ञांनीही त्यांचे राष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रीय सन्मान परत करून या वास्तवाचा निषेध नोंदवण्यात झाली. हे सन्मान, पुरस्कार फक्त त्यांना ते घरी जपून ठेवण्यापुरते या देशाने दिले नव्हतेच. तर ते हे राष्ट्र ज्या वैज्ञानिक, शास्त्रीय वृत्तीच्या, तार्किक, बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकी अभिरुची संपन्नतेच्या, कलात्मक अभिव्यक्ती, सहिष्णूता, संवेदनशील मानवतावादी समतेच्या, शोषण मुक्तीच्या व मानवाधिकारांच्या पायावर उभे करावयाचे होते, तसेच या देशाची विविधतेतील एकतेची जी संस्कृती टिकवण्याची कामगिरी करायची होती ती आपआपल्या माध्यमातून उत्कृष्टपणे करून दाखवल्याबद्दल दिले गेले होते. मात्र आता राष्ट्राच्या या पायालाच सुरुंग लागून, तो उध्वस्त करत हे राष्ट्र नेमके त्याच्या विरुद्ध दिशेने, अतार्किक, बुद्धिप्रामाण्यविहीन, ग्रंथप्रामाण्यवादी, अशास्त्रीय, अवैज्ञानिक, परजात व परधर्म असहिष्णुतेच्या, अविवेकाच्या दिशेने जाणाऱ्या पायावर उभे करण्याचे व तसे करण्याच्या उद्योगांना व ते चालवण्यासाठी सहमती निर्माण करणाऱ्या वैचारिक कारखान्यांना बळ पुरवू बघणाऱ्याच तेवढ्या अभिव्यक्तीचे, तिला सुष्ट व इष्ट शक्ती ठरवून इतर प्रकारच्या साऱ्याच अभिव्यक्तीला दुष्ट शक्ती ठरवून तिचे निर्दालन करण्याचीच तेवढी राजकीय इच्छाशक्ती ही अक्राळ-विक्राळ रूप धारण करू लागली, तेव्हा हे पुरस्कार या राष्ट्राने त्यांना कशाकरता दिले होते हे सांगणे त्यांना अपरिहार्य होते. ते सांगण्याचे त्यांच्याजवळचे सर्वात प्रभावी माध्यम हे त्यांना समाजाने दिलेले पुरस्कारच पुन्हा त्यांच्यासमोर, या राष्ट्रासमोर ठेऊन, ते पुरस्कार ज्या प्रकारच्या मानव, समाज व राष्ट्र निर्माणासाठी असलेल्या वैचारिकतेचे आहेत ती विचारधारा कोणती आहे ह्याचे स्मरण त्यांनी करून दिले आहे. तीच जर संपवली जात असेल तर मग ते पुरस्कार घरात ठेऊन, त्यांच्यासमोर बसून त्यांनी दर क्षणाला आपला श्वास तेवढा अवरुद्ध करून घेत बसल्या जागीच या दहशत पसरवणाऱ्यांचे नामस्मरण करीत अंतर्धान पावावे असेच, त्यांनी ते परत करू नये असे सांगणाऱ्यांचे म्हणणे आहे काय?

पुरस्कार त्यांनी परत केले नसते तर साहित्य अकादमीचे तोंड लेखकांच्या बाजूने, पर्यायाने ते लेखक-कलावंत ज्या

मूल्यांचा पुरस्कार करताहेत त्या बाजूने उघडले जाण्याची किंचितही शक्यता नव्हती. ते उघडायला हे पुरस्कार परत करून ज्या ज्या लेखकांनी बाध्य केले त्यांनी केवळ लेखक-कलावंतांचीच नव्हे तर या वातावरणाने गारठलेल्या साऱ्यांचीच हतवीर्यता घालवून या पर्वातही अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणाचा शांततामय, अहिंसक लढा विवेकाने कसा लढला जाऊ शकतो याचे ऐतिहासिक दिशा दिर्ग्दर्शनच केले आहे. त्यांच्या अशा कृतींनाही देशद्रोहाच्या व्याख्येत बसवणे शक्य करून सोडू शकणारी राज्याची परिपत्रके देखील अशाच विवेकाच्या दबावामुळे मागे घेण्याचे वातावरण निर्मिले गेले आहे, हे विसरून चालणार नाही. मात्र त्या नंतरही नुकताच तामीळनाडूमध्ये एका कवीवर देशद्रोहाचा आरोप लावण्यात आला आहेच. हैद्राबाद विद्यापीठाच्या एका दलित विद्यार्थ्यांला आत्महत्येस प्रवृत्त करणारी परिस्थितीही निर्मिली गेली आहेच. अशा अधिनायकवादी वृत्ती आज एकाच नव्हे तर साऱ्याच पक्षात उदयाला आल्या आहेत. या लेखकांनी अगोदर लिहिणे बंद करावे मग आम्ही तुमच्याशी बोलू असे उर्मटपणे सांगणाऱ्या असांस्कृतिक व असभ्य संस्कृतीचे, लेखकांचे लेखनच बंद करू इच्छिणारे राज्यकर्ते ज्या ज्या पर्वात ज्या राष्ट्राला लाभतील त्या त्या पर्वात लेखक आपली जीभ घरी ठेऊन बाहेर पडणार नाही हे ठणकावून सांगणारा आत्मविश्वास या पुरस्कार परतीच्या बंडाने लेखकांमध्ये निर्माण केला आहे.

पुरस्कार परत करणाऱ्या या लेखकांची विचारधारा तपासली पाहिजे असे राज्यकर्त्यांपैकी एक विद्वान राज्यकर्ते उद्‌गारले. त्यानंतर त्यांच्या परिवारातील संघटना प्रत्येक चर्चेत फक्त विचारधारेचाच उच्चार करू लागल्या. जणू विचारधारा बाळगण्याचा अधिकार फक्त विद्यमान राज्यकर्त्यांना व त्यांच्या परिवारालाच तेवढा जनतेने बहाल केला व इतरांचा तो काढून घेतला आहे, असे त्यांना म्हणायचे आहे. मत विकासाच्या नावावर मागायचे आणि राज्य विचारधारेच्या नावाचे करायचे या फसवणुकीच्या निषेधार्थच तर हा सारा उठाव आहे.

त्यांच्या त्या उद्‌गारातून त्यांना नेमके काय सुचवायचे आहे? लेखक - कलावंतांनाही विचारधारा असते. असायलाच हवी. फक्त ती लोकांचे अकल्याण करणारी नसावी. लोकांची जातवार, धर्मवार वाटणी करून त्यांना दुय्यम नागरिक ठरवणारी नसावी, धर्म व संस्कृती विचारांच्या नावावर अधर्म, दहशत व असभ्यता पसरवणारी नसावी. राज्यकर्त्यांच्या विचारधारेशिवाय अन्य कोणतीच विचारधारा अस्तित्वात असू नये असे या राजकर्त्यांना म्हणायचे आहे असा त्यांच्या या 'लेखकांची विचारधारा तपासली पाहिजे' विधानाचा अर्थ होतो. लेखकांची विचारधारा तपासल्यावर, राज्यकर्ते त्यांच्या मनातली पुढची कृती काय करणार? ती विचारधारा बाळगल्याबद्दल त्यांना तुरुंगात टाकणार की त्यांचा त्यांच्या पद्धतीने बंदोबस्त करणार? वैज्ञानिकता, विवेक, सहिष्णुता, बहुधार्मिकता, बहुसांस्कृतिकता, बहुभाषिकता टिकवणे व कोणी काय खायचे, काय नेसायचे, काय प्यायचे हे दुसऱ्याने ठरवू नये असे सांगणे ही त्या लेखकांची विचारधारा आहे. ती समाजविघातक आहे की अविवेक, असहिष्णुता, सांप्रदायिकता, आपलीच तेवढी विचारधारा लादण्याचा प्रयत्न करणारी विचारधारा समाज विघातक आहे?

राज्यकर्त्यांशिवाय इतरांच्या अभिव्यक्तीचा असाच बंदोबस्त करू बघणाऱ्या इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणी विरुद्ध विद्यमान राज्यकर्त्यांच्या अगोदरच्या पिढीने संघर्ष केला, त्याचे फळ म्हणूनच ते आज सत्तेची फळे म्हणूनच ते आज सत्तेची फळे चाखत आहेत एवढे तरी भान त्यांनी बाळगायलाच हवे. त्यामुळे खरा प्रश्न हा हे राष्ट्र नेमके कोणाचे व कुणा, कुणाचे? हा आहे. भूमी, सत्ता, संपत्ती व त्यासाठी सर्वंकष वर्चस्व स्थापण्याचे उद्योग यातूनच आजचा हा सारा अतिरेक, दहशत याची निर्मिती होते आहे. सांस्कृतिक अंगाचा आजचा वर्चस्ववाद हा त्याचाच एक भाग आहे. मात्र या राष्ट्रातील जनतेने ज्या राज्यघटनेची शपथ देऊन बहुमताने वेळोवेळी सत्तेत राज्यकर्त्यांना बसवले आहे ते या राज्य घटनेतील प्रत्येकाच्या मूलभूत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या व सर्व प्रकारच्या समतेच्या व बंधुभावाच्या रक्षणासाठी, विवेकी, शास्त्रीय वृत्तीचा, सहिष्णू समाज निर्मिण्यासाठी आणि सर्वप्रकारच्या वर्चस्ववादाच्या नायनाटासाठी, या प्रयत्नांच्या विरोधात कोणतीही वर्चस्ववादी कृती करू बघणाऱ्यांचा कठोरपणे बंदोबस्त करण्यासाठी व त्या योगे नव्वद वर्षांचा स्वातंत्र्यलढा लढून मिळवलेले स्वातंत्र्य टिकवून ते अधिक मजबूत करण्यासाठी. केवळ या घटनांशी आमचा काय संबंध? म्हणून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी नव्हे. याचे स्मरण करून देण्यासाठीच लेखक - कलावंत - शास्त्रज्ञ - इतिहासकार आपल्या आयुष्याच्या कर्तृत्वाचे सार असलेल्या पुरस्कारांचे पुरस्कारास्त्र करून समोर आले आहेत, ते या राज्यघटनेचे संरक्षण करायला.

राज्यघटना रक्षणाच्या या प्रयत्नांना 'कागदी बंड', 'ठरवून तयार केलेले बंड' म्हणून हिणवणे हा तर राज्य घटना - धर्माचाच अधिक्षेप आहे. या सभ्य व सुसंस्कृत निषेधमार्गाला 'तयार करवून घेतलेले बंड' असे म्हणून अरुण जेटली ह्या एका

सभ्य समजल्या जाणाऱ्या केंद्रीय मंत्र्याने आणीबाणीत इंदिरा गांधी बोलत होत्या तीच अधिनायकवादी भाषा वापरली आहे. मग 'त्यांच्यात' आणि 'ह्याच्यात' नेमका फरक तो कोणता? ज्या आणीबाणीच्या विरोधात ह्याच मंत्र्याच्या पक्षाचे पूर्वसुरी संघर्ष करीत होते, त्या बंडाला देखील इंदिरा गांधी व त्यांचे भक्त असेच 'तयार केल्या गेलेले बंड'च म्हणत होते याचे त्यांनी स्वतःच स्मरण करून घेण्याची गरज आहे. अशी बंड करण्याचेही अधिकार त्यांचे राज्य नसताना व ते विरोधात असताना फक्त त्यांच्याकडेच सुरक्षित आहेत व त्यांच्या राज्यात जर काही अवांछित घडत असेल तर इतरांनी मात्र तोंडावर पट्ट्या बांधाव्या व त्यांची शांतता भंग करू नये अशी त्यांची सुव्यवस्थेची व्याख्या आहे. या देशातला खरा लेखक - कलावंत 'त्यांच्याही' बाजूने तेव्हाही नव्हता तो आता ह्यांना, त्यांच्या वेळ सारखीच परिस्थिती देशात निर्माण होत असताना ह्यांच्या बाजूनेच बोलण्यापुरता कसा काय मिळणार आहे? आणि त्यांना तो हवा असला तरी तो कसा काय व का म्हणून अभिव्यक्तीच्या विद्यमान दमनाबद्दल बोलणार नाही ?

हे दमन प्रत्याक्षात केंद्र सरकार करते, राज्य सरकार करते, कोणतेही सरकार करते की सरकार करत नाही व अन्य कोणी याच्याशी त्याच्या निषेधाचा संबंधच नाही. त्याचा संबंध हा ही परिस्थिती निर्माण करणाऱ्या टोळ्या, संस्था, संघटना, व्यक्ती, गट यांना वेसण घालण्याची जी राजकीय इच्छाशक्ती दाखवली जात नाही त्याच्याशी आहे. ती दाखवा म्हणजे आपोआपच अशी पावले उचलली जाण्याची वेळ येणार नाही. या देशात कोणी कोणत्याही विचारधारेचा असला तरी त्याला ती बाळगण्याचा घटनादत्त अधिकार आहे. तो फक्त लेखकाची विचारधारा तपासायला निघालेल्यांनाच व राज्यकर्त्यांनाच तेवढा घटनेने दिलेला नाही. मात्र कोणाचा कोणताही धर्म व विचारधारा असली तरी प्रत्येकानेच दुसऱ्याचा संपूर्ण आदर करून व प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवून, सर्वांची सार्वजनिक वर्तनासाठीची विचाराधारा आणि सार्वजनिक धर्म एकच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. तो धर्म व ती विचारधारा ही भारतीय राज्यघटना आहे. ती आहे म्हणूनच कोणत्याही विचारधारा वाहकाला अगदी असहिष्णू, अविवेकही, सांस्कृतिक दहशतवादी विचारधारा बाळगणाऱ्यांना सुद्धा आपले विचार स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, विचारधारा स्वातंत्र्य जपत सत्तेसाठी बहुमत निर्मिती करता येते, परंतु बहुमताने प्राप्त सत्ता मात्र घटनात्मक उद्दिष्टे, कर्तव्ये व अधिकारांसाठीच तेवढी वापरू देणारा हा घटनाधर्म आहे. राज्यकर्ते कोणत्याही विचारधारेच्या पक्षाचे असोत, राज्यघटनेची शपथ देऊन लोकांनी त्यांना सत्ता प्रदान केल्यावर राज्यघटना हाच तेवढा त्यांचा लोकधर्म उरतो. त्यांची व्यक्ती व पक्ष म्हणून जी कोणती विचारधारा असेल ती राज्याची असू शकत नाही. त्यामुळे या लेखकांचा जो राज्यघटनाधर्म - विचारधारा, तीच राज्यकर्त्यांचीही गृहीतच असल्याने या लेखकांची विचारधारा त्यांनी वेगळी तपासण्याचा प्रश्न येतोच कुठे ?

या घटनाधर्माचे पालन हाच अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठीचा देखील राजधर्म आहे, त्या धर्माचा अधर्म करणाऱ्यांच्या इच्छाशक्तीला बळ प्रदान केले जात असल्याने आजचा अभिव्यक्ती संघर्ष उभा झाला आहे. त्याचे यथास्थित आकलन करून विद्यमान स्थिती ताळ्यावर आणणे यासाठीच सरकार असते, सरकारने सरकार म्हणून वागावे, केवळ आपल्या पक्षाच्या विचारधारेच्या प्रसारासाठीचा सत्तारूढ पक्ष म्हणून नव्हे ही या पर्वात सर्व संबंधितांची अपेक्षा आहे.

***

उपरोक्त अपेक्षा पूर्ण होणे यासाठी आवश्यक आहे की व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही या परस्परसंबद्ध बाबी आहेत. एकाशिवाय दुसऱ्याला अस्तित्व नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी संघर्ष करावा लागेल असा काळ हा लोकशाहीचाच कर्दनकाळ ठरत असतो. विशिष्ट धर्माचे लोक तसेच विशिष्ट विचारप्रणालीचे लोक हे शत्रू म्हणून घोषित करणाऱ्या विचारांचा समुच्चय असणारे तत्त्वज्ञान हाच ज्यांचा पवित्र वैचारिक ग्रंथ असेल व 'त्या' शत्रूंचा नायनाट करणे हाच ज्यांचा धर्म असेल त्यांचे 'धर्मराष्ट्र' हे त्यांच्या घोषितशत्रूंचा नायनाट झाल्यावर, तो करणाऱ्या नायकांचे नायकत्व कायम राखण्यासाठी अन्य खलनायक, शत्रू निर्माण करणार हे उघड आहे. असे खलनायक हे त्या धर्मांतगतच तो धर्म मोकळा करू बघणारे पंथ व त्यांचे अनुयायी असणार हे सांगायलाच नको. या वास्तवाचे दर्शन घडवायला सुरुवात झाली आहे. हेच गेल्या काही महिन्यातील लागोपाठ घडणाऱ्या घटना सांगू लागल्या आहेत. अशा घटना घडविणाऱ्यांचा जगातल्या कोणत्याही भागातला 'संप्रदाय' हा स्वतःला 'पवित्र राज्य' स्थापण्यासाठीचे प्रेषितच घोषित करीत असतो, हेच काम तिकडे आय. एस. ने चालवले आहे. असे प्रेषित आता आपल्याकडेही उजळ माथ्याने वावरू लागले आहेत. त्यांना असे वावरू देण्यास अटकाव करण्याची सत्ताधारी पक्ष कोणताही असला तरी त्याची कधीच इच्छा नसते हेही या देशानेही वारंवार अनुभवले आहे.

अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हे फक्त सत्तेवर असलेल्यांना व त्यांचे समर्थन करण्यांनाच तेवढे आहे, इतरांना ते नाही ही

अनुक्रमणिका

विचारसरणी म्हणजे विकृतीच होय. अशा विकृतीविरुद्धचा लेखक - कलावंतांचा निषेध हा ज्यांना 'राजकीय' व फक्त आपल्या पक्षाविरूद्ध वाटत असेल त्यांनीच तो त्यांना फक्त आपल्याच पक्षाविरूद्ध का वाटतो याचा नीट विचार केला पाहिजे. ज्या टोळ्या, गट, संघटना ही विकृती समाजात पसरवत असतील त्यांची माहिती सरकारजवळ उपलब्ध असणारच. ते सारे सरकारला आपल्याच परिवारातले आहेत हे ठाऊक असल्याने ते असे म्हणत असतील तर सरकार म्हणून त्यांनीच अगोदर अशा शक्तींचा बंदोबस्त करण्याची गरज आहे. अशा शक्ती जर त्यांच्या पक्षाच्या, त्यांच्या परिवाराच्या नसतील तर मग या प्रकारला 'राजकीय' व त्यांच्याच फक्त विरुद्धचे कारस्थान म्हणण्याचे कारणच असायला नको. तरीही त्यांना त्यांचा अशा शक्तींना करणे आवश्यकच आहे.

अशा शक्ती सरकार पक्षाच्या, त्यांच्या परिवारातल्या वा त्यांच्या समर्थक नसतील तर मग सत्तारुढ पक्षाच्या नेतृत्त्वाने या निषेधाला, या बंडाला ते 'कागदी बंड' आहे, त्यांनी अगोदर 'लेखन बंद करावे', 'त्यांची पात्रताच काय', 'त्यांची विचारसरणी तपासली पाहिजे' असे उलट हल्ले निषेध करणाऱ्यांवरच करण्याची गरज का भासते व त्यायोगे अशा वृत्ती-प्रवृत्तींना एक प्रकारे संरक्षणच का प्रदान केले जाते असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो.

या काळातील लेखक - कलावंताची वेगवेगळी निवेदने ही देशात नजीकच्या काळात असहिष्णुतेने, अविवेकाने, अविचाराने जो कळस गाठला गेला व त्याने जे वातावरण निर्मिले गेले त्या विरोधातल्या बंडाची कारणमीमांसा मांडणारी निवेदने आहेत. त्या वातावरणाच्या परिणामी डॉ. नरेंद्र दाभोळकर, गोविंदराव पानसरे, डॉ. कलबुर्गी यांच्या सारख्या समाजसुधारक, लेखक, विचारवंत कार्यकर्त्यांच्या हत्या केल्या गेल्या, दादरीसारखी निघृण हत्येची घटना घडवली गेली, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट सारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेच्या अध्यक्षपदी व संचालक मंडळावर अपात्र, अयोग्य व मनमानी पद्धतीने केवळ आपल्याच वैचारिक परिवाराच्या निकषावर नियुक्त्यांच्या विरोधातले १३९ दिवसांचे विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपले गेले, त्याही अगोदर काही काळापूर्वी पेरुमल मुरुगन सारख्या लेखकाला स्वयंघोषित संस्कतीरक्षकांच्या व प्रशासनाच्या दबावाखाली स्वतःचा लेखक म्हणून मृत्यू घोषित करून, लेखन थांबवून, अभिव्यक्ती संन्यास घेण्यास बाध्य केले गेले होते. सुधींद्र कुळकर्णींच्या अंगावर शाई फेकून हल्ला केला गेला, 'द हिंदू' हा वेंडी डोनिएर या विदुषीचा अभ्यासपूर्ण ग्रंथ असाच दबाव आणून लेखक - प्रकाशकांना न्यायालया बाहेरूनच परत घेण्यास बाध्य केले गेले.

या देशात गुलाम अलींचा कार्यक्रम रद्द होतो, आमीर खानसोबत नको ते वर्तन केले जाते, भारत-पाक क्रिकेट सामने रद्द करावे लागतात. राष्ट्रपतींनी मुस्लिमांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केल्यावरचे काही लोकांचे असभ्य वर्तन घडते, रामानुजन यांचा 'थ्री हंड्रेड रामायणाज' हा निबंध अभ्यासक्रमातून काढून टाकण्यास बाध्य केले जाते. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी यांचे खून पाडले जातात, इंडियन हिस्टरी रिसर्च कौन्सिल सारख्या प्रतिष्ठित इतिहासविषयक राष्ट्रीय संस्थेच्या अध्यक्षपदी जाती व्यवस्थेचे प्रच्छन्न समर्थन करण्याऱ्यांची नियुक्त केली जाते, फिल्म सेन्सॉर बॉर्डाच्या अध्यक्षपदी विशिष्टच परिवाराच्या विचारसरणीच्या नैतिकतेच्या व श्लील-अश्लिलतेच्या बुरसटलेल्या विचारांचेच संस्कारित नियंत्रण आणू बघणाऱ्या व्यक्तीची नेमणूक केली जाते (जी पुढे नुकतीच मागे घ्यावी लागली), एका व्यंगचित्रकाराला त्याच्या व्यंगचित्राबद्दल चक्क राष्ट्रदोही ठरविण्यापर्यंत मजल जाते, त्या संबंधातच पुढे राज्यकर्त्यांवर टीका करण्याचा अर्थ राजद्रोह लावला जाईल अशा आशयाचे सरकारी परिपत्रक काढले जाते, यातल्या कितीतरी घटना या विद्यमान भाजपाचे केंद्र व राज्यात बहुमतांचे सरकार आल्यानंतरच घडलेल्या आहेत. त्या घडवणाऱ्यांचा शोध घेऊन घेऊन त्यांना जरब बसेल, त्यांचा बंदोबस्त करण्यात येईल असे कोणतेही आश्वासक वातावरण केंद्र व राज्य सरकारांकडून निर्माण करण्याची इच्छाशक्ती देखील प्रदर्शित केली जात नाही. उलट तशी ती प्रदर्शित न झाल्याने ती व्हावी म्हणूनच सभ्य लोकशाही मार्गाने निषेध नोंदवू बघणाऱ्यांचीच खिल्ली उडवणारी, त्यांच्या निषेधाला सरकारविरुद्ध रचलेले बंड संबोधून, त्याला 'राजकीय' कृती ठरवणारी, त्यांचा अधिक्षेप करणारी अशीच वक्तव्ये केंद्र व राज्यातले मंत्री व नेते सातत्याने करीत राहतात. तरीही या सरकारांना दोषच द्यायचा नाही तर त्यांचे त्याबद्दल काय गुणगान करायचे आणि देशभरात अशी हत्या सत्र घडवणाऱ्यांच्या कर्तृत्वाचे पोवाडे त्या लेखकांनी रचायचे अशी या सरकारांची अपेक्षा आहे काय ?

सार्वभौम, धर्मनिरपेक्ष आणि लोकसत्ताक असणाऱ्या या राष्ट्राचे घटनात्मक उद्दिष्ट सर्व प्रकारच्या समतेवर आधारित शास्त्रीय वृत्तीचा भयमुक्त, निर्भय, स्वावलंबी असा बहुविध अभिव्यक्ती समृद्ध समाज निर्माण करणे हे आहे. तो तसा निर्माण करण्यात जे जे आडवे येत असेल त्याचा शांततापूर्ण मार्गाने निषेधच करणे हे त्यामुळे या देशाच्या नागरिकांचे

अनुक्रमणिका

घटनात्मक कर्तव्यच आहे. लेखक - कलावंत - विचारवंत - शास्त्रज्ञ - इतिहासकार हे सारेच प्रथम नागरिक आहेत. त्यामुळे देशाच्या सद्यःस्थिती बाबत आपले आकलन मांडणे व राज्यघटनेला बाधा आणणारे तत्त्वज्ञान, विचारधारा व वर्तन यांना आळा बसेल अशा रीतीनेच जनमत तयार करण्यासाठी आवश्यक ती कृती करणे हे त्यांचेही घटनात्मक हक्कच नव्हेत तर कर्तव्यही आहे. त्यांनी आपले पुरस्कार परत करून नुसता हक्कच बजावलेला नाही तर आपले घटनासिद्ध कर्तव्यही बजावले आहे. त्यांना तसे करण्यापासून रोखणे, त्यांची खिल्ली उडवणे वा त्यांच्या त्या कृतीची केवळ 'राजकीय' कृती म्हणून संभावना करणे याचा अर्थ त्यांच्या कर्तव्यभावनेचा व ही भावना ज्या राज्यघटनेच्या रक्षणार्थ ते व्यक्त करीत आहेत त्या राज्यघटनेचाच अवमान करणे ठरते.

भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता व शास्त्रीय वृत्तीच्या समाजाच्या निर्मितीचा आदर्शाच्या विरोधात ही राज्यघटना निर्माण होण्या आधीपासूनच काही शक्ती क्षीण असल्या तरी वावरत होत्याच. त्यांच्या मनातले राष्ट्र, त्यांचा त्या मनातल्या राष्ट्राचा राष्ट्रध्वज, त्याचा एकचएकरंग, त्यांचे राष्ट्रगीत, त्यांची राष्ट्रप्रार्थना त्यांच्याच तेवढ्या एकाच रंगात हे राष्ट्र बुडवून काढण्याचा निर्धार, हे सारेच या राष्ट्रातल्या बहुसंख्य व अल्पसंख्य यांनी मिळून निर्माण केलेल्या नवभारतापेक्षा वेगळेच होते. वर्णव्यवस्था, चातुर्वर्ण्य, कर्मविपाक, ईहवाद नाकारून लोकाकडे पाठ फिरवणारे पारलौकिक सुख, पुनर्जन्म, अस्पृश्यतेचा वारसा, दलित, शुद्र व स्त्री विषयक असमानता, भिन्नलिंगी, भिन्न धर्मीयांबद्दलचा द्वेष, तिरस्कार, अंधश्रद्धा अशा रुढी - परंपरांना धर्म व संस्कृतीची दर्जा देणारी पुरोहितशाही, जातीव्यवस्था व तिचे प्रच्छन्न समर्थन, १८५४ पूर्वीचेच शिक्षण आदर्श मानणारी धारणा, मोठ्या लोकसंख्येला ज्ञानाचा व मनुष्यत्वाचा अधिकाराच नाकारणारा मानवधिकाराचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिक्षेप, राज्याच्या निधर्मी कायद्यापेक्षा धार्मिक ग्रंथातले व स्मृतींचे कायदे श्रेष्ठ मानणारी विचारप्रणाली, या साऱ्यांनी युक्त असा भारत राज्यघटनेने ज्या नवभारताच्या निर्माणाचे स्वप्न बधितले त्या नवभारताचा फक्त वारसा होता. या वारश्यात व या संचितातच बदल करण्यासाठी भारतीय राज्यघटनेचा कायदा अस्तित्वात आणला गेला होता. तो केवळ राज्यकर्त्यांना राज्य करण्यासाठी सोय करून देणारा कायदा नाही, तरी लोकांनी, लोकांसाठी, लोकंकरवी केलेला नवभारताच्या निर्माणाचा तो कायदा आहे, ज्याच्या मूलभूत संरचनेत कोणताच बदल या देशातील जनता कधीही खपवून घेणार नाही हे या अमर असलेल्या जनतेने त्या कायद्याशी छेडछाड करणाऱ्या इथल्या मर्त्य मानवांना वारंवार आपल्या कृतीने दाखवून दिले आहे.

या देशातले नुकतेच घडून गेलेले पुरस्कार वापसीचे लेखकांचे अभूतपूर्व बंड हे मालिकेतले या राज्यघटनेच्या रक्षणाचे आपल्या काळातले ताजे व परिणामकारक आणि प्रभावी ठरलेले असे बंड आहे. अशी बंड, असे उठाव करताना त्या त्या वेळी सत्तेवर कोणता पक्ष आहे हे बघून त्यांच्या पक्षीय स्वार्थाच्या रक्षणासाठी वा हरणासाठी झालेली ही बंड नसतात. तशी ती ठरवून त्या उठावांपेक्षा आपले राजकीय व पक्षीय स्वार्थच तेवढे महान ठरवू बघणाऱ्यांना अशा उठावांनी नेहमीच त्यांची त्यांची जागा दाखवूनच दिली आहे. अशा उठावांनीच वेळोवेळी जनतेची क्षीण करून झालेली ऊर्जा पुनः पुन्हा तिला बहालही केली आहे. समाजाला अवांछित वळण लागल्यापासून रोखू धरून त्याला वांछित अशा इष्ट दिशेनेच वळवण्यात अशा बंडांचीच भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिलेली आहे.

काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत देशातल्या कितीतरी राज्यातील - भाषातील लेखक - कलावंत - शास्त्रज्ञ - इतिहासकार - विचारवंत - कार्यकर्ते या निषेधात व्यक्तिगतरित्या जे उतरले तो एक स्वयंस्फूर्त, कोणाच्याही नेतृत्वाशिवाय, कोणताही राजकीय पक्ष, राजकीय विचार अथवा राजकारण यांच्या अनुपस्थितला उठाव होता. या साऱ्या कुबड्यांचा आधार अशा उठावाला भासण्याचे कारणच नव्हते.

४ सप्टेंबर, २०१५ रोजील प्रख्यात हिंदी लेखक उदयप्रकाश यांनी कलबुर्गींच्या खुनाच्या निषेधार्थ राष्ट्रीय साहित्य अकादमीचा पुरस्कार परत केला. त्यापाठोपाठ नयनतारा सहगल, अशोक वाजपेयी, कृष्णा सोबती, शशी देशपांडे यांनी आपआपले पुरस्कार परत केले. अजमेर अवलख, अमन सेठी, गणेश देवी, वीरभद्रय्या, यांच्या पुरस्कार वापसीच्या घोषणांसह के. सच्चिदानंदन, पी. के. परक्कडवू, अरविंद मलगट्टी यांनी साहित्य अकादमीच्या आपल्या पदांचे राजीनामेही दिले. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त अशा सुमारे ४० लेखकांच्या पाठोपाठ राज्याराज्यातल्या साहित्य अकादमी व राज्य शासनाचे पुरस्कारप्राप्त झालेल्या अनेक लेखकांनी देखील या निषेधाच्या समर्थनार्थ आपआपले पुरस्कार परत करून लेखकांच्या या अभूतपूर्व बंडात आपलाही सहभाग नोंदवला. या उठावात पंजाबी, हिंदी, उर्दु, गुजराती, काश्मीरी, तेलुगु, कन्नड, आसामी, इंग्रजी, बंगाली, राजस्थानी, अशा कितीतरी भारतीय भाषातले साहित्य अकादमी पुरस्कार विजेते सहभागी होते. राज्यकर्त्या पक्षांच्या मंत्र्यांनी व नेत्यांनी खिल्ली उडवण्यावर नेलेल्या या बंडाचे गांभीर्य व त्याची गुणवत्ता

देशाच्या राष्ट्रपतींनी मात्र नेमकी जोखली. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी पुरस्कार वापसी हा निषेधाचाच एक प्रकार असून तो स्वयंपूर्त असा उठाव असल्याचे, स्वयंसिद्धच असल्याचे म्हटले होते. या निषेधाने असहिष्णुतेचा मुद्दा हा निश्चितच देशभर चर्चेचा मुद्दा बनवला, असेही राष्ट्रपती म्हणाले.

दादरी येथील गोमांस भक्षणाच्या नावावरून करण्यात आलेल्या निर्घृण खुनाच्या पार्श्वभूमीवर या देशाच्या राष्ट्रपतींनी या राष्ट्राने जपलेली मूल्ये वाऱ्यावर सोडून दिली जावू नयेत, विविधता, बहुलता व सहिष्णुता या मूल्यांच्या रक्षणासाठीच ही संस्कृती जगभर ज्ञात आहे. व शतकानुशकते या देशाला एकत्र राखण्यात या मूल्यांचाच वाटा राहिलेला आहे हे सांगणे नेमके कोणासाठी होते ? तर हे होते या देशातल्या या मूल्यांना सुरुंग लावू बघणाऱ्यांसाठी तसेच राज्यकर्त्यांसाठीही. बहुविधता आणि मानवता ही मूल्ये काणेत्याही परिस्थितीत आपण गमावून बसता कामा नये या देशाच्या राष्ट्रपतींना सांगावे लागते तेव्हा या मूल्यांना किती गंभीर इजा पोहचवली जाते आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

असहिष्णुतेच्या व त्यातून उत्पन्न होत असलेल्या अमानवीयता व क्रौर्याच्या वृत्तीफैलावामुळे आणि त्याला लाभणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या मूक पाठिंबामुळे या देशात बहुसंख्याकवाद हा भाषिक, धार्मिक, मूळनिवासी, अशा साऱ्याच प्रकारच्या अल्पसंख्यांकांवर आक्रमण करण्याच्या पावित्र्यात उभा झालेला आहे.

विविध धार्मिक, बहुसांस्कृतिक, बहुभाषिक अशी सहिष्णुता ही व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यासोबतच व्यक्ति आणि समाजाच्या समन्यायी व सर्वसमावेशक विकासासाठी आणि देशविदेशातील गुंतवणूकदार व त्यांचा पैसा, त्यांचे नागरिक, प्रवासी, पर्यटक इ. या देशात निर्भयपणे वावरून सुरक्षित राहू शकतात हा विश्वास या देशाबद्दल जगभरात निर्माण करण्यासाठी देखील अतिशय आवश्यक अशी बाब आहे. जगभर या देशाची प्रतिमा विद्यमान असहिष्णुतेच्या वातावरणामुळे मलिन होत आहे.

ब्रिटनमध्ये देखील सुमारे दोनशे नामवंत लेखकांनी ब्रिटीश पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन यांना निवेदन देऊन भारतात निर्माण झालेले भय व दहशतीचे वातावरण आणि वाढती असहिष्णुता याबद्दल चिंता व्यक्त करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतच्या त्यांच्या भेटीत हा प्रश्न उपस्थित करण्याची विनंती केली होती. भारतातील लेखक - कलावंत - विचारवंतांसोबतच शास्त्रज्ञ, चित्रपटनिर्माते, अभ्यासक, संशोधक, अभिनेते यांनी परत केलेल्या पुरस्कारांचा उल्लेखही त्यात करण्यात आला होता. या साऱ्यांना भारतीय पंतप्रधानांनी यथायोग्य सुरक्षा प्रदान करण्याबाबत त्यांच्याशी कॅमेरान यांनी बोलावे असेही त्यात सुचविण्यात आले होते. शांततामय सहजीवनासाठी हे अत्यंत आवश्यकच आहे.

पेन इंटरनॅशनल या जगभरातील ख्यातनाम लेखकांची संघटना असलेल्या या संस्थेने लिहिलेले ते दुसरे पत्र होते. १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी या संबंधात केवळ महिनाभराच्या आत लिहिलेल्या दुसऱ्या पत्रात जगभरातील १५० देशांमधील लेखकांनी भारतातल्या या पुरस्कार परत करण्याऱ्या लेखक - कलावंतांनी केलेल्या या बंडातील भावनेच्या ते सोबत असल्याचे सांगतात, 'इंडियाज डॉटर' या ब्रिटीश चित्रपटनिर्माते लेस्ली उडविन यांनी निर्मिलेल्या डॉक्युमेंटरीवरील बंदी उठवण्याची मागणीही अन्य एका गटाकडून करण्यात आली होती.

ब्रिटनच्या संसदेतील ४६ संसद सदस्यांनी, ज्यात लेबर पार्टी या विरोधी पक्षाचे नेते जेरेमी कॉरबन यांचाही समावेश होता, त्यांनी भारत सरकारकडे मानवाधिकारांच्या प्रश्नावर चर्चा करावी यासाठी लक्ष वेधणारी सूचनाही त्यांच्या संसदेत मांडली होती.

भारताची प्रतिमा नजीकच्या काळातील या काही घटनांनी जगभर कशी झाली आहे हेच त्यातून दिसते. भारतातील असहिष्णूतेच्या या वातावरणाच्या परिणामी जग देखील कसे चिंतीत आहे व त्याचा ज्या विकासासाठी विद्यमान सरकार लोकांनी बहुमतांनी सत्तेवर आणले त्या आपल्या विकासावरच कसा परिणाम संभवतो याचा विचार या सरकारला सत्तेवर आणणाऱ्यांनी व आपल्या साऱ्याच देशवासियांनी गांभीर्याने करण्याची वेळ या वातावरणाने आणली आहे.

लेखकांनी दाखवलेल्या या वातावरणाच्या निषेधाच्या 'पुरस्कार-वापसी'च्या मार्गावरून लेखकांच्या त्या आवाजात आवाज मिसळून दिल्ली, मुंबई, पुणे, कलकत्ता, बंगलोर, हैद्राबाद, चेन्नई, अलाहाबाद अशा ठिकाणच्या देशभरातील प्रख्यात ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय, संशोधन, संस्थामधील पद्मभूषण सारख्या पुरस्कारांनी देखील सन्मानित शास्त्रज्ञांपासून सर्वच स्तरावरील सुमारे १२५ शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत इत्यादींनी शास्त्रीय वृत्ती निर्माणावर, बुद्धिप्रामाण्यावर सध्या जे हल्ले केले जात आहेत त्याविरुद्ध आपलाही आवाज उठवण्याचे आवाहन देशातील सर्व

स्तरातील लोकांना केलेले आहे.

लेखकांच्या या बंडात कलावंत, चित्रपटनिर्माते, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंतांसोबतच देशातील ख्यातनाम इतिहासतज्ज्ञ, इतिहासकारांनी विचारांची लढाई विचारांनी लढण्याचे टाळून ती गोळ्या घालून लढल्या जात असल्याच्या द्वेषपूर्ण असहिष्णू वातावरणाचा तीव्र निषेध केला आहे. जी. एम. भार्गव सारख्या 'पद्मभूषण' लाभलेल्या, शास्त्रज्ञांनी त्यात भाग घेवून आपला पुरस्कार परत केला आहे.

शांतीनिकेतन, दिल्ली, बंगलोर, कॅनडा, ब्रिटन, मुंबई, लंडन, गोवा, चेन्नई, केरळ, कॅनबेरा, पॅरिस, बडोदा, कोलंबिया, ओहिओ, डर्बीशायर, कुंदपूर, हैद्राबाद, सुरत, त्रिवेंद्रम, डेन्मार्क, म्हैसूर, रोहतक, लॉस एंजल्स, शिलाँग, ऑरोव्हिल, सिएटल, गुजरात, जयपूर अशा जगभरातील ठिकठिकाणच्या सुमारे ३०० हून अधिक महत्त्वाच्या चित्रकार, छायाचित्रकार, चित्रकलाशिक्षक - प्राध्यापक, कलासमीक्षक, कला - इतिहासकार, यांनीही नरेंद्र दाभोळकर, गोविंदराव पानसरे, डॉ. कलबुर्गी यांच्या या हत्यासत्राची घोर निंदा करून देश - विदेशातील सर्वत्र द्वेष पसरवू बघणाऱ्या या शक्तींचा प्रतिकार करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी तर दादरी उधमपूर, फरीदाबाद सारख्या घटनांच्या निमित्ताने सामान्य नागरिकांच्या जीवितावरील वाढते हिंसक हल्ले, दलित - अल्पसंख्यांकाबाबत सत्तेत असणाऱ्यांनी वापरलेली असभ्य व अवमानजनक भाषा, सृजनशील, सर्जक व वैचारिक कृती नष्ट करणारी नियंत्रणे, धर्मवेडेपणा, यात घडवली जात असलेली वाढ रोखण्यासाठी राज्यघटनेने दिलेले सर्वसामान्यांचे सर्व अधिकार व हक्क, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, असहमती नोंदवण्याचे स्वातंत्र्य आपआपला धर्म व संस्कृति जोपासण्याचे स्वातंत्र्य याच्या रक्षणाची हमी दिली जाईल, असे वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक तो प्रतिकार करण्याचे आवाहनही केले आहे.

लेखक, कलावंत, विचारवंत, चित्रकार, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ इतिहासकार असा देशविदेशातील बुद्धिवादी, बुद्धिजीवी व बुद्धिप्रामाण्यवादी वर्ग, देशातील ही सर्वोच्च विद्वत्ता, प्रतिभा यांचा एवढ्या मोठ्या प्रमाणावरील हा उद्रेक हा देश प्रथमच बघतो आहे. त्या अर्थाने लेखक - विचारवंतांचे हे या देशातले पहिलेच अभूतपूर्व बंड आहे आणि ते आपल्या सहिष्णू वर्तमानाच्या रक्षणासाठी आहे तसेच ते आपली प्राचीन सहिष्णू परंपरा रखण करण्यासाठी आणि भविष्यात द्वेषमुक्त भारत निर्माण करण्यासाठीचे देखील बंड आहे.

पिंपरी-चिंचवड येथे नुकत्याच झालेल्या ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने देखील लेखकांच्या या असहिष्णुतेविरुद्धच्या बंडाच्या पार्श्वभूमीवर दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या खुनाचा निषेध करीत त्यांच्या खुन्यांचा शोध न लागणे व देशातले असहिष्णू वातावरण या साऱ्या संदर्भात केंद्र व राज्य सरकारांनी यथायोग्य कारवाई करत लोकांना आश्वासित करावे अशी मागणी एका ठरावान्वये केलेली आहे.

लेखकांचे हे बंड त्यामुळे आता केवळ त्या मोजक्याच लेखकांचे बंड उरलेले नाही. बारा कोटी मराठी भाषिकांच्या देशातील कोणत्याही भाषेत न होणाऱ्या एवढ्या मोठ्या प्रमाणावरील या अखिल भारतीय साहित्य संमेलनापर्यंत त्या बंडातील आशय पोहचता झाला असल्याने ते बंड हे केवळ 'राजकीय', 'कागदी' वा एखाद्या राजकीय पक्षाने 'तयार केलेले', एखाद्या राजकीय पक्षाविरुद्धचे बंड तेवढे म्हणण्यासारखी स्थिती उरलेली नाही.

देशातील वाढत्या असहिष्णुतेबाबत लोकांना सजग व सचेत करण्याचा लेखकांच्या या बंडाचा उद्देश या संमेलनातील या ठरावाने फार मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहचता केला आहे.

केंद्र व राज्यातील एकाच पक्षाच्या दोन्ही सरकारांनी आता तरी या प्रश्नाचे केवळ राजकारण न करता सांस्कृतिक दहशतीचे व असहिष्णुतेचे हे भयावह वास्तव मान्य करून त्याविरुद्ध कृती करण्याची इच्छाशक्ती त्यांच्यात जागृत करावी व जनतेला आश्वस्त करावे हीच लोकांची व या लेखकांचीही सहिष्णुतेच्या व द्वेषमुक्त भारताच्या रक्षणासाठी इच्छा आहे.

हा मजकूर लिहीत असतानाच हैद्राबाद विद्यापीठातील दलित विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला प्रवृत्त व्हावे लागणारी जी परिस्थिती असंवेदनशीलतेतून निर्माण झाली त्याविरुद्ध देशभर चाललेल्या निदर्शनांची वृत्त येत आहेत.

त्या प्रकरणी एका केंद्रीय राज्यमंत्र्यावर व कुलगुरुंवर गुन्हा दाखल होण्याइतपत वेळ येत आहे. या साऱ्या प्रकाराच्या पार्श्वभूमीवर त्या विद्यापीठाने दिलेली डी लिट पदवी परत करण्याची घोषणा प्रख्यात हिंदी कवी अशोक वाजपेयींनी केली आहे. त्या विद्यापीठातील बारा प्राध्यापकांनी या घटनेच्या निषेधार्थ राजीनामे देण्याची तयारी चालवली आहे.

आत्महत्या करणारा विद्यार्थी दलित असल्याचा उल्लेख ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला त्या केंद्रीय राज्यमंत्र्याच्या

अनुक्रमणिका

संबंधित खुलाश्यात येतो तर केंद्रीय मनुष्यबळ मंत्री मात्र तो विद्यार्थी दलित नसल्याची विधाने करून पुन्हा याला 'राजकीय' रंग दिला जात असण्याची तीच आवई उठवतात. आत्महत्या झाली हे वास्तव आहे, त्याला काही परिस्थिती कारणीभूत झाली हेही वास्तव आहे, असे असताना त्या आत्महत्येच्या कारणांचा शोध घेवू संबंधितांचे काय करायचे यावर लक्ष केंद्रित करून तसे ठाम आश्वासन देण्याचे सोडून लखनौला पंतप्रधान नरेंद्र मोदी या घटनेवर वक्तव्य करेपर्यंत तो विद्यार्थी दलित की ओबीसी हा वाद घालत बसणे ही कोणती 'सहिष्णू' संस्कृती आहे? पाठोपाठच आलेली वृत्त ही शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्था, आवळले जाणारे सावकारी पाश आणि कोणतीही ठोस सरकारी उपाययोजना त्यावर नसणे, या साऱ्या पार्श्वभूमीवर शासनाचे 'कृषीभूषण', 'शेतीनिष्ठ' व तत्सम पुरस्कार लाभलेल्यापैकी काही शेतकऱ्यांनी ते पुरस्कार परत करण्याची घोषणा केली आहे.

नुकत्याच आलेल्या एका वाहिनीवरील एका वृत्तानुसार नयनतारा सहगल यांच्याह दहा लेखकांनी परत केलेले पुरस्कार आता साहित्य अकादमीने केलेल्या त्यांना अपेक्षित कृतीनंतर अकादमीच्या विनंतीवरून परत घेण्याचे मान्य केले असे सांगितले गेले. मात्र उदय प्रकाश, नयनतारा सहगल व अशोक वाजपेयी यांनी ते पुन्हा स्वीकारण्यास ठाम नकार दिला असेही वृत्त आहे. १० लेखकांना तरी अकादमीने त्या संस्थेची गेलेली इभ्रत वाचवण्यासाठी पुरस्कार परत घेण्यासाठी तयार केले अशा बातम्या प्रसृत केल्या जात आहेत. या लेखकांची प्रतिमा उध्वस्त करण्याची ती युक्ती नसेलच असे नाही. आपल्या कृतीचा अपेक्षित परिणाम झाल्या असल्याची खात्री पटल्याने काही लेखक पुरस्कार परत घेणार असतीलही. मात्र ती त्यांची अकादमीच्या या बंडानंतरच्या बुद्धीनंतर आलेल्या शहाणपणाच आदर करणारी सहिष्णुताच म्हणावी लागेल. अनेकांना त्यांची ही कृती पश्चात बुद्धी वाटण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. मात्र साहित्य अकादमी ही शासनाची नसून स्वायत्त संस्था आहे व तिची स्वायत्तता कायम राखायची तर शासनाचा निषेध व अकादमीचा निषेध यात फरक करावा लागणे आवश्यकतच आहे. अकादमीचा निषेध हा कलबुर्गी यांच्या खुनानंतर अकादमीने त्याचा निषेध न करता उलट शोकसभा घेण्याचेही नाकारण्याची जी असहिष्णुता दाखवली होती त्या संदर्भात व्यक्त झाली होता. या निषेधानंतर अकादमीने आपली चूक सुधारली. हा त्या पुरस्कार परत करण्याच्याच कृतीचा परिणाम होता. तसेच, लेखकांचे हे बंड उत्स्फूर्त नव्हते, तो ठरवून केलेला कट होता म्हणणारे देखील या वृत्तांमुळे तोंडघशी पडले असून हा उठाव स्वयंस्फूर्तच कसा होता व त्याला राजकीय रंग देणारे केंद्राचे मंत्रीच राजकीय विधाने करून या देशातल्या सर्वोच्च प्रतिभेला कसे अवमानित करत होते हेच स्पष्ट झाले आहे. हाच अविवेक, अविचार आणि हीच असहिष्णुता आहे.

देशातील विद्यमान असहिष्णू, अविवेकी, अविचारी, असंवदेनशील, दहशत निर्माण करणाऱ्या परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी लेखकांनी स्वंयस्फूर्तीने केलेले बंड केवळ लेखक- कलावंत - विचारवंत - शास्त्रज्ञ - इतिहासकार यांच्यापुरते व त्यांनी त्यांचेच पुरस्कार तेवढे परत करण्यापर्यंत आता मर्यादित न उरता ते शेतकरी वर्गाला देखील त्याच्या परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी कृती करण्याची प्रेरणा देत गेले आहे. 'कृषीभूषण' व 'शेतीनिष्ठ' असे शासनाचे पुरस्कार शेतकरी परत करण्याच्या घोषणा करू लागले आहेत. त्यालाही विद्यमान राज्यकर्ते ठरवून केलेले राजकारणच म्हणणार आहेत काय ?

या देशात आज हे नेमके चालले आहे तरी काय? असा प्रश्न पडावा आणि या पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळकांनी तत्कालीन ब्रिटिश सरकारला उद्देशून विचारलेला, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' या प्रश्नाचा प्रतिध्वनी आपल्या प्रत्येकाच्या मनात उठावा अशी ही स्थिती निर्माण झाली आहे.

विद्यमान सरकारांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर व्यक्त होणाऱ्या या भावनांचा यथोचित आदर करून लेखक, कलावंत, विचारवंत, तसेच दलित, स्त्रिया, विविध अल्पसंख्य समुदाय, शेतकरी आणि ज्यांच्या ज्यांच्यावर अशा हल्ल्यांच्या व विपन्नतेच्या शक्यता असू शकतात अशांना संरक्षण पुरविण्याची कारवाई करण्याचे तसेच हे द्वेषाचे वातावरण निर्मिणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त द्वेषमुक्त भारत निर्माणासाठी करण्याचे अजूनही टाळण्याचा अर्थ ही सरकारे त्यांना दिलेल्या बहुमताची वैधताच घालवून बसताहेत असाच होतो, सोबतच त्यांना द्वेषमुक्त भारत निर्माण करायचा आहे की नाही की तो द्वेषयुक्तच राखायचा आहे या बद्दलच लोकांमध्ये संशय निर्माण करणाराही ठरतो.

(लेखक - कलावंतांचा एल्गार : असहिष्णुतेच्या विरोधात', संपादक - डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रकाशक - कॉ. गोविंद पानसरे स्मृती ट्रस्ट मुंबई, या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील संपादित भाग)

। डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
१०५, संकल्प सहनिवास
खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर - ४४० ०१०
भ्रमणभाष : ९९६०४९३६२२

नव्याने गोविंदाग्रज

डॉ. सुधीर रसाळ

'प्रेमाचे शाहीर' अशी गोविंदाग्रजांची ओळख करून देण्यात येते. त्यांनी प्रेमभावनेच्या महत्तेवर, प्रेमाच्या रोमँटिक स्वरूपावर आणि प्रेमवैफल्यामुळे येणाऱ्या उद्ध्वस्ततेच्या अनुभवावर काव्यलेखन केले, असे सामान्यपणे त्यांच्या काव्याचे आकलन केले जाते. असाधारण कल्पनाशक्ती असलेले भाषाप्रभू कवी अशी त्यांची महती सांगितली जाते. परंतु या कवीने आपल्या कवितेतून जीवनाच्या घडवलेल्या अर्थपूर्ण दर्शनाकडे मात्र दुर्लक्ष केले जाते.

गोविंदाग्रजांनी मानवाची दोन रूपे आपल्या कवितेतून प्रकट केली आहेत. त्यापैकी एक रूप सामान्य माणसाचे आहे. या सामान्य माणसाबद्दल प्रतिकूल भावना गोविंदाग्रजांच्या कवितेत उमटलेली असते. म्हणून या सामान्य माणसाचे उपहासगर्भ चित्रण त्यांच्या कवितांत जागोजाग रेखाटले गेले आहे. अशा माणसांसाठी 'आंधळ्यांची माळ' या कवितेत त्यांनी 'आंधळे' ही प्रतिमा योजिली आहे. या आंधळ्यांची माळ 'रानोमाळ' चाललेली असते. 'माळ' या प्रतिमेतून अशा माणसांचे संख्यावैपुल्य आणि 'रानोमाळ' मधून त्यांच्या वावराचे स्थलवैपुल्य प्रकट केले गेले आहे. 'तुकड्या' साठी ओरड करणाऱ्या, पैशांसाठी धडपडणाऱ्या, परंतु तोंडाने मात्र हरिनामाची बडबड करणाऱ्या आंधळ्यांची माळ या जगात जागोजाग - 'रानोमाळ चाललेली असते. ज्याला थोडेबहुत दिसत असते असा अर्धवट आंधळा त्यांचे नेतृत्व करीत असतो. त्याच्या मागोमाग बाकीचे 'आंधळे' चालत असतात. या आंधळ्यांबद्दल गोविंदग्रज पुढील निरीक्षण नोंदवतात - '''यांना दिसते केवळ 'आज' । नाही कांहिं 'उद्यां' ची लाज । मिळेल कैशी अगदीं वांझ । सायंकाळ । 'येथील 'वांझ सायंकाळ' ही प्रतिमा अर्थपूर्ण असून ती गोविग्रजांच्या जाणिवा अधोरेखित करणारी आहे. 'सायंकाळ हे मानवी जीवनाचे शेवटचे पर्व आहे. आयुष्यभर जे काही कर्तृत्व केलेले असते त्याचे फळ सायंकाळी माणसाजवळ असते. ज्यांना 'उद्या' ची लाज असते ते 'उद्या' साठी निर्मिती करून काही तरी मिळवून ठेवत असतात. अशांची 'सायंकाळ' वांझ नसते 'उद्या' ची लाज असते ते 'उद्या' साठी निर्मिती करून काही तरी मिळवून ठेवत असतात. अशांची 'सायंकाळ' वांझ नसते. 'उद्या' ची लाज बाळगणारे त्यासाठी परमेश्वराकडे आधीच 'दृष्टी' मागून ठेवत असतात. ही दृष्टी जर नसेत तर कर्मामध्ये जंजाळ येण्याची भिती असते. परंतु हे 'आंधळे' मात्र असा विचारही करत नाहीत. म्हणून या कवितेच्या शेवटी 'प्रभो'! ही आंधळ्यांची माळ तूच सांभाळ' अशी प्रार्थना परमेश्वराकडे केली जाते.

या कवितेत मानवाचे दुसरे रूपही अप्रत्यक्षपणे चित्रीत झाले आहे. हा मानव 'उद्या' ची चिंता करणारा त्यासाठी परमेश्वराकडे 'दृष्टी' मागून ठेवणारा, आयुष्यभर कष्ट करून,

अनुक्रमणिका

निर्मिती करून काही तरी 'टिकाऊ' असे मिळवून ठेवणारा कर्तृत्ववान माणूस आहे. गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेत 'जोमात' वाढणारा वृक्ष आणि त्याच्या भोवतीचे गुडघाभर उंचीचे खुरटे जग, यांच्या रेखाटनातून माणसाची ही दोन्ही रूपे व्यक्त झाली आहेत, यांपैकी 'उंच वृक्ष' असलेला माणूस हा गोविंदग्रजांच्या कवितेचे केन्द्र असून खुरटा माणूस ही या केंद्राला उठाव देणारी पार्श्वभूमी आहे. या उंच माणसाच्या जगण्यामागील प्रेरणा, त्याची जीवनोद्दिष्टे आणि त्याच्या भोवतीचे त्याला प्रतिकूल असलेले वातावरण याचे चित्र रेखाटणाऱ्या 'हुरहुर' या कवितेचा येथे विचार करायचा आहे. या कवितेचा कथनकर्ता हा असाच एक 'उंच माणूस असून तो आपल्या जीवितकार्यासंबंधी चिंता व्यक्त करीत आहे. या कवितेची संहिता पुढीलप्रमाणे आहे.

काळोखामधुनी पल्याड न दिसे या रात्रीचा शेवट,
आणि मोहकता तिला तरि दुष्प्राप्य तारागण?
अज्ञेयांतुनि आरपार न दिसे दिकाल यांचा तट,
चित्ताच्या नयनीं दुरून खुपती कां दिव्य आशाकण?
मी श्वासास धनी, अखंड फिरतो वारा भरारा जरी,
आधीं बारिक वाडगें तरि तया जहीं कुंपणें घातली !
या वाऱ्यावर बांधणार कधिं मी उंची मनोरे परि?
केव्हां नांगरणार ताल उघडी ही माळरानांतली ?
जें दृष्टीस दिसे न, तेंच पटुनी वाटे चित्ता कधी ?
बुद्धीला जिरवीन भावजलिं कां ?- आशा न माते दुजी
तेजाला हुडकीन कां लपलिया या अंधकारमधीं ?
केव्हां मस्तक लोपुनी हृदयिं या होईल उंची खुजी ?
माझें होईल सर्व हें कधिं, मला आजला पारखें?
माझें चित्रच नाचवीन नयनीं माझ्या कधीं सारखें?

ही कविता एक सुनीत आहे. हिच्या कडव्यांची विभागणी जरी केलेली नसली तरी हे बारा अधिक दोन ओळींचे सुनीत आहे. या कवितेचा कथनकर्ता हा एक 'उंच' माणूस असून त्याला 'उद्या' चेही दिसत आहे. त्यामुळे त्याला 'उद्या' घडविण्यासाठी काही प्राप्तव्ये मिळवायची आहेत. परंतु भोवतालची परिस्थिती अशी आहे की ही प्राप्तव्ये सहजपणे प्राप्त होऊ शकणार नाहीत. सभोवताली असा काळोख आहे की त्यातून या रात्रीचा की ही प्राप्तव्ये सहजपणे प्राप्त होऊ शकणार नाहीत. सभोवताली असा काळोख आहे की त्यातून या रात्रीचा शेवटच दिसत नाही. त्यामुळे ही 'रात्र' कधी संपून प्रकाश कधी उजळणार, हे कळू शकत नाही. या वातावरणात या रात्रीला मोहकता आणणारा तारागण चमकत आहे. काळोखामुळे हे वातावरण अज्ञेय बनले आहे. आणि त्यामुळे दिक्कालाचाही 'तट' दिसू शकत नाही. कथनकर्त्याला रात्रीचा शेवट घडवायचा आहे. तसेच त्याला दिक्कालाचा तट पहावयाचा आहे. याचा अर्थ त्याला या सर्वांवर प्रभुत्व मिळवायचे आहे. केशवसुतांच्या 'आम्ही कोण'? या कवितेची आठवण होते. केशवसुतांचा कवी जसा 'दिक्कालातुनि आरपार' पाहू शकतो, तसे या कथनकर्त्यालाही पहावयाचे आहे. अशा मानवाला प्रतिकूल असलेल्या वातावरणातही या कथनकर्त्याच्या 'चित्ता' च्या डोळ्यांना दुरून आशाकण खुपत आहे. येथे 'आशाकण' ही रात्री चमकणाऱ्या 'दुष्प्राप्य' ताऱ्यांसाठी आणि या ताऱ्याच्या प्राप्तीच्या आशेसंबंधी प्रतिमा आहे. गोविंदाग्रजांच्या अनेक कवितांतून 'तारा' हे प्राप्तव्य म्हणून आलेले आहे. हे दुष्प्राप्य' तारे प्राप्त करून घेण्याची प्रेरणा जरी या कथनकर्त्याच्या 'चित्तात' जागी झाली असली तरी ते त्याला कदापिही प्राप्त होऊ शकणार नाहीत. 'उंच' माणसांना अप्राप्याच्या प्राप्तीचा वेध लागलेला असतो. त्यासाठी ते आपले आयुष्य खर्ची घालत असतात. पण त्यांना लागलेला हा वेध सफल होत नसल्यामुळे त्यांच्या वाट्याला असफलतेचे दुःखही येत असते. गोविंदाग्रजांच्या अन्य कवितांतील 'वेडा' ही प्रतिमा येथे वापरायची असल्यास ही 'उंच' माणसे वेडी असतात; आपले सुखाचे आयुष्य नाकारून ते असफलतेचे दुःखही समाधानाने भोगत असतात. 'वेड्या' माणसांच्या वाट्याला येणारे असफलतेचे अनुभव आणि त्यातील दुःख हे गोविदाग्रजांच्या कवितेची सामग्री आहे.

या विश्वातील सर्व पदार्थावर आपले प्रभुत्व या 'उंच' माणसाला प्रस्थापित करायचे आहे. याचे आणखी एक चित्र पुढच्या चार ओळींत रेखाटले गेले आहे. या कथनकर्त्याच्या भोवती वारा भरारत अखंड फिरतो, परंतु आपण मात्र श्वासरूपाने स्वीकारीत असलेल्या मर्यादित वाऱ्याचाच केवळ 'धनी' असल्याचे त्याला दुःख आहे. रात्रीच्या काळोखात खुणावणारा तारांगण त्याला जसा आपला करायचा आहे तसेच या भरारा फिरणाऱ्या संपूर्ण वाऱ्याचेही आपण 'धनी' झालो पाहिजे, असे त्याला वाटते. नंतरच्या ओळीत 'वाडगे' ही अर्थपूर्ण प्रतिमा आली आहे. वाड्याच्या लगत असलेल्या आणि कुंपण घालून बंदिस्त केलेल्या छोट्याश्या मोकळ्या जागेला 'वाडगे' म्हणतात. गुरांचा गोठा म्हणून, गोवऱ्या-सरपण साठवून ठेवण्यासाठी अगर भाजीपाला लावण्यासाठी वाडग्याचा उपयोग केला जातो. येथे 'वाडगे' ही मानवी देहासाठी आलेली प्रतिमा आहे. हा देह आधीच 'बारिक', आकारमानाने लहान, आणि तरीही त्याला 'कुंपणे' घातलेली ! येथे 'कुंपणे' या प्रतिमेचे अनेक वचनी रूप अर्थपूर्ण आहे. ही अनेकवचनी प्रतिमा माणसाला धर्म, जात, व्यवसाय इत्यादी

अनेक गोष्टींनी बंदिस्त केल्या जाण्यासाठी योजिले आहे. आपण एक छोटेसे वाडगे असावे हे आणि या वाडग्याला अनेक कुंपणे असावीत हे या कथनकर्त्याला मंजूर नाही. आपली व्याप्ती अनंत असावी आणि संपूर्ण वारा हा आपला श्वास व्हावा असे या त्याला वाटते. येथेही सूचित होणाऱ्या जाणिवेचे नाते केशवसुतांच्या जाणिवांशी आहे. 'साकल्याचा प्रदेश' आखडून टाकणारे पतित आहेत आणि 'मळ्यांस माझ्या कुंपन पडणें अगदी न मला साहे!' (नवा शिपाई) केशवसुतांच्या या (रोमँटिक) जाणिवांशी गोविंदाग्रजांच्या या ओळीचे नाते आहे.

नंतरच्या दोन्ही ओळी 'वारा' आणि 'वाडगे' या प्रतिमाशी संबंधित आहेत. भरारा वाहणाऱ्या वाऱ्यावर 'उंची मनोरे' बांधण्याचे त्याचे स्वप्न आहे. येथे 'उंची' हा शब्द 'भव्य' हा अर्थ सूचित करणारा आहे. मानवी जीवन अर्थपूर्ण करणारी, मानवी जीवन सुखी करणारी स्वप्ने 'उंची मनोरे' या प्रतिमेतून सूचित केली गेली आहेत. माणूस आपल्या वैयक्तिक महत्वाकांक्षी दिवास्वप्ने पहात असतो. त्यांना मनातले मनोरे म्हटले जाते. या कथानकर्त्याला अशी संकुचित आणि वैयक्तिक महत्वाकांक्षा नाही. त्याला स्वतःच्या मर्यादित व्यक्तित्वाचा लोप घडवायचा आहे. त्याचे स्वप्ने समग्र विश्व, समग्र जीवन आपलेसे करणे आणि आपण स्वतःही विश्वमय आणि जीवनमय होऊन जाणे हे आहे. यांचे 'उंची मनोरे' या भरारा वाहणाऱ्या वाऱ्यावर बांधण्याची असोशी त्याला लागली आहे. 'वाऱ्यावर उंची मनोरे बांधणे' ही प्रतिमा विरोधन्यासात्मक आणि विपरितभावात्मक आहे. जी भव्य स्वप्ने प्रत्यक्षात उतरू शकतील अशाच स्वप्नांचे मनोरे 'उंच' माणूस बांधत असतो आणि ही स्वप्ने 'वाऱ्यावरचे मनोरे' नाहीत याची त्याला खात्री असते. परंतु येथे कथनकर्त्याला आपल्या मनात बांधले जाणारे मनोरे वाऱ्यावरचे असल्याबद्दल खात्री आहे. प्राप्तीच्या दृष्टीने अतिशय अशक्य असलेले त्याला शक्य करायचे आहे आणि हे शक्य होणार नसल्यामुळे त्याचे दुःखही त्याला भोगायचे आहे. भव्य मनोरे बांधणे आवश्यक आणि अपरिहार्य आहे; परंतु अंतिमतः ते वाऱ्यावरचेच ठरणार आहेत. 'उंच' माणसांबाबत अशी स्वप्ने पाहणे तसे अटळ आहे तसेच त्यांचे वैफल्यात होणारे पर्यवसानही अटळ आहे तसेच त्यांचे वैफल्यात होणारे पर्यावसनही अटळ आहे. असा विपरितभावात्मक विरोधन्यास येथे साधला आहे. इच्छावैफल्याची जाणीव हे गोविंदाग्रजांच्या कवितेचे केंद्रीय सूत्र आहे. इच्छेसंबंधीची स्वप्ने सफल करण्यासाठी आवश्यक ते सर्व करण्याची या 'उंच' माणसांची तयारी असते आणि तो आयुष्यभर त्यांच्या पूर्ततेसाठी धडपडही करत असतो. परंतु ही स्वप्ने कधीच पूर्ण होऊ न देणारी एक शक्तीही त्याच वेळी कार्यरत असते. या 'उंच' माणसास विस्तीर्ण माळरानातली कुंपण नसलेली तालही नांगरून काढायची आहे. 'नांगरणे' ही प्रतिमा निर्मितीसाठीची पूर्वतयारी करण्याचा अर्थ देते. या जगातली संपूर्ण भूमी ('माळरान') हे त्याला आपले निर्मितीक्षेत्र बनवायचे आहे. परंतु हे कधी होणार असा प्रश्न त्याच्या असा प्रश्न त्याच्या मनात उद्भवला आहे. येथे या प्रश्नातून हे कधीच होणार नसल्याचे सूचन दिले गेले आहे. जे लौकिकात अशक्य असते ते शक्य करण्याच्या 'वेडा' चे हे चित्र आहे. थोडक्यात, या सर्व प्रतिमांमधून हे संपूर्ण विश्व आपले बनवण्याच्या परंतु जी असफल होणार आहे अशा इच्छसंबंधीची जाणीव या आठ ओळींत व्यक्त केली गेली आहे.

नंतरच्या चार ओळींत विश्वाच्या आकलनाबद्दलची प्राप्तव्य आणि त्यांच्या प्राप्तीबद्दलची वाटणारी चिंता प्रकट केली गेली आहे. या 'उंच' माणसास सामान्य माणसाची आकलनपद्धती पर्याप्त आणि समाधानकारक वाट नाही. सामान्य माणूस इंद्रियसंवेदनामार्फत हे विश्व जाणून घेत असतो. परंतु या विश्वाचे असे एक अज्ञात परंतु मूल्यवान क्षेत्र असते जे इंद्रियसंवेदनांमार्फत हे विश्व जाणून घेत असतो. परंतु या विश्वाचे असे एक अज्ञात परंतु मूल्यवान क्षेत्र असते जे इंद्रियसंवेदनांच्या कक्षेत येत नाही. ते जाणून घेत असतो. परंतु या विश्वाचे असे एक अज्ञात परंतु मूल्यवान क्षेत्र असते जे इंद्रियसंवेदनांच्या कक्षेत येत नाही. ते जाणून घेणे म्हणजे विश्वासंबंधीचे खरे ज्ञान प्राप्त करून घेणे. असे मूल्यवान ज्ञान जर मिळवायचे असेल तर इंद्रियसंवेदनांच्या साधनाऐवजी अन्य साधन उपयोगात आणले पाहिजे. हे साधन 'भाव' हे आहे. जे 'दृष्टीस' - इंद्रियसंवेदनांना दिसू शकत नाही परंतु जे 'भाव'द्वारे दिसत असते त्याच्या खरेपणावर माणूस विश्वास ठेवीत नाही, पण या कथनकर्त्याला मात्र ते खरे आणि मूलभूत ज्ञान असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवावासा वाटतो. येथेही केशवसुतांच्या 'झपूर्झा' या कवितेची आठवण होते. तेथेही 'ज्ञाताच्या कुंपनावरून उड्डाण करून' जाणाऱ्या चिद्धनचपलेच्या प्रकाशात दिसणाऱ्या अंधुक आकृतीची, प्रकृतिपुरुषांच्या क्रीडेतील ज्ञानरूप अशा स्वरसंगमाची आणि ज्ञाताच्या कुंपनापलीकडील 'नांगरल्याविण' असलेल्या 'भुई' ची कल्पना आलेली आहे. या सर्व प्रतिमांचा येथे संदर्भ आहे. या कथनकर्त्याला भावनिक पातळीवरून 'पाहण्याची' आणि असे पाहिल्यानंतर जे 'दिसते' ते पटवून घेण्याची सवय नाही. म्हणून हे पटवून घेण्याची सवय लागावी असे त्याला वाटते. कारण ती लागल्यावरच अंधकारामध्ये लपलेल्या 'तेजा' ला तो हुडकू शकणार आहे. तेजाला प्राप्त करून घेणे हे त्याच्या दृष्टीने सर्वात मूल्यवान प्राप्तव्य आहे. हे जर घडवायचे असेल तर

अनुक्रमणिका

ज्ञानप्राप्तीचे सहज उपलब्ध असणारे आणि निसर्गतःच वापरले जाणारे इंद्रियसंवेदनेचे साधन लोपवून टाकले पाहिजे. नाही तर ते आपली जागा 'भाव' या आवश्यक असणाऱ्या साधनाला मिळूच देणार नाही. इंद्रियसंवेदनामार्फत ज्ञान मिळवणे ही बौद्धिक क्रिया आहे. ती जर नाकारायची असेल तर बुद्धीला भावजली बुडवले पाहिजे. भावजलाने ओली झालेली बुद्धीच भावनयनांमार्फत प्राप्त झालेले ज्ञान स्वीकारू शकेल. म्हणून कथनकर्त्याच्या मनात आपण 'बुद्धीला भावजलिं' जिरवू शकू का, अशी शंका येते. 'बुद्धीला भावजलिं' जिरवण्याची ही प्रक्रिया आपल्या आकलनव्यवस्थेत घडवून आणून विश्वाचे मूलभूत, गाभ्याचे ज्ञान मिळवणे हीच कथनकर्त्याची एकमेव आशा आहे. ती सफल व्हावी असे त्याला वाटते. असे घडवून आणणे म्हणजे आपली 'उंची' कमी करून घेणेच आहे! असा विपरितभाव येथे प्रकट केला बगेला आहे. बुद्धीला भावजलात बुडवणे म्हणजे आपली 'उंची' वाढवणे होय. पण सामान्यांच्या जगात बुद्धीचा वापर न करणारी माणसे 'खुजी' मानली जातात. मुळात 'उंची' असलेले पण सामान्यांच्या नजरेतले हे 'खुजे' पण कथनकर्त्याला हवे आहे. कारण त्यामुळे त्याला जे मिळवायचे आहे ते मिळू शकणार आहे. येथे 'मस्तक' ही बुद्धीसाठी आणि 'हृदय' ही 'भावा' साठी आलेली प्रतिमा आहे. जर शरिराच्या अत्युच्च स्थानावर असलेल्या हृदयात लोपवून टाकले तर लौकिक जगाच्या दृष्टीने त्याची 'उंची खुजी' होईल. परंतु अलौकिक पातळीवर 'उंची' वाढवणारे हे लौकिक पातळीवरचे 'खुजे' पण त्याला स्वीकारणीय आहे. हे सर्व आपल्यबद्दल केव्हा घडणार, असा शंकाकूल प्रश्न त्याच्या मनात उभा राहिला आहे. 'अतिंद्रिय' जाणून घेण्याची ओढ 'दगडामधुनि' ज्याला पलीकडचे दिसते अशा केशवसुतांमधील कवीलाही लागली होती आणि क्षणात जाणवणारे 'दिव्य भास' आपणांस धरता येत नसल्याबद्दलची खंतही त्यांना वाटत होती. या चार ओळींतून व्यक्त होणाऱ्या जाणिवा गोविंदाग्रजांचे केशवसुतांशी नाते प्रस्थापित करणाऱ्या आहेत.

आता आपण या सुनीताच्या शेवटच्या दोन ओळींकडे वळू. या दोन आळींतून कथनकर्त्याने या कवितेतील एकूण अभिव्यक्तीचा समारोप केला आहे. काळोखामधून रात्रीचा शेवट आणि अज्ञेयातून दिक्कालाचा तट आरपार पाहणे, अखंड वाहणाऱ्या वाऱ्याचा धनी होणे, आपल्या भोवती घातली गेलेली कुंपणे तोडणे, वाऱ्यावर उंच मनोरे बांधणे, अवघ्या जगाची भूमी नांगरून तिच्यात नवनिर्मिती करणे, मर्मचक्षूंना जे दिसू शकत नाही, ते पाहून पटवून घेणे, अंधारामागे लपलेल्या तेजाला हुडकणे, मस्तकातील बुद्धीपेक्षा हृदयातल्या भावाला अनुभव घेण्याचे साधन बनवणे ही या 'उंच' माणसासमोरची लक्ष्ये आहेत. ही लक्ष्ये प्राप्त करून घेण्याचा ध्यास त्याला लागला आहे. ती प्राप्त होतील की नाही. या चिंतेने तो व्याकुळ झाला आहे. शेवटच्या दोन ओळीत हे सर्व आपल्याला 'पारखे' झाले असल्याची खंत व्यक्त केली गेली आहे. हे सर्व प्राप्त झाल्यावर आपणांस जे रूप लाभेल ते आपल्या डोळ्यांत एक सारखे, सतत नाचवण्याची असोशी त्याला लागली आहे. हे सर्व त्याचे झाल्यावर तो स्वतः आणि त्याचे प्राप्तव्य एकरूपच होऊन जाणार आहे. त्यातून त्याचे एक नवेच 'चित्र' साकार होणार आहे. मग सभोवतालचे जग पाहणे म्हणजे स्वतःलाच पाहणे, असे होणार आहे.

हे सर्व एक वेळी माझे होते. परंतु ते 'आजला पारखे' झाले आहे. असे हा कथनकर्ता शेवटच्या दोन ओळींत म्हणतो. ते जर पुन्हा मिळवायचे असेत तर माझ्यात काही एक क्षमता आणली पाहिजे. भावपातळीवरून विश्वाचे आकलन करण्याची, 'वाऱ्यावर उंची मनोरे बांधण्या'ची आणि माळरानातील उघडी ताल नांगरण्याची क्षमता जर पुन्हा मला प्राप्त झाली तरच मी गमावलेले पुन्हा प्राप्त होईल; मग मी माझे 'चित्र माझ्याच नयनांत नाचवू शकेन; अशी आशा या कवितेच्या शेवटी प्रकट केली गेली आहे.

गोविंदाग्रजांच्या रोमँटिक जाणिवांच्या पायाच या कवितेतून व्यक्त झाला आहे. येथे हेही नमूद करणे आवश्यक आहे की त्यांच्या जाणीवव्यूहावर केशवसुतांची दाट छाया असली तरी तो अनेक पातळ्यांवर केशवसुतांच्या रोमँटिक जाणीवव्यूहापेक्षा वेगळा आणि स्वतंत्र आहे. मानवी जीवनातील काळोखाची आणि मानवाच्या प्राप्तव्यप्राप्तीतील अपरिहार्य असलेल्या विफलतेची जाणीव हा केशवसुतांच्या जाणीवव्यूहाचा भाग नाही. त्यांच्या कवितेत जीवनपरिवर्तनाची आशादायक स्वप्ने चित्रीत होतात. गोविंदाग्रजांच्या कवितेत 'उंच' मानव आणि 'आंधळा' मानव असा भेद आणि सामान्य, 'आंधळ्या' माणसाचा उपहास आणि 'उंच' माणसाचा गौरव केला जातो. जाणिवेची ही छटा अभिजातवादाशी संलग्न आहे. या दृष्टीने त्यांच्या विनोदी लेखनातील 'संगीत मूकनायक' या संवादात्मक लेखाचा विस्तार करण्यासारखा आहे. (पहा : 'संपूर्ण बाळकराम' यातील प्रस्तुत लेख) गोविंदाग्रजांच्या शैलीवरही अभिजातवादाचे संस्कार आहेत. त्यामुळे ते जरी स्वतःला केशवसुतांचा 'सच्चा चेला' म्हणवत असले तरी या दोन कवींची एकूण प्रकृती भिन्न प्रकारची आहे.

गोविंदाग्रजांची ही कविता त्यांच्या विस्कळीत रचनाबंधनाचाही नमूना आहे. कवितेच्या रूपबंधाकडे दुर्लक्ष करणे हे या काळातील काव्यलेखनाचे सामान्य लक्षण आहे. या

कवितेतील तिसऱ्या ओळीच्या जागी दुसरी ओळ आणि दुसऱ्या ओळीची जागा तिसरी ओळ हवी होती. तसेच तेरावी ओळ बाराव्या ओळीच्या जागी बारावी ओळ तेराव्या ओळीच्या जागी हवी होती. जशा जशा ओळी सुचत गेल्या तशा तशा त्या लिहून काढण्याची गोविंदाग्रजांची पद्धत असावी. परंतु चिकित्सक वाचनात हा अनुक्रम बदलून घेऊनच या कवितेचे आकलन करतो.

मानवाला असलेल्या मूलभूत मर्यादांच्या जाणिवेवर ही कविता उभी आहे. भव्य स्वप्ने पहाणे, आव्हानात्मक लक्ष्ये डोळ्यासमोर ठेवून त्यांचा ध्यास घेणे, यो ध्यासापोटी बाकी सर्व गोष्टी विसरणे आणि ही प्राप्तव्य प्राप्त करुण घेण्यासाठी जीवाचे रान करणे, या मानवी प्रवृत्तीचे आणि त्याच्या या जीवनोद्दिष्टांच्या साफल्याला प्रतिबंध करणाऱ्या वातावरणाचे आणि त्याच्या क्षमतांच्या असलेल्या अंगभूत मर्यादांचे चित्रण गोविंदाग्रजांनी आपल्या कवितांत केले आहे. जीवनातील वैफल्य प्रकट करणाऱ्या गोविंदाग्रजांच्या सर्वच कवितांच्या मागे सुप्तपणे मानवी क्षमतांच्या मूलभूत आणि स्वाभाविक मर्यादांची जाणीव आहे.

गोविंदाग्रजांच्या या विशिष्ट जाणीवव्यूहाच्या संदर्भात त्यांची 'गूढगुंजनपर' हे विशेषण का योजिले गेले, याचा बोध होत नाही. मराठीतील अतिभौतिक, अध्यात्मिक अनुभव व्यक्त करणारे ज्ञानेश्वरापासूनचे सर्व काव्य आकलनाला अवघड आणि स्वरूपाने 'गूढ' असले तरी त्याला 'गुंजन' म्हणता येणार नाही. ज्या कवितेतून सुखद, तरल असा अनुभव झपाटून टाकणाऱ्या लयीसह व्यक्त होतो त्या कवितेला 'गुंजन' हे विशेषण लावता येईल. परंतु गोविंदाग्रजांच्या 'गूढगुंजनपर' मानल्या जाणाऱ्या कवितांमधील अनुभव, तरल, सुखद आणि लयपूर्ण रूपबंधात बांधलेले नाहीत. त्यांची 'फुटकी तपेली' ही आध्यात्मिक परिभाषा वापरणारी, अतिभौतिक अनुभवाचा मुखवटा धारण करणारी परंतु मूलतः 'हुरहुर' जातीचीच कविता आहे.

या कवितेतील जीवाचे 'पाणी पाणी' असे बोलणे आणि जिच्यात पाणी ठरत नाही अशी 'फुटकी तपेली' त्याच्या हातात येणे, या घटनेच्या तळाशी 'उंच' माणसाला काहीतरी अत्यंत जीवनावश्यक गोष्ट उत्कटत्वाने हवी असणे आणि ती मिळवण्यासाठी आवश्यक असलेले योग्य साधन त्याच्या जवळ नसणे, हा जाणीवव्यूह स्थापित केला गेला आहे. या कवितेच्या कथनकर्त्याला ज्या प्राप्तव्याचा ध्यास लागला आहे त्यासाठी 'तहान' ही प्रतिमा आणि ते मिळवण्यासाठी हाती असणाऱ्या निरुपयोगी साधनासाठी 'फुटकी तपेली' ही प्रतिमा योजिली आहे. ही तहान 'चिरकालाची' आहे. ज्यात सामान्य माणसाची असंख्य विश्वे अणुसम होतील असे अनंतरूपी विराट विश्वाचा कथनकर्त्याला वेध लागला आहे. हे प्राप्त करण्यासाठी पर्याप्त साधन आपल्याला लाभलेले नाही, याची जाणीव येथे व्यक्त केली गेली आहे. विशिष्ट लक्ष्याच्या प्राप्तीचा लागलेला ध्यास, परंतु ते प्राप्त करण्यासाठी आवश्यक आणि कार्यक्षम साधनांचा अभाव, त्यामुळे ते लक्ष्य प्राप्त न होणे आणि त्यामुळे अंतिमतः वैफल्याचा दुःखपूर्ण अनुभव येणे, हा या कवितेचा, 'हुरहुर' या कवितेत प्रकट झालेला, पायाभूत बंध आहे. तो फसव्या आध्यात्मिक परिभाषेतून व्यक्त केला गेला आहे. अनाकलनीय आणि निरर्थक अशा अनेक विरोधन्यासात्मक आणि विपरितभावात्मक कल्पना आणि प्रतिमा यांचा पाऊस पाडून एक व्याज गूढता येथे निर्माण केली गेली आहे. अशा वाचकांचे लक्ष खेचून घेणाऱ्या आणि त्याला बुचकळ्यात टाकणाऱ्या असतात. गोविंदाग्रजांना शब्दांतून अशी 'जादू' करायची आहे. या कल्पनांचे काही नमूने पुढीलप्रमाणे नोंदविता येतील. 'आद्याच्या पर्यंतापासुनि । अंताच्या आरंभामधुनी', मागुनि सुटूनी पुढें धांवणें', 'नसते परके आधिं जाणतो । असत्या मलाच न परी बघतों', 'नसत्यामार्जी असतां जिरतों', भरूनी भरणें भरवुनि उरली'. 'तहान' लागणे आणि ती भागवण्यासाठी हाती 'फुटकी तपेली' असणे, या घटनेशी अशा विपरितभावात्मक कल्पनांचा संबंधी प्रस्थापित होत नाही. कथनकर्त्याला कशाची 'तहान' लागली आहे हे येथे सांगितले जाते पण ती भागणवणाऱ्या 'फुटक्या तपेली' चे स्वरूप मात्र कोठेही स्पष्ट केले जात नाही. 'माझें सर्व फार विलक्षण', तऱ्हाच माझी विचित्र असली' ही विधाने सत्य करणाऱ्या अनेक विरोधन्यासात्मक कल्पना या कवितेत पेरल्या गेल्या आहेत.

जी गोष्ट 'फुटकी तपेली' या कवितेची तीच 'मुरली' याही कवितेची. या कवितेला गोविंदाग्रजांनी दीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. तिच्यात अध्यात्माचा अनावश्यक खल केला आहे. या अध्यात्माचा या कवितेशी संबंध जोडणे अवघड आहे. येथेही कुठल्या तरी लक्ष्याचा ध्यास लागणे, त्यामुळे लौकिक जीवनाचे विस्मरण होणे आणि प्राप्तव्याची प्राप्ती झाल्यावर मनाला शांतता लाभणे या प्रक्रियेचे चित्र रेखाटले गेले आहे. 'हुरहुर' मधील कथनकर्त्याला जसे तेजाच्या शोधार्थ 'आशाकण' आवाहन करतात तसे येथे राधेला बासरीचे स्वर श्रीकृष्णप्राप्तीसाठी आवाहन करीत आहेत. येथे 'बंसिधर' श्रीकृष्ण ही प्राप्तव्याची आणि राधा ही प्राप्तव्याचा ध्यास लागलेल्या व्यक्तीची प्रतिमा आहे. याचा अर्थ 'हुरहुर' या कवितेतील जाणिवाच येथे पुन्हा व्यक्त केल्या गेल्या आहेत. 'फुटकी तपेली' या कवितेत लक्ष्यप्राप्तीतील दुःखद अपयशाचे

अनुक्रमणिका

चित्रण केले गेले आहे तर 'मुरली' या कवितेत लक्ष्यप्राप्तीतील सुखद यशाचे चित्र रेखाटले गेले आहे. प्राप्तव्याच्या यशस्वी प्राप्तीचे चित्रण करणारी गोविंदाग्रजांची ही एकमेव कविता आहे. येथेही एकच मनोवस्था वेगवेगळ्या प्रतिमांतून पुनरुक्त करून कवितेचा फापटपसारा वाढवला गेल्यामुळे ती अकारण फुगली असून विस्कळितही झाली आहे. थोडक्यात, 'हुरहुर' मधील जाणिवा गोविंदाग्रजांच्या कवितेतील केंद्रीय जाणिवा असून त्या त्यांच्या कवितेत वारंवार अभिव्यक्त झाल्या आहेत. असे म्हणावे लागते.

गोविंदाग्रजांच्या या पायाभूत जाणिवांच्या संदर्भातच त्यांच्या प्रेमकवितांचाही विचार केला पाहिजे. त्यांची 'वेडा' ही कविता याचे परिपूर्ण उदाहरण आहे. पश्चिमदिशा फोडून बाहेर आलेली तारका हा 'वेडा' पाहतो आणि 'हांसे भेसुर तो; सर्वेच अपुलें हृद्‌गान लागे म्हणूं!।' अशी त्याची अवस्था होते. येथे 'हृदगान' ही त्याला या तारकेच्या लागलेल्या वेधासाठी आलेली प्रतिमा आहे. तिच्या प्राप्तीसाठी 'तारास्थानपथें सवेग मग तो चालावया लागला; । हातीं तीस धरीन--निश्चय दिसे; धांवें पुढं तें पिसें ! ।' असे त्याच्या या वेधाचे पर्यवसान होते. अर्थात 'भूमी' वर कितीही चालून गेले तरी आकाशस्थ तारका त्याच्या हाती लागणे शक्य नाही. जे अशक्य आहे त्याचा वेध लागून त्याच्या प्राप्तीसाठी जिवापाड श्रम करणे, याला 'वेड' च म्हटले पाहिजे. हे जरी वेड असले तरी ते या कवितेच्या कथनकर्त्यासही हवे आहे. कारण असे वेड लागणे कथनकर्त्याला जीवनावश्यक आणि मूल्यवान गोष्ट वाटते. म्हणून तो म्हणतो - 'त्याचे वेड तरी कुणास मिळतां द्या तें मला आणुनी; । माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईन तीमागुनी! 'मनीची चांदणी' प्राप्त होवो अथवा न होवो, तिचा वेध लागून तिच्या प्राप्तीसाठी झटणे, हेही 'लक्ष्यशून्य' जगण्यापेक्षा अधिक मूल्यवान असल्याचे येथे सूचित केले गेले आहे.

गोविंदाग्रजांची 'प्रेम आणि मरण' ही लोकप्रिय कविताही याच जाणीवव्यहावर उभी आहे. ज्या प्राप्तव्याची प्राप्ती अशक्य आहे त्याचा वेध लागून त्याच्या प्राप्तीसाठी वेडा होण्याचे पर्यवसान शेवटी संपूर्ण विनाशात होते, याचा प्रत्यय गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेत घडवलेला आहे. प्रचंड वाढलेल्या वृक्षाला एका क्षणी आकाशस्थ विजेचे दर्शन होते आणि त्याच्या मनात 'गोड तरी जहरी' अशा प्रीतीच्या 'नवथर लहरी' तरंगू लागतात. त्याला तिच्या प्राप्तीचा वेध लागतो. शेवटी तपोदेवता प्रकट होते आणि त्याला वर मागायला सांगते. ''तो वदे । 'देवि सर्व - दे, । हेंच एक दे-। भेटची मजला । जिविंच्या जिवाची बाला । एकदा ।' यात त्याचा विनाश असल्याचे ती आणि 'देवाच्या तेतिस कोटी' त्याला परोपरिने सांगतात पण त्याचे हे मीलनवेड कायमच असते. तेहतीस कोटी देवांचे सांगणेही तो ऐकत नाही, या उल्लेखातून हे वेड किती तीव्र होते ते कथनकर्ता सूचित करू पाहतो. शेवटी नाईलाजाने देव 'गगनातिल चंचल बाले' ला त्याच्या भेटीसाठी पाठवतात. तिचा स्पर्श घडल्याबरोबर तो वृक्ष उन्मळून खाली पडतो. परंतु पडता पडता तो (समाधानाने) हसतो, त्याची निर्जीव बनलेली पाने फडफडू लागतात, त्याच्या सर्व कळ्या उमलतात. मरतानाही प्रेमप्राप्ती त्याच्यात चैतन्य निर्माण करते. शेवटी कथनकर्ता म्हणतो- 'तो योग । खरा हटयोग। प्रितीचा रोग । लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ।' हे असें

येथे काही गोष्टी नमूद केल्या पाहिजेत. एक म्हणजे ही कविता केवळ गोविंदाग्रजांच्या प्रेमजाणिवेची अभिव्यक्ती नसून ती त्यांच्या 'हुरहुर' या कवितेत अभिव्यक्त झालेल्या जाणीवव्यूहाची पुनराभिव्यक्ती आहे. ते प्रेमाकडे या जाणीवव्यूहातून पहातात. प्रेयसी हे येथे 'लक्ष्य' असते. तिच्यावरचे प्रेम हा 'वेध' असतो आणि तिच्या प्राप्तीसाठीचे झपाटलेपण हा 'ध्यास' असतो. येथे आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की, या कवितेतील प्रेम हे एकतर्फी आहे. केवळ वृक्ष विजेवर प्रेम करतो आहे; वीज त्याच्यावर प्रेम करीत नाही. तिचे त्याच्याकडे येणे तिच्या मर्जीने झालेले नसून ते देवांच्या आज्ञेवरून झालेले आहे. एकतर्फी प्रेम हेच गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितांना वैफल्याचे रूप देणारा घटक आहे. प्रेम द्वितर्फी झाल्याशिवाय ते यशस्वी होऊ शकत नसते.

गोविंदाग्रजांच्या प्रेमकविता दोन प्रकारच्या आहेत. त्यापैकी काही कविता प्रेमिकेचा वेध लागावा ही आकांक्षा व्यक्त करणाऱ्या आणि असा वेध लागलेला नसल्यामुळे निष्प्रेम जीवन जगावे लागते याबद्दल खंत प्रकट करणाऱ्या आहेत. त्यांच्या 'ती कोण'? या कवितेतील कुमुदिनी आकाशस्थ चंद्राकडे पाहून भूलोकावर (आनंदाने) राहते. कारण 'जीवाचे जगणें असेंच सापेक्ष प्रेमावरी! डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे! ।' चंद्र-कुमुदिनीचे हे नाते पाहिल्यावर कथनकर्ता म्हणतो- 'मी हे पाहुनि जीवनबंधन असें शोकार्थ होतो परि, । कांहीं या मम लक्ष्यशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे!।' ही आशा प्रेमप्राप्तीची; जिच्यासाठी आधी प्रेयसीचा वेध लागावा लागतो. व्यक्तीचे जीवन लक्ष्यशून्य असणे गोविंदाग्रजांना मंजूर नाही. असे लक्षशून्य जीवन सामान्य माणसे जगतात; 'उंच' माणसे नाही. मग लक्ष्यप्राप्तीचा प्रयत्न करूनही जर जीवन लक्ष्यशून्य राहात असेल तर त्याच्यापुढे-

'आलें हे भरूनी रितें हृदयही-देऊं कुणाच्या करीं? असा प्रश्न पडतो. हृदयसंवाद साधण्यासाठी, जीवनाधार मिळवण्यासाठी व्यक्तीसमोर कुठलेतरी 'लक्ष्य' हवेच. म्हणून हा कथनकर्ता देवास उद्देशून- 'जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही; आधार जी जीवनीं। देवा भेटवि-दाखवी तरि मला ती कोण देवी जनीं?' अशी प्रार्थना करतो. थोडक्यात, ,'हुरहहहुर' या कवितेत साकार झालेला जाणीवव्यूहच या प्रकारच्या कवितांचा पाया आहे.

दुसऱ्या प्रकारच्या प्रेमकवितेत प्रेमेच्छूसमोर नेमके लक्ष्य असते. परंतु तो हे लक्ष्य प्राप्त करून घेऊ शकत नाही. 'सतेज वचने देई तारा, परी लकाके नभामर्धी; । खाली येईल परी कधी?।' असे 'कधी?' या कवितेत म्हटले गेले आहे. हवे असलेले लक्ष्य प्राप्त होईल या आशेने त्याच्याशी, कितीही लीन होऊन संवाद साधायचा प्रयत्न केला तरी ते हवा तो प्रतिसाद देत नाही. 'निर्वाणीची विनवणी' या कवितेत प्रेमिक आपल्या प्रेयसीला म्हणतो की, 'पाहसि आतां अंत असा कां? पीडीसि कां या दीना? सुंदरी, पदरी मदीय हृदया घेसि न कां पदलीना?'। तरीही हे 'लक्ष्य' त्याला प्राप्त होत नाही. कधी हे लक्ष्य प्राप्तीच्या नजीक आलेले असते, ते प्राप्त होण्याची आशा बळावते. परंतु ते प्राप्त होतच नाही. 'निर्दय बालेस' या कवितेत कथनकर्ता म्हणतो की, 'जिकुनि तुजला प्रेमें होईन दास तुझा जन्माचा । या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा ।' 'पण ती त्याला नकार देते. मग हा प्रियकर - 'दिला तिलांजली अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा । परतायचे नाहीं आतां त्या प्रेमाच्या गांवा।' असा त्रागा करतो. हवे ते लक्ष्य जरी प्राप्त झाले तरी ते प्रेमेच्छूपाशी टिकून रहात नाही; याचेही चित्रण काही कवितांत केले जाते. 'गोफ' या कवितेत दोघांनी मिळून गुंफलेला गोफ अंतिमतः उकलावा लागलेला आहे. 'परि दैवाचा खेळ निराळा - खेळ नकोसा तुज झाला।' असे त्याचे कारण दिले जाते. ही सर्व एकतर्फी प्रेमाची कविता आहे.

चांगली प्रेमकविता लिहिणारे कवी म्हणून गोविंदाग्रजांचा लौकिक आहे. ते अशी प्रेमकविता लिहू शकले. याचे कारण त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात त्यांना अनुभव आलेला होता, असे मानले जाऊ लागले. यातूनच त्यांच्या 'प्रेयसी' चा शोध सुरू झाला. त्यांच्या प्रेमकवितेत 'तारा' ही प्रतिमा वारंवार येत असल्यामुळे त्यांच्या प्रेयसीचे नाव तारा असले पाहिजे, असा निष्कर्ष काढला गेला. आपण जर गोविंदाग्रजांचा काळ लक्षात घेतला तर ही सर्व चर्चा निरर्थक असल्याचे लक्षात येते. १८८५ ते १९१९ हा गोविंदाग्रजांचा काळ आहे. या काळात प्रेम करायला अविवाहित तरुणी अस्तित्वातच नव्हती. याचे कारण या काळात वयात येण्यापूर्वी, सामान्यपणे तिच्या वयाच्या आठ ते बारा वर्षापर्यंत मुलीचा विवाह 'उरकला' पाहिजे असा दंडक होता आणि तो कटाक्षाने पाळला जात होता, त्यामुळे वयात आलेली, तरुण स्त्री ही विवाहिताच असे. याच काळात १८९० च्या सुमारास शरीरसंबंधासाठी स्त्रीचे वय काय असावे याचा - म्हणजेच संमतिवयाचा - आणि मुलीच्या विवाहकालाचा प्रश्न सार्वजनिक पातळीवर चर्चिला जात होता. शरीरासंबंधासाठी स्त्रीचे वय दहाऐवजी बारा असावे, एवढेच या संबंधी येणाऱ्या नव्या कायद्यात म्हटले होते. गोविंदाग्रजांच्या तारुण्यकाळात म्हणजे १९००-१९०५ या काळात लग्नाच्या वेळी मुलीचे लग्नाचे वय बारा-चौदा हे असे. म्हणजे प्रेम करण्याइतकी समज असलेली अविवाहित स्त्री गोविंदाग्रजांच्या तारुण्यकाळात उपलब्ध नव्हती. पहिल्या महायुद्धकाळापासून मध्यमवर्गातल्या मुली किमान मॅट्रिकपर्यंत शिकू लागल्या आणि त्यांच्या विवाहाचे वय वाढले. हे जर लक्षात घेतले तर गोविंदाग्रजांची कोणी तरी प्रेयसी असावी हा कयास निरर्थक ठरतो. विवाहित स्त्रीवर परपुरुषाचे प्रेम असणे याची मात्र या काळात शक्यता असे. परंतु असे प्रेम एकतर्फीच असे. कारण विवाहित स्त्री जर अशा प्रेमात सहभागी झाली तर ती आयुष्यातून उठवली जाण्याचा धोका असे. एखादीला जर परपुरुषाबद्दल आकर्षण वाटले तरी ती ते प्रकट होऊ देत नसे. त्यामुळे असे चोरटे प्रेमसंबंध अतिशय दुर्मिळ असत. गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितेकडे या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात पहायला हवे.

इंग्रजी राजवटीपूर्वी निर्माण झालेल्या लावणीवाङ्मयातही असेच एकतर्फी प्रेमाचे चित्रण आलेले आहे. अर्थात लावणी ही 'प्रेम' कविता नसून ती 'शृंगारिक' भावनेचे चित्रण लावणीत कले जाते. त्या काळातही बालविवाह प्रचलित होते. विवाहित स्त्री मोकळेपणाने परपुरुषाशी बोलू शकत नसे. घरातल्या स्त्रीचा बाहेरच्या पुरुषाशी संबंधच येत नसे. देवदर्शनासाठी देवळात जाण्यासाठी, नातेसंबंधाना भेटण्यासाठी किंवा धार्मिक कार्यक्रमासाठी त्या घराबाहेर पडत. तेव्हा परक्या पुरुषांना त्यांचे दर्शन होत असे. अशा दर्शनातून त्याला त्या स्त्रीचे एकतर्फी आकर्षण वाटू शकत असे. त्या काळात घडत असलेल्या अशा घटनांवर शृंगारिक लावणी उभी आहे. म्हणून रस्त्याने चालत असलेल्या स्त्रीच्या वर्णनपर लावण्या अधिक प्रमाणात दिसतात. 'लटपट लटपट तुझे चालणे' ही होनाजीची लावणी, 'नटुन थटुन चालशी' ही सगनभाऊंची लावणी, 'झुलत खुलत डौलांत कमर हलहलवित नखऱ्याने । ठुमक चाल चौरंगी खबुतर झडपी कुऱ्याने' हे प्रभाकराने रस्त्याने जाणाऱ्या स्त्रीच्या चालण्याचे वर्णन, अशी अनेक उदाहरणे देता येतील. रस्त्यात

दिसणाऱ्या स्त्रीच्या शरीररुपाचे, त्यातही तिच्या शृंगारभावप्रेरक अवयवांचे, तिने ल्यायलेल्या अलंकाराचे वर्णन अशा लावण्यात केले गेले आहे. बालविवाहाची प्रथा असल्याने अशा प्रकारे दिसणारी तरुण स्त्री ही कोणाची तरी पत्नी असणार, म्हणून तिचा भरतार कोण, असा प्रश्नही या लावण्यांत विचारला जातो. रामजोशींच्या 'सुंदरा मनामधिं भरलि' या लावणीत 'पायी पैंजण झुबकेदार कुणाची दार, कोण सरदार हिचा भरतार'' असा प्रश्न विचारला गेला आहे. अशा प्रकारे दिसणारी विवाहित परस्त्री प्राप्त होणे शक्य नसे. म्हणून तिच्या प्राप्तीसंबंधीचे दिवास्वप्न अशा लावण्यांत रंगवलेले दिसते. लावणी ही स्वप्नरंनपर कविता आहे. अशा आकर्षणाचा वैफल्यात होणारे पर्यवसान मीलनाचे स्वप्नरंजन दिसते. लावणी ही स्वप्नरंजनपर कविता आहे. अशा आकर्षणाचा वैफल्यात होणारे पर्यवसान मीलनाचे स्वप्नरंजन दिसते. लावणी ही स्वप्नरंजनपर कविता आहे. अशा आकर्षणाचा वैफल्यात होणारे पर्यवसान मीलनाचे स्वप्नरंजनपर रंगवून झाकले जाताना दिसते. 'दानधर्म जर पूर्वी हातें या असल कांहिं घडला । तर लाभों ही वस्तु कुर्णी पाहिला दिवस पुढला । नोकझोकिचा बहर बरा आज रस्त्यामधि झडला । कसे हटकावें मुखें आम्हांला विचार हा पडला ।' असे शाहीर प्रभाकरच्या 'झुलत खुलत डौलात' या लावणीत म्हटले आहे. परंतु असा 'वस्तु' लाभ हा केवळ कल्पनेतच राहात असे. शृंगारिक भावनेची जागृती घडवणे, एवढेच लावणीचे उद्दिष्ट असे. थोडक्यात या लावण्यांतही (रस्त्यातली) स्त्री हे लक्ष्य, त्याच्या प्राप्तीचा लागलेला वेध आणि त्याच्या प्राप्तीसाठी धडपड, हाच व्यूह दिसून येतो. फक्त या व्यूहाच्या संदर्भात गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितांचे लावणीवाङ्मयाशी नाते आहे. इंग्रजी वाङ्मयाच्या संस्काराने शारिरिक मीलनाऐवजी मानसिक मीलनाला महत्व देणाऱ्या प्रेमाची कल्पना आली. मग लक्ष्य असलेल्या स्त्रीशी शारिरीक संबंध घडवण्यासंबंधीच्या स्वप्नाची जागा 'जीवाचे जगणें असेंच असतें असतें सापेक्ष प्रेमावरी ! । डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे !।' या स्वप्नाने घेतली. असे असले तरी लावणी आणि गोविंदाग्रजांची प्रेमकविता यांचा पायाभूत व्यूह एकाच प्रकारचा आहे आणि दोन्ही ठिकाणी विफल होणारे एकतर्फी प्रेमच विचित्र झालेले आहे. केवळ या अर्थाने गोविंदग्रज 'प्रेमाचे शाहीर' आहेत ।

व्यक्तीच्या इच्छा-आकांक्षा, स्वप्ने आणि प्रेरणा सफल करण्याचा प्रयत्न असफल होतो कारण त्यांच्या साफल्याला प्रतिरोध करणाऱ्या शक्तींवर व्यक्तींचे नियंत्रण नसते. या व्यक्तिबाह्य शक्तींना आकार देणे, त्यांचे स्वरूप निश्चित करणे, त्यांना हुकमीपणाने अनुकूल करून घेणे हे व्यक्तींच्या हातात नसते. या शक्ती कधी व्यक्तीला जे हवे ते सहजपणे देत असतात तर कधी ते नाकारीतही असतात. कधी व्यक्तीला नको असलेले त्याच्या पदरात टाकीत असतात. जे व्यक्तींच्या पदरात पडते ते त्याची इच्छा असो - नसो, त्याला स्वीकारावेच लागते. असे जे अपरिहार्यपणे घडत असते त्याला व्यक्तिंच्या आकलनाच्या, निर्णयाच्या आणि कृतिसाफल्य घडवण्याच्या शक्तींना अंगभूतपणे पडलेल्या मर्यादा कारणीभूत असतात. परिस्थितीचे त्याचे आकलन नेमके व परिपूर्ण नसते. परिस्थिती एकच असते. म्हणूनच 'तडजोड' या कवितेत गोविंदाग्रजांनी 'एका शून्य जगीं दिसे' तरि दिसे शून्यांत अन्या जग!' असे म्हटले आहे. आकलनातील चुकीमुळे व्यक्ती चुकीचे निर्णय घेत असते आणि तिला आवश्यक आणि इष्ट कृती करता येत नसते. त्यामुळे अंती त्याच्या पदरात वैफल्यच पडते. गोविंदग्रजांच्या कवितेमागे मानवाच्या ठिकाणी आकलनाच्या निर्णयाच्या आणि कृतीच्या क्षमतांना असलेल्या अंगभूत मर्यादांची जाणीव आहे. यासंदर्भात त्यांची 'मनातली पाल' ही कविता विचारात घेता येईल. या कवितेच्या प्रास्तविकात गोविंदाग्रज म्हणतात : 'काही विचार मनात आला आणि तितक्यात पाल चुकचुकली म्हणजे मनाला धक्का बसतो; तसेच काहीही अलौकिक करावयास जा, आधीच कसेसे वाटते' येथले 'काही अलौकिक करावयास जा' हे शब्द महत्वाचे आहेत. 'हुरहुर' या कवितेत निर्देशिलेला - काळोखातून रात्रीचा शेवट पाहाण्याचा आणि अज्ञेयातून दिक्कालाचा तट आरपार पाहाण्याचा प्रयत्न करावासा वाटणे, हे अलौकिकच म्हटले पाहिजे. 'हुरहुर' मध्ये आणि इतर अनेक कवितांमध्ये असलेले कथनकर्त्या व्यक्तीचे 'उंच' पण 'मनातली पाल' या कवितेतही आहे. आपण जे करू पाहतो ते आपल्याला करता येईल का, अशी शंका मनात येणे आणि ते काम हमखास बिघडणे हा या कवितेततील 'पाल चुकचुकणे' या वाक्प्रयोगाचा अर्थ आहे. काम बिघडले की माणूस म्हणतो : 'माझ्या मनात आधीच पाल चुकचुकली होती' हा वाक्प्रयोग व्यक्तीच्या ठिकाणच्या आत्मविश्वासाच्या अभावाची प्रतिमा आहे. व्यक्तीला आपल्या मर्यादांची सुप्त जाणीव या आत्मविश्वासाच्या अभावामागे असते. यातला कथनकर्ता म्हणतो. व्यक्तीला आपल्या मर्यादांची सुप्त जाणीव या आत्मविश्वासाच्या अभावामागे असते. यातला कथनकर्ता म्हणतो : 'ओळख निजरूपाची पटते। क्षणभर भेकड वृत्तिहि हटते । शक्तिहि सर्वस्वानें नटते । जीव तों घ्याया । चुकचुके पाल ही वायां।' भेकड वृत्ती हटून माणसाला स्वतःच्या सामर्थ्यांची, शक्तीची जाणीव होणे हे आव्हानात्मक कार्य करणाऱ्या माणसाबाबत घडावे लागते. पण अशा वेळी नेमकी

पाल 'जीव तों घ्याया' या शब्दप्रयोगातून केले गेले आहे. अनंताचा शोध घेण्यासाठी जेव्हा या 'उंच' माणसाच्या डोळ्यांसमोर जेव्हा जे जे अंधुक आहे ते ते लखलखू लागते. तेव्हा जे 'असते' ते तर सहजपणे त्याच्या 'हाती बसते' आणि जे 'नसते' तेही त्याला दिसू लागते. त्यामुळे शून्याचा निरास होण्याची शक्यता असते. परंतु अशा वेळी पाल चुकचुकू लागते आणि मग शून्याला ठावच नाही असे वाटू लागते. अंतिमतः समग्र विश्व जाणून घेण्याची ही ज्ञानप्रक्रिया विफल होऊन जाते. येथे 'असते' हा शब्द ज्ञानेंद्रियांना जाणवणारे या आणि 'नसते' हा शब्द ज्ञानेद्रियांच्या कक्षेपलीकडे असलेले या अर्थांनी आलेले आहेत. माणसाला आपल्या क्षमतांच्या मर्यादांची सुप्तासुप्त जाणीव असल्यामुळे त्याच्या हातून अशी महान कार्ये सफल होत नाहीत, हे या कवितेत सूचित केले आहे. हा कथनकर्ता शेवटी म्हणतो : 'न कळे चांडळिण ही कुठली । निशिदिनिं अडवायातें उठली । कर्तव्याची चालच खुटली । मार रे मार । पाल ही प्रभो अनिवार!' 'उंच' माणसांची काही महान 'कर्तव्ये' असतात, ज्यांचा उल्लेख या कवितेत केला आहे. पण या 'उंच' माणसांना प्रयत्न करूनही ती पूर्ण करता येत नाहीत. कारण कोठे तरी त्यांच्या ठिकाणी आत्मविश्वासाचा अभाव असतो. आत्मविश्वासाचा हा अभाव माणसाच्या क्षमतांना असलेल्या मर्यादांच्या जाणिवेमधूनच निर्माण झालेला असतो. म्हणून गोविंदाग्रजांच्या कवितेतून मानवाच्या क्षमतांना असलेल्या अंगभूत मर्यादांची जाणीव व्यक्त होते असे म्हणावे लागते.

आपल्या वाट्याला काय याचे हे माणूस ठरवू शकत नाही, जीवनातले जे भलेबुरे त्याच्या वाट्याला येथे ते त्याला स्वीकारावेच लागते. हे स्वीकाराचे की नाही याचा निर्णय तो घेऊ शकत नाही. पत्तांच्या खेळात ज्याप्रमाणे जे पत्ते वाट्याला येतात ते घेऊनच माणसाला खेळावे लागते. तसेच जीवनात चांगले-वाईट, हवे-नको असे जे माणसाच्या वाट्याला येत असते ते स्वीकारूनच त्याल जगावे लागते. माणसांच्या नियतीसंबंधीची, माणसाला निवडीचे, निर्णयाचे स्वातंत्र्य नसल्यासंबंधीची, त्याच्या पराधीनतेची जाणीव गोविंदाग्रजांच्या 'एखाद्याचें नशीब' या कवितेत व्यक्त झाली आहे. या कवितेची संहिता पुढीलप्रमाणे आहे.

कांही गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांही ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरी;
कांही जाउनी बैसती प्रभुपदीं पापापदा वारि तें,
एकादें फुटकें नशीब-म्हणुनी प्रेतास शृंगारितें !
कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हैमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;
कोणाला वनदेवता वरितसे मोदात जी नाहते,
एकाद्यामधुनि परंतु जळती ज्वालानदी वाहते !
झाडें जोडुनी पत्रयुग्म फुटले मेघांप्रती याचती.
स्वच्छंदें जलबिंदु तोच सगळ्या पानांवरी नाचती;
सारी पालवती, फुलें विहरिती शोभा वरी लोळतें,
एखाद्यावर मात्र वीज, पडुनी त्या जाळते पोळते !
चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी
पाही कोण अशा हताश हृदया? जो तो असे आपला,
देवा! तूं टाकिं अश्रु वरूनी, त्यासाठिं तो तापला !

ही एक सोपी कविता आहे म्हणून तिचा समावेश मराठीच्या पाठ्यपुस्तकांत नेहमी केला जातो. परंतु तिच्यात गोविंदाग्रजांचा महत्त्वाचा जाणीवव्यूह व्यक्त झाल्यामुळे त्यांची एकूण कविता समजून घेण्याच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहे. या कवितेत कथनकर्ता फुले, पर्वत आणि झाडे या नैसर्गिक वस्तूंवर बोलत असला तरी या वस्तूंना मानवाच्या प्रतिमेचे रूप देऊन तो मानवावरच बोलत आहे. या कवितेच्या पहिल्या चार ओळींत मानवासाठी 'फुला'ची प्रतिमा योजिली आहे. आपला वापर कोणत्या कामासाठी केला पहिजे, हे ही 'फुले' ठरवू शकत नाहीत. ज्याला त्यांचा वापर करायचा आहे तोच हे ठरवीत असतो. आपल्या 'नशिबात' कोणत्या प्रकारचे जीवन आहे, याची कल्पना फुलांना नसते. काही फुले स्वर्गीय सौदर्य लाभलेल्या स्त्रियांच्या केसांत माळण्यासाठी उचलली जातात तर काही रसिकांना प्रिय असल्यामुळे त्यांना त्यांच्या हृदयात स्थान मिळते. काहींची निवड त्यांच्या पापक्षालनासाठी देवाच्या पायावर ठेवण्यासाठी होते तर काहीच्या नशिबात प्रेताला सजवण्याचे कार्य येते! गोविंदाग्रजांच्या कवितेत भावनिक किंवा मूल्यविषयक कल सूचित करणारी, अनेक अर्थपदर असलेली विशेषणे किंवा प्रतिमा क्वचितच आढळतात. कवितेचा एकपदरी आशय निश्चित करणे एवढेच त्यांचे कार्य असते. परंतु येथे असा कल सुचविणारे शब्द योजले गेले आहेत. गोविंदाग्रजांना स्वर्गांगनांच्या शिरावर विहरणारी फुले 'गोड' वाटतात आणि ती सुंदर स्त्रियांच्या शिरावर 'विहरत' असतात. हे दोन्ही शब्द गोविंदाग्रजांना कल सूचित करणारे आहेत. विफल प्रेमाचे चित्रण करणाऱ्या या कवीला सुंदर स्त्रियांच्या केसांत माळून घेण्याचे भाग्य लाभलेल्या फुलांचे जीवन 'सफल' झाल्याचे जाणवते. म्हणून त्याला ही फुले 'गोड' वाटतात आणि त्यांचे केसांत माळलेले असणे हा त्यांच या स्त्रियांसमवेत केलेला 'विहार' वाटतो! जे त्यांच्या कवितेतील प्रेमिकाला लाभलेले नाही ते या फुलांना मात्र प्राप्त झालेले आहे! हे सर्व या

अनुक्रमणिका

विशेषण-क्रियापदातून सूचित झाले आहे. तसेच प्रेतावर चढवलेल्या फुलांबद्दल 'शृंगारिते' हे क्रियापद योजिले गेले आहे. शृंगारण्याचा संबंध स्त्रियांशी आहे. वस्त्र-आभूषणे इत्यादींनी त्या शृंगार करीत असतात. पण या फुलांना स्त्रियांना शृंगारण्याचे नव्हे तर प्रेताला शृंगारण्याचे कार्य दिले गेले आहे. येथे या कवितेच्या पहिल्या ओळीशी एक विरोधन्यास प्रस्थापित केला गेला आहे.

नंतरच्या चार ओळींत मानवासाठी पर्वताची प्रतिमा आली आहे. यातील प्रत्येक पर्वताचे नशीब वेगवेगळे असल्यामुळे त्यांचे रूप आणि त्यांच्या भोवतीचा परिसर वेगवेगळा झाला आहे. या पर्वतांच्या रूपचित्रणातून त्यांना लाभलेले स्वभावही सूचित केले गेले आहेत. हे स्वभाव त्यांनी मिळवलेले नाहीत, तर त्यांना बाह्य शक्तीकडून दिले गेले आहेत. एक पर्वत आपल्या डोक्याचर 'शीतल हिमप्रभा' धारण करणारा, थंड डोक्याचा, शांत स्वभावाचा आहे. त्याला लाभलेला हा स्वभावही 'प्रेम' सारखा, इतरांची मने प्रसन्न करून टाकणारा आहे. एखाद्याच्या पोटातून 'निर्मल' नद्या जन्मलेल्या असतात. या निर्मल नद्यांचा पिता म्हणून हा पर्वतही इतरांना लुभावणारा आहे. एखाद्या पर्वत वनराईने वेढलेला असतो. जणू वनदेवतेने त्याला वरलेले आहे. आणि हा पर्वत वनदेवतेवर उत्कट प्रेम करीत असल्यामुळेच त्याच्या समवेत राहण्यात, त्याच्याशी संसार करण्यात तिला आनंद मिळतो आहे! प्रेयसीवर उत्कट प्रेम करण्याचा आणि तिला 'मोदात नाहून' टाकण्याचा स्वभाव त्याला प्राप्त झाला आहे. येथे विफल प्रेमाचे चित्रण करणाऱ्या कवीने, ज्याला प्रेमसाफल्य लाभले आहे अशा पर्वताचे चित्र रेखाटलेले आहे. हे जर लक्षात घेतले तर 'मोदात जी नाहते' हा उल्लेख अर्थपूर्ण असल्याचे जाणवेल. या चित्राचे नाते या कवितेतच्या पहिल्या ओळीशी आहे. पहिल्या ओळी 'फुले' स्त्रियांसमवेत विहार करतात तर येथे पर्वतासमवेत वनदेवता मोदात नाहते. एखाद्या पर्वताला नियतीकडून 'ज्वालामुखी' रूप दिले जाते. त्याच्या शीर्षातून ज्वाला निघत असतात आणि लाव्हा रसाची 'ज्वालानदी' वाहत असते. नियतीने त्याला उग्र, इतरांना जाळणारा, म्हणूनच भयग्रस्त करणरा स्वभाव दिला आहे. जीवनात माणसाला पार पाडाव्या लागणाऱ्या भूमिका त्यांनी निवडलेल्या नाहीत आणि त्यांना लाभलेले स्वभावही त्यांनी स्वतः घडवलेले नाहीत. हे सर्व त्यांना बाहेरच्या शक्तीने स्वीकारायला लावले आहे.

या नंतरच्या चार ओळींत झाडांची दोन चित्रे रंगवली गेली आहेत. त्यापैकी मृत्यूच्या सीमेवर असलेल्या एका झाडाला नियतीकडून जीवनलाभाचे वरदान प्राप्त झाले आहे. ज्याचे जगणे सुरळीतपणे सुरू आहे आणि जो पुढेही जगतच राहील, अशा झाडाला अचानक मृत्यूचा लाभ करून दिला गेला आहे. एखाद्या झाडाला पानांची जोडी फुटलेली असते परंतु पाऊस पडत नसल्यामुळे जलाभावी सुकल्यामुळे ही जोडीची पाने परस्परांशी मिटली जातात. जणू ती हात जोडून मेघांना पाऊस पाडण्यासाठी प्रार्थना करत आहेत! मेघही या प्रार्थनाला प्रतिसाद देतात. पाऊस पडतो आणि पानांवर जलबिंदू नाचू लागतात. झाड पानांनी पालवते, त्याच्यावर फुले विहरू लागतात आणि त्याच्यावर 'शोभा लोळू' लागते. मृत्यू समोर उभा ठाकला असताना अचानक जीवन लाभावे, हे या नियतीच्या खेळाचे चित्र आहे. हे जसे घडते तसेच जे निर्वेधपणे जगत आहे आतिण पडणाऱ्या पावसामुळे पुढेही ज्याच्या जगण्याची शाश्वती आहे अशा एखाद्या झाडावर, जीवनदायी पाऊस पडत असतानच, अचानक वीज कोसळते आणि ते झाड जळून पोळून निघते. मरणोन्मुख असलेल्याला अचानक जीवनलाभ घडवण्याचा आणि जगत असलेल्याला अचानक मरणदंड देण्याचा हा नियतीचा विचित्र खेळ आहे. मानवी कर्तृत्वापेक्षा नियतीच मानवाच्या जीवनाला आकार देत असते. हे मानवाचे पराधीनत्व येथे अभिव्यक्त केले गेले आहे.

या कवितेच्या प्रारंभापासूनच्या बारा ओळींत फुलांच्या आणि पर्वतांच्या चार रूपांपैकी तीन रूपे यशस्वी आणि सुखी जीवनाची आणि एक रूप अयशस्वी आणि दुःखी जीवनाचे रेखाटले गेले आहे. झाडांची जी दोन रूपे रंगवली आहेत त्यांपैकी एक यशस्वी तर दुसरे अयशस्वी जीवनाचे आहे. याचा अर्थ असा की सामान्यपणे नियती माणसाच्या पदरात यशस्वी जीवन टाकीत असली तरी एखाद्यावर मात्र तिची अवकृपा होते. ही अवकृपा का होते हे अनाकलनीय असते. या कवितेच्या शेवटच्या चार ओळींत आधीच्या बारा ओळींवर भाष्य केले गेले आहे. येथे कथनकर्ता म्हणतो की, सारे जरी सौख्यात असले तरी एखादा मात्र दुःखार्णवी पडत असतो; जो तो आपल्यापुरते पहात असल्यामुळे दुःखार्णवी पडणाऱ्याकडे कोणीही लक्ष देत नाही. म्हणून शेवटी कथनकर्ता देवाला उद्देशून म्हणतो की, देवा! या तापलेल्यावर त्याला हवे असणारे अश्रू तू तरी वरून टाक! ज्याच्या पदरात दुःखी जीवन पडत असते ते एकाकी आणि निराधारही असतात. केवळ देवाच्या कृपेची याचना करणे, या शिवाय त्यांच्या हातात काहीही नसते. परंतु देवही त्यांची नियती बदलू शकत नाही; तो फक्त त्यांचे सांत्वन करू शकतो. याचे सूचन या कवितेच्या शेवटच्या चार ओळींत केले गेले आहे.

अनुक्रमणिका

हीच जाणीव त्यांच्या 'एकच मागणे!' या कवितेतूनही व्यक्त झाली आहे. 'आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो नाकळे । आहे जो सुखदुःखभोग नशिबी, कोणास तो ना टळे ।' म्हणून येथे देवाकडे पुढील प्रार्थना केली जाते : 'जें कांही घडतें सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे । ऐसें जाणुनि सोसण्यास मज तें सद्धैर्य दे तेवढें।'

'हुरहुर'मध्ये साकार झालेल्या जाणिवांच्या व्यूहाशी गोविंदाग्रजांनी असफल प्रेमाच्या जाणिवा जोडून घेतल्या आहेत. त्यांच्या 'कधी?' या कवितेतील पुढील ओळी या दृष्टीने पहाता येतील. या कवितेत कथनकर्ता म्हणतो : 'प्रतिरात्रीं ही स्वप्नें दाविती इच्छाचित्रें जीवांची । सृष्टि कधीं होइल त्यांची । अं नयनिं ही बघते आशा विश्वचि हें रम्याकार;। जगीं कधीं तें दिसणार?। - आणि वल्लभे ! दिर्लीस वचनें; गोड अहा तीं किती तरी । खरी कधीं होणार परी!' वल्लभेने दिलेली वचने खरी होत नाहीत कारण या जगात व्यक्ती जी इच्छाचित्रे - स्वप्ने - रंगवते ती प्रत्यक्षात येत नसतात. माणसांच्या आशेचे डोळे मुळातच 'अंध' असल्यामुळे तिला जरी हे विश्व रम्याकार दिसत असले तरी 'जगात'- प्रत्यक्षात- ते तसे दिसू शकत नाही. तसेच वल्लभेची वचनेही कधीच खरी होणार नाहीत. माणसाच्या आशेच्या आंधळ्या नेत्रांना प्रत्यक्षातले 'खरे' दिसत नसल्यामुळे त्याला आपले प्रेमही सफल होईल याची खात्री वाटत असते. परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही. पुन्हा माणसाला जे हवे असते ते त्याला नाकारून त्याच्या पदरात त्याला नको असलेले टाकणे ही त्याच्या नियतीचीच कृती असते.

शेवटी गोविंदाग्रजांनी आपला चार ओळींचा मृत्युलेख An April Fool's Work म्हणून लिहिला आहे. 'माझा मृत्युलेख' या कवितेत म्हटले गेले आहे की, ''यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आम्हांप्रती नीटसें । मित्रांतेंहि कळे न गूढ - न कळे माझें मलाही तसें । अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें?। कोठें आणि कधीं तरी जगतिं मी होऊन गेलों असें।'' यातला मिस्किल भाव बाजूला सारला तर गोविंदाग्रजांना मानवी आकलनाला असलेल्या मर्यादा येथे व्यक्त करायच्या आहेत, असे म्हणावे लागेल.

मानवाच्या क्षमतांना असलेल्या मर्यादा, त्याच्या भोवतीच्या काळोखातून आरपार पहाण्याचे त्याने स्वीकारलेले आव्हान आणि त्यात याला येणारे अपयश, इच्छातृप्तींसंबंधीची त्यांची आंधळी आशा आणि नियतिनिश्चित जीवनाचा त्याला करावा लागणारा स्वीकार या आणि यांच्याशी संलग्न असणाऱ्या जाणिवा गोविंदाग्रजांच्या समकालीन कवितेशिवाय अन्यत्र आढळत नाहीत. विसाव्या शतकाच्या प्रारंभाकाळातला हा एक असाधारण कवी आहे. दुसरे म्हणजे जाणिवांचा याच जातीचा व्यूह मर्ढेकरांच्या कवितेत प्रकट झाला आहे. मर्ढेकरांना बालकवींसारखी कविता लिहायची होती. बालकवींच्या शैलीत त्यांनी काही कविता लिहिल्या. पण जाणिवांच्या संदर्भात मर्ढेकरांचे बालकवींशी नव्हे तर गोविंदाग्रजांशी 'रक्ताचे नाते' आहे. बालकवी हे मर्ढेकरांचे स्वप्न आणि गोविंदाग्रज हे मर्ढेकरांचे वास्तव आहे.

। डॉ. सुधीर रसाळ
१००, श्रेयनगर,
नवा उस्मानपुरा
औरंगाबाद.
भ्रमणभाष : ९८८१४००३५०

अनुक्रमणिका

कृषीजनांचे समग्र अवकाश पेलणारा लेखक

श्रीकांत देशमुख

तसा त्याचा संपर्क अधूममधून कायम असतो. कधी भर दुपारला तर कधी वेळीअवेळी त्याचा फोन येतच असतो. दरवेळी त्याला काहीतरी बोलायचं असतं. कधी तो गावाशिवाराच्या पागाडी विषयी बोलतो तर कधी नव्या लेखनाविषयी किंवा खूप दिवसात लेखन न झाल्याविषयी. कधी तो नुस्ती आठवण आली म्हणूनही फोन करतो. जानेफळ, अमडापूला येऊन जा, नाहीतर तू गावकडे आला की मला कळव मी येऊन भेटून जातो अशी त्याची अस्वस्थता कायम असते. त्याचे माझ्याभोवतीचे असणे आता मी तसे गृहीत धरले आहे. माझ्यातली असणारी किंवा नसणारी पोकळी त्याच्या समंजस अस्तित्वानं मी उरात श्वास घ्यावा तशी भरून घेतली आहे. कार्हीना त्याचं वागणं खूपदा अपरिपक्व वाटतं. त्याच्याशी माझं असणारं दुपेडी नातं अनेकांना ठाऊक असल्यानं ते माझ्यापाशी बोलतात, तेही त्याच्यावरच्या मायेपोटीच. ही सर्वदूर पसरलेली त्याच्या लेखनावरली माया तशी त्यालाही ठाऊक आहे पण त्याचा स्वभाव हा ओढेकाठावर वाढणाऱ्या एखाद्या झाडासारखा आहे. भर पावसात भरभरून येणारा, शेशिवारातल्या दुष्काळानं कोमेजून जाणारा, कधी वाहत्या पाण्यात पाय बुडवून आपणच आपले प्रतिबिंब पाहणारा.

सदानंद देशमुख हा आज जवळपास सर्व मराठी वाचकाला ठाऊक असणारा लेखक आहे. गंभीर प्रकृतीचं लेखन वाचणाऱ्यांना जसा तो ठाऊक आहे तसाच वृत्तपत्र वाचकांनाही. मधल्या काळात काही मराठी दैनिकातून त्यानं नियमित लेखन केलंय. या सदर लेखनातून त्याचा लेखक म्हणून असणारा पिंड आणि एकूण प्रकृती सर्वांसमोर आली. त्यामुळं त्यांची लोकप्रियता ही तशी त्याच्या लेखकपणाचा ब राखणारीच आहे. केवळ तथाकथित अभिजनांना, अभिजात वाचकांना ठाऊक असेल तोच चांगला, मराठी भाषा - साहित्य पुढे नेणारा हा समज खोडून काढणारे जे काही मोजके लेखक आहेत त्यात सदानंदचं नाव अग्रक्रमानं घ्यावं लागेल. मराठी भाषेला 'लोकप्रिय' कवी लेखक तसे काही नवे नाहीत. माध्यमांचा अकाळविकाळ विस्तारामुळं असे लोक आता तर घरादारावरती आक्रमण करू लागले आहेत. सर्वसामान्य निरागस वाचकांना त्यामुळं, मुळातच आकलनाचा मर्यादा अल्यामुळं चांगलं काय नि वाईट / सुमार काय हेही कळेनासं झालं आहे. बाबा कदम, शिरवळकर, सिनकर, व. पु. काळे ही एक मोठी लोकप्रिय परंपरा आजवर सामान्य मराठी वाचकात ठाण मांडून होती. दृश्य माध्यमे, फेसबुक आदीच्या आक्रमक अवतरणानंतर एकूण वाचनाच्या माध्यमावर काही मर्यादा आल्या असल्या तरी लोकप्रिय लेखक आजही त्यांचं अस्तित्व टिकवून आहेत हे नाकारता येणार नाही. अर्थात त्या त्या भाषेतील साहित्याची उंची मोजण्यासाठी असे लेखक कधीही उपकारक ठरलेले नाहीत. फावला वेळ घालवण्यासाठी

अनुक्रमणिका

उपयुक्त असणारे असे लेखन करणारे कवीलेखक लोकनुरंजाच्या पातळीवरच कायम राहत आले असल्याने मागणी आणि पुरवठ्याचा जोड घालणारे ठरतात. सदानंद सारखा लेखक त्या सर्वांना ठाऊक असला तरी वाचणाऱ्या सर्वांनीच तो वाचलेला असतो असेही नाही. जे वाचतात त्यांनीही अशा लेखकाला त्याच्या भूमिनिष्ठेसह कितपत समजून घेतलेले असते हाही प्रश्न असतो.

सदानंदला मी साधरणपणे एकोणवीसशे एक्यांशी ब्यांशी पासून पाहत आलो आहे. मी चिखलीला अकरावी बारावी शिकत असतांना तो बी.ए.ला होता तेव्हाही तो कॉलेजामध्ये कथाकार म्हणून ओळखला जात असे. त्या काळात माझी आणि त्याची ओळखही नव्हती. कुठल्यातरी पुरवण्यामधून, बसस्टँडवर मिळणाऱ्या साप्ताहिक, मासिकातून तो लिहीत असल्यामुळे मी फार सद्भावनेनं त्याच्याकडे पाहत नसे. त्यामुळे त्याची कथा मी कधी त्या काळात वाचली नाही. कॉलेजला तो गावाकडे राहूनच अपडाऊन करायचा हे नेहमी दिसायचं. मी सोडून त्याच्याकडं आदरभावानं पाहणारे अनेक तरुण तरुणी, प्राध्यापक अर्थातच माझ्याभोवती होते तरीही त्याला गांभीरपणे घ्यावं असं मला त्याचेही कधीही वाटतं नाही, याची मला आजही गंमत वाटते. माझे तर त्यावेळपर्यंत काहीही लिहून न झालेले. फक्त आडवेतिडवे वाचन तेवढे चालू होते. तरीही वेगळ्या अर्थानं मला दिसत असलेल्या सदानंद सारख्या एका धडपडणाऱ्या लेखकाचा माझ्या पातळीवर अप्रत्यक्षपणे मी उपमर्दच करत होतो. चौधरी नावाचा माझा त्या वेळचा एक वर्गमित्र अतिशय राठ आणि आडव्या न होणाऱ्या केसाचा तो अमडापूरचा, म्हणजे त्याचा बाप तिथे पोलीस खात्यास शिपाई होता. त्याच्याबरोबर मी कधीकधी जायचो अमडापूरला. तिथेच टुरिंग टॉकीजमध्ये अनुपमा हा सिनेमा पाहिलेला. सदानंदचं हे गाव म्हणून अर्थात मनाच्या तळाशी असणारी भावना.

अमडापूर तसं इतर खेड्यासारखंच पण थोडं अंगापिंडानं मोठं असणारं, हायवेवरलं गाव. खामगावं शेगावकडं सतत धावणाऱ्या गाड्या. गावाचं रंगरूप इतर खेड्यासारखं उजाडओसाड वाटत असलेलं. अशी खेडी त्यातल्या माणसाशिवारासह साहित्यात यायला हवी असंही वाटत असलेलं. माडगूळकरांची बनगरवाडी, माणदेशी माणसं माडखोलकर, फडके खांडेकरांबरोबरच वाचून काढलेली. पण आपला वाटणारा लेखक माणूस हा माडगूळकरच असू शकतो असंही वाटून जायचं. पण अशाच एक खेड्यात राहाणारा उमेदीचा लेखक म्हणून सदानंदचं काही वाचावं असं वाटलं नाही. बारावीनंतर चिखली सुटलं आणि मनावर रेंगाळत असलेला सदानंदही तसा दूर गेला. विदर्भ सोडून शिक्षणासाठी मराठवाड्यात आलो. एम.ए. पर्यंतच्या मधल्या वर्षात सदानंद जवळपास मनातून कायमचा पुसून गेल्यासारखा झाला. कधीतरी एम.ए.च्या आसपास प्रभाकर हरकळांसोबत उन्हाळ्याच्या सुटीत अमडापूरला गेलो. हरकळ सांगत की आपल्या भागातला हा खूप महत्त्वाचा लेखक आहे. त्यामुळं नकळतपणे सदाचं महत्त्व वाटू लागलेलं. हरकळांचा 'उलघाल' नावाचा कथासंग्रह त्यावेळी प्रकाशित झालेला. अर्धवेळ शेतकरी, अर्धवेळ मोलमजूरी करणारा खेड्यातल्या अंधारातला माणूस हा हरकळांचा आस्थाविषय. त्यांच्यामुळं पुन्हा एकदा सदानंद आणि अमडापूरशी नातं जोडल्या गेलं ते कायमचंच.

मी जळगावला असतांना दोनहजार चार साली 'बारोमास'ला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. औरंगाबाद जळगाव प्रवासात असतांना शाम देशपांडेनं ही बातमी पहिल्यांदा मला मोबाईवर सांगितली. अनेकार्थानं समानधर्मी असणाऱ्या आपल्या मित्राला हा सन्मान मिळाल्याला अतीव आनंद झाला. पुरस्काराची अपूर्वाई तशी मला फारशी नव्हती तरी 'बारोमास'ला पुरस्कार मिळाल्याची बातमी मला तरंगत ठेवणारी वाटली. याची कारणं मी शोधायला जातो तेव्हा माझ्यासमोर येतं ते खेड्यापाड्यातलं भयाण वास्तव. पालापाचोळ्यासारखा झालेला इथला माणूस. दिवसा गणिक होणारी इथल्या निसर्गाची पडझड. या पडझडीला समजून घेणारा चांगला लेखककवींचा वर्ग मराठी भाषेत नेमका किती आहे, हा प्रश्न खुपदा निर्माण होतो. या वाताहतीला शब्द देण्यातून इथले प्रश्न मिटणार नाहीत ही जाणीवही तशी मनाशी असतेच. कलावंताचा लेखनातून दिलेल्या प्रतिक्रियेतून इथले प्रश्न सुटण्याची शक्यता खूप लांबलांबपर्यंत नसते, ही जाणीव असतांना देखील तो लिहीत असतो. आपल्या लेखनातून आपल्या सभोतालाविषयी समंजस प्रतिक्रिया व्यक्त करीत असतो. ही प्रतिक्रिया म्हणजे आपल्या समकालीन वास्तवाला दिलेल्या ठळक तळटीपे सारखी असते. सदानंदच्या भोवतालचे वास्तव हेच माझ्या भोवतालचे वास्तव होते. फरक एवढाच की भाकरीच्या आणि आत्मसन्मानाच्या शोधात मी कळतनळकतपणानं नागरी जीवनाचा भाग झालो होतो. तो मला आपल्या शेतीवाडीच्या आणि खेड्यापाड्याच्या धुळीत, पालापाचोळ्यात आरपार बुडालेला होता. अशी माणसं शब्दांच्या जवळ जाता जाता मध्येच हरवून जावून त्या पाचोळ्याचा भाग बनत नाहीशी होतात. भांबावून जातात. रोजच्या जगण्याचे भयावह प्रश्न सोडवता सोडवता निरुत्तरीत होऊन बैलासारखं आयुष्य ओढू लागतात. सदानंदला हे सगळं

टाळता आलं. पडझडीचा भाग बनूनही त्या पडझडीला त्याला शब्दाच्या गाठीला बांधता आलं. याठीच त्याला मिळालेल्या सन्मानाचं मोठेपण मला स्पर्श करून गेलं.

नव्वदोत्तर काळात मराठी भाषेत कथा, कादंबरी वाङ्मयाची परंपरा सशक्त करण्यामध्ये ज्या काही मोजक्या लेखकांचा उल्लेख करावा लागेल त्यात सदानंदला टाळता येणार नाही. अशी विधाने करणे वरवर तसे खूप सवंग वाटण्याची शक्यता गृहीत धरुनही ही सदानंदबाबत हे विधान अनेकार्थाने अवाजवी ठरणार नाही असे भरीव लेखन करणारा हा लेखक आहे. लेखन करणे ही एक भाषिक कृती आहे. या पलीकडे जावून तिचे सामाजिक - सांस्कृतिक महत्त्व अधोरेखीत करणारी मराठी साहित्यातील जी परंपरा आहे त्या परंपरेशी सदानंदचे नाव फार आधीच जोडले गेलेय. 'तहान', 'बारोमास' यासारख्या समकालीन ग्रामीण वास्तवाचा प्रगल्भ असा आडवा उभा छेद घेणाऱ्या कादंबऱ्यांनी त्याचे नाव आणि स्थान मराठी भाषा - साहित्य - संस्कृती परंपरेत कायमचे नोंदवले गेले. तसेच त्याचे एकूण कथालेखनही त्याच्या समाजभानाचे आणि सृजनशील व्यक्तिमत्त्वाने अधोरेखित करणारे ठरले. याशिवाय त्याचा कविता, ललितलेखनही त्याच्या लेखनाच्या आदीप्रेरणा काय आहेत हे समजून घेण्यासाठी पूरक महत्त्वाचे ठरणारे आहे. त्याच्याकडे मी कधीतरी वर्षा दोन वर्षातून जातो. माझ्या गावाहून मी मेहकरला जायचो. त्याची आणि माझी ओळख नसतांना मी मेहकरला गेलो होतो ते ना. घ. देशपांडेना भेटायला. 'नदीकिनारी, नदीकिनारी, नदीकिनारी ग', अशी नामधूर दृश्यकविता लिहिणारा आणि जगापासून अलिप्त असणारा हा कवी त्यावेळी उतरणीच्या उन्हात उभा होता. मेहकरात खूप आत एका गल्लीत असणारे ना. घं. चे छोटेसे उंचवट्यावरचे घर. वकीली करणारे ना. घ. त्यावेळी फारसे बाहेर फिरत नसत. पण घरी गेलो की खूप मनापासून बोलायचे. कविता म्हणून दाखवायचे. त्यांच्या मुलालाही पेटीवर कविता म्हणायला लावायचे. 'कंचनीचा महाल' हे नावंही त्याचवेळी कानावर आलेले. पण कधी तो महाल पाहण्याचा योग आला नव्हता. सदानंदमुळे तो आला, कायम येत गेला. कोणतीही महत्त्वाचा लेखक आपल्या मातीतूनच सत्य घेत असतो. आपल्या प्रदेशाचा इतिहास आणि वर्तमान त्याचा पाठपुरावा सोडत नाही. त्याचा भोवतालची समग्र जीवसृष्टी त्याला आपल्यात रिजवून सतत आवाहन करीत असते. कलावंताला उघड्या डोळ्यांनी दिसणारे वास्तव, त्याच्या संवेदनांचा कधी भाग बनून जाते हे त्यालाही कळत नाही. बरीचशी भूमिगत चालणारी ही प्रक्रिया तिची सजीवता जेवढी लवलवणारी तेवढे तिचे कलेमधले अवतरणही सजिवंत आणि देखणे असते. ना.घंनी कंचनीच्या महालावर दीर्घ कविता लिहिली तो महाल जानेकळला मेहकरकडून जातांना गावाबाहेर एका उजाड माळ्यावर उध्वस्त अवस्थेत आजही उभा आहे. सगळ्याच शहरे आणि खेड्यांनी आपले हातपाय अस्ताव्यस्त पसरायला सुरुवात केली तसे मेहकरही आता या महालाला विळखा घालू लागले आहे.

सदानंदकडे जानेफळला जातांना सुरुवातीला खूपदा मला रस्ता चुकल्याचे वाटायचे पण थोड्या अंतरावर कंचनीच महाल दिसला की हायचे वाटायचे. जणू काही जानेफळला जायच्या जानेफळ ही माझ्या परीने ओळख झालेली. मग पुढे टापोटाप त्याचं घरीही मला सुरुवातीला सापडायचं नाही. मग कोणाला तरी विचारलं की त्याच्या घरी आपोआप पोहोचल्यासारखा पोहोचायचो. विदर्भातली माणसं एखादी गोष्ट विचारली की अगदी मनमोकळी सांगतात. एका घरी विचारलं की बाजूचे चार दोन जणही सांगू लागतात. सदानंद मला जानेफळातल्या थोरमोठ्यांना ठावूक असणारा लेखक, तोही लेखक म्हणून ही तशी किती चांगली गोष्ट आहे. त्याच्या परिसरातल्या किती लोकांनी त्याचं साहित्य वाचलं हा तसा संशोधनाचा विषय. पण एखाद्या लेखकाचं अस्तित्व जाणवावं, किमान एवढा तसे आपला समाज अजूनही संवेदनाशील आहे. ही तशी आल्हाददायक गोष्ट आहे. सदानंद हा जसा महाराष्ट्राला ठाऊक आहे तसा बुलढाणा जिल्ह्यातल्या गावागावालाही. पिकलं तिथं विकत नाही म्हणतात पण कृषीजन समूहाच्या वेदना मांडणारा सदा जिथे शब्दांच्या राशी पिकवतो तिथल्या लोकांना तो ठाऊक आहे. चालताफिरता सतत कागदावर नोंदी करण्याची त्याची खूप जुनी सवय. त्याच्या ढगळ सदऱ्याच्या खिशात नेहमी एखादा कोरा कागद असतो. कोणाशी गप्पा मारतांना सापडणारा एखादा नवा शब्द, एखादी नवी म्हण, एखादा नवा जगण्याचा संदर्भ तो बोलता बोलता लिहून घेतो. आपण जी भूमी नांगरतो, वखरतो तिच्यातलं सत्व आपल्याला गवसतंच असं नाही. तो शोधण्यासाठी जीवापाड मेहनत करावी लागते. सर्व वेचवा तसं त्या भूमीतलं उरलसुरलं वेचत जावं लागतं आणि रास उभी करावी लागते. सदानंदच्या लेखनातले खूप सारे संदर्भ त्यानं असेच मुख्य पीक घेतल्यानंतरचा सर्वा गोळा केल्यासारखे दिसतात. त्याचीच पेरणी राखल्या बियाण्यासारखी तो आपल्या लेखनातून करतो. त्यामुळं वाचणाऱ्यालाही हे आपलंच आहे, पण सदानंद पाहिल्यांदाच आपल्याला सांगतोय असं वाटून जातं. हिंडताफिरता गोळा केलेले हे संदर्भ मग तो त्याला अभ्यासाच्या खोलीत बसून रजिस्टरवर नोंदवत जातो. अशा कितीतरी वह्या आणि

अनुक्रमणिका

रजिस्टर त्याच्या खोलीतल्या कपाटात असंख्य नोंदींनी भरलेले दिसतात.

एखाद्या महत्त्वाच्या वाटणाऱ्या कलावंताला समजून घेण्याची प्रक्रिया त्याच्या लेखनाचं समीक्षण करण्यापेक्षाही मला जास्त महत्त्वाची वाटते. या समजून घेण्यातून त्या कलावंताच्या मूळाचा शोध घेता येणे शक्य होऊ शकते. जगण्याच्या भरताड फाफटपसाऱ्यातून नेमकं नीकं तेवढं शोधत जाणं आणि त्याला आपल्या विचारप्रक्रियेचा , संवेदनप्रवाहाचा भाग बनवणं याचा शोध घेण्यातून कलेच्या प्रत्यक्ष निर्मितीच्या जवळपास जाता येतं सदानंदचं कागदावर नोंदी करत जाणं ही गोष्ट भौतिक क्रियेत जमा होणारी नसते. आपण ज्या पर्यावरणात जन्मापासून राहतो, वाढतो, ते आपल्याला किती समजते हाही प्रश्न उकरतोच. स्वतःच्या जाणीवेची समग्रता नाकारून जे समजले नाही ते पुन्हा पुन्हा समजून घेण्याची ही प्रक्रिया असते. तो वेगळ्या बाजूने संस्कृतीचा शोधही असतो. सदानंदच्या एकूण लेखनातून लोकसंस्कृतीची जी अनेक रूपे दिसतात ती त्याला स्वतःला खोदण्यातून आणि अशा प्रकारचा सर्वा वेचण्यातून साकार झालेली आहेत.

सदानंद व्यवसायनं शिक्षक आहे. आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभाय. त्यानं मध्या काळात महानोरांच्या कवितेवर पीएडी केलं तेही कवितेवरच्या आस्थेपोटी. कवी म्हणून त्यानं स्वतः फार जास्त काही लिहिलं नाही. तो कवी असण्यापेक्षा कादंबरीकार, कथालेखक म्हणूनच सर्वांना ठाऊक आहे. पण त्याचं कवीपण त्याच्या गद्यलेखनातूनही कायम डोकावत जातं. जनसमूहाविषयीची, प्राणीमात्रा-झाडाझुडांविषयीची अपार करुणा आणि आस्था त्याच्या लेखनाच्या स्थायीभाव राहात आला आहे. व्यवसायाच्या पातळीवर त्याची लेखन आणि संशोधक म्हणून असणारी श्रेष्ठता फारशी कामी आली नाही. मराठी भाषा संस्कृतीविषयी आमूल आस्था आणि दृष्टी असणारे सदानंद, प्रवीण बांदेकर, अशोक कोतवाल, रमेश इंगळे, रवींद्र चावरेकर सारखे अनेक लेखक, कवी माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळां मधून काम करतांना दिसतात. यालउट अतिशय सुमार बुद्धीचे कितीतरी लोक महाविद्यालये, विद्यापीठातून सहिसलामत स्थिरावलेले दिसतात. सदानंदला मात्र आपण शिक्षक असण्याची खंत कधी फारशी वाटली नाही. आपल्या ग्रामवास्तवाला थेट भिडून तो जगत आला आणि जे जगलं, पाह्यलं ते आपल्या भाषेत मांडत आला. त्याच्या तसा लेखक कधी कुठल्या भौतिक उत्कर्षाच्या बाबीत रमला नाही. त्याच्या लेखनातलं लसलशीत या त्याचा भिडून जगण्याचा आणि भोवतालच वास्तव हेच 'लेखक माणूस' म्हणून आपलंही वास्तव आहे या जाणिवेचाही परिणाम असावा. त्याच्या लेखनाची दखल घेतांना अनेक समीक्षकांना त्याची तुलना प्रेमचंद, रेणू, नागार्जुन यासारख्या थोर लेखकांशी सप्रमाण करण्याचा मोह आवरता आलेला नाही. एखाद्या विराट महाकाव्याची अनुभूती देणारे त्याचे लेखन नकळतपणे कोणालाही या तुलनेकडे ओढून नेते.

आपल्या भोवतालचा समग्र कृषीजनसंस्कृतीचा पसारा, जैविक, अजैविक वास्तवासह त्यांची अंतःप्रवाह समजून घेऊन तेवढ्याच नैसर्गिकपणे आपल्या बोलीभाषेत मांडण्याची क्षमता असणारा हा लेखक आहे. तो आपल्या समकालाचे केवळ वरवरचे छायाचित्रण करीत नाही तर कलात्मक सामाजिक भानातून एक समग्र व्यवस्था उभी करतो. पाणीप्रश्नानं वेढून टाकलेला, विकल गावगाडा त्याचा तहान सारख्या कादंबरीतून जेव्हा समोर येतो तेव्हा तो विदर्भातला कुणालाही एखादा गाव नसतो. तो असतो कुणलाही भारतीय गाव. 'बारोमास' असो की 'तहान' त्याच्या लेखनाच्या तळाशी असणारे भारतीयत्व हा सदानंदच्या लेखनाचा असाधरण विशेष आहे. केवळ बोलीभाषेत लेखन केले म्हणजे भारतीयत्व सिद्ध होत नसते. प्रादेशिक भानाला स्वतःला रिचवून त्याला वैश्वीक करण्याची क्षमता असणारे लेखकच ही भारतीयत्वाची संवेदना उभी करू शकतात. पारंपरिक खेडी ऐंशीच्या दशकात सपाट्याने बदलायला सुरुवात झाली. तशी ही सुरुवात फार आधीपासूनची. परंतु ऐंशी नव्वदीच्या दशकात नागरीकरणाने झपाट्याने वेग घेतला. बलुतेदारी अखेरचा श्वास घेत होती. यांत्रीकीकरणाने कृषीग्रामव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाले. जातीअंताच्या चळवळीही या काळात मोठ्या प्रमाणात वाढल्या. गढी हे या परंपरावादी खेड्याचे एक प्रतिमान ठरली होती. गढीचे ढासळणे हे एका व्यवस्थेचा शेवट आणि दुसऱ्याचा शोध या अर्थाने पाहावे लागते. मराठी साहित्यातही या बदलाचे पडसाद कमी अधिक फरकाने उमटायला सुरुवात झाली होती. एखादे नवे सकारात्मक किंवा नकारात्मक परिवर्तन आकाराला येतांना होणारी पडझड ही सहज स्वाभाविक अशीच प्रक्रिया असते. कलावंत हा या पडझडीचा साक्षीदार असतो. यादवांच्या 'गोतावळा'तला नारबा म्हणूनच एका युगांताच्या कहाणीचा प्रतीक बनतो तशीच उद्ध्वव शेळक्यांची कौतिक या संक्रमण काळातल्या मागची पुढली नायिका, तिही सर्वात तळातल्या माणसाचे प्रतिमान बनून येते. सदानंद देशमुख हा नव्वदीचा दशकानंतर खऱ्या अर्थाने आकाराला आलेला लेखक. 'रगडा', 'उठावण', 'महालूट', 'खुंदळघास', 'गाभूळगाभा' या कथासंग्रहातून तो या काळात, या काळतल्या ग्रामीण भागातल्या गावगाड्याचा शोध घेतांना

अनुक्रमणिका

दिसतो. 'रगडा'मधील 'अमृतफळ' सारखी कथा झाडावर जीव लावणाऱ्या आबाजीची गोष्ट. बदलत्या वर्तमानात समोर येते. तेव्हा आबाजी सोबतच एका बदलत्या व्यवस्थेचे चित्र मांडत जाते. नैतिक मूल्यांचा आग्रह हा कुठल्याही कलाकृतीचा स्थायीभाव असतो. बारिकसारिक घटना प्रसंगातून सदानंदच्या कथा साकार होतांना दिसतात. कुठे नव्या-जुन्या पिढीतला संघर्ष आहे. कुठे स्त्री जीवनाची घसमट, कुठे निसर्गावर प्रेम करणारे तरणे म्हातारे नायक आहेत, कुठे सृष्टीतत्त्वाशी अंगभूत नाते सांगणारी कहाणी आहे. कुठे नव्या बदलाला जुळवून न घेता न आल्यानं भुईसपाट होणारी माणसं आहेत. ग्रामीण सुखदुःखाला कवेत घेऊन एका समग्र जीवनाचा वेध व्यामिश्र स्वरूपात घेणारे सदानंदचे लेखन यासाठीच कधी तत्त्वाशी बांधील असणाऱ्या कोणालाही आपले लेखन वाटते. कोणत्याही लेखकाचे यश कुठल्या परिमाणात मोजायचे, याचे निकष विद्यापीठीय विद्वानांनी कसेही ठरवावेत सदानंदसारखा लेखक या साऱ्या परिमाणांना नकळतपणे कवेत घेऊन जनसामान्यांचा लेखक होतो, ही त्याच्या लेखनाची यथार्थता आहे.

मराठी भाषेत कृषीजन साहित्याची प्रदीर्घ परंपरा आहे. महात्मा चक्रधर, संत परंपरा, तुकोबा, जोतिबा ते आधुनिक काळातील र. वा. दिघे, माडगूळकर, यादव, बोराडे, चंदनशिव, उद्धव शेळके, राजन गवस, पठारे, भालचंद्र नेमाडे (विशेषतः हिंदू) अशा परंपरेला जोडून येणारे जे काही महत्त्वाचे लेखक आहेत त्यात सदानंद हा या परंपरेचा थेट वारस असल्यासारखा वाटतो. कृषीजन व्यवस्थेचा अवकाश पेलून तो माती आणि माणसासह जिवंतपणानं मांडणं, ही त्याची अंगभूत शैली आहे. एखादी लोककथा सांगावी तशा तो या साऱ्या गोष्टी समंजसपणानं आपल्या शैलीतून आणि आपल्या भाषेत सांगत जातो. त्याच्या शैलीतून येणारे विद्रूप आणि भकासपण ही मग चित्रदर्शी होऊन त्याचा कथा कादंबऱ्यामधून साकार होऊ लागते. सदानंदच्या कथांमधून जे छोटे छोटे अनुभव गोळीबंद स्वरुपात मूर्त रूप धारण करतात त्याचाच एक विशाल पट एखाद्या समरांगणासारखा कादंबरीत येतो. 'बारोमास'ला एका महान शोकांतिकेचे आलेले रूप म्हणूनच केवळ 'प्रादेशिकता' किंवा 'ग्रामीणता' या चौकटीत समजून घेता येत नाही. 'बारोमास' ही केवळ कलिक अर्थाने समकालीन नसून संपूर्ण भारतीय परिप्रेक्षात घडणाऱ्या कृषीव्यवस्थेतल्या आंतरविरोधती तळातल्या माणसाची शोकात्म कथा आहे. 'बारोमास'मधला एकनाथ हा पदवीधर तरुण असला तरी तो 'बारोमास'मध्ये येतो तो इथल्या शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून. त्याची बायको आणि त्याचं एकूण कुटुंब यात त्याची होणारी जीवघेणी ओढताण एका कुटुंबाच्या ताणाचे प्रतिनिधित्व करीत नाही तर एका व्यवस्थेतील ताणाचे प्रतिनिधित्व करते. ती केवळ एका कुटुंबाची गोष्ट राहिली असती तर तिथे स्थान एकूणात जमा होणारे ठरले असते. शेती, गावगाडा, बाजारव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, कौटुंबिक पातळीवरील नात्यागोत्यातले आंतरसंबंध, रागलोभ, हव्यास अशा कितीतरी बाबी बारोमासमधून एकजीव होऊन सेंद्रीय स्वरुपात समोर येतात. यासाठीच 'बारोमास' ही सर्वंकष ग्रामजीवन जाणिवेची भारतीय कथा ठरते. भारतीय उपखंडातल्या कोणत्याही प्रदेशातील भाषिक, प्रादेशिक भेद बाजूला केले तर 'बारोमास' ही मातीवर राबणाऱ्या भूमिनिष्ठ भारतीयांची कादंबरी आहे ती यासाठीच. कधीकधी असा प्रश्न पडतो की 'बारोमास'ला समजा अकादमीचा सन्मान मिळाला नसता तर तिचे जे कौतुक आणि मूल्यमापन केले गेले तसे केले गेले असते का? आपल्या कोणत्या सांस्कृतिक मनोवृत्तीचा विचार करता या प्रश्नाचे उत्तर नाईलाजाने नकारार्थीच घावे लागते. उद्धव शेळक्यांची 'धग' सारखी थोर कादंबरी आजही अनेकांच्या आस्थेचा विषय नसते. ही बाब आपले तथाकथित सांस्कृतिक मोठेपण सांगणारी आहे. अपघाताने का होईना 'बारोमास'ला सन्मान मिळाला. त्या निमित्ताने एकूण कृषीजनसाहित्य हे मध्यवर्ती साहित्य आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले ती बाब त्यातल्या त्यात महत्त्वाची मानावी लागेल.

सदानंदच्या बोलण्यातून नेहमी पाऊसपाणी, गावाकडल्या गप्पा दिसतात. शेतीला जोडून तो शिक्षकाची नोकरी करतो की नोकरीला जोडून शेती हे बरेचदा कळत नाही. कायम मागोमाग येणारी दुष्काळी वर्ष. शेतात टाकावं काय आणि पिकवावं काय, या रगाड्यात अडकलेला शेतकरी वर्ग. गावगाड्यातले शेतमालक आणि शेतमजूर यातले ताणतणाव. शेतकऱ्यापेक्षा मजुरांचे बरे, असं म्हणायची वेळ आलीय इतपत शेती करणे बेभरोशाचे झालेय. बरे तर शेतकरी आणि शेतमजूर एकाच व्यवस्थेचे भाग आहेत पण शेतीची प्रकृती इतकी बिघडलीय की झपाट्याने शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढते आहे. जागतिकीकरणातून शेतीचे चित्र पालटेल असे वाटले होते पण अजूनही काही भले वाटावे असे दिसत नाही. एक प्रचंड मोठा संभ्रम सर्वदूर पसरलेला. त्याच्या बोलण्यातून या साऱ्याचे पडसाद कायम उमटत असतात. कधी पावसाळ्यात एखादा मोठा पाऊस झाला की तो अचानक फोन करतो. त्यावेळी त्याचा बोलण्यातून ओसंडून वाहाणारा आनंद मी खूपदा अनुभवला आहे तशीच बखाडीमुळं पीकं कोमेजू लागण्याची विषण्णताही. त्याचं हे शेतकरी मन त्याला कायम आपल्या भूमीशी बांधून ठेवतं. तिथल्या माणसांविषयी आपली

अनुक्रमणिका

माणसं म्हणून बोलायला लावतं. आंतरिक उमाळ्यातून तो सारं काही वरवर भाबडं वाटांव असं बोलत असतो. एका बाजूने त्याची दिसणारी निरागसता मात्र दुसऱ्या बाजूने व्यवस्थेच्या खोल मुळापर्यंत जातांना दिसते ती त्याच्या एकूण लेखनातून.

'भुईरिंगणी' आणि 'भेळवण' हे त्याचे दोन ललितलेख संग्रह. सदानंदमधल्या लेखकाचा चिंतनशील तळ समजून घ्यायला असेल तर हे लेख वाचायला हवेत. त्याची एकूण कृषी व्यवस्थेकडे पाहण्याची सखोल दृष्टी या लेखनातून जाणवते आणि मग त्याच्या कथा, कादंबऱ्या समजून घ्यायलाही मदत मिळते. आपल्या ललित लेखनातून ग्रामव्यवस्थेचे स्थायित्त्व स्वीकारून आणि त्या व्यवस्थेची जगण्यातील अपरिहार्यता मान्य करून सदानंद समग्र गावगाडा इतिहास वर्तमानासह आपल्या कवेत घेतांना दिसतो. त्याचे हे लेखन म्हणजे गावगाड्याभोवतालची एक संवदेनशील भ्रमंती असते. त्याचे ललित लेखन केवळ प्रथा परंपरा मांडत, गावमाणसांचा, निसर्गचक्राचा नुसता धावता परिचय करून देत नाही. भिजपाऊस जसा खोलवर मातीत आणि भूगर्भात मुरत जातो तशी त्याची सृजनप्रक्रिया या लेखातून आकाराला येत जाते. 'जशी भूई तशी बाई' या लेखातून स्त्री हे सर्जनाचं कसं आदिम प्रतीक आहे, याची मांडणी समाजविकासाच्या अवस्थांचा शोध घेत तो मांडत जातो. इथली कृषी व्यवस्था कुणबी बायांनी आपल्या हातावर आणि खुरप्याचया अणीवर कशी तोलून धरली आहे या वास्तवाचा प्रत्यय त्याच्या लेखनातून येतो. वर्तमानातील स्त्रियांच जगणं समजून घेणारा त्याच्यातला लेखक खऱ्या अर्थानं त्यामुळं कृषीरजन परंपरेचा खराखुरा प्रतिनिधी वाटतो. पार्वतीमाय सह गावगाड्यातील अशा असंख्य कष्टकरी स्त्रिया त्यांच्या लेखनातून सर्वदूर भेटत जातात. ज्या पर्यावरणात तो लहानाचा मोठा झाला त्या सामाजिक पर्यावरणातील त्याला भेटलेली, त्यानं पाहिलेली युसूफभाई, आसाराम सारखी माणसं केवळ व्यक्तिचित्रणाचा पातळीवर न राहता एका भेलकांडणाऱ्या कृषीव्यवस्थेला आणि भांबावलेपणाला सोबत घेऊन येतात. डॉ. गणेश गायकवाडसारखे पात्र व्यवस्थेच्या ताणातून निर्माण झालेले. बलुतेदाराचा हा एक मुलगा टोपले विणतांना डॉक्टर होतो. ग्रामजाणीवेचे लखेक फक्त शेतीभाती विषयीच बोलतात, या काही सवंग प्रतिक्रयांना सदानंद अशा लेखनातून उत्तर देतांना दिसतो. '...दारी' या लेखात तो म्हणतो, ''चित्र बदलून गेलं त्यांच काही नाही पण आस्था संपली, भावनेतील हळुवारपणा गेला, एकोप्याचा मूल्यऱ्हास झाला आणि एका अपरिहार्य अशा व्यवहारवादी मूल्य व्यवस्थेचा विळखा एकूण बदलत्या वातावरणाला आवळून आवळून पिळवटून काढू लागला सदानंदच्या एकूण लेखनाचे मध्यवर्ती सूत्र मांडणारे हे विधान आहे. यात केवळ स्मरणरंजन नाही की गेल्या व्यवस्थेचा अकारण गहीवर नाही. आहे ती एक मूल्याची आळवणी. ती समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्याच्या काही लेखातून शेताशिवाराच्या पुरातन शोधाची कहाणी आहे. ग्रामव्यवस्थेची प्रदीर्घ वाटचाल मांडून तो वर्तमानाला भिडतो.

सदानंदच्या गद्यलेखनातून लोकपरंपरा, लोकगीते, जानपद शब्दकळा, सणावारांची परंपरा अशा कितीतरी गोष्टी येत जातात. या परंपरेची मांडणी करतांना तो गावगाड्यातील शोषण परंपरेला बाजूला ठेवत नाही. सरकारी बाबू, आडते, व्यापारी, दलाल यांचा शेतीव्यवस्थेतील आणि एकूण ग्रामव्यवस्थेला पडलेला विळखा तो कायम कथा, कादंबऱ्यातून मांडत जातो. त्यामुळे कोणाला तरी रिझवायचे आहे, म्हणून केलेले हे लेखन न राहता मराठी साहित्यातील समाजाशील लेखनाची परंपरा समृद्ध करणारे हे लेखन ठरते. अनेक लोक खूपदा त्याच्या लेखनाविषयी बोलतांना दिसतात. आपण जे पाहातो, ऐकतो तेच सारं देशमुखांच्या लेखनात आहे, पण वाचल्यावर कळतं की, आपण बरंच काही गमावत चाललो आहोत आणि त्याला जबाबदार आपणच आहोत, अशा प्रकारच्या ह्या प्रतिक्रिया प्रातिनिधिक आणि पुरेशा गंभीर तर आहेतच पण सदानंदचे लेखन हे वाचकाला एका चिंतनशीलतेकडे नेणारे आहे हेही सांगणारे आहे.

सदानंद हा मूळात कथा, कादंबरीकार. नादुरुस्त झालेला गावगाडा हा कायम त्याच्या चिंतनाचा विषय राहात आलाय. त्यानं आतापर्यंत जे लेखन केलेय त्यातून त्यानं मराठीला भरभरून दिलय. आपल्या साहित्याचं भांडवल करून पोट भरण्याची वृत्ती त्याच्यापाशी नाही. की स्वतःच्या साहित्याविषयी तो कधी फारसा बोलताना दिसत नाही. त्याचं बोलणं आणि वागणं हे आपल्या ग्रामकृषीपरिवाराला सोबत घेऊन चालत आलं आहे. लेखकाने लेखनासाठी अपार कष्ट करण्याची गरज आहे, हे तो पूर्ण जाणून आहे. आपलं लेखन ही एक महत्त्वाची सांस्कृतिक कृती आहे याचं पुरेसं भान त्याच्या लेखनातून दिसतं. मराठी मातीतली दुःख आणि वेदना केवळ अनुकंपेच्या पातळीवर विचारात न घेता त्यांना विश्वात्मक करण्याची क्षमता बाळगून असणारा हा लेखक त्याच्या लेखनासह मराठी माणसाला ठेवा ठरावा असा आहे.

। श्रीकांत देशमुख
'बळिवंत', नरहरनगर, नृसिंह पॅलेसच्या मागे,
रिंग रोड, नांदेड - ४३१ ६०५
भ्रमणभाष : ९४२२४३६७६९

सौंदर्यग्राही समीक्षेचे उद्‌गाते

डॉ. विलास खोले

दत्तात्रय भिकाजी कुलकर्णी ऊर्फ द. भि. गेले आणि मराठीतील सहसर्जक समीक्षापर्वाचा अस्त झाला.दभिंचा व माझा परिचय झाल्याला ३५ वर्षे होऊन गेली. नागपूर शहरात एसएनडीटी विद्यापीठाच्या परीक्षांचे नियंत्रण करण्यासाठी एके काळी मी जात असे, तेव्हा त्यांच्याकडे आवर्जून हजेरी लावत असे. जंतरमंतर येथील त्यांच्या निवासस्थानी पहिल्यांदा मी गेलो त्या वेळी नागपुरात त्यांच्या नावाचा मोठा दबदबा होता. त्यांच्याकडे भेटायला जाण्याविषयी आणि प्रत्यक्ष भेटीविषयी बरेच काहीकाही कानांवर होते. परंतु मला त्यांच्या स्वागतामागील मनःपूर्वकता, त्यांच्या विद्वत्तेमागील साहित्यप्रेम आणि त्यांच्या साहित्यचर्चेमागील रसिकता दरवेळी अनुभवास आली. दभिंच्या आणि माझ्या भेटीत तीन मुख्य दुवे होते. एक, म .द. हातकणंगलेकर, दुसरा वि. बा. प्रभुदेसाई आणि तिसरा अक्षयकुमार काळे. हे तिघे दभिंच्या स्वभावातील सगळ्या खाचाखोचा ठाऊक असूनही दभिंवर डोळस प्रेम करणारे होते. माझे या वर्तुळातले नाते लक्षात घेऊनच दभि कालांतराने एसएनडीटीच्या मराठी विभागात व्याख्यानाला आले होते व त्यांनी मराठी नाट्यवाङ्मयाविषयी व्यासंगपूर्ण विचार मांडले होते. मात्र, आपल्या स्वभावधर्माला जागून व्याख्यानास सुरुवात करण्यापूर्वी पुण्याच्या माणसांना काहीं चिमटे काढायला ते विसरले नव्हते.

मराठीचे अध्यापन आणि साहित्याची समीक्षा या दभिंच्या आत्यंतिक जिव्हाळ्याच्या गोष्टी होत्या. मध्ययुगीन आणि आधुनिक मराठी वाङ्मयाचा त्यांचा उत्तम व्यासंग होता. ज्ञानेश्वर आणि मर्ढेकर ही त्यांची दैवते होती. भारतीय साहित्यशास्त्र त्यांना कुठल्याही संस्कृतच्या नामांकित प्राध्यापकाइतकेच चांगले अवगत होते. या साहित्यशास्त्राची परिभाषा त्यांच्या वक्तृत्वाचा आणि लेखनाचा अविभाज्य घटक होती. ग. त्र्यं. देशपांडे यांचा याच नावाचा सुप्रसिद्ध ग्रंथ त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांकडून घटवून घेतला होता. पुण्यात रा. श्री. जोग यांची आणि मुंबईत व मराठवाड्यात वा. ल. कुळकुर्णी यांची जशी विद्यार्थ्यांची मोठी परंपरा उत्पन्न झाली, तशीच विदर्भात द. भि. कुलकर्णी यांची परंपरा निर्माण झाली. प्रभा गणोरकर, यशवंत महोतर, स. त्र्यं. कुल्ली, प्रमोद मुनघाटे, संध्या अमृते यांसारखे पीएचडीचे आणि ग्रेस, अक्षयकुमार काळे, श्रीकांत तिडके, प्रदीप विटाळकर यांसारखे त्यांच्या एम.ए.च्या वर्गातले विद्यार्थी यथावकाश मराठीचे नामवंत प्राध्यापक झाले.

'दुसरी परंपरा', 'पहिला परंपरा', 'महाकाव्य स्वरूप व समीक्षा', 'ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद', 'तिसऱ्यांदा रगांगण', 'मढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना', 'दोन परंपरा', 'युगास्त्र', 'द्विदल', 'हिमवंतीची सरोवरे', 'पहिल्यांदा रगांगण',

'कादंबरी स्वरूप व समीक्षा', 'नाट्यवेध', 'समीक्षेची सरहद', 'सुरेश भट नवे आकलन', 'नाटक स्वरूप व समीक्षा', 'महाकथा जीएंची', 'वल्कले', 'प्रतीतिविश्रांती ज्ञानदेवांची' इत्यादी पंचवीस समीक्षाग्रंथ द. भि. कुलकर्णी यांनी लिहिले. 'रेक्वीयम' (कथासंग्रह), 'मेघ', 'मोर' आणि 'मैथिली', 'अपार्थिवाचे चांदेणे', 'पस्तुरी' (ललित लेखसंग्रह) आणि 'मेरसोलचा सूर्य' (कवितासंग्रह) या ललित लेखनाची नोंद न करता पुढे जाता येत नसले तरी, द. भि. या नावाची ओळख त्यांच्या समीक्षालेखनाशीच निगडित आहे.

सैद्धांतिक व उपयोजित अशा दोन्ही प्रकारचे समीक्षालेखन त्यांनी केले. 'महाकाव्य' हा त्यांच्या पीएच. डी.च्या प्रबंधाचा विषय होता.

शतकानुशतकांची परंपरा असणारा, जागतिक साहित्यविश्व व्यापणारा, देशागणिक वेगवेगळी रूपे धारण कराणारा, नवनव्या साहित्यकृर्तींना जन्म देण्याची क्षमता असणारा भव्योदात्त विषय त्यांनी आपल्या प्रबंधासाठी निवडला आणि त्यावर बाराशे पृष्ठांचा प्रबंध लिहिला. त्या प्रबंधाचा गाभा पुढे 'महाकाव्य : स्वरूप व समीक्षा' या ग्रंथाच्या रूपाने प्रसिद्ध झाला. दुर्दैवाने त्यांच्या या ग्रंथाची व ग्रंथविषयाची मराठी समीक्षेने घ्यावी तेवढी दखल घेतली नाही. मर्ढेकरांच्या काव्यप्रतिभेवर व सौंदर्यमीमांसेवर द. भिं. चे निरतिशय प्रेम होते. कवी व सौंदर्यमीमांसक म्हणून मर्ढेकरांची योग्यता असाधारण असल्यामुळे मर्ढेकरांना व त्यांच्या भूमिकेला झत्तलेला विरोध त्यांना कधीच खपला नाही. विरोधकांना मर्ढेकर उमजलेच नाहीत असे त्यांचे ठाम मत होते. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची पुनःस्थापना करण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या ग्रंथात मर्ढेकरांच्या सर्व टीकाकारांच्या साधार परामर्श त्यांनी घेतला आहे. ज्ञानेश्वरांविषयी ते नेहमीच उमाळ्याने लिहीत आणि बोलत. अभिनव गुप्तांच्या परंपरेतून आलेल्या चिद्विलासवादी विचारधारेचा आपल्या प्रतिपादनातून ते अधिकारवाणीने उलगडा करत. ज्ञानेश्वरांविषयी बोलताना त्यांच्या शब्दांना लडिवाळपणाचा स्पर्श आपोआप घडे. केवळ ज्ञानेश्वरच नाही, तर सर्व संतवाङ्मयाचा त्यांचा व्यासंग होता. चक्रधरांविषयी व तुकारामांविषयी अगदी वेगळ्या प्रकारचे आकलन त्यांनी आपल्या समीक्षेमधून मांडले आहे.

आधुनिक मराठी साहित्यातील 'रगांगण' व जी. ए. कुलकर्णी यांचे कथासाहित्य यांनी द. भिं. ना अक्षरशः भुरळ घातली होती. या दोहोंवर त्यांनी स्वतंत्र दृष्टिकोनांतून लिहिले आहे. या साहित्यकृतींकडे पाहण्याची द. भिं. ची दृष्टी सर्वस्वी स्वतंत्र होती. समीक्षक हा खराखुरा रसिक आणि खराखुरा सहकलावंत असतो, कलावंत व आस्वादक हे दोघे मिळून साहित्यकृतीची संघटना निर्मित असतात असे त्यांचे आग्रही मत होते. अभ्यासविषयी, समीक्षासिद्धांतांविषयी, पांडित्याविषयी आदर असला तरी साहित्यास्वादावर व रसिकतेवर या गोष्टींचे आक्रमण झालेले त्यांना खपत नसे. समीक्षा करताना पांडित्यापेक्षा रसिकता आणि सहसर्जकता त्यांना सदैव महत्त्वाची वाटत आली. 'पहिली परंपरा', 'दुसरी परंपरा' या आपल्या पुस्तकांतून मराठी कवितेचा वेगळा अन्वयार्थ त्यांनी लावला. भा. रा. तांबे यांनी कवितेच्या क्षेत्रात बजावलेल्या कामगिरीचा द. भिं. नी अपूर्व असा परामर्श घेतला आहे. 'विविध विरोधी घटकांचा समन्वय, पुनरुज्जीवनवाद, अभिजातवाद व गीतरचना हे त्यांच्या कवितेतील घटक' लक्षात घेऊन त्यांनी तांबे यांची थोरवी वर्णन केली आहे. केशवसुतांपेक्षाही तांबे यांच्याविषयीचे द. भि. कुलकर्णी यांचे प्रेम त्यांच्या लेखनातून प्रकटले आहे. 'बी' कवींच्या 'चाफा' या कवितेचा मायावादाच्या दिशेने अर्थ लावण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. 'पहिल्यांदा रगांगण' मधील द. भिं. चे लेखनकथा, कादंबरी, नाटक व कविता या साहित्यप्रांतातील महत्त्वाच्या साहित्यकृतींचा अभूतपूर्व आस्वाद आहे. आस्वादक समीक्षा साहित्यकृतीच्या अंतरंगातील सौंदर्याची किती वेगवेगळ्या अंगांनी बोध घडविते त्याचे प्रात्याक्षिक या संग्रहातून वाचकाला पाहवयास मिळते. जीएंजी कथा, एलकुंचवारांची नाटके, पु. शि. रेगे यांची 'सावित्री', अनिलांची कविता यांचा मर्मग्राही वेध घेणाऱ्या लेखांनी द. भि. कुलकर्णी यांच्या साहित्यसमीक्षेचे सामर्थ्य प्रस्थापित केले आहे. नाटक, कादंबरी आणि कथा या तिन्ही साहित्यप्रकारांविषयी त्यांनी स्फुट परंतु सूत्ररूप विचारप्रकटन केले आहे. ते वाचताना त्यांच्या ठिकाणच्या स्वतंत्र प्रज्ञेचा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही. त्यांनी आपली समीक्षा सिद्धांताच्या चौकटीत बंदिस्त केली नाही. साहित्यकृतीच्या प्रकृतीस तत्परतेने प्रतिसाद देण्यात व पुनःपुन्हा तिचा नवा शोध घेण्यात ते सदैव रमले होते. त्यांच्या समीक्षेत परंपरेचे भान आहे, नवतेचे स्वागत आहे., रसिकतेची दृष्टी आहे आणि मर्मग्राही आकलन आहे. त्यांच्या संशोधनपर लेखनातून शोधकला, सूचकता आणि सूक्ष्मता यांचे दर्शन घडे. रा. श्री जोग संपादित मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या चौथ्या खंडात १८७४ पूर्व मराठी निबंधवाङ्मयावर त्यांनी लिहिलेला लेख शोधनिबंधाचा वस्तुपाठ म्हणावा असा आहे.

....पृष्ठ क्र. ४१ वर....

अनुक्रमणिका

आनंद विनायक जातेगावकर : तत्त्ववेत्ता लेखक

गजानन मालोकार

ज्येष्ठ कथालेखक व कादंबरीकार आनंद विनायक जातेगावकर यांचे निधन तसे अचानक नसले तरी मनाला चटका लाऊन जाणारे आहे. 'मुखवटे' (१९७४) नंतर प्रदीर्घ काळ थांबलेला त्यांचा लेखनप्रवास नवीन बहाराने सुरू झाला होता. त्यांच्या अनुभव विश्वाला प्रचंड व्यामिश्रता आली होती. जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी सखोल व व्यापक झाली होती. 'मुखवटे' नंतर त्यांनी तीस वर्षे जवळपास काहीच लिहिले नव्हते. मात्र शेवटच्या दहा वर्षात त्यांची नऊ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. चारेक महिन्यापूर्वी मेंदूच्या कर्करोगाचे निदान झाले. असहय्य शारीरिक वेदना सहन करत त्यांचे निधन झाले व परत एकदा सज्जन व्यक्तीचे सचोटीपूर्ण जीवन व त्याला भोगावे लागणारे दुःखभोग यामधले व्यस्त प्रमाण प्रकर्षाने अधोरेखित झाले.

जातेगांवकराचा स्वभाव अतिशय इंट्रोव्हर्ट मितभाषी, अलिप्त व आत्ममग्न. आपल्याच कोषात सुखावणारा. माणसांचा त्यांना फारसा सोसं नव्हता पण ते माणूसघाणे नव्हते. उलट अतिशय संवेदनशील व टोकाची सामाजिक बांधीलकी सांभाळणारे. त्यांच्यासारखे समाजभान तर विरळाच. त्यांचा मूळ पिंड सखोल चिंतनकाराचा. वाचनाचा झपाटा तर अफाटच, इंग्रजी, ग्रीक साहित्य, संस्कृत, हिंदी, बंगाली व मराठी या भाषांमधील अभिजात कलाकृती त्यांनी वाचलेल्या. नुसतं वाचल्याच नाहीत तर आत्मसात केलेल्या सोफोक्लीज, टॉलस्टाय, डोस्टोव्हस्की हे त्यांचे आवडते. शेक्सपीअर कोळून प्यालेला, शरदचंद्र चटर्जी, प्रेमचंद, रामदास यांचे ते चाहते. तुकाराम पावलोपावली भेटणारा. महाभारतकार व्यासांनी तर त्यांचे अवघे जीवनच व्यापलेले. जातेगावकरांचा मूळपिंड असा समृध्द वाचनपरंपरेवर जोपासलेला. याशिवाय अभिजात पाश्चात्य व भारतीय चित्रपटांची त्यांना अतिशय आवड. या सगळ्यांचे संदर्भ त्यांच्या लिखाणात इतस्ततः विखुरलेले असतात.

जातेगांवकराचा पहिला कथासंग्रह 'मुखवटे' (१९७४) ''मौज'' ने काढला यातील एकूण एक कथा 'सत्यकथे' मध्ये पूर्वप्रसिद्ध झालेली आहे. ह्या संग्रहाला महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक सुध्दा मिळालेले आहे. 'मौज', 'सत्यकथा' हे त्या काळात उत्कृष्ट साहित्याभिरुचीचे समानार्थी शब्द. कथा या वाङमय प्रकाराचा तो सुवर्ण कालखंड कसदार कथालेखनाचे सर्वच निकष पूर्ण करणाऱ्या ह्या कथा. त्यातील 'रान', 'पावलं', 'मुखवटे' ह्या विशेष लक्षात राहणाऱ्या कथा. तरीही त्यांच लेखन थांबलं. त्याची दखल सुधा जोशी यांनी बहुतेक सत्यकथेच्याच अंकात 'थबकलेली लेखणी' या लेखाद्वारे घेतलेली आहे. मध्यमवर्गीय मर्यादित अनुभव विश्वावर आधारित या कथा. कथालेखकाचे अनुभवविश्व संकुचित होऊन त्यांच कथालेखन थांबले असा काहीसा निष्कर्ष या लेखात काढल्याचं आठवते. जी.ए.कुळकर्णी यांनी

सुद्धा 'जातेगांवकराच्या कथा म्हणजे तलम रेशमी धाग्याला पडलेली नाजूकशी गाठ' अशी संभावना केल्याच आठवते. कारणं काहीही असो, प्रसिद्धीच्या प्रचंड वलयात असतांना व लिहीलेला शब्द छापला जाईल याची खात्री असतांना जातेगावकरांनी आपलं लेखन थांबवीले.

ऐंशी पंच्यांऐंशीच्या दरम्यान अकोल्यातील काही तरुणांनी अनवट संहितेच्या सादरीकरणासाठी 'प्रयोग' नावाची नाट्यसंस्था स्थापन केली. जातेगांवकरांनी 'प्रयोग' साठी फ्रांझ काफ्का या जर्मन, अस्तित्ववादी कादंबरीकाराची अजरामर 'द ट्रायल' या कांदबरीचे 'कैफियत' या नावाने सुटसुटीत नाट्यरूपांतर करुन दिले. एककल्ली हुकूमशाही शासन यंत्रणा, न्यायपालिका व पोलीस यंत्रणा सामान्य माणसाचा छळ करून त्याचं स्वातंत्र्य कसं मर्यादित करतात व एकंदरीतच माणसाचं अर्थहीन विसंगत अस्तित्व याचा दाहक अनुभव देणारे ते नाटक. शब्द प्रकाशनने २०११ ला ते 'कैफियत' या नावानेच प्रकाशित केलेले आहे. नंतर 'प्रयोग' ने त्यांच्या 'अग्नीजाळी' या नाटकाचे राज्यनाट्यस्पर्धेत सादरीकरण केले. गांधी हत्या, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद व ब्राह्मणांच्या घरांची जाळपोळ या पार्श्वभूमीवर रोमँटिक प्रेमकथेचा सबप्लॉट. जातेगावकरांनी हे नाटक फाडून टाकलेलं असावं. 'अस्वस्थ वर्तमान' चे बारावे प्रकरण या नाटकाच्या लेखन प्रक्रियेवरच आधारीत आहे. या नाटकाला एक संवाद बऱ्यापैकी लक्षात आहे.

''मूर्खपणाच्या विहिरीला जिवंत झरे उपसणार किती ?
आयुष्याचा तळ दिसतोच कधी ?''

ऐंशीचे दशक पथनाट्य चळवळीचे. जातेगावकरांनी 'अग्नीकुंड' नावाचे संपूर्ण स्त्री पात्र असलेले पथनाट्य लिहिले. विषय एकंदरीतच स्त्री जन्माच्या वाट्याला आलेले दुख:भोग व छळ.

त्यानंतर जातेगांवकर परत आपल्या कोषात गेले. जवळपास २५ वर्षे त्यांची लेखणी थबकलेलीच राहिली. सेवानिवृत्त झाल्यावर व मुंबईला सेटल झाल्यावर मात्र त्यांनी प्रचंड लेखन केले.

'श्रीमंत गोपिकाबाईची बखर' (२००४) ही राजा प्रकाशनाने काढलेली ऐतिहासिक चरित्र कादंबरी बखर शैलीत लिहिलेली. इतिहासात दुर्लक्षित असलेल्या श्रीमंत नानासाहेब पेशव्यांची पत्नी श्रीमंत गोपिकाबाईवर आधारीत.

'ज्याचा त्याचा विठोबा' (२००७) हे तुकारामाच्या निवडक अभंगावरचं मुक्त चिंतन. अभंग फक्त स्टार्टिंग पॉईंट. निरुपण किंवा किर्तन शैली हेतूत: टाळलेली. मुख्य भर तुकारामाचा वर्तमानकाळाशी असलेला रेलेव्हंस शोधण्यावर. जातेगांवकरांच्या सखोल आणि व्यापक चिंतनशैलीची सुरुवात दर्शविणारे पुस्तक, जातेगावकरांचा कल ललित लेखनापासून वैचारिक, गद्याकडे झुकल्याचं दाखविणारं. यावर आधारीत सदाशिव अमरापूरकरांची मुख्य भूमिका असलेले व झेलम परांजपे दिग्दर्शित नृत्यनाट्याचे काही प्रयोग मुंबईला झालेले आहेत. मुळात वैचारिक गद्य असलेल्या या पुस्तकावर कुठल्याही प्रकारचे रंगमंचीय सादरीकरण कठीणच. नंतर जातेगांवकरांच सदाशिव अमरापूरकर सहलेखक असलेलं 'अभिनयाचे प्राथमिक सहा पाठ' (२००९) हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

'व्यासांचा वारसा' (२००९) हे शब्द प्रकाशनाने प्रकाशित केलेले महाभारतावरील पुस्तक म्हणजे जातेगावकरांच्या वैचारिक उंचीचा कळसच. महाभारत हा त्यांचा कायम चिंतनाचा विषय, जणू त्यांच्या रक्तात, श्वासात अगदी बोन मॅरोपर्यंत भिनलेला. महाभारताचा आकलनाचा त्यांचा पैस विलक्षण स्तिमित करणारा आहे. मलाच व्यास समजले असा त्यांचा अविर्भाव नाही. अगदी सुरूवातीलाच त्यांनी महाभारतावरील सर्व चिकित्सांची 'ओल्ड मॅन अँड सी' मधल्या शार्कनी लचके तोडलेल्या महाकाय माशाच्या सांगांड्याशी तुलना केलेली आहे व हा सुध्दा असाच एक लचका आहे हे सहज कबूल केलेले आहे. महाभारताकडे ते व्यासांच्याच अलीप्त व त्रयस्थ नजरेने पाहतात. महाभारतावरील त्यांचे चिंतन मुख्यत: व्यक्तीरेखांच्याच अनुषंगाने येते. परकाया प्रवेश केल्यासारखे ते प्रत्येक पात्राच्या अंतरंगात शिरतात. प्रत्येकाच्या विचार, विकार, कृती, सुप्त हेतू यांचे अत्यंत काटेकोरपणे सायको-ॲनालीसीस करतात. ह्या सगळ्या 'लार्जर दॅन लाईफ' पात्रांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन भाबडा, सश्रध्द तर नाहीच व आपल्याही झापडबंद पध्दतीने पाहू देत नाहीत. त्यांची मुख्य भूमिका प्रतिमा भंजक म्हणूनच येते. यामध्ये कुणी नायक नाही व खलनायकही नाही. कुणी महारथी नाही व देवही नाही. आहेत ती हाडामासाची जिवंत माणसं. परत परत त्याच चुका करणारी, आपल्या मूळ स्वभावाशी सुसंगत वागणारी व 'कॅरेक्टर डज डेस्टीनी' हे परत परत सिध्द करणारी. जातेगांवकर त्यांच्या रत्नखचित व सुवर्णमंडीत वस्त्रालंकारामागील मातीचे कुरूप पाय उघडे करतात. जातेगांवकरांची वाङमयीन अभिरुची इंग्रजी साहित्य व समीक्षेवर पोसलेली. मग किंग लिअर, ओडीपस, ऑफेलीया यांच्यासोबत तुलना सहज येत राहतात. मुख्य सुत्र आधुनिक जगण्याशी रेलेव्हंस शोधणारं. तेव्हा खांडववन दहनाची तुलना

ज्युंच्या हत्याकांडाशी होणे अपरिहार्यच. पात्रांच्या विश्लेषणासोबतच इतर अनुषंगीक विषयही तेवढ्याच ठळकपणे येतात. गीते मधील संधिसाधू दैववादाचं वस्तुनिष्ठ स्पष्टीकरण आपल्या गीतेवरच्या भाबड्या श्रध्देची लक्तर काढतं. श्रीकृष्णाला अवताराच्या देव्हाऱ्यात बसवल्यामुळे मूळ महाभारताच्या ललित व साहित्यिक मूल्यांचं झालेलं नुकसान ते अधोरेखित करतात. स्वहितदक्ष ब्रह्मवर्गाने स्वार्थीपणाने लावलेली ठिगळे ओरबाडुन काढतांना त्यांच्या शैलीला बऱ्यापैकी मिस्कील उपहासपूर्ण धार येते.

''हल्ली आईबहिणीवरून शिवी देण्याऐवजी लोक एखाद्याला

मनुवादी का म्हणतात ते अशावेळी उलगडतं आपल्याला''

शेवटी व्यासांचा वारसा विशद करतांना ते म्हणतात ''सर्वसमावेशक स्वीकारातून जीवनाबद्दलची जाण सखोल करत नेणं व्यासांना एवढंच सांगावयाचं आहे की काय न कळे?'' व्यासांचा वारसा, या मातीचं संचित त्यांना आपल्या प्राचीन सहिष्णुतेमध्ये सापडते व हा वारसा फक्त भक्ती संप्रदायानेच पुढे नेलेला आढळतो. 'व्यासांचा वारसा' हे त्यांच्या व्रतस्थ साहित्य तपश्चर्येचं फलीत. प्रत्येक सुजाण वाचकाने आपल्या पदरी बाळगावं असं.

'अस्वस्थ वर्तमान' (२००३) हे सुद्धा शब्द प्रकाशननेच काढलेले पुस्तक. या पुस्तकाचा नेमका आकृतिबंध ठरविणे कठीण. फॅक्ट आणि फॅंटसीच्या सीमारेषा धुसर झालेल्या. दोन समांतर रूळ दूर धुक्यात विरघळून जावेत तसे. रेस्टोरेशन काळातील सामाजिक लघुनिबंधकार जोसेफ ॲडीसन व रिचर्ड स्टिल यांनी एक 'स्पेक्टॉटर' नावाचं काल्पनिक पात्र निर्माण करून आपले सकल सामाजिक चिंतनपर विचार त्या मानसपुत्राच्या माध्यमातून व्यक्त केले. तसेच काहीसें 'अस्वस्थ वर्तमान' मध्ये दिसते. या चिंतनशील गद्याचा निवेदक आहे. अशोक नारायण गोरे. हा निवेदक म्हणजे जातेगावकरांचे काही अंशी सेल्फ पोर्टेट. इंग्रजी लघुनिबंधाचा जनक फ्रांन्सीस बेकन आपल्या लघुनिबंध मालिकेला 'डिसपर्सड् मेडीटेशन्स' म्हणतो. या पुस्तकातील सर्व विचार, सर्व निरीक्षणे म्हणजे अशोक नारायण गोऱ्यांची 'डिसपर्सड् मेडीटेशन्स' मुक्त चिंतन. या 'मेडीटेशन्स' मध्ये चैत्यभूमीवरची निळी गर्दी आहे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. महात्मा गौतम बुद्ध आहे व जातक कथा आहेत. मिर्झा गालीब आहे व प्रेमचंदही आहेत. शाहू छत्रपती व लोकमान्य टिळक आहेत. बहादूरशहा जफर आहे व झाशीची राणी आहे. पाश्चात्य तसेच भारतीय अभिजात चित्रपट आहेत. डोस्टोव्हस्की आहे व स्वत: लिहिलेलं व नंतर फाडून टाकलेलं नाटकही(अग्नीजाळी) आहे. आणि आहे जीवघेणी घुसमट व प्रचंड अस्वस्थता. जातेगांवकर आपलीच जाणीव व नेणीव जणु काही शरीराबाहेर काढतात व चहुबाजूंनी निरखून पाहतात. नुसतं निरखूनच पाहत नाहीत तर आत्मटीकेच्या तप्त तव्यावर उलटपालट करतात. हे मुक्त चिंतन म्हणजे त्यांच्या आजपर्यंतच्या जीवननिष्ठा, चिंतनगर्भता, संवेदनशीलता, डोळस निरीक्षण व सजग आकलन या सगळ्यांच सोलीव सत्व. या चिंतनपर ललित गद्यातील मुख्य सूर हा परत मूर्तीभंजकाचाच आहे. वर्षानुवर्ष जोपासलेल्या श्रद्धा, मनात सजवलेले देव्हारे यांचे वस्त्रहरण करतांना ते जराही संकोचत नाहीत. ही सर्व आत्मपरीक्षणं हॅम्लेटच्या जातकुळीची. प्रत्येक संवेदनशील, समाजभान व आत्मभान जिवंत ठेवू पाहणाऱ्या रसिकाने आपल्या संग्रही ठेवावे असे हे पुस्तक.

'डॉ. मयंक अर्णव' (२०१५) ही सुद्धा शब्द प्रकाशनचीच निर्मिती. व्यासांसारखाच शेक्सपिअर सुद्धा जातेगावकरांच्या नसानसात भिनलेला. 'डॉ. मयंक अर्णव' ही कादंबरी शेक्सपिअरच्या एखाद्या शोकान्त नाटकासारखी बांधलेली वाटते. 'ऑथेल्लो', 'मॅकबेथ' प्रमाणे मूळबीज थोडेसे बटबटीत. हिंसा, क्रौर्य, रक्तपात यावर आधारीत. कुठल्यातरी तत्कालीन सोर्समधून घेतलेले. पण त्यातून निर्माण होणारे शब्दशिल्प मात्र एखाद्या आदिम गुहेसारखे विस्मयकारी व भयकारी. उच्चभ्रू डॉक्टर पतीपत्नी डॉ. मयंक व डॉ. शर्मिष्ठा आपल्या एकुलत्या एका मुलीचा कोल्ड ब्लडेड मर्डर करतात, या मुख्य कथाबीजावर आधारीत. परंतु कादंबरी मानवी मानसिकतेमधील हिंसा व लैंगीकता या मूळ आदीबंधाचे अनेक पापुद्रे डलगडत पुढे जात राहते. डॉ. मयंक व डॉ. शर्मिष्ठा, मॅक्बेथ व लेडी मॅक्बेथ मध्ये केव्हा विरघळून जातात हे कळतसुद्धा नाही. अगदी रक्ताचा वास कितीही धुऊन न मिटणारा तसाच. वेगवेगळ्या वेळी घेतलेला सॉलोलकीजचा आधारसुद्धा तसाच. डॉ. मयंकच्या पात्रात डोस्कोव्हस्कीचा अपराधभावग्रस्त रास्कलनिकोव सुद्धा हळू हळू डोकाऊ लागतो. डॉ. शर्मिष्ठा मात्र 'ऑथेल्लो' मधल्या इयाहोसारखी निगरगट्ट शेवटपर्यंत तिला अपराधभाव जाणवत नाही. तथाकथीत उच्चभ्रू समाजाच्या भावजीवनातील विकल, भकासपणाचं भयावह दर्शन ही शोकांतिका घडविते. नटसम्राट प्रमाणे ही कादंबरी म्हणजे शेक्सपिअरच्या मॅक्बेथचं स्वतंत्र रिक्रीएशन वाटते.

'मी मी उर्फ सेल्फी' (२०१५, शब्द प्रकाशन) हे देशाच्या फाळणीवरचं पुस्तक गांधी, नेहरु, पटेल वगैरे राजकारणाचे अंडरकरंट तर आहेतच. पण इथे लेखकाची कणव वैश्विक होते. धर्म, देश या सीमारेषांच्या वर जाऊन या भगभगत्या जखमेकडे स्त्रीत्वाच्या संवेदनेने पाहिल्या गेलेले आहे. वर्णनं पिळवटून काढणारी. परंतु भाषा अतिशय परखड. कुठलीही भिडमूर्वत न ठेवणारी.

रोमँटिक कवी कोलरीज आपल्या एका कवितेमध्ये आपली कल्पनाशक्ती व प्रतिभाशक्ती आटली आणि निरस व कोरडे वैचारिक लेखन करणे नशिबी राहिले, म्हणून शोक व्यक्त करतांना दिसतो. जातेगावकरांचा मात्र अगदी उलट प्रकार. कल्पनेवर आधारीत कथा, कादंबरी या साहित्य प्रकारापासून ते वैचारिक गद्याकडे वळलेले दिसतात. मनोरंजनावर भर असणाऱ्या ललित लेखनातील उणिवा व मर्यादांची त्यांना जाणीव झाली असेल किंवा तत्त्व चिंतनात्मक प्रगल्भता त्यांच्या मूळ पिंडाला मानवत असेल. त्याचा लेखन प्रवास मात्र वैचारिक साहित्याकडे वळलेला दिसतो.

प्राचीन व ग्रीक तत्त्ववेत्यांमध्ये 'सोफीस्ट' नावाचा पंथ होता. सॉक्रटीस हा सोफीस्टच होता. कुठल्याही एका वैचारिक बांधिलकीची गुलामगिरी न मानणारा हा पंथ. त्यांच्या मते प्रवाही जीवनाला एकाच स्टॅटीक विचारांच्या शृंखला बांधता येत नाहीत. आपले जीवनविषयक आकलन कायम बदलत असते व बदलत्या आकलनानुसार आपले विचारसुद्धा कालसुसंगत बदलायला हवेत. ठाम विचार म्हणजे चैतन्यमय जीवनप्रवाहाला बाधीत करणारा महाकाय शिलाखंड. आनंद विनायक जातेगांवकर हे सुद्धा आधुनिक सोफीस्टच. सगळ्या जीवनानुभवांकडे अलिप्तपणे पण उघड्या डोळ्यांनी पाहणे व वास्तवेतेचा सहज स्वीकार ही त्यांची मुख्य स्वभाववैशिष्ट्ये. साहित्यजीवन असो की समाजजीवन, त्यांची भूमिका एखाद्या व्रतस्थ साधकाचीच राहिली. लेखनाची सेकंड इर्नींग ऐन भरात आली असतांना त्यांचा प्रवास थांबणे हे मराठी सारस्वताचे न भरून येणारे नुकसान आहे.

। गजानन मालोकार
'पैस', मदर टेरेसा कॉन्व्हेंट जवळ,
द्वारका नगरी, अकोला - ४४४ ००१
भ्रमणभाष : ९९६०४०२४२८

....पृष्ठ क्र. ३७ वरून....

सौंदर्यग्राही समीक्षेचे उद्‌गाते

कालौघात नागपुरात द. भिं. विषयी मतमतांतरे उत्पन्न झाली. काही प्रमाणात त्यांच्या विरोधी वातावरणही निर्माण झाले आणि त्यांनी नागपूर सोडून कायमच्या निवासासाठी पुण्याला यावयाचा निर्णय घेतला. तो फारच फलदायी ठरला, द. भिं. साठी व पुणेकरांसाठीही! गेल्या दशकभरात पुण्यात त्यांचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाला. नवनवे लेखक, प्रकाशक त्यांना भेटू लागले. अरुण जाखडे यांनी त्यांची जुनी, नवी पुस्तके प्रकाशित केली. महाराष्ट्र साहित्य परिषदेशी त्याचे हार्दिक संबंध निर्माण झाले. मोठमोठे वाङ्मयीन परिसंवाद व चर्चा आणि लहान लहान गटांतले साहित्यविषयक उपक्रम त्यांच्या उपस्थितीविना पार पडेनात. त्यांची अस्खलित काव्यशास्त्रप्रचुर वक्तृत्वशैली आणि त्यांची प्रेरणादायी ऊर्जा सर्वांना हवीहवीशी वाटू लागली. या सर्वांवर कळस चढला तो त्यांना लाभलेल्या पुणे येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदामुळे. अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल भाषण त्यांच्या आवडत्या अलौकिकतावादी परिभाषेत प्राधान्याने समीक्षाविषयक अभिप्राय व्यक्त करणारे होते.

या वर्षीच्या संमेलनप्रसंगी प्रकृती तितकीशी बरी नसतानाही ते उपस्थित राहिले ते मूलतः कर्तव्यभावनेने. तेथूनच त्यांना हॉस्पीटलात न्यावे लागले आणि २७ जानेवारी रोजी वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षी (जन्म : २५ जुलै १९३४) त्यांचे देहवसान झाले. त्यांना आणखी काही वर्षे आयुष्य लाभते तर त्यांच्या साहित्यचर्चेने विस्तारलेली 'समीक्षेची क्षितीजे' साहित्यरसिकांना आणखी काही काळ खुणावत राहिली असती, परंतु तसा योग नव्हता हेच खरे!

(लेखकाच्या परवानगीने व 'लोकसत्ता'च्या सौजन्याने पुनर्मुद्रित)

। डॉ. विलास खोले
'गीतवसंत', प्लॉट नं. ३७,
स्वेदगंगा हाऊसिंग सोसायटी,
वारजे, पुणे - ४११ ०५८
दुरभाष : ०२०-२५२३४६४२

तीन कविता

वसंत वाहोकार

तरीही प्रश्न

प्रश्नांची उत्तरं मागणं, अपेक्षित नाही
खरं तर प्रश्नच यायला नकोत.
सारं काही जागेवर ठाकठीक असताना
अजून काय हवं आहे तुम्हाला यापेक्षा?
गाणं म्हणता ना वेळीअवेळी घरात दारात. शीळही वाजवता.
कविता लिहिता, त्यासाठी वेगळा काही कर देता का सरकारला?
नाचता धूम मंदिरात, चौकात स्टेजवर कुठेही... कसेही...
तलवारी-भाले उपसून... घोडे नाचवता भर रहदारीतून...
तिन्ही त्रिकाळ भोंगे आवाजी प्रदूषण करीत असतात.
भोळ्या भाबड्या वस्त्यांवर... भजन... किर्तन... प्रार्थना... असे, जमेल.
त्या कोणत्याही भूलविणाऱ्या-गुंगविणाऱ्या धर्मभोळ्या-रसायनांचे
शाळेत जातात तुमची पोरसोरं टू व्हीलर फोर व्हीलर्स मधून
आणि बायका पर्स लटकावून मॉलमध्ये दुपार-दुपारभर
संध्याकाळ घालवता छान मित्रांमध्ये
मिणमिणत्या धुंद उजेडात... मुक्तछंदात. भाषा बोलता पेटवण्याची
तरीही प्रश्न विचारता...
प्रश्न येतातच कुठून डोक्यात?
मेहरबानी करा, मायबापहो!
प्रश्न विचारू नका
आणि मनातही येऊ देऊ नका. प्रश्नांचे...
त्यानं हरवते झोप.
बिघडते पचन.
थांबते उद्दीपन.
आणि इतरही
बरेच काही, सांगण्या न सांगण्यासारखेही.
लक्षात घ्या. जागेवर आहे सारे ठाकठीक आहे.
उद्याही असेल
परवाही...
हे आश्वासन पुरेसं नाही का? मग तरीही प्रश्न..
आश्वासनांची भाषा कळत नाही की काय तुम्हाला?

चार शब्द

आदेश येतो वरून
लिहा कविता.
अशी अशी.
आणि लागतात कामाला
सांगकामे
बुद्धिवंत उठाबशी
त्यांना जमते
कागदावर सहज दिवाळी
रंग असतात ठेवणीतले
मग हाणतात होळी
मेहरबान असतात स्वप्नांतही त्यांच्या
कामचलावू ओळी

ओवी असो असो अभंग
भारुड असो वा लावणी
यांना सारेच असते वश
पोवाडा वा बतावणी

हिशेब असतो चोख
आणि व्यवहार रोख
यांच्या कवितेत उजळून निघतो
पडक्या विहिरीतला काळोख

पुसलेलं कुंकू असो
वा टिचेलेला चूडा
सगळ्यांसाठीच दुभंगते यांचे काळीज
आणि आतड्यांना
सतत तडा


जीव जाळतात
आदेश पाळतात
प्रतिभावंत ते
त्यांना दहादिशा ओवाळतात

आपण आपले पाहात जावे
गाणे मात्र आपलेच गावे
रोजचे गाणे गाता गाता
चार शब्द त्यांना द्यावे.

अनुक्रमणिका

रिकामे दिवस

रिकामे दिवस येतात एखाद्या आजारपणासारखे थेट आपल्या खोलीत
आपली पुस्तकं आळसावून नुसतीच पडलेली असतात इकडे तिकडे.
रिकाम्या... समारंभ उलटून गेलेल्या घरासारखी... सामानाएवढी अस्ताव्यस्त
त्यांच्यातलं येत नाही कोणही आपली विचारपूस करायला.
कागद नुसतेच इस्त्रीचे कपडे घालून मिरवत असतात इकडून तिकडे.
पेनांना काही सांगायला जावं तर त्यांचे आपले वेगळेच
दीर्घ रजेचा पिवळा अर्जच नाचवत येतात आपल्यासमोर.
लग्नघडीची वाट पाहणाऱ्या उतावीळ नवऱ्यासारखे कितीतरी
घटका पळं नाचवीत असतात रंगीत भिंगऱ्या अवतीभोवती.
पण सजलेला घोडा भरधाव धावत जातो आपल्या समोरून
बाजूच्या गल्लीतल्या नवरदेवासाठी... लग्न सोहळ्यासाठी, मुहूर्तावरच्या.
हवी असलेली कविता दिसतच नाही समोर, समोरासमोर
ती तर मैत्रिणींच्या घोळक्यात. चेष्टामस्करीत कारंजं होवून उसळणारी.
असा जीव खालीवर वरखाली होत राहतो.
आणि रिकाम्या दिवसांची फुलपाखरं नुसतीच उडत असतात
या बोगतून त्या बागेत
नाहीतर उनाड रस्त्यांवर तरी.
रिकाम्या दिवसात काय करावे ?
या प्रश्नाचा गळफास घ्यावा गळ्यात
आणि...
दिवे मालवून टाकावेत खोलीतले-घरातले.
मग खिडकीशेजारी टेकलेला हिरव्या पानगर्दीतून उसळी घेणारा
पांढराशुभ्र घमघमता चाफा... जुन्या मित्रासारखा येईल भेटीला.
विचारेल नेहमीसारखा तोच प्रश्न 'कविता लिहीतोस की नाही रे अजून, आता ?'
चहा पिताना गरम घोटानं भाजून जावी जीभ, घसा
तसा हा प्रश्न भाजून काढतो पुन्हा एकदा त्यांचे आपले असणे.
आणि सतत सततच्या रिकाम्या दिवसांमध्ये
आपल्यासहित कोणत्याही आडव्या उभ्या कवितेचे कुठेही नसणे.



। वसंत वाहोकार
जानकी अपार्टमेंटस्,
२६, गजानननगर, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०१५
भ्रमणभाष : ८००७७३१५०५

अनुक्रमणिका



तीन कविता

बालाजी मदन इंगळे

मिडीया

चकार शब्द न बोलता
रात्रंदिवस राबत राहणारा
प्रत्येकपण
आता बोललो आहे हळूहळू
आपलं दुखणं मांडतो आहे जमेल तसं

कुणी योग्य भाव न मिळाल्याबद्दल
कुणी न उगवलेल्या बियांणाबद्दल
कुणी न पोचलेल्या योजनांबद्दल
कुणी खताच्या किमतीबद्दल
कुणी लपंडाव खेळणाऱ्या विजेबद्दल
कुणी सावकाराबद्दल
कुणी बँकेबद्दल...

पण प्रत्येकजण बोलतो आहे
आपापल्या बांधावरून
जिथं कोणताही मिडीया
कधीच पोहोचत नाही...!


पावसा, माझ्या कवितांना चांगले दिवस येऊ देऊ नकोस...

तू येत नाहीस
तेव्हा उडते तारांबळ सगळीकडेच
लागतो टांगणीला जीव सगळ्यांचाच
वेळेवर होत नाही पेरणी
झाली तरी वाढत नाहीत कोवळे कोंभ
करू शकत नाही कोणी दुबार पेरणी
मग करायचे काय ?
कर्ज
उसने-पासने
सावकारी
बँका
सगळेच मार्ग खुंटलेले
नसतो पर्याय पुन्हा शेतात घातल्याशिवाय
पण हातात तर काहीच नाही
घर तर चालवावेच लागते
पोरांची शाळा
अँडमिशन
वह्या
कपडे-लत्ते
सण-वार
सोयरा-धायरा
काहीच चुकवता येत नाही
जगवावीच लागतात काही करून मुकी जनावरं
पण समोर नसतो एकही मार्ग
सापडला नाही कुठलाच रस्ता
की कामाला येते तूरीसाठी आणून ठेवलेले औषध
किंवा धावून येतो बैलांचा कासरा...

हे सगळे पाहतो मी उघड्या डोळ्यांनी
काळीज चिरत जातं हे जळजळीत वास्तव
मग चिरलेल्या काळजाला सांधते कविता
त्या कविता भावतात रसिकांना

पण
तुला कळकळीची विनंती आहे
पावसा, माझ्या कवितांना
चांगले दिवस येऊ देऊ नकोस...

अनुक्रमणिका



फोटो काढायची हिंमत झाली नाही...

हातात स्मार्ट फोन
स्मार्ट फोनला १३ mp कॅमेरा
म्हणून कुठंही गेलं की
काढ फोटो आणि कर पोस्ट
काढ फोटो आणि कर पोस्ट...
फेसबुक असो वा कुठंलही मेसेंजर
एखादा फोटो तर टाकलाच पाहिजे


उद्या येळवस
शेतात जायचं
पिकाचा,
पूजेचा,
पोरं रानात उड्या मारल्याचा
मस्त फोटो काढायचा
त्याला साजेशा दोन ओळी टाकायच्या
असं ठरवूनच
आज शेताकडे आलो

भेगाळलेली जमीन
खुरटलेली, जळलेली तूर
सुकलेला हरभरा
कोरडी विहीर
भकास शिवार
आणि
शेजारच्या गावात
शेतकऱ्याने केलेल्या
आत्महत्येचं सुन्न वातावरण
पाहून
जेवण गेलं नाही
कुणाशी नीट बोलावंही वाटलं नाही...

मग
पांडवाची, साती आसराची
लक्ष्मीची, म्हसोबाची
आज्याच्या समाधीची पूजा करताना
या परिस्थितीतून बाहेर काढ बाबा
अशी मागणी घातली
आणि
चितागती बसून राहिलो दिवसभर पांडवापुढं
आख्ख्या दिवसभरात
एकही फोटो काढायची हिंमत झाली नाही...
एकही फोटो काढायची
हिंमत झाली नाही...

। बालाजी मदन इंगळे
इंद्रायणी नगर, डिग्गी रस्ता,
उमरगा, ता. उमरगा,
जि. उस्मानाबाद - ४१३ ६०६
भ्रमणभाष :

अनुक्रमणिका



चार कविता

प्रशांत असनारे

गिरकी

रंगमंचावर
स्पॉटलाईटच्या प्रखर प्रकाशात
ती कधीची नाचतेय
बेधुंद होऊन.

हॉलमधल्या अंधारात
आम्ही खुर्च्यांशी जखडलेलो
कधीचे न्याहाळतोय
नाचतांना
गिरकी घेतांना
तिची उघडी पडणारी गोरीपान मांडी

पडदा पडतो
ती तृप्त
घरी जाते
आनंदानं गिरकी घेत घेत

आम्हीही तृप्त
घरी जातो
गिरकी घेत घेत
गिरकीतली गोरी मांडी घेत घेत...।

दंगल


गावात वेगानं पेटलेली दंगल
हळूहळू विझली

आता गावातल्या गल्लीबोळात
रक्ताच्या थारोळ्यात
अस्त्यावस्त पडली आहेत माणसं;
इथेही
आणि तिथेही.

गावातल्या गल्लीबोळात
रक्ताच्या थारोळ्यात
अस्त्यावस्त पडली आहेत शस्त्रं;
इथेही
आणि तिथेही.

एवढं मात्र नक्की
की आता गावात
कोणत्याही परिस्थितीत
रक्तानं माखलेली माणसं
पुन्हा उठून उभी राहणार नाहीत
पण
रक्ताची चटक लागलेली लाल शस्त्रं मात्र
दिवसागणित होत जाणार आहेत
अधिकच तीक्ष्ण
धारदार
आणि टोकदार !

अनुक्रमणिका



प्रतिबिंब

पिंजऱ्यातला तो पक्षी जगतोय
पिंजऱ्याच्या आकाराएवढं आकाश
अन् झेलतोय
पिंजऱ्याच्या आकारा एवढा प्रकाश.

मी पिंजऱ्याचं दार उघडं ठेवतो
तरीही तो येत नाही बाहेर.

तो पिंजऱ्यातच मजेत खातो, पितो
पिंजऱ्यातच येरझारा घालतो
अन् अधून मधून वाजवतो शिट्टी
मजेत असल्याची ग्वाही देत.

त्याला अजिबात नकोय अथांग आकाश
किंवा त्याला मुळीच नकोय सर्वदूर
पसरलेला प्रकाश

तो मोजत मोजत जगतोय
पिंजऱ्याचा एक एक गज
आयुष्य म्हणून.

मी कुतूहलाने पक्ष्याकडे पाहतो
तर त्याच्या डोळ्यात
मला खोलवर दिसतं
माझंच स्पष्ट प्रतिबिंब.

शीळ

झाडाखाली उभं राहून
ते शोध घेताहेत
झाडावर बसून शीळ घालणाऱ्या
अनोळखी पक्षाचा;
जो त्यांना खालून दिसतंच नाहीये.

मग ते झाडावर चढतात
तपासून पाहतात झाडाची प्रत्येक फांदी
डोकावून बघतात पानात... फुलात
पण त्यांना कुठेच दिसत नाही
झाडावर बसून शीळ घालणारा
तो अनोळखी पक्षी.

हळूहळू ते झाडाच्या शेंड्यापर्यंत जाऊन पोहचतात
जिथून त्यांना दिसते सगळं शहर...
नदी... माणसं...
फक्त दिसत नाही
झाडावर बसून शीळ घालणारा
तो अनोळखी पक्षी.

शेवटी ते हाताश होतात
निराश होतात
उदास होतात
अन् उतरून निघतात घराकडे;
अनिच्छेनेच.

त्यांना कोणी सांगत का नाही
की पक्षांसोबत राहून राहून
झाडंही आता शीळ वाजवायला शिकली आहेत म्हणून!

। प्रशांत असनारे
'अभिनंदन'
मुकजी बंगल्याजवळ,
राऊतवाडी, अकोला.
भ्रमणभाष / ९७६३७१४३०४

|| कथा ||

वाळवंटातील हिरवळ

डॉ. पद्मरेखा धनकर-वानखेडे

अमित प्रचंड आवेगाने चालतोय. अरुंद गल्ली. दोन्हीकडे उंच उंच माड्या. माणसांची गर्दी. दारुचे उग्र भपकारे. माणसं किती आनंदात. उन्मादात! प्रत्येक घराच्या पायरीवर, दारात, खिडकीत स्त्रीदेहाचं उत्तान दर्शन. घराच्या बाहेर, आडोशाला कंडोमची फुगे फुगवून मातीत खेळणारी शेंबडी पोरं. माणसांना पटवणारे दलाल, दुर्गंधीला दाबणारे घराघरातून बाहेर ओसंडत येणारे अत्तराचे उग्र दर्प. अमित चालतोय आवेगात, शरीर तापलंय, प्रचंड भूक, सतत मागणं मागतंय, अमित चालतोय... "ऐ साहब कैसा माल मांगता." एक दलाल अडवतो. अमित आपल्या तंद्रीत. शरीराला लागलीय प्रचंड भूक. काही कळत नाहीय पुन्हा शब्द कानावर आदळतात. "अपनेपास हर प्रकार का माल है साब, देसी विदेसी क्या मांगता बोलो." अमित भानावर येतो. कुठे आलो आपण. नजर भिरभिरते. खिडक्यांमधून अनेक डोळे रोखून पाहताहेत. कुणाच्या डोळ्यात लालसा, कुणाच्या डोळ्यात श्रीमंत होण्याची स्वप्न, कुणाच्या डोळ्यात आर्जव तर कुणाच्या डोळ्यात आक्रोश. अमित गोठलेला... कानावर शब्द आदळताहेत... अचानक गरगरायला लागलंय... उलटी होणार बहुतेक... त्याच आवेगात अमित परत फिरतो. भरभर पावलं उचलतो. जवळ जवळ धावतच बाहेर पडतो गल्लीच्या. मुख्य रस्ता. वाहनं. माणसांची प्रचंड गर्दी. अमित चालतोय. रेल्वेस्टेशन केव्हा आलं. कळलंही नाही. पुन्हा माणसांचे लोंढे. प्लॅटफॉर्मवर संथ शिरणाऱ्या गाड्या. वेगात धावणारे हमाल. ओरडणारे फेरीवाले. गाड्यांची अनाऊजमेंट. एका प्रचंड गर्दीच्या रेट्यात लोकलमध्ये प्रवेश कशीबशी जागाही मिळालीय. अमितला जरा बरं वाटतंय.

काय करत होतो आपण! आपले पाय कसे वळले तिकडे। शरीराची भूक इतकी मोठी असते! ती ऐकत नाही कुणाचंही. संस्कारांना मानत नाही. लाचार करते माणसाला कधीकधी. पण आपण असे कसे वागलो! आई-बाबांचे संस्कार विसरलो काय आपण. उत्तमोत्तम तत्त्व रुजविलेत त्यांनी आपल्यात मग कसे वळलेत आपले पाय त्या मार्गावर. काही का असेना. शरीर मात करू पाहतंय मनावर आणि संस्कारावर. असं वाटतंय पुरे झाली मुंबई. परतावं आपल्या गावी पण आपलाच तर अट्टहास होता. खूप शिकण्याचा. इंजिनिअर होण्याचं स्वप्न आपणच बघितलं आणि आई-बाबांनी किती कष्टानं पूर्ण केलं. पण... पुढे काय? अठराव्या वर्षी नागपूर इंजिनिअरींग कॉलेजला ॲडमिशन घेतली आणि सुटलं गाव. डोळ्यासमोर एकच ध्येय इंजिनिअर व्हायचंय. आई-बाबा खपताहेत. आपण प्रचंड अभ्यास करतोय. पंचविसाव्या वर्षी झालं स्वप्न पूर्ण. वाटलं आता आनंदाचे दिवस येणार. खूप कमावणार. आई-बाबांना खूप सुख देणार पण इतकं सोपं असतं का सगळं? पंचविसाव्या वर्षी उत्तम नोकरी मिळावी म्हणून गाठली मुंबई आणि हरवूनच गेलो मुंबईत. नोकरीसाठी काही कोर्सेस केले पण... नोकरी...

गेल्या सात आठ वर्षात किती कंपन्या ... किती इंटरव्ह्यू ... किती नकार...

***

'महेंद्रा ॲन्ड महेंद्रा' च्या भव्य आलिशान ऑफिसमधून अमित बाहेर पडला. प्रचंड उद्वेग. डोकं भणभणतंय. अजून किती नकार ऐकायचेत? यावेळेस किती आशा लावली होती आपण? वाटलं होतं इंटरव्ह्यू चांगला झालाय. नोकरी नक्की पदरात पडेल. पण ओंजळ पुन्हा रिकामीच. ही कितवी कंपनी? कितवा इंटरव्ह्यू? आठवतही नाही. सालं शिक्षणाचा काही फायदा नाही. शिक्षणासोबत वशिलाही हवा असतो. नुसते इंटरव्ह्यू देतोय. अजून किती नकार ऐकायचे. आई-बाबांना तोंड दाखवायची लाज वाटते. एवढा घोडा झालोय पण अजूनही त्यांच्याच पैशावर जगतोय. नाही म्हणायला दोन चार ट्यूशन घेतोय. पण त्याने धड किरायाही निघत नाही रूमचा. मुंबईत ठिय्या देऊन बसलोय. पण हाती काहीच लागत नाहीय. रात्री आईला फोनवर काय सांगायचं! प्रत्येक वेळेस आशा लावून बसते ती. सामान्य माणसाची स्वप्न पूर्ण होणार नसतील तर त्याला स्वप्न पाहण्याचा अधिकारच नाही. नको आता ही पायपीट सगळं संपवून टाकावं... की जावं परत गावाला. पण पराभूताचं जीणं जगता येईल काय आपल्याला? त्यापेक्षा या न संपणाऱ्या प्रतीक्षेचाच अंत केला तर...

रेल्वेस्टेशन केव्हा आलं कळलंच नाही. पुन्हा माणसांचे तेच लोंढे. प्लॅटफॉर्मवर संथ शिरणाऱ्या गाड्या. वेगात धावणारे हमाल. ओरडणारे फेरीवाले. गाड्यांची अनाऊजमेंट. चिक्कार गर्दी आणि गर्मी. अंग घामानं निथळतंय. समोरची गाडी सुटली की घ्यावी का धाडकन उडी. संपवावं सर्व... पण सारिका... पोहचली असेल रूमवर. वाट बघत असेल आपली... गेल्या वर्षभरापासून तिचाच एक आधार. वाळवंटातली हिरवळ. गर्दीच्या एका प्रचंड रेट्यासरशी लोकलमध्ये प्रवेश.

रूमच्या बाहेर सारिकाला बघून बरं वाटतंय, ''बऱ्याच वेळाची वाट बघतेय काय?''

''नाही रे आत्ताच आलेय बघ.'' आपली पराभूत नजर मिळवावी वाटत नाहीय हिच्या नजरेला.

दार उघडून दोघं आत आली. ती शोधतेय. त्याच्या चेहऱ्यावर दिसतंय का समाधान. तो उदास? त्याची पराभूत नजर. काय समजायचं समजली ती. समोरच्या खुर्चीत जवळजवळ कोसळतोच तो,

''हे रे काय अमित, असं वेड्यासारखं करतोय.''

''सारिका आता सहन होत नाहीत हे पराभव. रात्री आईला फोनवर काय सांगू. मी इंजिनिअर होण्याचं स्वप्न त्यांनीही बघितलं आणि मीही. मध्यमवर्गीय लोकांना असली स्वप्न झेपणारी नसतात. मला त्यांच्या कष्टांची जाणीव आहे. आता त्यांना सुख देण्याची माझी वेळ. पण काय करतोय मी? नुसता वणवणतोय नोकरीसाठी. नकोसं झालंय. संपवून टाकावसं वाटतंय स्वतःला''

''असं म्हणू नकोस रे मी कुणाकडे बघू.''

तिच्या हाताचा स्पर्श दिलासा देणारा. ही सुद्धा काय करतेय आपल्यापेक्षा वेगळं. करिअरचं स्वप्न घेऊन हीपण आलीय मुंबईला. गेल्या तीन वर्षापासून वणवण भटकतेय. किती इंटरव्ह्यू किती नकार. आज हिचाही इंटरव्ह्यू होता.

''तुझ्या इंटरव्ह्यूचे काय झाले सारिका?''

तिचे डोळे गच्च भरले, त्यालाही दाटून आलंय. तिचं डोकं मांडीवर घेऊन हलकेच थोपटत राहतो तो तिला. बाहेर अंधार. बाहेरचा अंधार आत खोलीभर पसरतोय आणि मनातला अंधार अधिक गडद होतोय.

''अमित, मला निघायला हवं अंधार झाला बघ.''

''ऐ थांब ना थोडावेळ झक्कास चहा करू या.''

''हो रे खरंच चहा हवासा वाटतोय. तू बस जरा मीच ठेवते चहा.''

खोलीतच एका बाजूला असलेल्या ओट्यावर सारिका कब्जा घेते. अमित पण मदतीला.

आज सारिका फारच सुंदर दिसतेय. हा निळा जिन्स आणि लेमन टॉप हिला फारच शोभून दिसतोय. ही आपल्या आयुष्यात आली नसती तर किती एकाकी झालो असतो आपण. मुंबईला येऊन करिअरसाठी केवढा आटापीटा करतेय ही. हीपण थकत असणार, एकाकी होत असणार, सततचे इंटरव्ह्यू सततचे नकार पचवता पचवता जेरीस येत असणार.

अमितच्या हातांनी नकळत सारिकाला वेढा घातला. आपल्या कुशीत जवळ जवळ ओढूनच घेतलं त्यानं तिला. तीही विसावली त्याच्या कुशीत. तिच्या डोळ्यात अश्रू. तोही भरून आला. किती तरी वेळ दोघं तशीच होती. पण अचानक ही मिठी अधिक घट्ट होऊ लागली. एकमेकांच्या स्पर्शात अधिक खोल बुडण्याची उर्मी जागी झाली. शरीर तापू लागलं. ओठाला ओठ भिडले. आवेग वाढला. आणि..... सारिकानं जवळ जवळ ढकललंच त्याला. ती धावत खुर्चीवर येऊन

अनुक्रमणिका

बसली. एव्हाना तोही भानावर आला.

''सॉरी सारिका चुकलं माझं.''

''नाही रे माझंही चुकलं.''

''सारिका, काय होतंय समजत नाही ग. पण शरीर एकत नाहीय. त्याच्या मागण्या वाढल्यात. तू प्रेम करतेस माझ्यावर. तुझी सोबत हवी आहे. पण त्याहीपेक्षा अधिक काही हवंय मला. खूप त्रास होतोय ग.''

''मी समजू शकते रे! मला त्रास होत नाही असं वाटतंय का तुला. दिवसभराची वणवण, प्रचंड मानसिक दडपण. थोडं सुसह्य होतं तुझ्या सान्निध्यात. पण माझंही शरीर मागतं यापेक्षा जास्त काही. म्हणून काय पाय घसरू द्यायचे...''

बरोबर बोलतेय ही. शरीर मागतं म्हणून काय द्यायचं त्याला वाट्टेल ते. आणि मग संस्काराचं काय? आपलं मध्यमवर्गीय पांढरस्वच्छ घर पेलणार नाही आपलं असं घसरणं. नाही... नाही... सांभाळलंच पाहिजे स्वतःला. दोघांनीही एकमेकांचे हात घट्ट हातात घेतले. नाही...नाही... लग्नाच्या आधी आपल्या हातून अशी चूक घडणार नाही. मग काय करावं? सारिकाशी लग्न करावं? छे... छे... तेही शक्य नाही. अजून आपलाच ठावठिकाणा नाही. आपलंच युद्ध चाललंय नोकरीसाठी. लग्न म्हणजे जबाबदारी. आपण पेलू शकतो का ती? कसंबसं भागतंय आपलं. सारिकाची जबाबदारी आपण उचलू शकत नाही. साऱ्या गोष्टी कळतात पण... या शरीराचं काय. वय वाढतंय. ब्रह्मचर्याचे दिवस केव्हाच संपले. विशिष्ट वयानंतर शरीरालाही हवं असतं काही. किती तीव्र होतात इच्छा. शरीर पेटून उठतं. पण... शेवटी काय? काही उपाय नाही मारून टाकायची इच्छा. विझवून टाकायचं शरीर. प्रचंड चिडचिड, कशात लक्ष नाही, समाधान नाही दमन... दमन... फक्त दमन... किती वेळापासून बसलोय असं. सारिका केंव्हा गेली कळलेच नाही. अंधार... अंधार... अधिक गडद होतोय...

***

विनूच्या फ्लॅटच्या पायऱ्या चढताना अमितला जाणवलं. त्याला चक्क धाप लागली होती. अशी धाप लागणं चांगलं लक्षण नाही. किडलेलं शरीर, किडलेलं जगणं. मनच स्वस्थ नाही तर शरीर स्वस्थ कुठून असणार. विनूकडे जरा बरं वाटेल. एवढ्या मुंबईत हाच तर एक मित्र आहे. बाजूच्या बिल्डिंगमध्ये राहतो तरी महिनांमहिने भेट होत नाही. खरंच मुंबईत कुणालाच कुणासाठी वेळ नाही. आजचा रविवार विनूके नाम...विनूने दार उघडलं, चारपाच मित्र जमलेले दिसतात. विनूकडे पार्टी आहे वाटतं! तसे त्याचे दोनतीन मित्र आपल्याही ओळखीचेच तर आहेत. आजचा दिवस चांगला जाणार तर...

''ये ना अमित फार मोक्याच्या वेळेस आलास. आज झक्कास पार्टी आहे माझ्याकडे. बरेच दिवसांनी आलास. आज केवळ मजा करायची?'' बोलता बोलता विनू आत गेला. अमितने साऱ्यांना हस्तांदोलन केले. तेवढ्यात विनू बाहेर आला. हातातल्या ट्रेमध्ये व्हिस्कीची बॉटल आणि काचेचे ग्लास. ग्लास भरून प्रत्येकाच्या हाती देत त्याने अमित ही समोर केले.

''नाही विनू मी घेत नाही, ठाऊक आहे ना तुला?''

''होय रे, पण मला असं वाटलं आता सुरू केली असशील तू.''

''आणि नसेल सुरू केली तर आजपासून करायला हरकत नाही.'' रमेश फस्सकन हसत म्हणाला,

''नो थॅंक्स आणि मला असं वाटतं तुम्हीपण दूर रहावं यापासून.''

अमित, तुला माहीत नाही हिचा आनंद. म्हणून बोलतोय असं. एकदा हिची अवीट गोडी चाखून बघ. सब कुछ भूल जाओगे सिर्फ आनंद ... आनंद... मोहनच्या बोलण्यावर खळखळून हसत सगळ्यांनी चिअर्स केलं. आणि ओठाला ग्लास लावले.

कशी चव असेल या मदिरेची. एकदा ओठाला लावली की ओढून घेते ही बाहूपाशात. खूप आनंद मिळतो म्हणे. घेऊन पहावी काय थोडी? जीव अगदी थकून गेलाय. वणवण, दगदग, नकार हे पराभूत होणं. विसरले जाईल का खरंच हे सगळं. थोडावेळतरी मिळेल का निर्भेळ आनंद. नाही...नाही... सारं विसरता येईल पण आई-बाबांना विसरता येणार नाही. त्यांच्या संस्कारांना विसरता येणार नाही. आपल्यासाठी घेत असलेल्या त्यांच्या कष्टालाही विसरता येणार नाही. अमितने नजर फिरवली सगळ्यांच्या डोळ्यात आनंद. एक नवंच जग निर्माण झालं होतं त्यांचं. किती आनंद मिळतोय यांना. पण हे सारे आपल्यासारख्याच मध्यमवर्गीय, सुसंस्कृत घरातून आलेत. मग त्यांना अडविलं नाही का त्यांच्या संस्कारांनी. अडविलं असेल, नक्कीच अडवलं असेल. त्यांनी आधी अव्हेरलच असेल मदिरेला. तर मग हिचा पाश कसा पडला असेल? हे सारे आपल्यासारखेच चांगल्या घरातले. त्यांच्यासाठीही घेताहेत आई-बाप कष्ट आणि हे हिंडताहेत इथं नोकरीसाठी. वणवण, जीवाची धावपळ, जीवाची मुंबई करताहेत, रोज बसताहेत

लोकलमध्ये. रोज चढताहेत वेगवेगळ्या ऑफिसच्या पायऱ्या. शोधताय रोज वेगवेगळ्या कंपन्यांचे दरवाजे. रोज मुलाखती, रोज नकार, रोज पराभूत होणं. निब्बर झालंय याचं मन, म्हणूनच शोधताय असा आनंद.

गप्पा ऐन रंगात आल्या होत्या. पण यात अमित कुठेच नव्हता.

यापेक्षा सारिकाला भेटायला गेलो असतो तर...पण नको. तिच्या जास्त भेटीही त्रासदायक ठरतात आजकाल. ती आवडते आपल्याला. तिचा सहवासही आवडतो. तिचं निर्मळ मन आवडतं. तिच्या सान्निध्यात दुःखाचा विसर पडतो. पण आजकाल मनाच्या भूकेबरोबर शरीराचीही भूक वाढतेय. आपल्याला ती हवीशी वाटते. मनाने आणि देहानेही. असं कां व्हावं आपल्याला? शरीरावरचा ताबा सुटतोय कां आपला?

''काय अमित कुठल्या तंद्रित आहेस?'' विनूने अलगद खांद्यावर हात ठेवला.

''विनू लाव ही मी आणलेली सीडी म्हणजे हा मदिरेचा आनंद द्विगुणीत होईल.'' रमेशने विनूच्या हाती सीडी दिली.

''कोणता सिनेमा आणलाय? छान झाले बरेच दिवसात एकही चित्रपट बघितला नव्हता.'' अमितच्या बोलण्यावर हास्यस्फोट झाला. विनूने सीडीप्लेअर आणि टीव्ही सुरू केला. ती एक अश्लिल सीडी आहे हे अमितच्या क्षणात लक्षात आले.

''काय विनू काय बघताय हे? शोभतय का तुम्हाला? चांगल्या घरची पोरं तुम्ही. सारे संस्कार विसरलात. हे असं गलिच्छ बघण्याआधी आई-बाप आठवले नाही काय रे तुम्हाला?''

''आठवले ना अमित संस्कार आणि मायबापही सगळ्यांना आठवले. पण कसं जगावं म्हणतोस? हे पराभूत जगणं सुसह्य करण्यासाठी काही तर करावं लागेल. ही तडफड, मानसिक ताण, चिडचिड, एका नोकरीसाठी किती ही जीवघेणी वणवण वय उलटून गेलं तरी लग्न नाही. कसं करायचं रे लग्न? संसार चालविण्याची धमक कुठाय आमच्यात अजून. सालं नामर्द झाल्यासारखं वाटतं. हा मोहन बघं याला नोकरी मिळालीय. इंजिनिअर माणूस. करतोय बाबुगिरी. पगार! सांगू फक्त पंधरा हजार रुपये. यात हा घरभाडं देतोय आणि दोनवेळचं जेवतोय. आई-बापाला पैसे पाठवू शकत नाही. नोकरी असूनही लग्न करू शकत नाही. त्यानं काय करावं रे? वय वाढतंय, लग्न नाही, पण शरीर आहे ना...! त्याच्या गरजा आहेत ना...! कशा विसराव्यात त्या म्हणूनच महिन्यातला शेवटचा रविवार असा साजरा करतो आम्ही. शुद्धीत राहून करू शकत नाही साजरा हा आनंद. पाहू शकत नाही असली अश्लिल सीडी, म्हणूनच ढोसतो ही दारू. विसरतो सगळं. फक्त आनंद... आनंद... आनंद...

अमितला गरगरायला होतंय. पोटातही डचमळायला लागतंय. उलटी होईल बहुतेक तडक निघायला हवं असं ठरवून तो निघाला. पायऱ्या उतरतांना धाप लागली. काय हे जीणं. घरदार, गाव सोडून भटकतोय. चांगल्या नोकरीच्या शोधात. दमट मुंबईत. किती हे दमन. पण म्हणून काय विकृतीकडे जावं. नाही... नाही... आपल्याला वागता येणार नाही असं. आपण सुसंस्कृत आहोत... विकृत नाही.

***

किती दिवस झालेत अमितची भेट नाही. आपल्याला टाळतोय का तो? त्या दिवशीच्या घटनेनंतर थोडा अवघडल्यासारखं असतो. पण त्या दिवशी नेमकं काय झालं होतं आपल्यालाही? आपल्याला आवडतो तो. त्याचा सहवास आणि त्याचा स्पर्श... हो! हो! तोही हवासा वाटतोय. किती रोमांच, किती तरंग देहात पसरले होते त्याच्या स्पर्शानं. आणखी हवा होता तो स्पर्श. पण... नाही आपल्या हातून अशी चूक नको घडायला. आई-बाबांचं स्वप्न घेऊन आलोय आपण इथे. त्यांना लाज वाटेल अस कोणतही कृत्य आपल्या हातून घडू नये. पण... अताशा मन विचलित होतं आपलं. कळतं ना! बरोबर नाही. पण मन ऐकत नाही. आणि कधी कधी शरीरही ऐकत नाही. मागे गावी गेले तेंव्हा जुन्या मैत्रिणींची भेट झाली. एव्हाना आपल्या सगळ्याच मैत्रिणींची लग्न झालीत. संसाराला लागल्या सगळ्या. किती भरभरून बोलत होत्या घराबद्दल, नवऱ्याबद्दल, मधुचंद्राच्या रात्रीबद्दल, वादळवेड्या स्पर्शाबद्दल, बरसणाऱ्या धारांबद्दल. किती अवघडलो आपण. कसे कळणार आपल्याला ते स्पर्श. अनुभूतीच घ्यावी म्हणतात. आपल्या वाट्याला केंव्हा येईल हे सारं. तापलेल्या देहावर केंव्हा बरसेल हा पाऊस. नको... नको... कल्पनेनंही रोमांच उठताहेत. नको ते विचार नको ते रोमांच...

लिना केंव्हाची लॅपटॉप उघडून बसलीय. हिचं आपलं बरं असतं. ती अन् तिचा लॅपटॉप. इंटरनेट हाती आलं आणि माहितीचा स्फोट झाला सर्वत्र. या स्फोटात माणूस हरवून बसला स्वतःला. तुटला आपल्याच जगापासून.

''लिना, अगं किती वेळ घालवतेस या लॅपटॉप सोबत मी सुद्धा राहते या खोलीत म्हटलं. थोडं माझ्याशीही बोल.''

''असं होय सारिका, तुच ये ना इकडे, बघ काय मज्जा

अनुक्रमणिका

येतेय चॅटिंग चालू आहे.''

''अगं कुणाबरोबर? हा कोण? कोणीतरी अनोळखी दिसतोय आणि हा ग तू स्वतःचा म्हणून कुणाचा फोटो टाकला आहेस?''

''सारिका, खूपच मज्जा येतेय बघ. मी माझ्या फोटो ऐवजी एका सुंदर मॉडेलचा फोटो टाकलाय. आणि बघ माझ्या प्रेमात किती जण पडलेत. हा बघ कुणी आशीष पाटील. थांब त्याला 'हाय' म्हणते. आणि रॉबिन डिसुजा...''

काय चाललयं हिचं. आपल्या ऐवजी मॉडेलचा फोटो टाकलाय आणि खेळवतेय पोरांना एका वेळेस किती पोरांशी चॅटिगं करतेय? किबोर्डवर बोटं बघा किती वेगात फिरताहेत. बडबडते काय? मध्येच गालातल्यागालात हसते काय? पुरुषांना आपल्या नादी कसं लावावं हे चांगलं माहीत आहे हिला. आणि मुलंही कसे मागे लागणार नाहीत. मॉडेलचा फोटो तर टाकला पण तो तरी सोज्वळ आहे का? अगदी उत्तन कपड्यातील ती मॉडेल. पोरं नादी लागणारच. आणि... ही आनंद घेतेय.

''अगं सारिका बघ ना युवर ब्युटी इज लाइक ए हेवन'' असं म्हणतोय, रॉबिन.

''अगं, पण तो ज्या स्वर्गीय सौंदर्याची गोष्ट करतोय ते तुझं नाही त्या मॉडेलचे आहे.''

''हे ग काय सारिका, मूड नको घालवूस. खोटा का होईना मिळतोय ना आनंद. बस्स! आनंद घ्यायचा! या धावपळीच्या जीवनात अशा आनंदासाठी वेळ तरी आहे का आपल्याजवळ? प्रेमबिम करावं, कुणात तरी मन गुंतवावं. जिथे आपलाच ठावठिकाणा नाही तिथे या गोष्टी फारच दूर म्हणूनच खोटा का होईना; घ्यावा हा आनंद. भरभरून.''

काय म्हणावं या पोरीला! तीन वर्षापासून राहतेय या होस्टेलमध्ये. गरिबाच्या घरची पोर. आई-बाप तिकडे राबताहेत. लेकीला चांगली नोकरी मिळावी, अशी स्वप्न बघाताहेत. आणि ही इकडे यात आनंद शोधतेय.

''सारिका, अगं बघ भेटायचं म्हणतोय आणि हे काय? हट्टच धरून बसलाय फिगर सांग म्हणून चावट मेला... ''

''जीव कसंसा होतोय हे वाह्यात ऐकणं, बघणं नको. उठलच पाहिजे इथून.'' सारिका बाहेरच्या पॅसेजमध्ये आली. प्रत्येक मजल्यावर लांबच लांब पॅसेज. आणि दोन्ही बाजूंनी दहाबायदहाच्या खोल्या प्रत्येक खोलीत दोन मुली.

किती लांबच लांब आहे हा पॅसेज अगदी रेल्वे गाडीसारखा. चाललाय अखंड प्रवास. कुठे जायचे माहीत नाही. बसलोय ना आपणही या रेल्वेत एक प्रवासी म्हणून. किती गर्दी? सारेच प्रवासी व्यस्त. कुणाला कुणाशी बोलायला वेळ नाही आणि ज्याला वेळ मिळतो तो लागलाय लॅपटॉप किंवा मोबाईलवर. आज कुणाशी तरी खूप गप्पा करण्याचा मूड आहे आपला. रूम नं. दहा गीता आणि शामाशी मारू या का गप्पा!

सारिका रूम नं. दहा जवळ आली. दरवाजा हलकेच ढकलला आणि तिचे डोळे विस्फारले. दरवाजा परत ओढून धावली ती पॅसेजमध्ये. लांबच लांब रेल्वे. पळतेय न थांबता आणि सारिकाही धावतेय.

नेमकं काय बघितलं आपण. आपण बरोबर बघितलं की काही दृष्टीदोष निर्माण झालाय. शामा आणि गीता अशा अर्धनग्न विचित्र अवस्थेत. अरे बाप रे! काय बघितलं हे. दोघींच्या अतुट मैत्रीबद्दल केवढा आदर आपल्याला. एकमेकींशिवाय राहत नाही कधी छी!... शामा आणि गीता केव्हा जवळ येऊन उभ्या झाल्या सारिकाला कळलेच नाही. शामाने आवाज दिला पण त्यांच्याकडे बघण्याचीसुद्धा इच्छा होत नव्हती तिला.

''सॉरी मी चुकून आले तुमच्याकडे. असं काही बघायला नको होतं मी''

''सॉरी म्हणू नको सारिका. प्लीज बघितलं ते बोलू नकोस कुठे''

शामाने हातात घेतलेला हात झिडकारून द्यावा असे वाटले सारिकाला

''पण कां? ... कां असे वागलात तुम्ही? केवढी मोठी चूक...''

''होय. सारिका कळतं आम्हाला. आम्ही चुकतोय. हे बरोबर नाही. पण काही गरजा असतात ग शरीराच्या. गेल्या पाच वर्षापासून या होस्टेलला राहतोय आम्ही. नोकरीचं स्वप्न घेऊन आलो होतो इथे. आता फक्त स्वप्नाच्या मागे धावणं सुरू आहे. मी दोनतीन घरी ट्युशन घेते आणि गीता गायन क्लास. जेमतेम होस्टेल, मेसचा खर्च भागतो. म्हाताऱ्या आई-बापाला एक पैसाही पाठवू शकत नाही. उलट त्यांनी पाठवलेले पैसे ठेवून घेतो कोडगेपणाने. तुला माहीत आहे. लग्नाचं वय केंव्हाच उलटून गेलयं. लग्नाची स्वप्नही विसरायला झालीत. पण शरीर विसरता येत नाही. मग एकमेकींची तहान थोडी भागवली तर

काय हरकत आहे?''

सारिकाने शामाचा हात हलकेच बाजूला केला आणि ती चालू लागली. लांबच लांब पॅसेज संपता संपत नव्हता. शामा आणि गीताची अवस्था कळू शकते आपल्याला. पण शरीर मागतं म्हणून का द्यायचं त्याला वाट्टेल ते. वाट्टेल त्या मार्गानं. आपलंही शरीर नाही का त्या दिवशी अमितच्या स्पर्शाची मागणी करत होतं. आपल्यालाही हवा होता ना तो स्पर्श. हवं होतं ना ते सुख. सावध झालो नसतो तर त्यादिवशी घडलाच होता अनर्थ. पण काय हरकत आहे? ही दगदग, ही वणवण, हे होरपळून निघणं. जर निवत असेल एखाद्या स्पर्शानं तर... कां घेऊ नये तो आनंद...नाही... नाही... आपल्याला असं वागता येणार नाही. सुसंस्कृतपणाचे संस्कार खोलवर रुजवलेय आईबाबांनी. आपल्याला असं वागता येणार नाही.

***

अमित खोलीवर पोहचला तर सारिका होती बाहेर. केंव्हाची उभी आहे कुणास ठाऊक? आज आपल्याला उशीरच झाला. बऱ्याच दिवसांनी आली ही आणि आपण ताटकळत ठेवलं हिला.

''अरे अमित! धावत आलास की काय? चक्क धाप लागलीय तुला.''

हसत हसत अमितने दार उघडले. दोघांनी मिळून चहा केला. किती दिवसांनी भेट झालीय. खूप बोलायचंय हिच्याशी. पण खूप अवघडल्यासारखं होतंय. ही सुद्धा अबोल झालीय. आपल्यासारखीच अवघडलीय. असं कां होतयं. त्यादिवशीचा प्रसंग आठवतोय आपल्याला तसाच हिलाही आठवत असणार. त्या दिवशी चुकलो का आपण? सारिका दुरावली का आपल्यापासून? नाही... नाही... तीही सुखावली होती आपल्या स्पर्शानं. मग हे अवघडलेपण...

''सारिका, इतकी अबोल कां तू?''

''काही नाही रे उगाच''

''मला माफ केलं नाहीस का तू त्या दिवशीच्या चुकीसाठी?''

''नको रे। असं बोलू नकोस, चूक आपल्या दोघांच्याही हातून घडणार होती तू एकट्याला दोष देऊ नकोस.''

काय बोलावं कळत नाहीय. किती अवघडलेपण आलंय. पण अशानं ही निघून जाईल. ही जाऊच नये असं कां वाटतयं आपल्याला. ही आज इथेच राहिली तर किती बरे होईल.

''सारिका, तू जाऊच नये असं वाटतंय मला. तुला राहता येणार नाही का इथे... कायमचे...

''अमित काय बोलतोयस तू.''

''बोलू दे सारिका मला बोलू दे. एकटं राहणं असह्य झालयं बघ. हिरवंगार कुरण पायाखाली केंव्हा लागतं कोणास ठाऊक? पण आज या तप्त वाळवंटाचे चटके फार क्लेशकारक आहेत. तुझी स्थितीही काही वेगळी नाही. दोघंही धावतोय या वाळवंटातून. या वाळवंटात कुठंतरी हिरवळ लागावी पायाला. तेवढाच दिलासा. तेवढ्यानेच धावणे सुसह्य होईल. म्हणून मला प्रकर्षानं वाटतंय तुझ्या सोबतीची हिरवळ हवीय मला.''

''मलाही हवीय रे ही हिरवळ. कधी कधी खूप एकटं वाटतं मन खचायला होतं. आजूबाजूला घडणारे भयंकर प्रकार, मुंबईतली दमछाक, सततचा मानसिक ताण नकोसं होतं जगणं. तुझी सोबत हवीय मला. पण कशी?''

''आपण दोघं एकत्र राहू या.''

''लग्नाशिवाय...!''

''होय, मुंबईत अनेक लोकं राहतात ना लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये.''

''नाही...! अमित... ही आपली संस्कृती नाही. आपण मध्यमवर्गीय आहोत. आपले संस्कार वेगळे. आपल्या घरी आई-वडिलांचे वेगळे कायदे आहेत. आपल्या घरी अंधश्रद्धा नसल्यात तरी श्रद्धावंत आहोत आपण. आपली श्रद्धा आपली निष्ठा आहे मूल्यांवर, नीतीवर. आपण असे वागू शकत नाही. आपले आई-बाबा याला कधी मान्यता देणार नाही. ते दुखावल्या जातील. लग्नाशिवाय एकत्र राहणे हा अनाचार आहे.''

''मला मान्य आहे तुझं म्हणणं पण ज्या परिस्थितीतून, ज्या मनोवस्थेतून आपण जातोय त्यात आपण काय मार्ग काढू शकतो. मला सांग, मी आवडतो तुला?''

''होय रे! हे काय विचारणं झालं.''

''माझी सोबत हवीहवीशी वाटते तुला.''

''होय रे! खूप''

''मुंबईत सतत होणाऱ्या पराभवानं मन खचतं तेंव्हा तुझ्या मनाला माझा आधार हवासा वाटतो.''

''होय रे!''

अनुक्रमणिका

''मनाच्या आधारासोबत हवासा वाटतो ना स्पर्श माझा''

''खरंय अमित! खरंच कधी कधी इतका आवेग...''

''मी समजू शकतो सारिका. प्रत्येक वयात काही गरजा असतात मनाच्या आणि शरीराच्याही. शरीराला नाकारून चालणार नाही. विशिष्ट वयात शरीराच्या मागण्या तीव्र असतात. गावाकडची आपली मित्रमंडळी केव्हाच लग्न झालीत त्यांची. त्यांना मिळतय हवं ते. सुखानं, आनंदानं आणि कायदेशीर. खरंच ज्या ज्या वयात जे जे हवं ते मिळायलाच पाहिजे शरीराला. आपण अजूनही लढतोय, वणवणतोय पण शरीर विसरता येत नाही. या वयात त्यालाही असते भूक.''

''म्हणून काय लग्नाशिवाय...''

''लग्न करू शकतो का आपण? लग्न व त्या सोबत येणाऱ्या जबाबदाऱ्या उचलू शकतो का आपण?''

''नाही रे, सध्या विचारही करू शकत नाही आपणं लग्नाचा.''

''लग्न करू शकत नाही. मग या मनाच्या आणि शरीराच्या वणव्याचं काय करायचं? कशी भागवावी ही तहान? जावं का वाईट मार्गाने? अनेक मार्ग आहेत त्याचे पण आपले संस्कार वळू देत नाहीत त्या मार्गाला. आपलं दमन, ही घुसमट कशी थांबणार.''

खरंय याचं म्हणणं. आपल्यालाही त्रास होतोय. लग्नाचं वय उलटतंय. गात्रागात्रास रोमांचित करणाऱ्या स्पर्शाची ओढ जाणवतेय. पण असा आनंद घेण्यासाठी आपण लिनासारखं पुरुषांना नादी लावू शकत नाही आणि शामा-गीता ने अवलंबलेला मार्गही अवलंबू शकत नाही. अमितनेही आपल्यासारखे असे अनुभव घेतले असतील. आपल्या आसपासचे तरुण कुठे कसे बळी जातात हा बघत असणार. पण... ह्याने सांगितलेला मार्ग बरोबर आहे काय? नाही...

''अमित, तू काय म्हणतोय ते कळतंय मला पण लग्नाशिवाय एकत्र राहणाऱ्याबद्दल समाज किती वाईट बोलतो. ठाऊक आहे ना तुला? कारण लिव्ह इन रिलेशनशिप ला आज बीभत्स रूप प्राप्त झालेय. मुंबईसारख्या ठिकाणी बघतोय ना अनेक उदाहरणं. केवळ मौजमजा करण्यास एकत्र राहणारी जोडपी माहीत आहेत मला. त्यांच्या आई-बापाला यातलं काही माहीतही नसतं. ही जोडपी सुद्धा खूप काही सिरीअस नसतात आपल्या या नात्याबद्दल. एखाद वर्ष सोबत राहून सहज सोडून देतात ऐकमेकांना. पुन्हा दुसऱ्यासोबत एकत्र राहणं सुरू करतात आणि आई-बापाच्या आवडीनुसार तिसऱ्याशीच लग्न करून मोकळे होतात.''

''मला माहीत आहे सारिका. हे असंच रूप आलंय लिव्ह इन रिलेशनशीपला. पण अनाचार वाटणाऱ्या गोष्टींना नीती, मूल्य आणि तत्त्वांची बैठक दिली तर तो राजमार्ग झाल्याशिवाय राहणार नाही. आपण जे करू ते आई-बाबांना विश्वासात घेऊन. त्यांना विचारून, सांगून. एकमेकांप्रती असलेला विश्वास, आदर व प्रेमाच्या आधारावर आपण एकत्र येऊ. यामुळे आपल्याला एकमेकांचा हवासा वाटणारा सहवास मिळेल. वाईट मार्गाने न जाता मनाची आणि शरीराचीही गरज आपल्याला पूर्व करता येईल. मनाची तगमग, जीवाची तडफड आणि चिडचिड थांबेल. मनाच्या आणि शरीराच्या गरजा पूर्ण करता येतील. जगण्याला अर्थ प्राप्त होईल. लढण्याला बळ प्राप्त होईल. स्वप्नांना ऊर्जा प्राप्त होईल. या एकत्र राहण्यात आपले तत्त्व असतील, कायदे असतील आणि नोकरी मिळाल्यावर सर्वांसाक्ष विवाह करू आपण.''

अमित म्हणतोय ते बरोबर आहे. पण मला माहीत आहे. आई-बाबांना आवडणार नाही हे. मध्यमवर्गीयांना असल्या गोष्टी मानवत नाहीत. उच्चवर्गीयांचे जगच वेगळं. ते जगतात आपल्याच धुंदीत. निम्नवर्गीयांचेही जग वेगळेच. ते जगतात बिनधास्त कशाचीही पर्वा न करता. समाज टिकून आहे तो मध्यमवर्गीयांमुळे. समाजाचं पावित्र्य त्यांनीच राखलंय म्हणूनच आईबाबांची परवानगी मिळवणं मोठं कठीण आहे.

''सारिका, मला माहीत आहे. तुझ्या मनात काय सुरू आहे ते. आपल्या आईवडिलांना आपली परिस्थिती, मनस्थिती समजावून आपण निवडलेला मार्ग त्यांना पटवून सांगणं हेच आपल्या समोरचं मोठं आव्हान आहे. तू स्वीकारणार आहेस काय ते?''

अमितने नकळत हात समोर केला सारिकाने मोठ्या निश्चयाने त्याच्या हातात हात दिला. दोघांचेही डोळे विलक्षण तेजाने चमकले. नवा आत्मविशास निर्माण झाला. हात अधिक घट्ट झाले. आणि... तप्त वाळवंटात हिरवं कुरण दिसू लागलं.

। डॉ. पद्मरेखा धनकर-वानखेडे
'पसायदान',
एफ -०१, केशवगंगा अपार्टमेंट,
बाबा सॉ मिलजवळ,
गजानन मंदिर रोड, चंद्रपूर - ४४२ ४०२
भ्रमणभाष : ९८८१९४५५५७

अनुक्रमणिका

॥ पुस्तक परीक्षण ॥

'मम म्हणा'च्या निमित्ताने -

डॉ. अनिल धाकू कांबळी

■■■

कविता हे कवीचे कंस तडकलेले स्वगत असते. प्रत्येक व्यक्तीचे खासगीतील असे स्वगत असते. विपरीत परिस्थितीशी संघर्ष करता करता संवेदनक्षम माणूस थकून जातो. त्याच्या मनातल्या विचारांचा विस्फोट होऊन त्याच्या स्वगताचा हा कंस केव्हाही तडकू शकतो. वीरधवल परब यांच्या 'मम म्हणा फक्त...' मधली कविता ही अशाच प्रकारे आंतरिक कल्लोळाच्या उद्रेकातून लाव्हारसाप्रमाणे अपरिहार्यपणे उफाळून आलेली कविता आहे.

एका कवीच्या दृष्टिकोनातून दुसऱ्या एका समकालीन कवीचा हा कवितासंग्रह वाचतांना मला व्यक्तिशः हे जाणवले की, त्याच्या 'दर साल दर शेकडा' ह्या कवितासंग्रहातली कविता काळानुसार पुढे पुढे सरकत अधिकाधिक विस्तृत, प्रगल्भ, गहनभंगीर व बहुआयामी होत एका विशिष्ट अशा उन्नत टप्प्यावर पोहोचली आहे. ह्या टप्प्याने मराठी कवितेत त्याची स्वतःची ओळख आणि त्याचे स्वतःचे स्थान निश्चित केले आहे.

हेही जाणवले, की, फिरत्या रंगमंचावरचा एक शोकात्म नाट्यप्रयोग आपण पाहत आहोत. असा नाट्यप्रयोग, की ज्यात कवीने दुर्दैवाचे दशावतार आपल्या तीव्र उपरोधिक शैलीत उलगडून दाखविले आहेत.

ह्या आगळ्यावेगळ्या नाट्यप्रयोगातली पात्रे, घटना, रंगभूषा, वेषभूषा, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत ही सर्व विस्मयकारी आहेत. स्वतः कवी हा सामान्य माणसांच्या वतीने निवेदकाच्या रूपात येतो. बारा-पाचाचे मानकरी, विविध लोकप्रतिनिधी, फलज्योतिषी, भटजीबुवा, पोटार्थी शिक्षक - प्रमुख पात्रे म्हणून येतात. तर भंगारवाले, खडी फोडणारे, रस्त्यांवर डांबर ओतणारे, लमाण, कातकरी, मैलकुली, दरवेशी, पांगुळबैलवाले, पिंगळे जोशी, वानरमारे, भिल्ल, रामोशी, शेतमजूर हे विंगेत राहणे पसंत करतात.

ह्या नाट्यप्रयोगासाठीची प्रकाशयोजना ही नेहमीप्रमाणेची प्रकाशझोतांची नाही. दृश्यांच्या आवश्यकतेनुसार ती आहे. भजनी मेळ्यांच्या पेट्रोमॅक्स बत्त्यांची, जिगरबाज लढवय्या सोबत्यांनी फिरविलेल्या पेटत्या बनोट्यांची, तोंडातून रॉकेलचा फवारा हवेत उडवून पेटवल्याची, त्रस्त समंधांनी चूड लावून पेटवून दिलेल्या गवताच्या गंजीची आणि झोपड्यांची तसेच स्वतःलाच पेटवून दिलेल्यांची.

पार्श्वसंगीत म्हणून कष्टकरी, शोषित, पीडित, विस्थापित, चिरडले गेलेल्यांच्या आकांताचा कोरस येतो. तर कधी अवसारांचे कडाडणारे ढोल, न संपणाऱ्या फटाक्यांची माळ, कानठळ्या बसविणाऱ्या लाऊडस्पीकरांवरचा जयघोष, डी. जे. चा उन्माद, खडी दाबायच्या रोलरचे आवाज, फावड्या-

घमेल्याचें आवाज पार्श्वसंगीताचाच भाग म्हणून येतात. नेपथ्यामध्ये देवीचे वारुळ, समाजवाद्यांच्या शुभ्र गाद्या, तक्के, बापूजींचा चरखा, सूत, चष्मा, काठी, पंचा तर कधी होमहवन येते. नाटकात विविध दृश्ये हळूहळू गतिमान होत प्रेक्षकांना विचार करायला अंतर्मुख व्हायला प्रवृत्त करतात. नाटक सुरू होण्यापूर्वी प्रेक्षागृहात आणि पडद्यापलीकडच्या रंगमंचावर देखील मिट्ट असा अंधार आहे. लट्या आणि फट्या हे दोघे सामान्य कष्टकरी हा अंधार अविश्रांत उपसून टाकताहेत. हा निगरगट्ट काळोख पिढ्यान् पिढ्या ठाण मांडून बसला आहे. लट्या आणि फट्या यांचे पूर्वज हाच काळोख उपसता उपसता दमछाक होऊन, तोंडाला फेस येऊन मरून गेले. लट्या-फट्यांचे वंशजही भविष्यात फार काही वेगळे करतील, अशी शक्यता संभवत नाही. 'काळोख उपसणे' हेच त्यांचे भागधेय ठरून गेल्यासारखे आहे.

मला जाणवलेले नाटक ढोबळमानाने पुढील प्रमाणे :-

प्रेक्षकांना सावध करणारी भयसूचक घंटा घणघणते आणि पडदा उघडतो.

दृश्य क्र. १ : रंगमंचावर भलेथोरले वारुळ. कडाडणाऱ्या ढोलांच्या आवाजांत हांकेसरशी उभे राहिलेले खळनाथ, भूतनाथ, नि दांडेकराचे अवसार. मायेचा पूर्वस मात्र अडून बसलेला. रयतरोंबाबळ हात जोडून करते आहे याचना, 'न्हव महाराजा, उभो न्हव । तुझ्याशिवाय ह्यो मेळो सुटाचो नाय । आज बारा गावांची पिलगी तुज्या पायाकडे इली हा । तूच बारा-पाचांचा गणित एक करून न्हाटीची घडी बसंय।'

(रंगमंचावर पुन्हा अंधार. थोड्यावेळाने उजेड उजेडात वारुळ तिथेच आहे. मात्र सुटाबुटातली माणसं दुरूनच पायऱ्यांखालूनच हात जोडल्यासाखे करीत लगबगीत निघून जातांना दिसतात.)

दृश्य क्र. २ : निवेदक : पाहता - पाहता कवी चतकोर दुःखाचा उभा करतो डोंगर कागदांवर । उधार उसनवारीच्या संदर्भांना कल्हई काढून बनवतो झिलईदार विकाव‌ू । वाटेवरचं शिराड बाजूला करण्याची तसदी घेण्यापेक्षा पेरतो घनव्याकूळ प्रार्थनांचे चलाख सूर । बारक्या बारक्या कवितांचे दीर्घांक करून । काठेकाठ भरू द्या प्याला । फेस भराभर उसळू द्या म्हणणारे आत्मतुष्टीच्या डोहात आकण्ठ बुडालेले हे कवी । खुरप्याला धार कशी लावायची हे माहीत नसलेले । हातांत नांगर धरून । गवताच्या गंजीवर बसून फोटो काढून घेणारे । गार पंख्याखाली बसून कृषिजन-संस्कृतीविषयी काहीतरी खरडणारे । इंटरनेटचा दोर पकडून हवा असलेला काठ बिनचूक पकडणारे। हे कवी संमेलनांतून बकवास, कंटाळवाणी कविता वाचत असतात । अमूक एका शब्दावर जोर दिला, की, टाळ्या । स्वर थोडासा कातर केला, की, दीर्घ उसासे । किंचित विराम । किंचित गती । लकबीची सापेक्ष चलाखी । सर्व काही ठरल्यावेळी सवयीनं आपसूक ।

दृश्य क्र. ३ : (एक दादा माणूस लोकांना उद्देशून) : तुमच्या गावच्या व्हाळावर साकव बांधणे हे माझे काम नव्हे । (आपल्या भालदार, चोपदार व चॉपरदारांना उद्देशून) : ते पन मीच सांगू काय भोसडीच्यांनो ? चर्चासत्र लावा, कसलायन लावा । मी केवा इच्चारलं काय? नुसतेच बियर पिवून तराट न्हावा नको । पानभर झायिरात द्या । पैसा खर्च करा । निधी परत जाता नये । नायतर कानपटवीन मायझयांनो ।

(लोकप्रतिनिधी) : आरोपी सापडत नाहीत म्हणजे काय ? मुसक्या बांधून उद्याच हजर करू.

(लोकप्रतिनिधी : ३) : (डोळ्यांत खुपसून थेट बोट) आदिवासींचे आदिवासी आणि विस्थापितांचे विस्थापित बघून घेतील । जनहिताच्या साध्या सरळ बाबीही कळेनाशा होतायत कां तुम्हांला ?

(लोकप्रतिनिधी : ४) : हे एक विशेष पॅकेज आहे। जे घेऊन लोकांनी परतायचं आहे । काहीही न बोलतां आपापल्या घरात । एकाच रंगाचे होऊन । एकाच छापाचे एकाच बाण्याचे होऊन। इच्छा असो वा नसो ।

(लोकप्रतिनिधी : ५) : आमदार निधी आहेच । शिवाय खासदारांचे वजन । कानाला धरून गंगा आणू अंगणात । तुमचे सर्व प्रश्न सोडवू । तुमच्या एका मताच्या बदल्यात ।

दृश्य क्र. ४ : (निवेदक): ताडमाड उंचीची पोस्टर्स उभारून । फटाक्यांच्या आतषबाजीत देदीप्यामान करू शकते झूंड । एखाद्याचा काळवंडलेला गलिच्छ इतिहास । सरकारला कळवला तर आहेच म्हणूनच या भांडवलदारी जेवणावळी । हे परिवाराचे प्रचंड मेळावे । हे रंगीतसंगीत मांडव । दारिद्र्यरेषासुद्धा मोडून काढणार आहेत, म्हणे ।

इको फ्रेंडली हायटेक झमेल्यात । हद्दपार दुष्काळी भागाचा अनुशेष । सरकारी नोकरांनी खाल्ला भरपेट गवतचारा । सूचकांनी आधीच हात ओले करून । गिळून टाकला अजेंड्यासह इतिवृत्ताचा मसुदा । ग्रामसभेत अंगठे उठवून । आणि सरकार तर कवीला आणि कागदांना माचिस इतकंही स्फोटक मानत नाही हल्ली ।

अनुक्रमणिका

दृश्य क्र. ५ : (शाळेचा वर्ग - गुरुजी रिकाम्या बाकड्यांना उद्देशून) : आज गांधी जयंती । मुलं शाळेत आलीच नाहीत । खरं तर त्यांनी यायलाच हवं होतं या प्रसंगी । गांधी तर खूपच महत्त्वाचे होते । (गांधीजींनी काय म्हटलं, कुणास ठाऊक?) तर काहीतरी म्हटलेलं असणारच त्यांनी । त्यांच्या चमत्कारिक स्वभावधर्माप्रमाणे । सकाळी सकाळी उठून यायचा त्रास तर आम्हालाही होतोच । पण गांधींसाठी उठावंच लागतं ना नाइहाजानं । मुलं नक्कीच कुठेतरी गेले ही असतील । कुठे गेली असतील नक्की?

दृश्य क्र. ६ : (वस्तूसंग्राहालय : शिवाय तिथेच बाजूला सर्वोदय चळवळीचे दुकान आहे. दुकानाचे विक्रेता) : ही टोपी गांधीजींची । हे घड्याळ, हा चरखा, ही काठी, हे सूत आणि ही सर्व ग्रंथसंपदा आपल्या बापूजींचीच । सगळ्या प्रकारच्या विचारांच्या वाळवीपासून हे सारं सांभाळूण ठेवणं ही काही साधी बाब नव्हे।

(निवेदक) : ते कसं काय म्हणाले, 'सत्याचा पराभव कधीच होत नसतो'? त्यांच्या शुद्ध समाजवादाचं झालं तकलुबी खेळणं। अपरिग्रहाच्या उरावर चढल्या कमानदार ग्लोबल हवेल्या रातोरात आणि दार-खिडक्या बंद करून सामाजिक मृत्यू झाला प्रत्येक घराचा । सत्याच्या प्रयोगाची गोळी उतरलीच नाही घशातून ।

दृश्य क्र. ७ : (रंगमंचावर एक मोठी रिकामी चौकट. चौकटीखाली 'कै.(नामदार) मधु दंडवते' असं ठळक अक्षरांत लिहिलेलं. त्या चौकटीला पुष्पहार अर्पण करून निवेदक) : तुम्ही अर्थमंत्री होता । रेल्वेमंत्री होता । देशाच्या नियोजन मंडळातही होता नाना । पण स्वतःच्या मतदारसंघापेक्षाही दुसरा कंगालच होता तुमचाही मतदार । उकड्या तांदळाची पेच आणि कालवं पखडून खाणारा । कडव्या करांद्यांवर जीवन जगविणारा । सोळा आण्यांची भर व्हावी, म्हणून दिवसाला छत्तीस छत्तीस सुंभ वळणारा । पहाटेच्या भिनभिनत्या अंधार-उजेडात पत्रावळींच्या पानांसाठी रानोमाळ अनवाणी भटकणारा । आपला कार्यकर्ता ..... दुधारी पात्यावर निश्चत उभा राहील, असा भरवसा धरून मोर्चबांधणी करीत होता तुम्ही रामराज्याची । आणि कार्यकर्ते मात्र होते जवळचा एखादा खुष्कीचा मार्ग शोधण्यात गढलेले । तुमचा खरा भिडू मात्र इकडून तिकडे टोलवला गेला बेदखल । आणि आता तर भुरूभुरू जळतो आहे या मातीत तत्त्वांचा पतेरा । आणि तुमचा फोटोही दुर्मिळ झालाय । तुमच्या आजच्या ह्या पुण्यतिथीला ।

दृश्य क्र. ८ : (बॉलीबुडस्टार) : फूटपाथ ही काय झोपायची जागा आहे?

(लोकनेता) : देशात कोठे आहे गरीबी?

(निवेदक) : फिकीरच नाही आपल्याला । उन्हातान्हात राबराबून दिवसाकाठी वीस रुपयेसुद्धा कमावू न शकणाऱ्या आपल्याच कोट्यवधी बांधवांबद्दल । ट्रकखाली हकनाक चिरडून मेलेल्या फूटपाथवरच्या नागरिकांबद्दल ।

दृश्य क्र. ९ : (फलज्योतिषी गिऱ्हाइकाला उद्देशून) : तुमच्या बुद्धीचं तेज पडत नाही । तुमची लक्ष्मी स्थिर नाही । तुमचा भाग्यांक तुम्हांला माहीत नाही । तुम्हीच तुमच्या अपयशाचे शिल्पक आहांत । या वास्तूत तुमचा भाग्योदय नाही । साडेसाती निवारण्याचे यंत्र आम्ही देऊ अभिमंत्रून । तुम्ही फक्त पाटावर बसून मम म्हणा ।

(एक भटजी) : एकशे एक एकादशा करा । न् सहस्र ब्राह्मणभोजन । म्हणजे हा अधोगतीचा आरसा जाईल फुटून ।

(दुसरे भटजी) : घ्या बर गोमुत्रानं सारवून ही विटाळलेली जमीन । घ्या बरं हे गोमुत्र । चौऱ्याऐंशी लक्ष जीव-योनींना पवित्र करून घेणारं तीर्थ । घ्या बरं हे यज्ञोपवित । अस्सल जुन्या ब्राह्मणी पिळाचं ।

(निवेदक) : पोथ्या - पुराणांतून मैलोत् मैल धादांत खोटा पळत राहिलो । आणि तळहातावर शुद्धोदक घेऊन । तुर्कदुष्ट सोवळे- ओवळे । अलगद खांद्यावर अडकून बसले ।

दृश्य क्र. १० : (निवेदक) : डगमगत्या टेबलावर बसून । काहीतरी कविता खरडत असतो मी । यांत्रिकपणे एका कार्यालयाकडून दुसऱ्या कार्यालयाकडे टोलवल्या जाणाऱ्या शवविच्छेदन अहवालाप्रमाणे । संवेदना हरवलेले शब्द रचत जातो एकापुढे एक । खरंतर महारवाड्यातल्या धनगरवाड्यातल्या कोरड्या पडलेल्या विहिरीपर्यंत पोहोचायला हवं माझ्या कवितेनं पाणी होऊन ।

दृश्य क्र. ११ : (पडद्यावर कष्टकऱ्यांच्या सावल्या. घमेली. फावड्यांचे, रोलचे आवाज)

(भूमिपुत्र) : सरकारदप्तरी गायब आमचे हिरवे पट्टे । चरावू गायरानांचे हडप झाले मालिदे । काळजीपूर्वक बेदखल आमच्या हातांचे कसबी ठसे । नद्यांचं पाणी पिकाची चोरी । डुबण्याला मनाई । डिंक, मध मोहाची दारू, ताडी - माडी, बरड जमिनीवरची मूठभर नागली यांवर सुद्धा डोळा । ज्यांच्यावर ठेवावी भिस्त, ते करताहेत ठरवून आषाढी

अनुक्रमणिका

कार्तिकीच्या वाऱ्या । करताहेत महामृत्युंजय मंत्राचे जपानुष्ठान।

(निवेदक) : कोणती पॉलिसी यांचे संरक्षण करील? रस्त्याच्या कडेला खडीशीच खेळणाऱ्या । खडीलाच अंथरूण समजून गाढ झोपी जाणाऱ्या । या मुलांसाठी कोणत्या बापाचं हृदय फाटून जाईल ? हक्क कसले ? दिवस भराची साधी मजुरी मागतांना ..... थरथरणारे हे लोक अतीव कष्टांतंतर हातभट्टीची झोकून। बायकोला गुडदावत बसतील । नाहीतरी काय करतील मनोरंजन ? कोणती कृती करतील या स्वतंत्र देशात, घटनात्मक चौकटीत रहून । उन्हाने काळवंडलेले हे बिहारी युवक । ओढत राहतात विजेचे अवजड खांब आणि लांबच लांब जाणाऱ्या पिळदार तारा । इतक्या दूर आपला मुलुख सोडून आत्मावर एक भाषाच तर फक्त आलेली असते त्यांच्यासोबत । आठवडी बाजाराच्या दिवशी । तालुक्याच्या ठिकाणी जाणाऱ्या खेंडुतांचेसुद्धा खिसे फाटकेच असतात । तरीसुद्धा ते पुनःपुन्हा तपासून आपल्यासोबत अदृश्यपणे । कवडीमोल दरानं विकलं गेलेलं आपल्याच खळ्यावरचं धान्य । दसपद दरानं विकले आज असंत परत । ब्रँडेड पोत्यात भरून ।

दृश्य क्र. १२ : (धर) सर्वत्र वाळवीचे देव्हारे. खिट्टीतून सुटलेले कोनवाखे उनाड माकडांनी फोडून टाकलेल्या नळ्यांच्या खापऱ्या इतस्ततः शिसवी तुळ्या. नक्षीदार भक्कम दरवाजे. लाकडी पेट्या. वंशावळीचे ऐतिहासिक दस्तऐवज. पुराणग्रंथ. त्यांचे चौरंग. देवीचे लाकडी मुखवटे

(निवेदक) : विकायला काढलंय हे घर । हुसकावून लावावे लागतील पिंपळावरचे एकेक ब्रह्मसमंध ।

दृश्य क्र. १३ : (निवेदक) : एक दस्ता तातडीनं बांधला जातो । एक धरण तातडीने बांधलं जातं । एक हेलीपॅड तातडीने उभारलं जातं । तातडीनं दत्तक विधान करून एक गांव तातडीनं ताब्यात घेतलं जातं ।

दृश्य क्र. १४ : (देवकातला सभामंडप. धुनी पेटवलेली आहे. ग्रामस्थ ग्रामदेवतेला साकडे घालताहेत. मायनिंगवाल्यांच्या विरोधात घोषणाबाजी चालू आहे. निषेधाचे फलक आहेत. मुलं घोषणा देत आहेत. 'गाव वाचवा. डोंगरदऱ्या वाचवा. निसर्ग वाचवा, शेती वाचवा, आम्हांला मायनिंग नको. आम्ही जमीन देणार नाही' अशा आशयाच्या)

(निवेदक) : लढा सुरूच दखल बेदखल । वटारलेल्या जळजळीत डोळ्यांखाली । हळूहळू आक्रसत गळपटत चाललेला । मध्येच कोणाचा पाठिंबा । कोणाचा तरी काढता पाय । शेवटी तपासाची चक्र फिरायची तशी फिरली । गाड्या रोरावत आल्या । रोरावत निघून गेल्या, जाहीर होता होता जनसुनावण्यांचा मजकूर । जादूई अक्षरांसारखा कोणालाच वाचता येईनासा झाला । फोन खणखणले । हळूहळू वर्तमानपत्रांचे मथळेही आक्रसत गेले । माहितीच्या अधिकाराची तरफ मोडली मध्यातच । इकडच्या तिकडच्या पर्यावरणवाल्यांना मग पद्धतशीर मांडणी करून नैमित्तीक सूत्र वाजवले । साहित्यिकांना निषेधपत्रापर्यंतच मजल मारता आली। शेवटी प्रत्येकाच्याच घरातलं भाकरीचं पीठ संपत आलं होतं । तर 'कळणे' आता इथेही आणि कुठेही।

दृश्य क्र १५ : (भूमिपुत्र) : आता ढवारा तरी चरवक पूर्वीसारखी जागा खंय न्हवली हा ? सगळीकडे जेथे तेथे गडगे उभे वलंहत । झील म्हणता बापाशीक - 'घरभाट ठेव्‌त बाकीचा सगळां इकून टाक। भुसारी मालाचा दुकान काढूया । नायतर मायनिंगाक लाव्‌क डंपर ध्येवया । मगे बघ पैशाकडे पैसो कसो जातां तो । बिअर शॉपी आनी चायनीजचा हाटेल काढला तर । पैशे कमाव्‌क आणखीन्‌ खंय जाव्‌क नको । पावळेचा पाणी एकदम पाष्ठाक जायत्‌ बग । तू इतकी वर्सां काष्ठी न्हेसान न्हिमरात इकळाप इकळाप इकळायलंस । पण आता चार आणे सुद्धा तुझ्या कनवटेक रवाक्‌ नाय । आता मात्र ऐन येळाक मायनिंग वाल्यांका सय दिताना हात लटालटा कापव नको माझ्या बापाशी । नायतर फुटकी कवडी तर नायच । साधी करटी सुद्धा चाय पिव्‌क गावाची नाय ।

दृश्य क्र. १६ : (लोकप्रतिनिधी) : कांदे-टोमॅटो फेका रस्त्यावर । दूध टाका ओतून । नागवे व्हा । दातीं तृण धरून शरण या । आमच्यासाठी जागोजागी शुभेच्छांची पोस्टरं लावा । आमच्या नांवाने जेवणावळी घाला । मोफत आरोग्य शिबिरं लावा । गोरगरिबांना गुळाच्या ढेपीचें दान करा । शिकणाऱ्या पोरांसाठी गणवेश, वह्या-पुस्तकं । लॅपटॉप, चड्डी, बनियनचं वाटप करा । स्पर्धा घ्या... कसल्याही घ्या । पुरस्कार द्या... सत्कार करा । भरभक्कम मानधन द्या । दावणीला बांधा । पेपरात फोटो छापून आणा । झकास उत्तरां दिया आंदोलकांका । लिहून घ्येवा कोनावकडसून ।

(निवेदक) : तर आता घशात घाला ना हा अख्खा जिल्हा । मग मोकळच आम्ही आमच्या पोराबाळांसहित तुमच्या पंचतारांकित कपबश्या विसळायला । हाः हाः हाः । (भ्रमिष्टासारखे होत) लोक हागंदारीत... हाः हाः हाः । शबय शबय शबय । शंभर एकर जमिनीचा एक तुकडा त्यांतल्या हवशा - गवशा- नवश्यांसकट हजारी दरातं विकायला काढला, तर दोन्हीकडून दोन टक्के दराने मधली दलाली किती

अनुक्रमणिका

होईल? पाटलोण हे जागृत देवस्थान आहे । इथे सर्व नवस फेडून दिले जातील । पांचशे रुपये मोजून घेईन एका मताला । जनाधाराला लावा चुना । एका गुराख्याला चार म्हसरं तर एकोणसाठ म्हसरांना किती गुराखी ? मांडा बरं त्रैराशिक । कड्यावरचा दोर केव्हाच कापून टाकलाय । आत कुंपणावरून उड्या मारून शनि बिघडलाय पत्रिकेत तेवढा बाजूला करा भाऊ । स्वातंत्र्य कसलं? अभिव्यक्ती अबाधित ठेवायला किती रुपये लागतील ? कसला भोसडीचा शब्दप्रभू । राहू शांती केली काय ? चलो राक्षसभुवन । चहो कर्दळीवन । सकाळच्या बोहतीला दोन रुपयाला अडीच किलो वांगी काय मागताय ? मग काय करणार महाराज । पुन्हा एक डाव भुताचा । शनिवारी जा शिंगणापूरला । मुंज झाली नै भावो तुमची आजून । मुतून घ्या इथेच । गाडी प्रायव्हेट हाय । थांबणार न्हाय मध्येच । शेंडी ठेवून भटजी होतोय चुतमारीचा । निष्ठेची नि पारदर्शकत्वाची बकवास बंद करा । गुरुजी, आजून दोन टक्क्यांचा हिशेब करता येत नाही, म्हणजे काय ? कसलं शिकवता गणित ? वैज्ञानिक दृष्टिकोन कसला घडवतोस भारत? असंघटितांची कसली कविता तुझी गेली तेल लावता । आता गिळा आपलाच शेंबूड आपण । करा आनंद । आणि तुमी राव । बसले वंचितांच्या बाजूनं पाण्यात सगळा देह बुडवून । आणि वंचित निघाले व्यवस्थेचा बूट चाटत । मी पुरोगामी । मी पुरोगामी । पुरोगामी पुरोगामी । मी परिवर्तनवादी । परिवर्तनावादी । परिवर्तनवादी । म्हायतीच्या आधिकाराची पाटलोण नेमकी विरते बरं कां वंचितांच्या ढुंगणावर । तर असं तडकाफडकी कसं सांगतां येईल । म्हणजे पंचांग तर पहावंच लागेल । अक्षांश रेखांश शोधावे लागतील । त्यानुसार स्थानिक सूर्योदय सिद्ध करावा लागेल । प्रोसेसमध्ये खूप वेळ जाईल आधी एकापार नोंदवून या । नुस्ती बाई म्हणून नका । सहा महिन्यांची गरोगदर बाई म्हणा । तिच्यावर सामूहिक बलात्कार झाला म्हणा । चेहरा ओळखता येत नाही म्हणा । त्यामुळे कोणत्या समाजाची आहे ते सांगतां येत नाही म्हणा । असं काय करता राव? फुल्यांनी सांगितलं, तेच नाही कां सांगितलं सावरकरांनी? सावरकरांनी सांगितलं तेच सांगितलं नाही कां हेडगेवारांनी? तुम्ही फुल्यांचे नांव घ्या नि हेडगेवारांचं वगळा । हेडगेवारांचं घ्या नि आंबेडकरांचं वगळा । आंबेडकरांचं घ्या नि गोळवलकरांचं वगळा । कुठं काय फरक पडला का भौ? आणि कॉर्पोरेट एरियात आता कुठं काय राहिलंय ? जातबीत, धर्मबीर्म, गरिबीबिरीबी गेलं सगळं गंगार्पण । मधल्या मध्ये उगाचच काही लोक मचमच करतात । नि गंगेचे पाणी गढूळ होतं । चला आता आपण करू शुद्धिकरण । चला होऊ समरस। चलो स्वधर्म । तर आता इथं नगरीचे समस्त श्रोते, आज्ञाधारक, भाविक, चौकस वाटाडे हो । ऐका सावधाचित पुढील कहाणी श्रवणीय । तर एका गावात होता एक लट्या. दुसरा फट्या । त्यांना कोणी सांगितला नव्हता अंधार उपसायला । पण लट्याने घेतली सुपली । भरला अंधार । ओतला टोपलीत । फट्याने उचलली टोपली । आतून आला वेशीवर । लट्याने घेतली सुपली । भरला अंधार । ओतला टोपलीत । फट्याने उघळली टोपली । ओतून आता वेशीवर । लट्याने घेतली सुपली । भरला अंधार । ओतला टोपलीत । फट्याने उचलली टोपली । ओतून आला वेशीवर । म्हणतां म्हणतां पहाट झाली । कीर्तन संपलं । पण अंधार काही संपेना । पाहुणा काही उठेना । बौद्धिक काही शिजेना । तर सांगा आता फट्यासोबत गेलं कोण? लट्यासोबत राहिलं कोण? जो सांगेल बरोबर त्याला गुरुजी घेऊन जातील चारधाम यात्रेला संपत्ती का । उठा म्हणतां ना चला... चला... चला... याचे बा चला... चला... चला... उठा... हैक... हैक... हैक... काय तांब्याला, पितळेच्या भांड्यान्ला कल्हई करायचीचेSS ?

पडदा

तर हे असे नाटक मला जाणवलेले. आता वीरधवलच्या कवितेविषयी ह्या कवितेवर काही वेगळे भाष्य करायची तशी काही गरज नाही. ही कविता कलावादी, गूढगुंजनात्मक, क्लिष्ट अशी नाही. परिवर्तनवादी चळवळीशी संबंधित ही कविता थेट अर्थवाही आहे. कवीने ह्या कवितांमधून जी क्षेपणास्त्रे डागली आहेत, ती सर्व त्याला इच्छित अशा लक्ष्यांच्या अचूक भेद करून गेली आहेत. ही कविता कष्टकऱ्यांच्या, पीडित, शोषित, नागवले गेलेल्यांच्या नि विस्थापितांच्या बाजूने खंबीरपणे उभी राहाते. आणि राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक अधःपतनावर हल्ला चढवते.

कवितासंग्रहाची सुरुवात आदिमाया मूळभूमिकेच्या मंगलाचरणाने झाली आहे. ह्या मातीत ती आपले पाय रोवून खंबीरपणे बसली आहे. आजूबाजूच्या चौऱ्याऐंशी खेड्यांची ती स्वामिनी आहे. गाई-म्हशींच्या पहिल्या दुधावर, झाडावरच्या पहिल्या फळावर, नव्याच्या पहिल्या खिरीवर पाहिला हक्क तिचाच. तिच्याच आशीर्वादानं गावन्हाटी चालते. मात्र, अवदसेच्या ह्या काळात श्रद्धेचा केवळ देखावा उरला असून जीर्णोद्धाराचे नांव पुढे करून कोंकणातल्या अन्य काही देवस्थानंप्रमाणे केव्हाही हे देऊळ मांडले जाऊ शकते. वारुळ उखडून त्या जागीं देवीची घाटदार मूर्ती स्थानापन्न केली जाऊ शकते, लिलावाच्या नांवाखाली देवराईतले साग, शिसमाचे शंभर नंबरी नग लंपास होऊ शकतात हातोहात, आणि गूढ,

अतर्क्य भाषेतल्या श्रद्धेच्या या आत्मनिमग्न उत्सवाचे रुपांतर केव्हाही एखाद्या पर्यटन स्थळात होऊ शकते अशी साधार भीती कवीच्या मनात घर करून असावी, ही शक्यता नाकारता येत नाही.

'खऱ्या कवीला घाऊकपणे घालता येत नाहीत पायघड्या। कवितेच्या दलबदलू दलाल स्ट्रीटवर ।' हे सांगतांना जे जगतात एक आणि लिहितात एक, खोटे खोटे उमाळे काढून व्यवस्थेकडून फायदे उपटण्याच्या मागे सतत लागलेले असतात, अशा खोट्या कवींचा बुरखा फाडण्याचे एक आवश्यक ठरलेले असे काम कवीने ह्या संग्रहामधून केले आहे.

शिक्षणक्षेत्रावर प्रकाश टाकतांना, मूल्यशिक्षणाचा पुरता बोजवारा उडाल्याचे आणि शिक्षकसुद्ध पोटार्थी झाल्याचे कवी सूचित करतो. मुलांवर त्यांच्या बालवयातच पालकांकडून आणि गुरुजनांकडून संस्कार होणे आवश्यक असते. हेच संस्कार मुलांना जबाबदार नागरिक आणि उत्तम माणूस म्हणून घडवतात. त्यांच्यातल्या ओबडधोबडपणाला पैलू पाडतात. हेच संस्कार त्यांना आयुष्यभर पुरतात. पुढे घेऊन जातात. मुलांवर मुळात संस्कारच झाले नाहीत, तर ती भरकटतात. चंगळवादाच्या आणि इंटरनेटमधल्या कुप्रवृत्तींच्या नादी लागून वाम मार्गाला लागू शकतात. ह्या समस्येकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता कवीते सुचविली आहे.

गांधीजींच्या वस्तूंच्या संदर्भात कवी म्हणतो, 'सगळ्या प्रकारच्या विचारांच्या वाळवीपासून हे सारं सांभाळून ठेवणं ही काही साधी बाब नव्हे' उदा. 'फुल्यांनी सांगितलं, तेच नाही कां सांगितलं सावरकरांनी?' यातून राज्यकर्ते आणि त्यांचे प्रवक्ते जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करून जनसामान्यांचा बुद्धिभ्रम करताहेत हे कवी स्पष्ट करतो. समाजवादी चळवळीत ऐन उमेदित कार्यरत असतांना कवीच्या मनात धगधगत राहायचे प्रश्न आणि नकळत त्याच्या मनाचेही जाडेभरडे वस्त्र होऊन जायचे महात्माजींच्या पंच्याप्रमाणे. काळाच्या ओघात समाजवाद, गांधीवाद या नुसत्या भाकड गोष्टी झाल्या आहेत. बापूंजींच्या गोड गोष्टी वाचत निवांत पडून राहिलेल्या कवीला प्रश्न पडतो, की ते कसे काय म्हणाले, की, सत्याचा पराभव कधीच होत नसतो? दुर्दैवाने, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गांधीजी आणि त्यांचे विचार हे इथल्या राज्यकर्त्यांसाठी एक अडचणीची गोष्ट होऊन बसले. आणि सध्याच्या काळात तर त्यांचे आचार-विचार, त्यांचा स्वदेशीचा नारा हे सर्व म्हणजे लोकांसाठी जगण्यातली एक समृद्ध अडगळ होत चालली आहे.

एक काळ असा होता, की, कोंकण म्हटले, की, समाजवाद्यांचा बालेकिल्ला असे समीकरण ठरून गेले होते. (बॅ.) नाथ पै, (प्रा.) मधु दंडवते ह्यांच्या अभ्यासपूर्ण, निरपेक्ष आणि व्यापक देशहित लक्षात घेऊन केलेल्या भाषणांनी संसद गाजवली. एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, मृणाल गोरे, निळू फुले, पु.ल.देशपांडे अशा समाजधुरिणांच्या उन्नत विचारांचा पगडा इथल्या आबालवृद्धांवर होता. ह्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावायला प्रयत्न त्यावेळच्या सत्ताधारी काँग्रेसने हरतऱ्हेने केला. मात्र, इथल्या गरीब परंतु सूज्ञ विचारी मतदारांनी त्यांना प्रत्येक वेळी पराभूत केले. इंदिराजींच्या हत्तेनंतरच्या सहानुभूतीच्या लाटेत मात्र समाजवाद्यांचा प्रथम पराभव झाला. तो नंतर होतच राहिला. त्या काळात राज्यात व केंद्रात दोन्हीकडे काँग्रेसचीच सत्ता होती. त्यामुळे कोंकणातल्या त्यांच्या वारंवारच्या पराभवांमुळे विकासकामांच्या बाबतीत त्यांनी या भूमीचा दुःस्वासच केला. इथला भूमिपुत्र कायम दारिद्र्यातच खितपत पडला. नाथ पै, दंडवते यांनी पूर्ण देशाची काळजी वाहिली. त्यांनी तत्त्वाचे राजकारण व समाजकारण केले. त्यामुळे त्यांचे खंदे कार्यकर्तेसुद्धा त्यांच्याप्रमाणेच निर्धन राहिले. आणि त्यांच्या समान्य मतदाराची तर चूलसुद्धा पेटणे कठीण झाले. कवीच्याच शब्दात सांगायचे , तर, शेवटी प्रत्येकाच्याच घरातलं पीठ संपत आलं होतं. काँग्रेसपाठोपाठ शिवसेना आली. राजकीय खूनखराबा झाला. लोकांना विकासाचं गाजर दाखवून राज्यकर्त्यांनी सरंजामशाही उभी केली. लोकांच्या जामिनी, डोंगर बळकावले. मायनिंगवाल्यांनी पर्यावरणाचा व समृद्ध निसर्गाचा सत्यानाश केला. इथला भूमिपुत्र समाजजीवनातून पुरता बेदखल झाला. तत्त्वांना तिलांजली देण्याइतपत नैतिक अधःपतन झालेल्या इथल्या लोकांना मग कोंकण रेल्वेचे शिल्पकार ना. मधु दंडवते यांचाही विसर पडला. इतका, की, त्यांच्या पुण्यतिथीला त्यांचा फोटो मिळणेसुद्धा दुरापास्त झाले.

वैचारिक असहिष्णुतेचे उदाहरण देतांना कवीने, गायक अभिजितच्या 'फूटपाथ ही काय झोपायची जागा आहे?' या विधानाचा खरपूस समाचार घेतला आहे. अशाच आशयाचे एक विधान ('देशात कोठे आहे गरिबी?') एका लोकप्रतिनिधीने केले होते. खरं तर, अतिसुखोपभोगांच्या अत्याधिक आहारी जाऊन आत्मकेंद्रित बनलेल्या सुखासीन लोकांना, वस्तुस्थितीपासून कोसो मैल दूर असलेल्या लोकांना कष्टकऱ्यांच्या आणि दीनदुबळ्यांच्या जगण्या-मरण्याशी काहीही देणं-घेणं उरत नाही. आपल्या अवतीभवती किती जीवघेण्या समस्या 'आ' वासून आहेत, कोणावर कसला हृदयद्रावक, दुर्दैवी प्रसंग ओढवला आहे. याविषयी,

वैचारिकदृष्ट्या उथळ व गरिबांच्या जखमांवर मीठ चोळणारी विधाने करतांना ह्या गुलछबू लोकांना काहीच दिक्कत वाटत नाही. ह्या कवितासंग्रहात, कवीने चातुर्वर्ण्यव्यवस्थेतला ब्राह्मणवाद तसेच राज्यकर्त्यांचे कर्तव्यच्युत होणे या गोष्टींवरदेखील मार्मिक टीका केली आहे.

'घर' ही कविता कवीच्या द.सा.द.शे ह्या संग्रहात समाविष्ट आहे. 'घर' ही प्रतिमा देशाची सद्यःस्थिती दर्शवते. वाढती लोकसंख्या, बेकारी, महागाई, जातीय व धार्मिक तेढीतून वारंवार घडणाऱ्या दंगली त्यांतून सार्वजनिक वापरातल्या साधनसामग्रीची तसेच जीवितांची होणारी हानी, भ्रष्टाचार, बलात्कार, देशाच्या सीमा असुरक्षित असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, राज्यकर्त्यांचे 'प्रेतांच्या टाळूंवारचे लोणी खाणे', कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नसणे अशा अराजकाचे व बंधुतेमध्ये 'कटुता' निर्माण झाल्याचे वास्तव दर्शन या प्रतिमेतून होते.

कवीची लेखनशैली ही तीव्र उपरोधिक आहे. शिवाय तींत नर्मविनोदही दडला आहे. उदा. (१) 'कधी मराठीचे प्राध्यापक भेटतात । त्यांना संतसाहित्य वगैरे प्राचीन पेपर असल्यानं अर्वाचीन वगैरे टच् नसतो ।' उदा. (२) काच खाऊन मुखदर्शनावरच मानलं समाधान । (द.सा.द.शे.) उदा. (३) मुतून घ्या इथेच । गाडी प्रायव्हेट आहे । थांबणार नाय । उदा. (४) म्हणजे वेळ पडली तर आम्ही सगळे आहोतच तुमच्या पाठीशी । रान तर उठवता येईलच । पेटवताही येईल । तशी तर साने गुरुजींची ही कविता । अधूनमधून शाळेत । मी खूप आत्मीयतेने शिकवत असतोच ।

कोंकण हा निसर्गसंपन्न, सौंदर्यसंपन्न प्रदेश असल्याने इथल्या प्रत्येक कवी-लेखकाच्या गुणसूत्रांमध्ये तो विपुल प्रमाणात आहे. वीरधवलसुद्धा निसर्गकवी आहे. हे त्याच्या 'मोरांचे आवाज' (द.सा.द.शे) व 'मायनिंग विरोधातील कळणे' ह्या कवितेच्या क्र. १ च्या भागातून सहज स्पष्ट होते. हा चिमण्यांचा आवाज । ही झाडांची हिरवीगर्द लुसलुशीत कोवळी पालवी । माडापोफळींचा सर्वदूर पसरलेला हा केवळ नि केवळ मांडव । ह्या साध्या सुध्या शब्दांत तो वाचकाच्या डोळ्यांसमोर एक निसर्गचित्र उभे करण्यात यशस्वी होतो.

अखेरीस, 'उच्चारीतच निषेधाचा एकतरी शब्द' म्हणणारा हा कवी व्यवस्थेकडून पराभूत होतो आणि कबूल करतो, की, 'शेवटी अकलेचे बुडबुडे फुटलेच । सापेक्षतेच्या धादांत भुईवर । प्रज्ञेच्या टोकावर सुईचे नेढे मोडले ।' 'हुच्च...' या कवितेत तर तो वेडाच्या सीमारेषेवर पोहोचते मानसिक संतुलन बिघड्यामुळे असंबद्ध बडबड करतो. जशी की, 'सिंहासन' चित्रपटातला पत्रकार (ज्याची भूमिका निळू फुले यांनी वठवली आहे) सत्तेच्या सारीपाटात चालणाऱ्या बेरकी, कोडग्या , निर्दय राजकारण्यांच्या चाली-प्रतिचाली आणि त्यातूनच मग ज्येष्ठ, वयोवृद्ध समाजधुरिणांची होणारी मुस्कटदाबी, डिकास्टासारख्या प्रामाणिक, निडर कामगार नेत्याची झालेली हत्या पाहून हादरतो व त्याला वेड लागते. इथे सुद्धा कवीच्या बाबतीत तेच घडतांना दिसते.

आरंभीच्या अवतरणात कवी म्हणतो, 'कविता असते कवीसाठी एक अवघड स्थिती । सतत ताणलेल्या प्रत्यंचेसारखी। आणि एका निगूढ गुहेच्या दाराशी । भली मोठी शिळा असावी, तशी ।'

ह्या अवतरणातही सतत ताणलेली प्रत्यंचा ही कवितेसाठी कवीला सोसाव्या लागणाऱ्या परिस्थितीजन्य ताणतणावांची, शारीरिक हालअपेष्टांची व त्याच्या संवेदनक्षमतेची निदर्शक आहे. सतत ताणलेली प्रत्यंचा आणि निगूढ गुहा या दोन उपमांमधून अनुक्रमे दोन क्रिया सूचित होतात. त्या म्हणजे 'वेध घेणे' आणि 'शोध घेणे'. कवी हा द्रष्टा असतो. आपल्या दूरगामी बुद्धीच्या साह्याने तो भविष्यात वाढून ठेवलेल्या घटितांचा / अघटितांचा वेध घेत असतो. तसेच मोठ्या धाडसाने, यत्नपूर्वक अथवा अगदी सहजपणे भावरहित, स्थितीशील, प्रकाशाला मज्जाव करणारी अशी मायावी शिळा दूर सारून तो गुहेच्या आंतल्या गूढ रहस्यांचा, सत्याचा शोध घेत असतो. म्हणजेच जनसामान्यांच्या बुद्धीतला जडपणा दूर सारून त्यांच्यासाठी कवितेचे दालन प्रकाशमान करीत असतो. आणि खऱ्या कवीने हेच तर करायचे असते.

'मम म्हणा फक्त -', वीरधवल परब,लोकवाङ्मयगृह, मुंबई, पृष्ठे ११२, किंमत १५० रुपये.

। डॉ. अनिल धाकू कांबळी
मु.पो.नांदगाव - ४१६ ६१८
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग
दूरभाष : ०२३६७-२४८६१६
भ्रमणभाष : ९६०४३५९५१७

।। पुस्तक परीक्षण ।।

अनुभूतीची मानवतावादी मांडणी

संदीप जगदाळे

■ ■ ■

"दैत्यांनी असुरांनी झापटलेल्या युगात आपण आयुष्य कंठत आहोत. लवकरच असा काळ येईल, की चांगलं काही करायचं झालं तर, एखादा गुन्हा करत आहेत की काय, असं समजून तो गुप्तपणानं दडवून करावा लागेल" - फ्रान्झ काफ्का

वरिल विधान काफ्काने साधारणतः मागच्या शतकाच्या सुरुवातीस केले होते. हे शतक उलटून १६ वर्ष होत असताना आपली प्राप्त परिस्थिती नक्कीच या विधानाच्या शेवटास येऊन ठेपली आहे. १९८० च्या दशकामध्ये आपल्याकडे धिम्यागतीने आर्थिक उदारीकरणाने प्रवेश करण्यास सुरुवात केली. १९९० नंतर आपण गॅटवर केलेल्या स्वाक्षरीने या प्रक्रियेस आपल्या देशात प्रचंड वेग दिला. मागच्या वीस-पंचवीस वर्षात बदलांनी घेतलेली गती सर्वांनाच गोंधळात टाकणारी आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यातून स्वतःला 'समाजवादी लोकशाही' म्हणवणारी आपली व्यवस्था 'भांडवलशाही लोकशाहीत' रूपांतरीत झालेली दिसते. सर्व सत्ताकेंद्र भांडवलदार वर्गाने प्रभावाखाली आणल्याने सर्वसामान्य माणूस अमर्याद शोषणाचा बळी ठरत आहे तसेच हा सामान्य माणूस या शोषणाच्या प्रतिवाद करण्यास अपयशी ठरतोय. शोषणाच्या विरोधात आवाज तीव्र करणाऱ्या कष्टकरी, कामगार, शेतमजुर, शेतकरी यांच्या चळवळी संपवण्याचा अथवा भ्रष्ट करून दडपण्याचा वर्तमान आपण अनुभवत आहोत. यातून माणसाची फरफकट होऊन तो हतबल झाला आहे, निष्क्रिय होऊन जगण्याशिवाय त्याच्यासमोर पर्यार उरलेला नाही. एकीकडे प्रचंड मोठ्या प्रमाणात असलेली वस्तुभांडारे अन् त्याचवेळीस दुसरीकडे प्राथमिक गोष्टींचाही अभाव हा विरोधाभास दिवसेंदिवस वाढतच आहे. गेल्या अडीच दशकात झालेल्या माध्यमक्रांतीने जाहिरातबाजीच्या नफेखोर वापरातून सर्व गोष्टींचे वस्तूकरण केले आहे. यामुळे माणसामाणसातील संबध व्यवहाराच्या पातळीवर शिल्लक आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून ग्राहकांच्या गरजा ठरवण्याचा अधिकार उत्पादक वर्गाने नियंत्रित केला आहे. इंटरनेटसारख्या संपर्क माध्यमाने फेसबुक, व्टिटर, व्हॉट्सअप इ. मार्गाने सामान्य माणसास आभासी वास्तवात गुरफटून त्यास भावनिक दृष्ट्या गोठवून टाकले आहे. लोकशाहिचा आधार असणारा हा माध्यमस्तंभ कोसळून पडत आहे. खाऊजाच्या या रेट्यातून गावखेड्यातील शेतीकेंद्रीत पारंपारिक व्यवस्थादेखील विस्कळीत झाली. शहरातील अनेक विकृती गावखेड्यात पाय पसरत आहेत. शहरी झगमगाटाला भुलून गावातून शहराकडे मजुरीच्या शोधात स्थलांतरीत होणाऱ्यांची संख्या वाढून, नैसर्गिक संकटे तसेच केवळ मध्यमवर्गीय केंद्रित आर्थिक धोरणांमुळे शेतीव्यवसाय आतबट्ट्यात आला आहे, यातून शेतीविषयीची परात्मता वाढत आहे. तसेच विकासाच्या नावाखाली उद्योगांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी वाट्टेल त्या नैतिक-अनैतिक मार्गाने

अनुक्रमणिका

मिळवून देण्याचे सरकारी धारेण शेती व्यवसायावरील मोठे अरिष्टच म्हणावे लागेल.

या सर्व उलथापालथीचा अन् गोंधळाचा परिणाम आपल्या कलाजीवनावरही झालेला दिसून येतो. यादृष्टीने मराठीतील १९९० नंतर लिहण्यात आलेली कविता महत्त्वाची आहे. नव्वोदोत्तरी कवितेतील जाणीव साठोत्तरी कवितेच्या प्रवाहातील असली तरी साठोत्तरी कवितेपेक्षा ही कविता अधिक प्रातिनिधिक आहे. वेगवेगळ्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक वातावरणातून येणारे कवी या पिढीत लेखन करताना दिसतात. असे असले तरी प्रमुख भारतीय भाषेतील समकालीन कवितेच्या तुलनेत मराठी नव्वोदोत्तरी कवितेला तितकेस सशक्त राजकीय विधान करून शकली नाही, तसेच अभासी वास्तवाच्या संकटास ही कविता अभावानेच टिपते. तरीही या कवितेस आपणास निव्वळ प्रतिक्रियावादी ठरवता येणार नाही व तिचे महत्त्व ही नाकारता येणार नाही.

अनिल धाकू कांबळी हे नव्वोदोत्तरी पिढीतील स्वतंत्र जाणिवेची कविता लिहिणारे एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचे दोन कवितासंग्रह आजपर्यंत प्रकाशित झाले आहेत. पहिला संग्रह 'रंगहोळी' (१९९८) व दुसरा 'किलकिल्या उजेडाची तिरीप'(२०११) यापैकी 'किलकिल्या उजेडाची तिरीप' या कवितासंग्रहातून त्यांची कविता अधिक सकसपणे समोर येते.

सामाजिक पर्यावरण : 'किलकिल्या उजेडाची तिरीप' या कवितासंग्रहातून केलेले अनुभावचे प्रकटीकरण हे ग्रामीण कोकणातील आहे. पाठराखणीत समीक्षक दिगंबर पाध्ये यांनी म्हटल्याप्रमाणे ''या कवितेत येणारे जीवनाचे संदर्भ ग्रामीण कोकणातले असले तरी तिला आपण 'ग्रामीण' या विशेषणात बंदिस्त करू शकत नाही, तसेच अ नागर जगण्याचे चित्रण करावे, त्यांचे प्रश्न मांडावेत हा या कवितेचा उद्देशच नाही. हे अ-नागर जगणे काळाच्या रेट्यात कसे बदलत आहे याची प्रतिक्रिया ही कविता देते.''

ग्रामीण परिवेषाच्या संदर्भात आजवर लिहिण्यात येणाऱ्या कवितांमध्ये सातत्याने फक्त शेतीशी संबधित प्रश्नाचे व स्थितीचे चित्रण मांडले आहे. शिवाय या प्रकारच्या बहुतेक कवितेमध्ये शेतकीसंबंधीत अनुभवाचे प्रकटीकरण केवळ भावनिक स्तरावर झालेले दिसते. खूप थोडी ग्रामीण कविता ग्रामीण जगण्यातील भौतिक प्रश्न हाताळताना दिसते. तसेच गावखेड्यात असाही लोकसमूह वावरत असतो जी शेती न करता शेतीपूरक व्यवसाय करतो अथवा शेतीशी संबंधित नसणारे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतो. असा लोकसमूह ग्रामीण कवितेने मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित केला आहे. परंतु अनिल धाकू कांबळी यांची कविता यास अपवाद ठरते. या कवितासंग्रहामध्ये मुस्लिम समाजातील कष्टमय जगणे, अंतर्विरोध, श्रद्धा-अंधश्रद्धा यांची सशक्तपणे दखल 'रफिक', 'औरत', 'उस्मानचा परतले हजवरून', 'कफन', 'हा जो कलकलाट आदळतोय कानावर', 'फकिर' यासारख्या कवितांमधून घेतली आहे. यामध्ये येणारे पात्र हे रीक्षा चालवणे, मासळी विकणे असे छोटे व्यवसाय करून पोट भरणारे आहेत. विकासाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रवाहातून दूर लोटण्यात आलेल्या अल्पसंख्याक समाजाच्या दुरावस्थेचे प्रतिनिधित्व या कविता करतात.

'आमच्या घरी येऊन
चाचांनी आम्हाला दिली अत्तराची कुवी
आणि दिले खजूर, झमझमचं पणी
मियाज म्हणुन' (उस्मानचा परतले हजवरून, पृ.३१)

किंवा

'आमच्या गावातल्या भैरीच्या जत्रेत
खडेखडे लाडू खात, पेपरं वाजवीत
तो भिरभिरला होता... फुलपाखरांसारखा' (रफिक, पृ. २८)

यासारख्या ओळींमधून मुस्लिम समाजाचे गावागाड्यातील इतर समाजांशी पिढ्यानपिढ्या असणारे एकात्मतेचे अनुबंध दिसतात. पहिल्याच कवितेमध्ये कवीच्या आईला दूध येत नसताना जातीपातीचा विचार न करता स्वतःच दूध पाजून कवीस वाढवणाऱ्या 'थोरली आये' चे चित्रण आले आहे. हिंदू-मुस्लिम समुदाय गावगाड्यात हजारो वर्षांपासून एकत्र नांदत असल्याने या दोन भिन्न समुदायात सण, उत्सव, आचरण पद्धती, श्रद्धा, भाषा, खाणपाणाच्या पद्धती यांच्या परस्परावरील प्रभावतून सांस्कृतिक अभिसरण घडून आले आहे. कवितांमध्ये आलेले कजरची नमाज, कफन, नियाज, हाजीसाब, उस्मानचा, सैतान, झमझमचं पाणी यासारखे शब्द कवीवर झालेले मुस्लिम भाषिक संस्कार दर्शवतात.

इंग्रज आमदनीमध्ये भारतात आलेल्या नगदी पिकांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा संबंध पहिल्यांदा औद्योगिक भांडवली व्यवस्थेशी आला. हरितक्रांतीनंतर रासायनिक खते, किटकनाशके, कारखान्यात बनलेली शेतीची अवजारे, संकरित बियाणे यांचा शिरकाव बांदाच्या आता झाला. यातून ग्रामकेंद्रीत असणारी गावाची उद्योग अन् अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली. पुढे शेतीचे झालेले तुकडीकरण तसेच सततची

अनुक्रमणिका

नापिकी, शेतकरी विरोधी सरकारी भूमिका या कारणांमुळे शेतकरीही शेतीपासून परात्म होऊ लागला. यामुळे रोजगाराच्या शोधात गावातून शहराकडे स्थलांतर सुरू झाले. कोकणातूनही रोजगाराच्या शोधात मुंबईकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर सुरू असते. या स्थलांतराचा विपरित परिणाम आपल्या कुटुंबसंस्थेवरही झाला आहे. जागतिकीकरणाने आपली समाजातील, कुटुंबातील समूहभावना नष्ट केली आहे. आज प्रत्येक व्यक्ती म्हणजे एक स्वतंत्र समाज आहे की काय, असे वाटण्याइतपत आत्मकेंद्रीतता वाढली आहे. कोकणातून रोजगारासाठी मुंबईस गेलेले कुटुंब सदस्य पाठीमागे गावात सोडून गेलेल्या वृद्ध कुटुंबसदस्यांकडे दुर्लक्ष करू लागले यामुळे मुंबईस गेलेल्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असणाऱ्या वृद्धांच्या गावात हालअपेष्टा सुरू झाल्या. कोकणातील स्थलांतरातून आलेल्या यासर्व ताणतणावांची नोंद अनिल धाकू कांबळी यांची कविता पहिल्यांदाच घेते.

वर म्हटल्याप्रमाणे अति-आत्मकेंद्रिततेतून आपल्या नात्यागोत्यातील तसेच शेजारच्या व्यक्तींशीही आपले काही देणेघेणे नाही अशी भावना लोकव्यवहारातून बळावताना दिसते. याचा प्रत्यय 'तुझ्या करुणार्त बोलांनी', 'दिवसभरात' या कविता वाचताना येतो.

या सर्व विषम वातावरणात दारिद्र्याच्या अवस्थेस पोहचलेल्या समाजाचे चित्रण 'पहिलटकरीण', 'वांगड', 'पुरेपुर उपभागलं बापाचं मरण', 'तुमचे शंभर रुपये' या कवितांमधून झाले आहे. ग्रामीण समाजाच्या धर्म व आचरणविषयक संकल्पना अनेक श्रद्धा-अंधश्रद्धांनी युक्त असतात. गावातून झालेली नवीन सुशिक्षित पिढी या धर्मविषयक अंधश्रद्धेवरती प्रश्नचिन्ह निर्माण करु लागली आहे. या धर्मवादी अंधश्रद्धाविषयक मानसिकतेवर आधारित 'देवगायी आणि देवमाणूस' 'लहानात लहान माणूस' या महत्त्वाच्या कविता आहेत, तसेच 'पाते' व 'रफिक' या कविताही काही प्रमाणात याप्रकारचे सूचन करतात. कवी हा वैद्यकीय व्यवसायात आहे. त्याचे व्यावसायिक व सामाजिक चरित्र सातत्याने कवितेमध्ये येते. यावरून हा कवी दैनंदिन व्यवहारात समाजाच्या सुख-दुःखात समरस होऊन आपले संवदेनशील प्रकटीकरण करत आहे हे समजते. जवळ-जवळ सर्वांनीच या विरोधी काळास प्रतिरोध करणारे काहीच बोलायचे नाही अशी भूमिका घेतली असली तरी कविता ही सर्वसामान्य माणसाच्या शोषणाच्या विरोधात हस्तक्षेप नोंदवत असते. परंतु आपल्या आजूबाजूला असणाऱ्या दीनदुबळ्यांसाठी आपण कविता लिहिण्याशिवाय दुसरे काहीच करू शकत नाही ही हतबलता कवीचा पिच्छा सोडत नाही. याचीच कबुली कवी येथे देतो -

ह्या तुझ्या करुणार्त बोलांनी
दुसरं-तिसरं काहीच घडणार नाही
आवशी
ह्या दुबळ्या कवितेशिवाय (ह्या तुझ्या करुणार्त बोलांनी, पृ. ७)

'लाव्हा', 'अश्वत्यामा', 'वेंगुर्ल्याच्या रेस्ट हाऊसच्या कट्ट्यावरून', 'कदाचित', 'कळत नाही', 'उपसा' या कविता आत्मकेंद्रिततेकडे नेतात. परंतु यातील आत्मीयचिंतन हे कवीला समाजापासून तोडून विजनवासाच्या स्वप्नाळू बेटावर घेऊन न जाता ते एक समाजशील माणूस म्हणून स्वतःतील सत्व तपासण्याची मानवतावादी भूमिका घेते.

एकूणच कोकणातील ग्रामीण जीवनाची पडझड टिपताना तेथील धर्मविषयक, जातीविषयक, स्त्रीविषयक, समाजअंतर्गत सहसंबधविषयक पर्यावरण या कवितांमध्ये येते.

स्त्रीरूपांचे आकलन अनिल धाकू कांबळी यांच्या कवितांमध्ये सत्तासंपत्तीच्या हक्क नाकरण्यात आलेल्या विविध जातीय व धर्मीय संवर्गातील स्त्रिया भेटतात. कौटुंबिक नात्यातून, रुग्ण म्हणून आलेल्या म्हाताऱ्या स्त्रिया, कष्टकरी मुस्लिम स्त्रिया अशा तीन सूत्रांनी ही कविता स्त्रीरूपे घेऊन आपणासमोर येते. कौटुंबिक नात्यातून येणारी स्त्रीरूपे 'थोरली आये', 'पाते', 'आवसान' या कवितांमध्ये आली आहेत. यामध्ये आपल्या परंपरागत कुटुंबसंस्थेत स्त्रियांचे असणारे दुय्यम स्थान, तिच्या सहजभावनांचा झालेला मृत्यू, पुरुषसत्ताक मानसिकतेचे तिच्यावर असणारे नियंत्रण तसेच अंधश्रद्धेच्या माध्यमातून तिला देण्यात येणारे दूषण याचे सूचन करण्यात आले आहे. याचबरोबर कुटुंबसंस्थेत रुढीजन्य विषमतेच्या केंद्रस्थानी असणारी ही स्त्री आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या मात्र सक्षमपणे पेलताना दिसते. वैद्यकीय व्यवसायाच्या निमित्ताने कवीकडे रुग्ण म्हणून येणाऱ्या म्हाताऱ्या स्त्रिया शरीराने, मनाने व परिस्थितीने खचलेल्या आहेत. यादृष्टीने 'एव्हाना', 'तुमचे शंभर रुपये', 'या तुझ्या करुणार्त बोलांनी' इ. कविता महत्त्वाच्या आहेत. वृद्धापकाळामध्ये कुटुंबातील इतर सदस्यांनी केलेले दुर्लक्ष आर्थिक ओढताण, आजारपण यातून आलेल्या हतबलतेमुळे त्यांची जगण्यावरची निष्ठा कमी झालेली आहे. वृद्धत्वाच्या काळात आलेले निराधारपण इथे मांडण्यात आले आहे.

म्हातारीच्या काटकुळ्या पाठमोया आकृतीवरून
सहजच माझं लक्ष तपासणीच्या टेबलकडे गेलं
तिच्या डोळ्यातून घरंगळलेल्या अश्रूंपैकी एक

अनुक्रमणिका

उशीवर विसावला होता
तो अश्रू
मला तिच्यासारखाच एकाकी आणि निराधार वाटू लागला (वांगड, पृ. ८)

'कफन', 'दिवसभरात हा जो कलकलाट आदळतोय कानावर' या कवितांमध्ये असणारी स्त्री कुटुंबाच्या उदनिर्वाहासाठी आर्थिक मिळकतीचा मासे विकण्याचा व्यवसाय करते. मुस्लिम समाजातील जुम्माबी, जुबेदा, साबीरा, मरियाबी, ह्यात, फातिमा, रहिमतबी, रुकीया, दिलशाद, रविया इ. पात्राच्या रूपाने या स्त्रिया कवितेत येतात. कुटुंबासाठी आर्थिक मिळकत करणारी व्यक्ती व परंपरेने स्त्रियांना दिलेली कुटुंबविषयक जबाबदारी या दोन्ही गोष्टीचे त्यांना असलेले भान या संवादातून जाणवते. त्यामुळे ती अधिक कणखर व जगण्याविषयी स्पष्ट बनली आहे. इतर कवितांपेक्षा या तीन कवितांमध्ये आलेली स्त्रीरूपे जगण्याला अधिक आत्मविश्वासाने सामोरे जातात.

या सर्व स्त्रियांच्या जगण्याला वाङ्मयीन चेहरा देत असताना कवी येथे नुसती प्रतिक्रिया देऊन थांबत नाही तर यासर्व परिस्थितीच्या अनुषंगाने प्रश्नही उपस्थित करतो ते या प्रश्नार्थक प्रकटीकरणातून जाणवते -

माझ्या आवशे
तुझ्या केसांच्या झिंजोट्यात
जेवढ्या म्हणून ऊवा-लिखा असतील
तेवढी तुझी मरणे झालीयत का मरून?
कुठल्या उकिरड्याच्या डोंगराखाली पुरून ठेवली आहेस
तू तुझी ओळख; तहानभूक ?
भंगलेपणाच्या आकांत डोहात डुबून मनमुराद
कुठल्या युगारंभापासून चालत आलीयस इथवर
नि कोणत्या दिशांताला चालली आहेस ?
काळाच्या नेमक्या कोणत्या बिंदूवर उभी आहेस तू?
(आता कोणत्याही क्षणी, पृ. १७)

संग्रहातील इतर कवितांपेक्षा स्त्रीरूपे दर्शवणाऱ्या कविता या अधिक संवादी आहेत. यामधील स्त्रिया त्यांच्या बोलीभाषेतून त्यांचे जगणे मांडतात. कवितेमध्ये येणारे संवाद कवितेच्या अंतर्गत गरजेपोटी आल्याने कवितेत अधिक सहजता येते.

देशीरूपबंध : अनिल धाकू कांबळी यांच्या कवितांमध्ये स्थानिक बोलीभाषेचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला आहे. मालवणी आणि स्थानिक मुस्लिम समुदायाची मालवणी व हिंदी यांच्या प्रभावातून निर्माण झालेली हिंदीसदृश्य बोलीभाषा याप्रकारच्या दोन बोलीभाषा आल्या आहेत. ही गोष्ट आपली भाषिक विविधता व संपन्नता दर्शवणारी आहे. कवितेचे प्रतिमाविश्व तिचा वावर असणाऱ्या लोकतत्त्वातून येते. याशिवाय वेगवेगळ्या श्रद्धा-अंधश्रद्धा, लोकसमज, मिथक यात येतात. 'आता कोठेच धावत नाही मन' या कवितेमध्ये कवितेच्या गरजेनुसार मूळ शब्दांमध्ये फेरबदल करून अभंगाचा वापर करण्यात आला आहे.

'आता कोठेच धावत नाही रे मन
देखोनिया तुझे चरण
खिळलेले विटेशी
अठ्ठावीस युगांसाठी' (आता कोठेच धावत नाही मन, पृ. ४६)

सदर संग्रहामध्ये बोलीभाषा, मिथक, अभंग, श्रद्धा - अंधश्रद्धा, लोकसमज, प्रतिमा - प्रतिके या प्रकारच्या देशी रूपबंधाची रचना करण्यात आली आहे. यातून भाषा, धर्म, परंपरा, विविध सांस्कृतिक सहसंबंध यांच्या एकसमानतेची कवीला असणारी जाणीव सातत्याने जाणवते.

अनिल धाकू कांबळी यांच्या 'किलकिल्या उजेडाची तिरीप' या कवितासंग्रहामध्ये असणारी संवादात्मकता, अनुभवाचा अस्सलपणा, अकृत्रिमता, सहजता या सर्व गोष्टी या कवितेला अधिक महत्त्वाची बनवतात. आपण जिवापाड जपत असलेले सत्वशील जगणे लोप पावत जाण्याच्या याकाळात ही कविता या पडझडीला नुसती प्रतिक्रिया देऊन थांबत नाहीतर या पडझडीतही शिल्लक असणाऱ्या मानवतावादी मूल्यांचा पुनर्शोध घेते. या कवितासंग्रहातील शेवटच्या जवळ जवळ सात - आठ कविता या कवितासंग्रहातील इतर कवितांच्या तुलनेत वेगळ्या जाणवतात. या शेवटच्या काही कविता कवी पहिला कवितासंग्रह 'रंगहोळी'च्या प्रभावाखाली असणाऱ्या आहेत. हे त्यांच्या रूपबंधावरून जाणवते.

'किलकिल्या उजेडाची तिरीप' या कवितासंग्रहामध्ये अनिल धाकू कांबळी यांना स्वतःच्या कवितेची जमीन सापडली आहे. येणाऱ्या काळात हा कवी यापेक्षाही महत्त्वाची कविता आपल्याला देईल असा विश्वास वाटतो.

'किलकिल्या उजेडाची तिरीप', अनिल धाकू कांबळी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठे ८२, किंमत १०० रुपये.

। संदीप शिवाजीराव जगदाळे
'झाड' अन्नपूर्णानगर, पैठण
ता. पैठण, जि. औरंगाबाद.
भ्रमणभाष : ७७०९७०६८४७

अनुक्रमणिका

।। पुस्तक परीक्षण ।।

चार पिढ्यांच्या आंबेडकरी कवितेचा वेध

डॉ. अशोक रा. इंगळे

'आंबेडकरी कविता' हा डॉ. पद्माकर तामगाडगे यांनी संपादित केलेला अलिकडचा काव्यग्रंथ आहे. निर्मिती संवाद कोल्हपूरद्वारे १४ ऑक्टोंबर २०१४ मध्ये प्रकाशित झालेले एकूणच मराठी कवितेच्या दालनातील कवितांचे हे बहुमूल्य संपादन आहे. अनेक संपादने प्रसिद्ध झालेली आहेत. हे संपादन आंबेडकरी प्रेरणेतील कवींच्या चार पिढ्यांचा एकत्रित मिलाप घडवून आणणारे आहे. जागतिकीकरणाचा विशेष संदर्भ घेऊन आलेले हे संपादन अनेकांगाने वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. आंबेडकरी कवितेतील जुन्या व नव्या पिढींच्या दिग्गज कवींना एकत्रित गुंफल्याबद्दल मी प्रथमतः डॉ. पद्माकर तामगाडगे यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

आंबेडकरी कविता हे जागतिकीकरणाच्या कालखंडात प्रकाशित झालेले महत्वपूर्ण संपादन आहे. कारण या कालखंडातच समाज, संस्कृती व साहित्य यामध्ये फार मोठे स्थित्यंतर घडून आले. दलित साहित्याच्या संज्ञा संकल्पनेतील बदल हे त्यातील महत्वाचे स्थित्यंतर म्हणता येईल. समाज आणि साहित्यातील या नव्या स्थित्यंतरामुळे आज दलित कविता हे नामभिधान मागे पडून या प्रवाहाने आंबेडकरी कविता हे नामाभिधान स्वीकारलेले आहे, दलित कविता ते आंबेडकरवादी कविता या स्थित्यंतरात केवळ नावाचाच फरक आहे असे समजून चालत नाही तर त्यात तात्विक फारकत आहे. शिवाय दोहोंच्या अभिव्यक्ती पद्धतीतही मोठे अंतर आहे. आणि कालानुरूप त्याचे अगत्य देखील आहे. हा प्रवाह चार पिढ्यांच्या अभिसरणाचा कालखंड आहे. पहिली पिढी ते चौथी पिढी अव्याहतपणे लिहीत आहे. पहिल्या पिढीतील कवी अजून नव्या धाटणीने व नव्या प्रेरणेने कालसुसंगत लिहीत आहेत. (आंबेडकरी कविता, पृ.१२) डॉ. तामगाडगे यांचे उपरोक्त मत आंबेडकरी साहित्याच्या संज्ञा संकल्पनेविषयीचे असून, आंबेडकरी कवितेची ठोस भूमिका स्पष्ट करण्यासाठी ते पुरेसे आहे. त्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथातील संपादकीय मनोभूमिका बोलकी असून; आंबेडकरी कविता या संज्ञेबद्दलची परखड भूमिका त्यातून दृग्गोचर होते.

डॉ. पद्माकर तामगाडगे यांनी संपादित केलेल्या आंबेडकरी या ६०० पृष्ठांच्या बृहद अशा काव्यसंग्रहामध्ये एकूण १०९ कवींच्या अल्प परिचयासह २९९ कविता समाविष्ट केलेल्या आहेत. त्यात सर्व प्रवाह अंतर्गत जुन्या व नव्या कवींसह चार पिढ्यांची कविता संकलित झाली आहे. सदर संग्रह कवितेसाठी आयुष्यपणाला लावणाऱ्या आईच्या स्मृतीसोबत, चळवळीत वैचारिक सारथ्य करणाऱ्या कवींच्या लेखणीला अर्पण केलेला आहे. संपादकाचे अभ्यासपूर्ण व चिंतनशील मनोगत आणि अर्पण पत्रिकेवरून डॉ. पद्माकर तामगाडगे यांची वैचारिक मनोभूमिका स्पष्ट होते. वस्तुतः

अनुक्रमणिका

संपादित केलेला प्रस्तुत काव्यग्रंथ आणखी मोठे झाला असता जर १९७८ साली कवी केशव मेश्राम यानी संपादित केलेल्या विद्रोही कविता या काव्यग्रंथातील काही कवी व यांच्या कविता डॉ. तामगाडगे यांनी सदर संपादनात समाविष्ट केल्या असत्या तर. पण ते विस्तारभयास्तव टाळल्याचे डॉ. तामगाडगे स्वतः नमूद करतात. तद्वतच मराठी दलित कविता ह्या साहित्य अकादमी प्रकाशित ग्रंथाअंतर्गत अनेक महत्वपूर्ण कवींचा अंतर्भाव राहून गेला होता, तो बराचसा दूर करण्याचा प्रयत्न आंबेडकरी कविता या संपादकाने केला आहे. त्यादृष्टीने प्रस्तुत संपादन अनेक अलक्षित कवींना सामावून घेणारे ठरल्याचे प्रत्ययास येईल.

'आंबेडकरी कविता' या संपादित काव्यसंग्रहाद्वारे डॉ पद्पाकर तामगाडगे यांनी नव्वदोत्तर आंबेडकरी कविता कुठल्याच अंगाने आर्वतात सापडलेली नाही हे सिद्ध करून; भलावणीकार मराठी समीक्षकांना आपल्या कृतीतून चोख उत्तर दिले आहे. प्रस्तुत संग्रहात बाबुराव बागूलांपासून तर अलिकडे लिहू लागलेल्या विजय मोहिते व डॉ. भास्कर पाटलांपर्यंतच्या चार पिढ्यांची कविता अंतर्भूत झालेली आहे. 'वेदाआधी तू होतास' हा बाबुराव बागूलांचा कवितासंग्रह २००४ साली प्रसिद्ध झाला. आणि पुन्हा एकदा हा कवितासंग्रह मराठी कवितेची दिशा बदलण्यास कारणीभूत ठरला. असे म्हणता येईल. कारण आजवर मराठी साहित्यविश्वातील उच्चमध्यमवर्गीत न रुजलेले माणूसपणाचे मूल्य वेदाआधी तू होतास या कवितासंग्रहाद्वारे जोरकसपणे रुजविण्याचा प्रयत्न केला. खरं म्हणजे या देशात आजतागायत वर्णाला, जातीला, दगडांच्या देवांना किंमत आहे व यापूर्वीही होती, पण माणसाला किंमत नव्हती. म्हणूनच इथला माणूस हजारोवर्ष व्यवस्थेपुढे चिरडला व नागवला गेल्याची सल उत्कटतेने बागूलांच्या कवितेतून प्रकट होते.

ही कविता माणसाच्या सर्वांग चेतनेला आव्हान देणारी सजीव कविता आहे. राजा ढाले हे अनियतकालिकाच्या चळवळीतील महत्वाचे कवी. शिवाय ते दलित पँथरच्या चळवळीचे संस्थापक कार्यकर्तेअसल्यामुळे, त्यांच्या कवितेतून पँथरमधील कार्यकर्त्यांचे प्रतिबिंब उत्कटतेने चित्रित झाले आहे. पँथरमधील कार्यकर्त्यांचा लढा हा समतेसाठी होता म्हणून अखेरचा एक जरी माणूस उरला, तरी त्यानं समतेसाठी लढलं पाहिजे असं उत्कटतेनं सांगणारी ही लढाऊबाण्याची कविता आहे. पण वर्तमान वास्तवात चळवळीतील कार्यकर्त्यांत असा लढाऊबाणा राहिलेला दिसत नाही. तो चाळवळीतील कार्यकर्त्यांत निर्माण व्हावा यासाठी कवी सोप्या आणि सर्वसामान्य माणसाला कळणाऱ्या भाषेतून आपल्या मनातील आशय प्रकट करतो. प्रस्तुत संपादनात बाबुराव बागूलांच्या कवितेसह राजा ढाले, प्रमानंद गज्वी यांच्या कविता समाविष्ट करून काव्यसंग्रहाचा एकप्रकारे लौकिकच वाढविला आहे.

नव्वदोत्तरी कालखंडात कवी अरुण काळे, महेंद्र भवरे, उत्तम कांबळे, प्रज्ञा पवार इत्यादींच्या कवितेने मराठी कवितेला नवे वळण आशय दिला. त्यातील अरुण काळे यांच्या कवितेन मराठी अभ्यासकांचे विशेष लक्ष वेधले. कारण या कवीने महानगरीय जीवनासोबत, जागतिकीकरणाचा लंबक समतोलपणे तोलून घरत उत्कट काव्यनिर्मिती केली आहे. खाऊजा प्रक्रियेच्या बाजारू संस्कृतीने सामान्य माणसांवर केलेला आर्थिक कब्जा, त्यातून तळागाळातील सामान्य माणसांची होणारी परवड आणि त्यांच्या एकूणच जगण्यावर केलेल्या परिणामांचा नेमका आलेख चित्रित केला आहे. खरं तर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा तीव्र विरोध करणे, शोषितांना या प्रक्रियेची जाणीव करून देणे हा काळेंच्या कवितेचा प्रमुख स्वर आहे शिवाय जागतिकीकरणाच्या या ग्लोबल व्यवस्थेत सामान्य माणूस रस्त्यातील खड्ड्यांप्रमाणे उखडला जाऊ नये म्हणून ती कविता धडपडत राहते. माहितीच्या महाजालातही लुळे, लंगडे, गंदे, गुंदे ह्यांच्या रोंढ्या-मांढ्या अवयवांना पंख फुटावेत म्हणून 'w.w.w. हे विश्वचि माझा कटोरा. com' ही कविता सर्वसामान्यांना सजग करताना दिसते. त्यांची 'बारकोर्डींगवाल्या मुली' ही कविता समाजातील हरेक संवेदनशील माणसाला विचार करायला प्रवृत्त करणारी आणि माणसातील कोडगेपणावर जबरदस्त प्रहार करणारी कविता आहे. ज्या उदात्त भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला एखाद्या इंडस्ट्रीप्रमाणे सेक्सवर्कर म्हणून काम करावं लागते, त्या वेश्यावर्गांकडे कवीने इथल्या तथाकथित मराठी लेखकांचे लक्ष वेधले आहे.

कवी आ. कि. सोनाने यांनी आपल्या वऱ्हाडी बोलीतून 'आरक्षण' नावाची कविता साकार केली. ही कविता जातीवास्तवाचे पितळ उघडे पाडणारी असून: सध्या या कवितेने फेसबुक व व्हॉट्सअॅपवर लोकप्रियतेचा उच्चांक गाढला आहे. धर्म आणि संस्कृतीच्या गुलामीचा हजारोवर्षाचा इतिहास रेखाटताना उत्तम कांबळे यांची कविता समर्थपणे माणसाच्या जगण्याची भूमिका स्पष्ट करते. आजच्या ग्लोबल वर्तमानाध्ये माणसाचं जीवन कसं सुलभ शौचालयासारखं खालच्या पातळीवर घसरलं, हे अतिशय समर्पक आणि सूचकतेने कवी काशिनाथ वेलदोडे यांनी स्पष्ट केले आहे.

पाराला टिम इंडियाची काळजी/ पारीला फिगरची/ बायकोला सुरकुत्या अन् केसांची काळजी/ डाबरमलला उलची गादी स्वतंत्र खोली / म्हातारा म्हातारीला वृद्धाश्रमाची सावली. (पृ.९६) अशा टोकदार उपरोध व उपहासातून कवी वेलदोडे माणसाला आजच्या बदलत्या वास्तवाचा प्रत्यय आणून देतात. तर कवी विठ्ठल शिंदे यांच्या गेय कवितेला मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेची ओढ लागलेली दिसते.

कवी सिद्धार्थ तांबे यांची 'आंबेडकर चौक' ही कविता या संग्रहातील अतिशय महत्वपूर्ण आणि लक्षणीय कविता म्हणता येईल. मराठी कवितेत मैलाचा दगड ठरावी अशी ही कविता आहे. जागतिकीकरणात मूलतत्ववादी केंद्रे व धर्मांधशक्तीने माणसाला कसे वेढून टाकले आहे. याचे अतिशय बोलके आणि संमर्पक शब्दचित्र तांबे इथे रेखाटतात. इथला हरेक रस्ता व गल्ली देवदैवतांच्या नावाने विख्यात असताना कवीचा मित्र रस्त्याने चालताना गांधळून जातो. मित्राचा गोंधळ अधिक वाढू नये म्हणून कवी म्हणतो-

हॅलो .... गोंधळ उडलाय म्हणतोस,
अरे, पावलो पावली दिशा दाखवायला
देव असताना असं होईलच कसं ?
हॅलो... जरा आवाज वाढव,
माणसाने माणसाकडे थेट यावं
असा सरळ मार्ग इथे नाही दोस्ता!
बरं असं कर, मीच येतो घ्यायला
हलू नाकोस आहेस तिथून
तू आंबेडकर चौकातच थांब
तिथून कुठलाही माणूस अगदी स्पष्ट दिसतो. (पृ.११५)

कवी आपल्या फोनवरील संवादात आपल्या मित्राला म्हणतो की, माणसाने माणसाकडे थेट यावं असा सरळ मार्ग इथे नाही. तो नसावा असेच इथल्या मूलतत्ववादी शक्तीला वाटते. म्हणून सर्वत्र धर्मांधाचा उदो उदो होताना दिसतो आहे. अशा बिकट समयी माणसाला ऊर्जा पुरवायची असेल तर आंबेडकरांचा मानवमुक्ती मार्गच योग्य ठरेल. आजच्या गोंधळ उडवून टाकणाऱ्या वास्तवात आंबेडकरी विचारच त्याला स्पष्ट दिशा शेकतो, त्याला उजेडाचा मार्ग दाखवू शकतो. म्हणून कवीला आंबेडकर चौक इतर मार्गापेक्षा योग्य व दिशादर्शक वाटतो. कारण हा मार्ग, आडमार्ग व अध्यात्माच्या रानात भरकटलेल्या माणसाला मानवतेच्या महामार्गावर आणून सोडतो. अशा उदात्त विचारांचा संस्कार ही कविता देते म्हणून ती वाङ्मयीन दृष्ट्या श्रेष्ठ कविता ठरते.

महासत्तेच्या पीडादानाने सामान्य माणूस कसा हवालदिल झाला याचे अतिशय सूक्ष्म चित्र महेंद्र भवरे यांची कविता रंखाटते. कवीला हे युग पत्थरदिल वाटते. या युगात मानवी संवेदना बोथट झाल्याचे फायबर ग्लास या प्रतिमेतून सूचित होत. मानवी जीवन मूल्यांनाही खग्रास ग्रहण लागल्याचे भवरे कलात्मकतेने सूचित करतात असे म्हणता येईल. कवी गंगाधर अहिरे यांची कविताही याच वळणाची आहे. मराठी कवितेत भाषासौष्ठव, आशय, विषय आणि शैली अभिव्यक्तीच्या दृष्टीने नवे वळण घेऊन मराठी काव्यसृष्टीत प्रचंड उलथापालथ करणारा युगकवी म्हणजे केतन पिंपळापुरे होय. चिंतनशील आणि सशक्त वैश्विक जाणिवेची कविता लिहून पिंपळापुरेंनी मराठी कविता खऱ्या अर्थाने विकसित केली. तसेच ती मराठी कवितेला उंच शिखरावर नेणारी व शिखरदृष्टीने मानवी दुःखाकडे पाहणारी कविता आहे, असे प्रत्ययास येईल.

या ग्लोबल वर्तमानाच्या फांदीवर बसलेला
कॅपिटॅलिझमचा कावळा करतोय कावकाव
संसदेच्या मंदिरावर घिरट्या घालतोय,
मूलतत्ववादी गिधाडांचा वखवखलेला थवा
आणि तुझ्या बोटावरून उडालेलं
पार्लमेंट्री डेमॉक्रिसीचं कबुतर
कंपाऊंडच्या काटेरी तारेवर झालंय रक्तबंबाळ
त्याच्या चोचीतलं प्रिएंबलचं पान कुठे झालं गहाळ ?
(पृ.१७२)

दोनहजारोत्तर काळातील शोषणाचे, अत्याचाराचे आणि सामाजिक बदलाचे व्यापक संदर्भ घेऊन केतन पिंपळापुरेंची कविता नवभांडवलशाहीचा मूलतत्ववाद्यांचा छुपा अजेंडा उघडा करते आहे. लोकशाही शासनव्यवस्थेने सर्वसामान्यांना दिलेले अधिकार नष्ट करण्याचे कार्य ही भांडवलशाही व्यवस्था, मूलतत्ववादी व्यवस्थेच्या हातात हात घालून करू पाहते आहे. त्यामुळे समाजात निर्माण झालेलं शांततेचं रूपांतर हिंसेत होताना दिसते. पार्लमेंट्री डेमॉक्रिसीचं कबुतर कंपाऊंडच्या काटरी तारेवर रक्तबंबाळ झालं या प्रतिमेतून ते सूचित होते. त्यातून खाऊजा प्रक्रियेला पिंपळापुरेंच्या कवितेचा तीव्रपणे विरोध असल्याचे दिसते. भाषा, शैली, व प्रयोगशीलता यादृष्टीने कवी अविनाश गायकवाड, आनंद गायकवाड, उत्तम अंभोरे यांची कविता मराठी कवितेला काही नवे देऊ पाहते आहे. कवी अविनाश गायकवाड यांनी आपल्या कवितेत बोलीभाषेचा सर्जक वापर करून भाषिक प्रयोग केले आहेत. उदा. मातीचं भंड पडो, ठणाकतं आंगांग मनांग या दुखण्यानं असे बोलीतील

शब्दप्रयोग योजून कवितेत भाषिक नवता सिद्ध केली आहे. तृष्णा, माया, वासना, मोह इ. मानवी जीवनातील विषय चिंतनशील पातळीवर साकारून अविनाश गायकवाड यांनी वर्तमान जीवनातील गुंतागुंत नेमकेपणाने टिपली आहे. तर कवी आंनद गायकवाड यांनी चर्मकार व्यवसायातील बोलीभाषेचा उपयोग करून कवितेत नावीन्यता सिद्ध केली. याशिवाय आंनद गायकवाड यांनी मराठी कवितेत एकल शब्द काव्य हा कवितेतील नवा आकृतीबंध साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. हिंदाण हा त्यांचा मराठीतील पहिला एकल शब्द काव्यसंग्रह त्याची साक्ष देतो. असाच यशस्वी प्रयोग कवी प्रशांत वंजारे यांनीही केला आहे. मराठी कवितेत हायकू हा जपानी काव्य प्रकार खऱ्या अर्थाने शिरीष पै यांनी रुजविला. नंतर अनेकांनी मराठीत हायकू लिहिल्या. पण कवी गंगाधर मेश्राम यांनी आंबेडकरी जाणिवेतील हायकूंचा कवितासंग्रह काढून सर्वांचे लक्ष वेधले आहे.

दोनहजारोत्तर काळात ज्या आंबेडकरी कवींचे अनेक कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत, त्या कवींच्या कवितासंग्रहांची शीर्षके पहिली तरी आंबेडकरी कवितेचे स्वरूप, व्याप्ती व संदर्भ बदलल्याचे लक्षात येते. सायरनचे शहर (१९९७), ग्लोबलचे गावकूस (२००४), पत्ता बदलत जानिम (२०००), मी येणाऱ्या पिढीची दिशा घेऊन फिरतोय (२००१), महासत्तेचे पीडादान (२००५), जागतिकीकरणात माझी कविता (२००६), अजूनही अस्वस्थ रोहिणी (२००८), स्थितीचा आला कोलाज(२००७), मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा (२००७), रस्ता साडून चालला कुठं? (२००९), मी महासत्तेच्या दाराशी कटोरा घेऊन उभा राहणार नाही (२०१०), उन्हाच्या कटाविरुद्ध (२०१०), ग्लासनोस्त (२०११), तुरुंगातील अस्वस्थ रात्रींच्या कविता (२०१२), बाकी सर्व ठीक आहे ()२०१५ इ. काव्यसंग्रहाची शीर्षके बोलकी आहेत. त्यासंदर्भात अधिक स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता वाटत नाही. सदर शीर्षकातून नजिकचा वर्तमान जसा उजागर होतो तसे येणाऱ्या भविष्यकाळाचेही सूचन त्यातून प्रकट होताना दिसते.

दोनहजार नंतरचे कवी वेगवेगळया प्रदेशातील असून तर काही महानगरीय आहेत तरी काही ग्रामीण भागातून आलेले आहेत, काही कवी तर अतिशय दुर्गम भागात वास्तव्य करतात. अशा विविध प्रदेशातील कवींमध्ये सुनील अभिमान अवचार, पद्माकर तामगाडगे, विनोद कुमरे, शेषराव धांडे, काशिनाथ वेलदोडे, प्रदीप जाधव, मच्छिंद्र चारमारे, केतन पिंपळापुरे, भूषण रामटेके, अनिल कांबळे, अशाक रा. इंगळे, विनोद बुरबुरे, संजय डोंगरे, प्रमोद अहिरे, प्रशांत वंजारे, अशोक बुरबुरे, आदिनाथ इंगोले, संध्या रंगारी, सतीश मस्के, राजेंद्र कांबळे, राज मेहर, अनिल म्हमाने आदी कवींचा अंतर्भाव करता येईल. हे कवी सशक्तपणे आंबेटकरी कवितेला पुढे नेत आहेत.

तिसऱ्या जगाचे प्रतिनिधित्व करणारी सुनील अवचार यांची कविता महानगरीय जीवनाचा आलेख साकारते या आलेखात सुनील अवचार कॉमन मॅनला उभे करतो. हा कॉमन मॅन अगतिकपणे जीवन जगतो. परंतु एकदिवस त्याच्याही जीवनातील अंधार संपुष्टात येऊन तो सुखी जीवन जगेल हा आशावाद ही कविता व्यक्त करते. कॉमन मॅन सुनील अवचार यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. महानगरातील मिडियाच्या केंद्रस्थानी कॉमन मॅन कधीच नसतो. तिथेही त्याच्या श्रमाला, त्याच्या मूलभूत प्रश्नाला डिलिट बॉक्समध्ये हलक्या हाताने फेकले जाते. तो उपेक्षितच राहतो. 'BPL चा गहू' या कवितेतूनही महानगरीय जीवनाचे चित्रण अत्यंत प्रत्ययकारी पद्धतीने आलेले आहे. एकंदीरीत हे बदललेले महानगर म्हणजे नवे गावकूसच आहे ही खात्री अवचार यांच्या कविता आपल्याला करून देतात. समकालीन समाजवास्तव शब्दाच्या चिमटीत पकडण्याची ताकद सुनील अवचारांच्या कवितेमध्ये निश्चितच आहे. वर्तमानाच्या गाभ्याला भिडणारा हा कवी भाषेच्या, अभिव्यक्तीच्या, प्रतिमेच्या दृष्टीने मराठी कवितेची चौकट फोडून काढतो असे म्हणता येईल.

फँड्री या आंतरराष्ट्रीय कीर्तीप्राप्त चित्रपटाचे दिग्दर्शक नागराज मंजुळे हे मूलतः कवी आहेत. 'उन्हाच्या कटाविरुद्ध' या अर्थपूर्ण शीर्षकाचा त्यांचा कवितासंग्रह २०१० मध्ये प्रसिद्ध झाला. खरं तर फँड्री चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी त्यांनी आपल्या मनातील खदखद कवितेतून अतिशय प्रत्ययकारी पद्धतीने अधोरेखित केलेली आहे. वडार जातीत जन्मास आल्यामुळे त्यांना बालपणापासूनच गरिबीचे आणि जातीय विषमतेचे भयंकर चटके भोगावे लागले. म्हणूनच अवतीभोवती आभाळभर पसरलेल्या उन्हाच्या वेदनेतूनच कवी नागराज मंजुळे यांनी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणारी, सनातन्याचे डावपेच उधळून लावणारी आणि विषमतेविरुद्ध विद्रोहाचा एल्गार पुकारणारी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कविता लिहिली आहे.

ह्या सनातन
बाहरख्याली उन्हाला घाबरून
तू का होते आहेस
एका सुरक्षित खिडकीतील

शोभीवंत बोन्साय
अन् लाचारपणे
मागतेयस सावली.
का तू
उन्हाच्या काटाविरुद्ध
गुलमोहरासारखं
त्वेषानं फुलत नाहीस. (पृ. ४१७)

कवी नागराज मंजुळे याची कविता गुलमोहरासाखं त्वेषानं फुलत उन्हाचे कट रचणाऱ्या व्यवस्थेचे डावपेच ओळखायला लागली. आपल्या स्वार्थासाठी इतरांना उन्हात होरपळत ठेवणाऱ्या सनातन व्यवस्थेविरुद्ध आग ओकू लागली आहे. कारण खाऊजा प्रक्रिया माणसाला माणूस म्हणून मूल्य प्राप्त करू न देता उलट ती व्यवस्था त्या माणसालाच नागविते आहे. त्याला नव्या गावकूसात पुन्हा बंदिस्त करू पाहत आहे. नागराज मंजुळेची कविता लढावूबाणा दाखवत मार्गक्रमण करताना दिसते.

जागतिकीकरणोत्तर काळात मराठी कवितेमध्ये हल्ली इंग्रजी नावांच्या काव्यशीर्षकांचा भरणा अधिक वाढला आहे. त्यामुळेच रॉकगार्डन, सायरनचे शहर, ग्लोबलंचे गावकूस, स्थितीचा ओला कोलाज, ग्लासनोस्त, इत्यादी कवितासंग्रहांची नावे वर्तमानाची गरज म्हणून इंग्रजीत आलेली आहेत. ग्लासनोस्त हा रशियन शब्द असून त्याचा अर्थ खुलेपणा openness असा होतो. परंतु अर्थव्यवहारातील खुलेपणासोबत जीवनाच्या इतर क्षेत्रात जी जीवघेणी स्पर्धा आणि स्पर्धेतील अडथळे अगोदरच ओळखले. म्हणून नव्या पिढीचा हा कवी लिहितो,

मी नव्या पिढीचा शिलेदार,
प्रचंड स्पर्धेच्या महालाटा थोपवणे हे माझे कर्तव्य आहे
जुन्यांचे जनुकं जिवंत ठेवण्याच्या तकलादू धडपडी
प्रतिक्रांती करण्याचे नाना मनसुबे, कट ओळखणे
हे माझे कर्तव्य आहे.
... ...
पिढी नासण्या आधी, सतर्कतेचा इशारा देऊन
तुमचेच दात घशात घालणे हे माझे कर्तव्य आहे.
(पृ. ४२४)

सामाजिक बांधिलकी जोपासणे हे आंबेडकरी कवितेचे मूलभूत वैशिष्ट्यच आहे, त्याचा प्रत्यय डॉ. पद्माकर तामगाडगे यांच्या कवितेतून येतो. तसाच तो या पिढींच्या बहुतेक कवींच्या कवितेतूनही येतो. वस्तुतः ही नवी जनरेशन स्पर्धेला घाबरत नाही, पण स्पर्धेच्या नावाखाली जी सामान्य माणसांच्या महालूट होते आहे. ते पाहून कवी अस्वस्थ होते. कवीला ही अस्वस्थताच आपले कर्तव्य जपायला भाग पडते. कारण नव्या पिढीचे आयुष्य नासण्याआधी तिला सतर्कतेचा इशारा देऊन जागे करण्याची महत्वपूर्ण कमिटमेन्ट कवी जपतो. आणि जुलमी व्यवस्थेला आपले दात घशात घालयला भाग पडताना दिसतो. कवितेतील बोलीभाषा वास्तव साकार करण्यात यशस्वी ठरली आहे.

पाहांदी पारी कुपार लिंगो हे समस्त आदिवासी जनसमूहाचे आदी महापुरुष होऊन गेलेत. त्यांनीच कोया वंशीय गोंडी लोकांना सर्वकल्याणाचा मार्ग दाखविला. म्हणून संपूर्ण कोया वंशीय गोंडी जमातीचे लोक त्यांना आपला प्रवर्तक मानतात. त्यामुळे कोया पुनेम मुठवाचा (अर्थात गोंडी धर्म गुरू) त्यांना मान प्राप्त झाला. या पाहांदी पारी कुपार लिंगोचे विचार कवीला सत् मार्गाकडे नेणारे वाटतात. म्हणून कवी विनोद कुमरे गोंडी पुनेम (सत्मार्ग) गुरु पाहांदी पारी लिंगोचे तत्वज्ञान मानवतावाद असल्याचे स्पष्ट करतात. आणि त्या विचारातूनच कवी विनोद कुमरे संपूर्ण गोंडजमातीला नवे सामाजिक भान प्राप्त करून देतात. व बुद्धाच्या मानवतावादी मार्गावर अनुसरण करायला सूचित करतात असे वाटते.

तुझ्या कुशीत कोयापुंगार फुलताना, लिंगोच्या डोळ्यात दाटले अश्रू
आणि अपार मानवी महाकारुण्याच्या समुद्रात त्याला गवसले मोती
माणसाने माणसाशी कसे वागावे हे सांगताना,
तो विसरला शत्रुच्या छुप्या कारवायांचा बोध,
कपट - कारस्थानाची राजनीती,
संस्कृती संपविण्याचे षडयंत्र
तो बुद्धाच्या अगोदरचा आदि -बुद्धच होता. (पृ.४९२)

आदिवासी संस्कृतीची ऐतिहासिकता सिद्ध करण्यासाठी कवी विनोद कुमरे पाहांदी पारी कुपार लिंगोची अर्थात जेष्ठ गुरुची गोष्ट कथन करून आदिवासी संस्कृतीच्या सर्वव्यापकतेचे प्रत्यकारी दर्शन घडवितात.

कवी अनिल म्हनाने यांची कविता सरळ सरळ मूलतत्ववादी व्यसस्थेवर हल्ला चढवून; त्या व्यवस्थेचा खरा चेहरा उघड करतात. कारण आजवर घडवून आलेल्या परिवर्तनवादी लढ्याला ही मूलत्वत्ववादी व्यवस्थाच प्रामुख्याने अडसर ठरली आहे. म्हणून कवी त्या व्यवस्थेला इशारा देताना म्हणतो की,-

या मूलतत्ववाद्यांना,
एका इशारा, तुम्ही खुशाल माजवा आंतक
आम्ही ओळखलंय तुमच्या नकली चेहऱ्यांना
तुमची असलियत कळलीय माणसांना
....
तरीही मानवतेवर प्रेम करणारी आमची जमात
देतेय संधी पुन्हा एकदा तुमच्यासाठी
सावध व्हा!
माझ्या माणसांना पाठीत वार करण्याची सवय नाही.
(पृ.४४०)

अखिल मानव जातीवर प्रेम करणारी आंबेडकरी विचारदृष्टी हरेक माणसाला आपल्या चुका सुधारण्याची संधी देते. पण आतापर्यंत या मूलतत्ववादी व्यवस्थेने धर्माचा खोटा मुखवटा चढवून अनेक धार्मिक दंगली घडवून आणल्यात. त्या घटनांची नोंद रोजच वर्तपानपत्रात बघायला मिळते. माणसं कापण्यासाठी, माणसाचं माणूसपण हिरावून घेण्यासाठी येथील शोषक प्रवृर्तीनी धर्मांचा वापर मोठ्या खुबीने केला. इथल्या माणसाला धर्माधर्मात विभागून त्यांला लढवत ठेवण्याचा इतिहास कवीला ज्ञात आहे. म्हणून कवी त्यांना यापुढे तुमची हुशारी चालणार नसल्याचा निर्वाणीचा इशारा देतो आहे. प्रस्तुत काव्यग्रंथात अशा अनेक कवींच्या कविता आपलं लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. पण विस्तारभयास्तव त्या सगळ्यांवर भाष्य करणे इथे शक्य नाही.

तात्पर्य, दोनहजारोत्तर आंबेडकरी कवितेचे रूप न्याहाळत असताना मला त्यात कधीच एकसारखेपणा जाणवलेला नाही. उलट प्रस्तुत संग्रहातील आंबेडकरी कवींनी भिन्नभिन्न विषयावर कविता लिहून आंबेडकरी कवितेचे वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. तसा आढावा घेणारी प्रस्तावना संग्रहाला जोडलेली आहेच. त्यातून वर्तमान युगातील समाजवास्तव, जागतिकीकरणातील कवींनी टिपलेला नवा मूल्यबदल, त्याकवींच्या कवितेतून दृग्गोचर होणारी सामाजिक वैशिष्ट्ये यांची सूक्ष्म नोंद डॉ. तामगाडगे यांनी घेतली आहे. शिवाय काही कवींच्या नावाचा त्यांनी नामोल्लेख केला,तोही दीडशे कवींच्या वर आहे. त्यामुळे सर्वच आंबेडकरी कवींच्या कविता या संग्रहात समाविष्ट करणे शक्यच नव्हते. तामगाडगेंनी आपल्या प्रस्तावनेत अनेक कवींच्या सन्मानाने नामोल्लेख करून त्यांची दखल घेतली एवढे मात्र खरे आहे. खरं तर त्या नामोल्लेखावरूनही आंबेडकरी जाणिवेची कविता लिहिणाऱ्या कवींची संख्या व कवितेतील आशयाची व्याप्ती सहज लक्षात येऊ शकते. डॉ. तामगाडगे यांनी त्यातीलच अनेक कवींना यथोचित न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे, असे लक्षात येईल.

एकंदरीत, आंबेडकरी कविता हे मूल्ययुक्त संपादन येणाऱ्या काळातील कवितेच्या अभ्यासकांना निश्चितच 'संदर्भग्रंथ'म्हणून प्रेरक ठरेल असे विश्वासाने म्हणता येते.

आंबेडकरी कविता, संपादक : डॉ. पद्माकर तामगाडगे, प्रकाशक : निर्मिती संवाद, कोल्हापूर, पृष्ठे ६००, किंमत ५५० रुपये.

। डॉ. अशोक रा. इंगळे
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख
डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय,
पातूर, जि. अकोला
भ्रमणभाष : ९४२१७४७४१७

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी

युगवाणी : २०११ ते २०१६ : प्रगती अहवाल

वर्ष २०११ ते २०१६ या कालावधीसाठी विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी श्री. मनोहरराव म्हैसाळकर यांची अविरोध निवड झाल्यानंतर घटना कलम क्रमांक १३ प्रमाणे त्यांनी माझी नामनियुक्त (स्वीकृत) सभासद म्हणून नवीन कार्यकारी मंडळात नियुक्ती केली. दि. ०३ एप्रिल २०११ रोजी नवनिर्वाचित अध्यक्ष, कार्यकारी मंडळ सदस्य व मावळल्या कार्यकारी मंडळातील सदस्य यांची एकत्रित सभा झाली. या सभेत विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या संपादकपदी माझी नियुक्ती केली गेली. २०११ ते २०१६ या कालावधीतील 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या प्रगतीचा अहवाल पुढीलप्रमाणे -

१. प्रस्तुत संपादकाची 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या संपादकपदी निवड झाली तेव्हा या वाङ्मयीन नियतकालिकाचे प्रकाशन सातत्य खंडित झाले होते.

१.१ १९९५ पासून वर्षा सहा महिन्याला एखाद दुसरा अंक तेवढा प्रकाशित होत होता.

१.२ मार्च २०११ मध्ये कार्यकाल संपलेल्या कार्यकारिणीच्या काळात सुरुवातीला 'युगवाणी'चे काही अंक प्रकाशित झाले पण एप्रिल मे जून २००८ नंतर 'युगवाणी'चे अंक निघणे जवळजवळ बंदच होते. एप्रिल मे जून २००८ ते जानेवारी फेब्रुवारी मार्च २०११ या काळात तर एकही अंक प्रकाशित झाला नाही. त्यामुळे अंकेक्षण अहवालात देखील 'युगवाणी' प्रकाशित होत नसल्याबद्दल आक्षेपही नोंदवला गेला होता.

१.३ या नियतकालिकाबाबत वर्गणीदार, लेखक, संस्थेचे आजीव सभासद वारंवार विचारणा करीत होते. या नियतकालिकाचे प्रकाशन सातत्य खंडित झाल्यामुळे विदर्भ साहित्य संघावर टीकाही होत होती.

अशा स्थितीत प्रस्तुत संपादकाकडे या नियतकालिकाच्या संपादक पदाची जबाबदारी दिली गेली.

२. दि. १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१६ या पाच वर्षांच्या काळात 'युगवाणी'चे सर्व अंक प्रकाशित झाले, त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

अंक ०१	एप्रिल-मे-जून २०११, पृष्ठे ६८
अंक ०२	जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०११, पृष्ठे ६८
अंक ०३	आक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०११, पृष्ठे ६८
अंक ०४	जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१२, (वसंत आबाजी डहाके विशेषांक), पृष्ठे १००
अंक ०५	एप्रिल-मे-जून २०१२, पृष्ठे ६८
अंक ०६	जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१२, (ग्रेस विशेषांक), पृष्ठे १८०
अंक ०७ व ०८	आक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१२- जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१३, जोडअंक, पृष्ठे ६८

अनुक्रमणिका

अंक ०९	एप्रिल-मे-जून २०१३, पृष्ठे ६८
अंक १०	जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१३, पृष्ठे ६८
अंक ११	आक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१३, (लेखिका संमेलन विशेषांक), पृष्ठे ८४
अंक १२ व १३	जानेवारी-फेब्रुवारी-मार्च-एप्रिल-मे-जून २०१४, (नामदेव ढसाळ विशेषांक), जोडअंक, पृष्ठे ८४
अंक १४,१५ व १६	: जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१४-जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१५, जोडअंक, पृष्ठे ८४
अंक १७	एप्रिल-मे-जून २०१५, पृष्ठे ८४
अंक १८ व १९	जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५,(भालचंद्र नेमाडे विशेषांक), जोडअंक, पृष्ठे ८४
अंक २०	जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६, पृष्ठे ८४.

एप्रिल-मे-जून २०११ ते जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६ या काळातील एकूण वीस अंकांमध्ये मुखपृष्ठ, मलपृष्ठ, रंगीत पृष्ठे यासह कृष्णधवल पृष्ठे असा सुमारे १२६० पृष्ठांचा मजकूर प्रकाशित झाला.

३. काही वैशिष्ट्ये :

३.१ या पाच वर्षात पाच विशेषांक प्रकाशित झाले.

१. वसंत आबाजी डहाके विशेषांक
२. ग्रेस विशेषांक
३. लेखिका संमेलन विशेषांक
४. नामदेव ढसाळ विशेषांक
५. भालचंद्र नेमाडे विशेषांक

ज्येष्ठ कवी, कादंबरीकार, समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके हे चंद्रपूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्यानिमित्ताने चतुरस्र प्रतिभेचे धनी असणाऱ्या प्रा. वसंत आबाजी डहाके यांचे व्यक्तित्व व साहित्य यांचा साक्षेपी वेध घेणारा वसंत आबाजी डहाके विशेषांक प्रकाशित केला.

कवी ग्रेस आणि कवी, कादंबरीकार नामदेव ढसाळ यांच्या निधनानंतर भारतीय भाषांतील या दोन थोर प्रतिभावंतांच्या व्यक्तित्व आणि साहित्य यांचा साक्षेपी वेध घेणारे दोन विशेषांक प्रकाशित झाले. ग्रेस विशेषांकाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. अंक संपल्यानंतर अभ्यासकांसाठी, रसिकांसाठी अंकाची वेबसाईट तयार करण्यात आली. वर्षभर वेबसाईटवर पी.डी.एफ. स्वरूपात कृष्णधवल व रंगीत पृष्ठांसह अंक उपलब्ध करून देण्यात आला. नामदेव ढसाळ विशेषांकास विचारवंत, समीक्षक, लेखक, चळवळीतील कार्यकर्ते या सर्वांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

विदर्भ साहित्य संघाने नागपूर येथे राज्यस्तरीय लेखिका संमेलन आयोजित केले होते. त्या निमित्त 'युगवाणी'चा लेखिका संमेलन विशेषांक प्रकाशित केला गेला. त्याला उत्तम प्रतिसाद लाभला.

कवी, कादंबरीकार, समीक्षक भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर 'युगवाणी'चा भालचंद्र नेमाडे विशेषांक प्रकाशित झाला.

दरवर्षी एक विशेषांक हे नवे धोरण या पाच वर्षात 'युगवाणी'ने अवलंबिले त्यानुसार पाच दर्जेदार विशेषांक प्रकाशित झाले. १२ नंबरच्या फॉन्ट मधले ए फोर आकाराच्या सुमारे ५३२ पृष्ठांचे हे विशेषांक आहेत. महाराष्ट्राच्या सर्व विभागातील लेखक, समीक्षक, अभ्यासक, कवी, चित्रकार, छायाचित्रकार अशा सुमारे शंभर प्रतिभावंतांचा सहभाग या विशेषांकांमध्ये आहे.

अनुक्रमणिका

३.२ एप्रिल मे जून २०११ या अंकापासून 'युगवाणी'ला अभ्यासक, लेखक, समीक्षक, कवी, चित्रकार अशा सर्व सृजनशील प्रतिभांचा उत्तम प्रतिसाद लाभला. ज्येष्ठ साहित्यिकांसह नवोदित साहित्यिकांनाही हे विचारपीठ आपले वाटू लागले अशा स्थितीत १४ नंबरच्या फॉन्टच्या ६८ पृष्ठांमध्ये जास्तीत जास्त लेखनकृतींचा समावेश करणे कठीण होत होते. एप्रिल मे जून २०११, जुलै ऑगस्ट सप्टेंबर २०११, ऑक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर २०११, जानेवारी फेब्रुवारी मार्च २०१२ या चार अंकानंतर 'युगवाणी'च्या पानांचा आकृतीबंध, मांडणी, फॉन्ट साईज हे सारे बदलवावे लागले. ओळींमधले अंतर कमी करून १२ क्रमांकाच्या फॉन्ट मध्ये मजकूर घेतला. पुढे आणखी प्रतिसाद वाढल्यावर विशेषांक व नियमित अंक यांची पृष्ठसंख्या सारखीच म्हणजे ८४ एवढी करण्यात आली. आक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर २०१३ या अंकापासूनचे सर्व अंक ८४ पृष्ठांचे आहेत. १२ क्रमांकाच्या फॉन्ट मधली ८४ पृष्ठे असा भरगच्च व दर्जेदार, सकस मजकूर 'युगवाणी'ने प्रकाशित केला.

या पाच वर्षांच्या काळात सर्व साहित्यप्रकारात लेखन करणारे साहित्यिक आणि चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार यांचेसह सुमारे तीनशे सृजनशील प्रतिभावंतांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष विनामूल्य सहकार्य 'युगवाणी'ला लाभले आहे. कविता, कथा, ललितगद्य, समीक्षा, संशोधन, आस्वाद, रसग्रहण, मीमांसा, व्यक्तिवेध, मुलाखत असे सर्वप्रकारचे सकस, दर्जेदार साहित्य या पाच वर्षांच्या काळात 'युगवाणी'मधून सातत्याने प्रकाशित झाले. सुमारे १२३० पृष्ठांचा हा संपूर्ण मजकूर आहे.

३.३ या पाच वर्षांच्या काळात 'युगवाणी'ला INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER मिळाला. युगवाणीचा ISSN 2319-6092 हा आहे.

३.४ या पाच वर्षात 'युगवाणी'चा दर्जा व नियमितता या दोन बाबींमुळे अनेक वृत्तपत्रांनी व दूरदर्शनसारख्या प्रसारमाध्यमांनी 'युगवाणी'ची उत्तम दखल घेतली. आज या नियतकालिकाकडे संग्राह्यतामूल्य, संदर्भमूल्य असलेले प्रतिष्ठित वाङ्मयीन नियतकालिक म्हणून सन्मानाने पाहिले जाते.

३.५ विशेषांकासह नियमित अंकाचा दर्जा पाहून अनेक मान्यवरांना या नियतकालिकाचे पूर्वीचे वैभवाचे दिवस आठवले. 'युगवाणी' या नियतकालिकातील साहित्याचा दर्जा, सामाजिक निष्ठा, वैचारिक बांधिलकी, भूमिकांचा स्पष्ट उच्चार वाङ्मयनिष्ठा या बाबींची सर्वस्तरात सुयोग्य दखल घेतली गेली. या नियतकालिकाच्या संपन्न वारशाचे स्मरण करीत सद्यकाळातील रूपस्वरूपामुळे भविष्याबाबत मोठा आशावाद अनेक प्रतिभावंतांनी व्यक्त केला.

३.६ दि. ०१ जानेवारी २०१६ रोजी या नियतकालिकांने एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे. या प्रदीर्घकाळात हे नियतकालिक अनेक संक्रमणांतून गेले आहे. या पाच वर्षात या नियतकालिकाच्या यशाच्या प्रत्येक पायरीपाशी वैभवसंपन्न पूर्वेतिहासाचे स्मरण झाले. या पाच वर्षात या नियतकालिकास गतवैभव पुन्हा प्राप्त झाले. शताब्दीकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकाच्या दर्जा, गुणवत्ता, नियमितता या बाबींचे महाराष्ट्रभर स्वागत आणि कौतुक व्हावे, ही बाब संस्थेसाठी निश्चितच अभिमानास्पद आहे.

३.७ या पाच वर्षांतील 'युगवाणी'चे यश हे विदर्भ साहित्यसंघाचे यश आहे. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहरराव म्हैसाळकर व केंद्रीय कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी व सदस्य या सर्वांसह कार्यालयातील आणि ग्रंथालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी 'युगवाणी'ला निरपेक्ष सहकार्य केले. या सर्वांच्या सहकार्यामुळेच 'युगवाणी'ला यश मिळाले.

३.८ या पाचवर्षात सुमारे तीनशे साहित्यिकांसह चित्रकार, छायाचित्रकारांनी 'युगवाणी'ला विनामूल्य सहकार्य केले, लेखन सहकार्य करणारे साहित्यिक, चित्रे, छायाचित्रे देणारे कलावंत यांच्या साहित्यकृती, चित्रकृतींचे आर्थिक मोल करताच येत नाही, या सर्व साहित्यिकांनी, कलावंतांनी 'युगवाणी' आपल्या लेखनकृती व चित्रकृती उदार अंतःकरणाने दिल्या, मानधनाची कधीच अपेक्षा केली नाही, यापैकी अनेकांना 'युगवाणी'चा अंक देखील मिळाला नाही. पण त्यांनी साधा तक्रारीचा सूर देखील कधी काढला नाही. या लेखक व कलावंतांमुळे 'युगवाणी' हे नियतकालिक यशस्वी झाले आहे. या सर्व साहित्यिक आणि कलावंतांनी प्रस्तुत संपादकाच्या कार्यावर विश्वास दाखवून निरपेक्ष सहकार्य केले. या सर्व साहित्यिक व कलावंतांचा व्यक्तीशः नामोल्लेख या अहवालात करता येणे अशक्य आहे. तथापि प्रस्तुत संपादकाचे 'युगवाणी'साठी निरपेक्ष सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाशी अत्यंत जवळचे नाते निर्माण झाले आहे. 'युगवाणी'या नियतकालिकाचा संपादक या नात्याने विदर्भ साहित्य संघाच्यावतीने या सर्वांचे मनःपूर्वक आभार. प्रस्तुत

अनुक्रमणिका

संपादकास समजून घेऊन या सर्व साहित्यिक कलावंतांनी जे अमूल्य सहकार्य केले, त्याबद्दल प्रस्तुत संपादक व्यक्तीशः या सर्वांच्या कायम ऋणात आहे.

३.९ या पाच वर्षातील वीस अंकांचे मुद्रितशोधन करण्याकरिता आर्थिक मोबदला देऊन स्वतंत्र व्यवस्था करता आली नाही. तथापि प्रस्तुत संपादकाच्या काही मित्रांनी स्वेच्छेने व विनामूल्य हे कार्य केले. व्यावसायिक व तंत्रकुशल मुद्रितशोधकाची उणीव पाचवर्षे जाणवू न देण्याइतपत कार्य या मंडळींनी केले. त्यांचे कार्य दोषरहित होते असे म्हणता येत नाही पण संस्थात्मक कार्य हे टिमवर्क असते. ते करीत असताना बरेचदा काही तडजोडी कराव्या लागतात. कधीकधी अंक तातडीने म्हणजे पंधरा दिवसात तयार करण्याची जोखीमही पत्करावी लागत होती. अशावेळी ही मित्रमंडळी अहोरात्र मदत करीत होती. वसंत आबाजी डहाके विशेषांक, ग्रेस विशेषांक, लेखिका संमेलन विशेषांक यांसह काही अंकही अगदी प्रकाशनाचा दिवस ठरवून पंधरादिवसांच्या अवधीत प्रकाशित करण्यासाठी अक्षरजुळवणी, मुद्रितशोधन तयार करणे, पृष्ठमांडणी, पृष्ठसजावटीसह मुद्रणप्रत ही सारी कामे करण्यासाठी कितीतरी मित्र धावून येत होते. या मित्रांची कुठलीही अपेक्षाही नव्हती. पडद्यामागे राहून अंक न निघण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न करून अंकाचे श्रेय लाटण्याची परंपरा असताना प्रस्तुत संपादकाच्या मित्रांनी केलेले निरपेक्ष सहकार्य फार मोलाचे आणि महत्त्वाचे आहे. या सर्व मित्रांच्या कायम ऋणात राहणे प्रस्तुत संपादकास पसंत आहे.

३.१० प्रस्तुत संपादकाला वैयक्तिक देणगीसह आजीवन सभासद वर्गणी व 'युगवाणी'चे वर्गणीदारांचे शुल्क या स्वरूपात सुमारे पंचावन हजार रुपयांचा निधी वेळोवेळी संस्थेस देता आला. [धनादेश क्र. २३७२७६ (दि.०२.०८.२०११), २६१८२४ (दि.१०.०३.२०१२), २६१८२६ (दि.१०.०४.२०१२), २६१८३० (दि.०३.०५.२०१२), २६१८३१ (दि.१५.०५.२०१२), २३७२८० (दि.०३.०८.२०१२), १५५७०२ (दि.३१.०८.२०१२), ००६६५७ (दि.१६.११.२०१३), ००६६५९ (दि.२३.१२.२०१३), ००६६६० (दि.१५.०१.२०१४), ०२१३३२ (दि.१५.०३.२०१६) एकूण ५६१०० रुपये, सर्व धनादेश बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वणी] तथापि लेखक, कलावंत ही सारी मंडळी युगवाणीस विनामूल्य सहकार्य करीत असल्यामुळे युगवाणीच्या कार्याची स्टेशनरी, पोस्टेज, फोन, प्रवास, ग्रेस विशेषांकाच्या वेबसाईटचा खर्च व इतर खर्च घेणे प्रस्तुत संपादकास आवश्यक वाटले नाही. दर तीन महिन्यांनी होणाऱ्या सभेसाठी होणाऱ्या प्रवासाचा एस टी बसच्या तिकिटीचा खर्च घेण्याव्यतिरिक्त कुठल्याही खर्चाचे देयक सादर करून आर्थिक रक्कम प्रस्तुत संपादकाने संस्थेकडून घेतली नाही. संस्थात्मक विधायक कार्य व साहित्य चळवळीचे कार्य करताना वैयक्तिक खर्च, श्रम यांचा उल्लेखही करण्याची गरज नसते. 'युगवाणी'त प्रसिद्ध केलेल्या एकेका रंगीत चित्राचे व्यावसायिक मूल्य फार मोठे आहे. पण ही सारी चित्रे व साऱ्या साहित्यकृती 'युगवाणी'ला विनामूल्य मिळाल्या. 'युगवाणी' ही विधायक अशी वाङ्मयीन चळवळ आहे. वाङ्मयीन पर्यावरणाला न्याय देणारे ते विचारपीठ आहे. या वाङ्मयीन चळवळीसाठी, या विचारपीठासाठी विदर्भ साहित्य संघासह संपादक, लेखक, कलावंत अशा साऱ्यांनीच साहित्य, कलाकृती, वेळ, श्रम व अर्थसहाय्य करण्याची गरज असते, हे करण्यासाठी विदर्भ साहित्य संघासारख्या संस्था प्रेरक ठरत असतात. गेल्या सत्तर वर्षांपासून संपादक, लेखक, कलावंत यांसह ही संस्था 'युगवाणी' या नियतकालिकासाठी साहित्य, कलाकृती, वेळ, श्रम व अर्थसहाय्य यांचे निःस्पृह योगदान देत आली आहे. प्रस्तुत संपादकास लेखक, कलावंत, संस्था यांच्या निःस्पृह सहकार्याची प्रचिती आली. 'युगवाणी' या सत्तरवर्षाच्या वाङ्मयीन चळवळीत पाच वर्षे सहभाग घेण्याची संधी कार्यकर्ता असणाऱ्या प्रस्तुत संपादकास लाभली. ही पाच वर्षे जशी 'युगवाणी'स नवा आकार व आयाम देणारी ठरली असावी तशी प्रस्तुत संपादकाच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वासही प्रेरक ठरली.

४. पाच वर्षांचा कालावधी हा फार मोठा नाही. वाङ्मयीन नियतकालिकांच्या पडझडीच्या काळात एखादे नियतकालिक सदाचार निष्ठा, नैतिकता, बांधिलकी सांभाळून नव्याने उभे करणे हे अत्यंत जिकरीचे काम आहे. पण विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहरराव म्हैसाळकर हे प्रस्तुत संपादकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले, म्हणूनच 'युगवाणी'ने पाच वर्षांच्या काळात हे यश मिळविले, आणि 'युगवाणी'चे संपादनाचे काम प्रस्तुत संपादक निष्ठेने व निर्भीडपणे करू शकला. त्याबद्दल श्री. मनोहरराव म्हैसाळकर यांचे मनःपूर्वक आभार. विदर्भ साहित्य संघाच्या २०११ ते २०१६ या काळातील कार्यकारिणीने प्रस्तुत संपादकास सहकार्य केले, कार्यकारिणीतील प्रत्येक पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार. कार्यालय व ग्रंथालयाचे सहकार्य या कार्यात आवश्यकच असते, त्यांचेही मनःपूर्वक आभार. 'युगवाणी'चे मुद्रक व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

५. या पाच वर्षांतील 'युगवाणी'च्या यशाचा आलेख नोंदवीत असताना आव्हानांचा विचार करणे देखील अपरिहार्य आहे.

अनुक्रमणिका

शताब्दीकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या 'युगवाणी'या वाङ्मयीन नियतकालिकासमोरची आव्हाने अजून संपलेली नाहीत, उलट ती वाढतच आहेत.

५.१ तटपुंज्या आर्थिक अनुदानात नियतकालिक चालविताना संस्थेची आर्थिक दृष्ट्या मोठी ओढाताण होत असते. अशा स्थितीत वर्गणीदार, जाहीरातदार यांचा विश्वास संपादन करून वर्षाचे चार अंक नियमित व वेळेवर प्रकाशित करण्यासाठी लागणारी कायमस्वरूपी आर्थिक तरतूद या संस्थेस करावी लागणार आहे. मुद्रण, कागद, छपाई, मुद्रितशोधन, अक्षरजुळवणी, मांडणी सजावट यांचे वाढणारे दर लक्षात घेता, 'युगवाणी'च्या खर्चाची कायमस्वरूपी योजना करावी लागणार आहे.

५.२ वर्गणीदार होणाऱ्या प्रत्येकाला, लेखन सहकार्य करणाऱ्या आणि कलाकृतींचे सहकार्य करणाऱ्या प्रत्येक साहित्यिकास व कलावंतास 'युगवाणी'चा अंक मिळालाच पहिजे, अंक मिळणे वर्गणीदार, लेखक, कलावंतासह 'युगवाणी'स सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाचा हक्क आहे व अंकाचे निर्दोष वितरण हे विदर्भ साहित्य संघाचे कर्तव्य आहे, ही भावना निर्माण होणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या या काळात सारे जग एक खेडे झालेले असताना थातुरमातूर सबबी आणि अनाठायी शंकाकुशंका व्यक्त करीत अंकाच्या सदोष वितरणाचे समर्थन येणाऱ्या काळात करता येणार नाही. वर्गणीदारांची वर्गणी हवी असेल तर समंजस, संयमी, कर्तव्यतत्पर अशी निर्दोष वितरण व्यवस्था निर्माण करावी लागेल.

५.३ विचारांची लढाई विचारांनी लढण्याचा बाणा असलेल्या या नियतकालिकाने सवंग लाभासाठी नैतिकता, निष्ठा, विचार यांची कास सोडली नाही. सभोवतीच्या मूल्यभ्रष्ट वातावरणातही नैतिकता, वैचारिक बांधिलकी जपत विधायक विचारांचा स्वीकार, प्रचार व प्रसार हे नियतकालिक करीत राहिले. वाङ्मयीन नियतकालिकांची पडझड व मृत्यू होत असताना आणि अवाङ्मयीन मूल्यभ्रष्टता वाङ्मयीन निष्ठांच्या मानगुटीवर बसू पाहत असतानाही हे नियतकालिक तत्त्वशून्य तडजोडी न करता ताठ मानेने उभे आहे. येणारा काळ हा आणखी कठीण आव्हानांचा असणार आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या अपप्रवृत्ती, मूल्यभ्रष्टता, स्वातंत्र्य, समता, बंधुता या प्रकाशमूल्यांवरील हल्ले, संविधान व लोकशाहीमूल्यांवरील आक्रमणे आदी अनेक संकटांचा सामना करीत असताना वाङ्मयीन पर्यावरण निर्भय, निरोगी, मूल्याधिष्ठित, संविधान व लोकशाहीविचारांचा पुरस्कार करणारे असे ठेवण्यासाठी 'युगवाणी' या विचारपीठाने सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे. वाङ्मय व्यवहारातील व कलाव्यवहारातील विधायक उपक्रमांना, चळवळींना व सृजनशील प्रतिभांना 'युगवाणी' हे विचारपीठ हक्काचे, आपले वाटले पाहिजे, सर्व विधायक विचारधारा व सृजनशील आविष्कार 'युगवाणी'तून प्रस्फुटित झाले पाहिजे. हा पाच वर्षांचा कालावधी या दृष्टीने 'युगवाणी'साठी महत्त्वपूर्ण ठरला. पण अजून बराच पल्ला गाठावयाचा आहे. या साहित्यसंस्थेच्या प्रत्येक आजीव सभासदाने 'युगवाणी'ची वर्गणी भरून हे नियतकालिक नियमित वाचण्याची सवय करून घेण्याएवढी जागरुकता निर्माण करणे व साहित्य व कला व्यवहारातील सर्व प्रवाहांना हे नियतकालिक वर्गणी भरून वाचता येण्याची कृतिशीलता निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे.

५.४ आजच्या इंटरनेटच्या, माहिती तंत्रज्ञानाच्या, स्मार्ट फोनच्या युगात या वाङ्मयीन नियतकालिकाच्या मुद्रित आवृत्तीसह ई आवृत्तीचीही गरज भासणार आहे. ग्रेस विशेषांकाच्या वेळी 'युगवाणी'च्या वेबसाईट द्वारे हजारो वाचकांना विशेषांक उपलब्ध करून देण्याचा प्रयोग प्रस्तुत संपादकाने यशस्वीरित्या केला. तेव्हा वेबसाईट, ई-आवृत्तीची किती गरज आहे त्याचाही प्रत्यय आला. 'युगवाणी'ची वर्गणी सरळ बँक खात्यात भरता येण्यासह हे नियतकालिक ऑनलाईन करून साऱ्या जगातल्या मराठी भाषकांपर्यंत पोहोचवावे लागणार आहे.

नजीकच्या भविष्यकाळात 'युगवाणी' ही सारी आव्हाने पेलून यशाचे शिखर गाठेल, असा विश्वास प्रस्तुत संपादकास वाटतो. विदर्भ साहित्य संघास उज्ज्वल यश, समृद्धी व भरभराट लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करीत असताना प्रस्तुत संपादकास अतिशय आनंद होत आहे. विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. मनोहरराव म्हैसाळकर यांना व त्यांच्या नेतृत्वातील नव्या कार्यकारिणीला मनःपूर्वक सदिच्छा. 'युगवाणी' या वाङ्मयीन नियतकालिकास यश, समृद्धीसाठी मनःपूर्वक सदिच्छा.

। डॉ. अजय देशपांडे
संपादक 'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

शताब्दीकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या 'युगवाणी'या वाङ्‌मयीन नियतकालिकासमोरची आव्हाने अजून संपलेली नाहीत, उलट ती वाढतच आहेत.

५.१ तटपुंज्या आर्थिक अनुदानात नियतकालिक चालविताना संस्थेची आर्थिक दृष्ट्या मोठी ओढाताण होत असते. अशा स्थितीत वर्गणीदार, जाहीरातदार यांचा विश्वास संपादन करून वर्षाचे चार अंक नियमित व वेळेवर प्रकाशित करण्यासाठी लागणारी कायमस्वरूपी आर्थिक तरतूद या संस्थेस करावी लागणार आहे. मुद्रण, कागद, छपाई, मुद्रितशोधन, अक्षरजुळवणी, मांडणी सजावट यांचे वाढणारे दर लक्षात घेता, 'युगवाणी'च्या खर्चाची कायमस्वरूपी योजना करावी लागणार आहे.


५.२ वर्गणीदार होणाऱ्या प्रत्येकाला, लेखन सहकार्य करणाऱ्या आणि कलाकृतींचे सहकार्य करणाऱ्या प्रत्येक साहित्यिकास व कलावंतास 'युगवाणी'चा अंक मिळालाच पहिजे, अंक मिळणे वर्गणीदार, लेखक, कलावंतासह 'युगवाणी'स सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाचा हक्क आहे व अंकाचे निर्दोष वितरण हे विदर्भ साहित्य संघाचे कर्तव्य आहे, ही भावना निर्माण होणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या या काळात सारे जग एक खेडे झालेले असताना थातुरमातूर सबबी आणि अनाठायी शंकाकुशंका व्यक्त करीत अंकाच्या सदोष वितरणाचे समर्थन येणाऱ्या काळात करता येणार नाही. वर्गणीदारांची वर्गणी हवी असेल तर समंजस, संयमी, कर्तव्यतत्पर अशी निर्दोष वितरण व्यवस्था निर्माण करावी लागेल.

५.३ विचारांची लढाई विचारांनी लढण्याचा बाणा असलेल्या या नियतकालिकाने सवंग लाभासाठी नैतिकता, निष्ठा, विचार यांची कास सोडली नाही. सभोवतीच्या मूल्यभ्रष्ट वातावरणातही नैतिकता, वैचारिक बांधिलकी जपत विधायक विचारांचा स्वीकार, प्रचार व प्रसार हे नियतकालिक करीत राहिले. वाङ्‌मयीन नियतकालिकांची पडझड व मृत्यू होत असताना आणि अवाङ्‌मयीन मूल्यभ्रष्टता वाङ्‌मयीन निष्ठांच्या मानगुटीवर बसू पाहत असतानाही हे नियतकालिक तत्त्वशून्य तडजोडी न करता ताठ मानेने उभे आहे. येणारा काळ हा आणखी कठीण आव्हानांचा असणार आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या अपप्रवृत्ती, मूल्यभ्रष्टता, स्वातंत्र्य, समता, बंधुता या प्रकाशमूल्यांवरील हल्ले, संविधान व लोकशाहीमूल्यांवरील आक्रमणे आदी अनेक संकटांचा सामना करीत असताना वाङ्‌मयीन पर्यावरण निर्भय, निरोगी, मूल्याधिष्ठित, संविधान व लोकशाहीविचारांचा पुरस्कार करणारे असे ठेवण्यासाठी 'युगवाणी' या विचारपीठाने सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे. वाङ्‌मय व्यवहारातील व कलाव्यवहारातील विधायक उपक्रमांना, चळवळींना व सृजनशील प्रतिभांना 'युगवाणी' हे विचारपीठ हक्काचे, आपले वाटले पाहिजे, सर्व विधायक विचारधारा व सृजनशील आविष्कार 'युगवाणी'तून प्रस्फुटित झाले पाहिजे. हा पाच वर्षांचा कालावधी या दृष्टीने 'युगवाणी'साठी महत्त्वपूर्ण ठरला. पण अजून बराच पल्ला गाठावयाचा आहे. या साहित्यसंस्थेच्या प्रत्येक आजीव सभासदाने 'युगवाणी'ची वर्गणी भरून हे नियतकालिक नियमित वाचण्याची सवय करून घेण्याएवढी जागरुकता निर्माण करणे व साहित्य व कला व्यवहारातील सर्व प्रवाहांना हे नियतकालिक वर्गणी भरून वाचता येण्याची कृतिशीलता निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे.

५.४ आजच्या इंटरनेटच्या, माहिती तंत्रज्ञानाच्या, स्मार्ट फोनच्या युगात या वाङ्‌मयीन नियतकालिकाच्या मुद्रित आवृत्तीसह ई आवृत्तीचीही गरज भासणार आहे. ग्रेस विशेषांकाच्या वेळी 'युगवाणी'च्या वेबसाईट द्वारे हजारो वाचकांना विशेषांक उपलब्ध करून देण्याचा प्रयोग प्रस्तुत संपादकाने यशस्वीरित्या केला. तेव्हा वेबसाईट, ई-आवृत्तीची किती गरज आहे त्याचाही प्रत्यय आला. 'युगवाणी'ची वर्गणी सरळ बँक खात्यात भरता येण्यासह हे नियतकालिक ऑनलाईन करून साऱ्या जगातल्या मराठी भाषकांपर्यंत पोहोचवावे लागणार आहे.


नजीकच्या भविष्यकाळात 'युगवाणी' ही सारी आव्हाने पेलून यशाचे शिखर गाठेल, असा विश्वास प्रस्तुत संपादकास वाटतो. विदर्भ साहित्य संघास उज्ज्वल यश, समृद्धी व भरभराट लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करीत असताना प्रस्तुत संपादकास अतिशय आनंद होत आहे. विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. मनोहरराव म्हैसाळकर यांना व त्यांच्या नेतृत्वातील नव्या कार्यकारिणीला मनःपूर्वक सदिच्छा. 'युगवाणी' या वाङ्‌मयीन नियतकालिकास यश, समृद्धीसाठी मनःपूर्वक सदिच्छा.

। डॉ. अजय देशपांडे
संपादक 'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ, नागपूर



एप्रिल
मे
जून
२०११


एप्रिल
मे
जून
२०१२





जुलै
ऑगस्ट
सप्टेंबर
२०११


ग्रेस विशेषांक
●
जुलै
ऑगस्ट
सप्टेंबर
२०१२






ऑक्टोबर
नोव्हेंबर
डिसेंबर
२०११


ऑक्टोबर
२०१२
ते
मार्च
२०१३






वसंत आवाजी डहाके
विशेषांक
●
जानेवारी
फेब्रुवारी
मार्च
२०१२

एप्रिल
मे
जून
२०१३



अनुक्रमणिका



जुलै
ऑगस्ट
सप्टेंबर
२०१३

एप्रिल
मे
जून
२०१५






लेखिका संमेलन
विशेषांक
●
ऑक्टोबर
नोव्हेंबर
डिसेंबर
२०१३


भालचंद्र नेमाडे
विशेषांक
●
जुलै
ते
डिसेंबर
२०१५






नामदेव ढसाळ
विशेषांक
●
जानेवारी
२०१४
ते
जून
२०१४

जानेवारी
फेब्रुवारी
मार्च
२०१६





जुलै
२०१४
ते
मार्च
२०१५

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी

संपर्क :
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त : जानेवारी २०१६ ते मार्च २०१६

■

०३ जानेवारी २०१६ : विदर्भ साहित्य संघाच्या 'स्वरमंडल' या उपक्रमाअंतर्गत एका संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. उदय गुप्ते ह्यांच्या सतार वादनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. सुप्रसिद्ध गायिका डॉ. कल्याणी देशमुख ह्यांना बालगंधर्व पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा ज्येष्ठ नाटककार प्रा. महेश एलकुंचवार ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. एलकुंचवार ह्यांचे स्वागत सरचिटणीस डॉ. विलास चिंतामण देशपांडे ह्यांनी केले. या प्रसंगी डॉ. कल्याणी देशमुख ह्यांच्या गायनाचा आनंद श्रोत्यांनी घेतला. संवादिनीवर संदीप गुरुनले आणि तबलावर सचिन बस्ती ह्यांनी साथ दिली.

४ जानेवारी २०१६ : कवीश्रेष्ठ पद्मभूषण मंगेश पाडगावकर ह्यांना संस्थतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी डॉ. आशा सावदेकर, डॉ. प्रज्ञा आपटे व प्रकाश एदलाबादकर ह्यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

५ जानेवारी २०१६ : देशातील कामगार व डाव्या पुरोगामी चळवळीचे सर्वोच्च समर्पित असे ज्येष्ठतम् नेतृत्त्व राहिलेले कॉम्रेड भाई बर्धन यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शोकसभेच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते. याप्रसंगी डॉ. रतिनाथ मिश्रा, डॉ. वि. स. जोश व प्रा. रणजित मेश्राम ह्यांनी आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

१४ जानेवारी २०१६ विदर्भ साहित्य संघाचा ९३ वा वर्धापनदिन संस्थेच्या सभागृहात संपन्न झाला. या प्रसंगी महाधिवक्ता ॲड्. श्रीहरी अणे प्रमुख उपस्थितीत होत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मनोहर म्हैसाळकर ह्यांनी भूषविले. संस्थेचे विश्वस्त डॉ. चंद्रशेखर मेश्राम व उपाध्यक्ष वामन तेलंग व्यासपीठावर विराजमान होते. या प्रसंगी ६५ व्या विदर्भ साहित्य संघाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सदानंद देशमुख व सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानबद्दल श्री. सदानंद फुलझेले ह्यांचा विशेष सत्कार विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर ह्यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेच्या वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळा याप्रसंगी पार पडला. पुरस्कार विजेत्यातर्फे ई. झेड्. खोब्रागडे ह्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन मुखपत्र असलेल्या 'युगवाणी' या नियतकालिकामध्ये १९७६ - २००१ या काळात प्रसिद्ध झालेल्या निवडक लेखांचा समावेश असलेल्या 'निवडक युगवाणी भाग-२' या ग्रंथाचे प्रकाशन ॲड् श्रीहरी अणे ह्यांच्या हस्ते करण्यात आले. या भागाचे संपादन वामन तेलंग ह्यांनी केले आहे. प्रास्ताविक प्रकाश एदलाबादकर यांनी केले. शुभदा फडणवीस यानी सूत्रसंचालन केले आणि डॉ. विलास चिंतामण देशपांडे यांनी आभार मानले.

२३ जानेवारी २०१६ : ज्येष्ठ पत्रकार आणि समाजशास्त्राचे अभ्यासक डॉ. अरुण टिकेकर ह्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष वामन तेलंग होते. डॉ. टिकेकर ह्यांच्या भगिनी. सौ. सुनंदा मोहनी व दिवाकर मोहनी, सुरेश भुसारी ह्यांनी या प्रसंगी आपल्या संवदेना व्यक्त केल्या.

२८ जानेवारी २०१६ : विदर्भ साहित्य संघ व सर्व आंबेडकरी संघटना ह्यांच्या वतीने डॉ. यशवंत मनोहर ह्यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ कवी भाऊ पंचभाई ह्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी जोगेंद्र कवाडे, जाबुवंतराव धोटे, जैमिनी कडू, ताराचंद्र खांडेकर, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, आदिंनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्यात.

२९, ३० व ३१ जानेवारी २०१६ : विदर्भ साहित्य संघाचे ६५ वे विदर्भ साहित्य संमेलन चंद्रपूर येथे संपन्न झाले. चंद्रपूरच्या मनोवेध सांस्कृतिक प्रतिष्ठान या सांस्कृतिक संस्थेने संमेलनाचे आयोजन केले. संमेलनाचे उद्घाटन चित्रपट कथा लेखक शैलेंद्र रोडे ह्यांनी केले. तर समारोप राज्याचे अर्थ, वित्त व वन मंत्री

सुधीर मुनगंटीवार ह्यांची हस्ते झाले. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलानचे अध्यक्ष डॉ. सदानंद देशमुख होते स्वागताध्यक्ष विजय बदखल, कार्याध्यक्ष प्रशांत आर्वे व कार्यकर्त्यांनी संमेलन यशस्वी होण्यात मेहनत घेतली. या संमेलनात डॉ. जब्बार पटेल ह्यांची प्रकट मुलाखत हे विशेष आकर्षण होते.

२ फेब्रुवारी २०१६ : विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष वामन तेलंग ह्यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुळकर्णी ह्यांना आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी डॉ. मदन कुळकर्णी, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. श्याम माधव धोंड, डॉ. वैशाली बेझलवार ह्यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्यात.

१० फेब्रुवारी २०१६ : २०१६-२०२१ या कार्यकालासाठी विदर्भ साहित्य संघाची निवडणूक होऊन अविरोध निवडून आलेल्या सदस्यांची यादी निवडणूक अधिकारी मोहन पारखी ह्यांनी जाहीर केली. विद्यमान अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर ह्यांची पुन्हा अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. कार्यकारी सदस्यासाठी, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, वामन तेलंग, शुभदा फडणवीस, प्रकाश एदलाबादकर, डॉ. विलास चिंतामण देशपांडे, विलास मानेकर, नरेश सबजीवाले, डॉ. इंद्रजित ओरके, संयोगिता धनवटे, नरेंद्र लांजेवार, प्रदीप दाते, मोना चिमोटे, पदमूरेखा धनकर-वानखेडे, अनिल नितनवरे, प्रा. राजन जयस्वाल, राजश्री धामोरीकर, बाबाराव मुसळे, मा. गं. सरपटवार, गजानन नारे, उदय पाटणकर, विकास लिमये, भाग्यश्री बनहट्टी ह्यांची अविरोध निवड झाली.

। डॉ. विलास चिंतामण देशपांडे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ,नागपूर

।। विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन ।।

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्या संबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९ (बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. प्रकाशन स्थळ :

नागपूर, महाराष्ट्र

०२. प्रकाशनाची कालनियतता :

त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, आक्टोबर)

०३. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :

डॉ. विलास चिंतामण देशपांडे, भारतीय, सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२.

०४. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :

अॅड्. वासुदेव लक्ष्मणराव विधाते, भारतीय, अॅक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०५. मुद्रणस्थळ :

अॅक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०६. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :


डॉ. अजय जनार्दन देशपांडे, भारतीय, वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४

मी डॉ. विलास चिंतामण देशपांडे असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

। डॉ. विलास चिंतामण देशपांडे
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर (प्रकाशक)

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६



चित्र : मंगेश नारायणराव काळे

अनुक्रमणिका


मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६

अनुक्रमणिका